वसई धर्मप्रांत

ऑक्टोबर २०२६

# सुवार्ता

स्थापना १५ ऑगस्ट १९५५

श्रद्धेच्या प्रकाशात
संपन्न जीवनासाठी



## BASSEIN CATHOLIC CO-OPERATIVE BANK LTD

ESTD.1918

(SCHEDULED BANK)

# BCCB RETAIL LOANS



*Your Dreams, Our Commitment.*

**Flexible Loans • Attractive Rates • Quick Approvals**

| | |
|---|---|
| HOME LOAN | @ 7.35%* |
| PMLN LOAN | @ 9.50%* |
| VEHICLE LOAN (CAR LOAN) | @ 7.75%* |
| BDLN LOAN | @ 10.25%* |
| EDUCATION LOAN | @ 8.50%* |
| PERSONAL LOAN | @ 12.50%* |
| • BCCB GURU GAURAV LOAN | @ 9.00%* |
| • BCCB SAKHI LOAN | @ 9.00%* |
| SOLAR LOAN | @ 8.25%* |
| CASH CREDIT / BD ODCC LOAN | @ 10.00%* |
| ORNAMENT LOAN | @ 7.95%* |
| SHOP / GALA LOAN | @ 8.60%* |

Interest Rates are subject to change as per Bank's discretion.

LOW INTEREST
HIGH TRUST
BETTER TOMORROW

QUICK
PROCESSING
MINIMUM
DOCUMENTATION

YOUR TRUSTED
FINANCIAL PARTNER
SINCE 1918

* T&C Apply

TOLL FREE NO.:
08069420000

VISIT YOUR NEAREST
BCCB BRANCH TODAY!

www.bccb.bank.in

# सुवार्ता ८५५

स्थापना : १५ ऑगस्ट १९५५

**ऑक्टोबर २०२६**

**वर्ष ७२ / अंक ३ / मूल्य रु. २०/-**

**संपादक : फा. (डॉ.) जोएल डिकुना**

**संपादक मंडळ :** फा. रॉबर्ट गोन्साल्वीस
फा. डॉमनिक डिआब्रिओ, फा. जॉनी निग्रेल

**सहकार्य :** जॉन गोन्सालविस, जॉन परेरा
हेलन डिसिल्वा, नाझरेथ अथाईत
लुकस परेरा

**मुखपृष्ठ रचना :** सुमित परेरा

**रेखाचित्रे :** रॉबर्ट परेरा

**अक्षरजुळणी :** रिटा डाबरे

**कार्यालयीन सहकार्य :** रेजीना अथाईत



**'सुवार्ता' कार्यालय**
जीवन दर्शन केंद्र, गिरीज
वसई, महाराष्ट्र - ४०१ २०१.

**मोबाईल नंबर्स**

**'सुवार्ता' कार्यालय : 97 02 09 02 31**

**जीवन दर्शन केंद्र : 97 02 09 02 32**

**वेळ : सोमवार ते शनिवार**
सकाळी ९.३० ते दुपारी १२.३०
दुपारी २.३० ते संध्या. ५.३०

E-mail : suvartavasai@gmail.com
Web. : www.suvarta.org


## अंर्तनाद

**पोपमहोदयांचा ऑक्टोबर महिन्यातील प्रार्थना हेतू**

**: मानसिक आरोग्यसेवाकार्यासाठी प्रार्थना :**



मानसिक आजार असलेल्या व्यक्तींसंबंधीचा कलंक आणि भेदभाव दूर करण्यास मदत करण्यासाठी अखिल ख्रिस्त-सभेत मानसिक आरोग्य सेवाकार्य सुरू व्हावे म्हणून आपण प्रार्थना करूया.

**आविलाची संत तेरेजा (१५१५-१५८२)**
**स्मृतिदिन : १५ ऑक्टोबर**



'कशानेही विचलित होऊ नका, कशानेही घाबरू नका. सारे काही कालांतराने नाहीसे होते. पण देव कधीच बदलत नाही. संयमाने सर्व काही साध्य होते. केवळ देवच पुरेसा आहे.'

# अ नु क्र म


| | | |
|---|---|---|
| | : अंतर्नाद | ३ |
| बिशप थॉमस डिसोजा (अधिकृत) | : १००वा जागतिक मिशन संडे | ४ |
| संपादक | : ख्रिस्ती मिशन : बदल व परिवर्तन सेवेसाठी | ७ |
| संकलन | : संपादकांस पत्रे | ९ |
| फा. थॉमस लोपीस, फा. रॉबर्ट डिसोजा | : मिशनमधील सौंदर्यस्थळे | ११ |
| फा. जॉन मॅथ्यू फरोज | : जागतिक मिशनचे पाचारण... | १३ |
| फा. विल्सन डिसोजा OFM Cap. | : संत फ्रान्सिस आणि आंतर-धर्मीय सुसंवाद | १४ |
| ब्र. ओशन डिक्रुझ | : संत फ्रान्सिसच्या शिकवणुकीचे अनुकरण | १५ |
| फा. घोन्सालो डिसिल्वा OFM Cap. | : मृत्यूविषयी संत फ्रान्सिस ह्यांचे विचार | १६ |
| फा. नितीन डिसोजा OFM Cap. | : ताऊ क्रॉस | १७ |
| ख्रि. बिशप एडविन कोलासो | : धर्मपरिवर्तन | १८ |
| प्रा. (डॉ.) मेबल पिमेंटा | : सिंथिया ताई : एक समर्पित वाटचाल | २१ |
| डॉ. सुभाष डिसोजा | : बायबल आणि मानसिक आरोग्य | २२ |
| जॉन गोन्सालविस | : साहित्यप्रेमी रॉकी लोपीस | २३ |
| लुकस मतेस परेरा | : आवे मरिया... | २५ |
| एफिजीन अगस्तीन तुस्कानो | : कर्जतच्या फातिमा मातेचे चर्च | २६ |
| डॉ. वनिता पटवर्धन | : आपली मुलं देशोदेशी, मन:शांती जपू अशी | २७ |
| इझाबेल जोकीम कोरिया | : ऋण आईच्या मायेचे | २८ |
| जोसेफ एस. डाबरे | : कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) : उदय आणि आव्हाने | ३० |
| आलेक्स पिटर डाबरे | : जगाचे पर्यावरण | ३२ |
| फ्रँक मिरांडा | : पाण्याची बचत | ४७ |
| जॉन लुईस परेरा | : सायबर गुन्हेगारीचे वाढते प्रमाण | ५० |
| फिलीप चांदी | : तुम्ही जगा, आम्हालाही जगू द्या! | ५१ |
| मॅटिल्डा ॲन्थनी डिसिल्वा | : अनोखा वाढदिवस | ५२ |
| विजया डिसा | : मूठभर पीठ | ५४ |
| ॲड. बॅरी डाबरे | : संत ब्रुनो | ६७ |
| फा. पीटर डिकुन्हा | : सहवासाचे सेवाकार्य | ६८ |
| डॉ. एल्टन क्लॉड मेंडोन्सा | : कान-नाक-घसा उपचार समजून घेताना... | ७० |
| प्राचार्य सोमनाथ विभूते | : अंतरीचा दीपोत्सव : विवेकाची दिवाळी | ७३ |
| सिस्टर ज्योती परेरा MSI | : आफ्रिकेतील माझा मिशन अनुभव | ७४ |
| फा. सुहास फरेरा OFM Cap. | : देवाची हाक | ७६ |
| फा. ग्लेन फर्नांडिस | : पवित्र अवशेष | ७८ |
| डॉनल्ड डिमेलो, कॅथरिन फरगोज, ॲन्थनी डाबरे, नागेश राऊत, ब्रिनल क्रास्टो | : साद-प्रतिसाद | ८० |
| दीपक मच्याडो, विजय रॉड्रिग्ज बॅप्टिस्ट वाझ, रोविना वाझ, मायकल लोपीस | : कविता | ८२ |
| डेव्हिस डाबरे | : माझे मत | ८३ |
| नेव्हील डिसोजा | : मनोरी-धारावी बेट शुद्धीकरण प्रकल्प मोर्चा | ८४ |
| बावतीस पेडीकर, हेलन रॉबी डिसिल्वा | : पुस्तक परिचय | ८५ |
| झेविअर डिमेलो | : विशाल विश्वात | ८७ |
| संकलन | : वृत्तविहार | ९० |
| अनिल गोन्साल्वीस | : 'सुवार्ता' शब्दकोडे - १४ | ९६ |
| फा. (डॉ.) जोएल डिकुना | : मनन-चिंतन-मंथन :पार्थिव जीवन, दैवी गर्भितार्थ | ९७ |
| धर्मप्रांतीय उपासना आयोग | : उपासना वर्ष दिनदर्शिका : ऑक्टोबर २०२६ | ९८ |

अधिकृत

# १००वा जागतिक मिशन संडे

## ख्रिस्तामध्ये एक, सुवार्ता घोषविण्यामध्ये एकजूट

जागतिक चर्चच्या जीवनात ह्या वर्षी आपण एक आध्यात्मिक आणि ऐतिहासिक क्षण अनुभवत आहोत : १००वा जागतिक मिशन रविवार! शंभर वर्षांचा हा प्रवास केवळ इतिहासातील एक मैलाचा दगड नाही; शंभर वर्षांपूर्वी सुरू झालेल्या ह्या जागतिक आध्यात्मिक प्रवासाकडे पाहताना आपल्या अंतःकरणात प्रथम उमटणारा स्वर म्हणजे कृतज्ञतेचा. देवाच्या अखंड कृपेबद्दल, सुवार्तेची ज्योत जगभर नेणाऱ्या असंख्य मिशनऱ्यांबद्दल आणि आपल्या बाप्तिस्म्याच्या मिशनरी आवाहनाला विश्वासूपणे प्रतिसाद देणाऱ्या असंख्य सामान्य विश्वासूंबद्दल परमेश्वराला कोटी-कोटी धन्यवाद!

ह्या निमित्ते पोप चौदावे लिओ ह्यांनी दिलेला विषय : 'One in Christ, United in Mission' 'ख्रिस्तामध्ये एक, सुवार्ता घोषविण्यामध्ये एकजूट.' ह्या शब्दांत आजच्या चर्चसाठी संपूर्ण आध्यात्मिक दिशा सामावलेली आहे. ख्रिस्तात आपण अधिक खोलवर एकरूप होऊ, तितकेच त्याने आपल्यावर सोपविलेले मिशन आपण अधिक विश्वासूपणे आणि एकत्रितपणे पार पाडू शकू. आज चर्चसमोर सर्वांत मोठे आव्हान केवळ जगापर्यंत सुवार्ता पोहोचविण्याचे नाही; तर स्वत: चर्चमध्ये ख्रिस्ती ऐक्य, बंधुभाव आणि मिशनरी सहकार्याची साक्ष अधिक दृढ करण्याचे आहे. मिशन संडे हा केवळ एका दिवसाचा कार्यक्रम नाही. पोप आपल्याला विचारतात : आपण ख्रिस्तामध्ये किती खोलवर रुजलो आहोत? आपण चर्चच्या ऐक्यात किती प्रामाणिकपणे सहभागी आहोत? आणि आपल्यावर सोपविलेल्या मिशनसाठी आपण स्वतःला किती खुले केले आहे?



### ख्रिस्तामध्ये एक

प्रभू येशूच्या महायाजकाच्या प्रार्थनेत मिशनच्या संपूर्ण रहस्याची उकल केली आहे. प्रभू म्हणतो, ''ते सर्व एक असावेत; हे पित्या, तू माझ्यामध्ये आणि मी तुझ्यामध्ये, तसे त्यांनीही आपल्यामध्ये असावे; म्हणजे जगाने विश्वास ठेवावा की तू मला पाठविले आहेस'' (योहान १७:२१) येशूची ही प्रार्थना चर्चच्या मिशनसाठी होती. चर्चची एकता ही केवळ अंतर्गत शिस्त किंवा संस्थात्मक व्यवस्था नाही; ती स्वत: सुवार्तेची साक्ष आहे. आपल्या भाषा, संस्कृती, आध्यात्मिक देणग्या आणि सेवाकार्ये भिन्न आहेत; तरी आपण सर्व एका बाप्तिस्म्यात, एका विश्वासात, एका प्रभूमध्ये आणि एका ख्रिस्ताच्या शरीरामध्ये एकत्रित आहोत. म्हणूनच communion आणि mission हे एकमेकांपासून वेगळे नाहीत. मिशनमध्ये एकत्र चाललो म्हणून आपली एकता अधिक दृढ होते. जग प्रगतीच्या अनेक शिखरांवर पोहोचले असले, तरी मनुष्याच्या अंतःकरणातील देवाची तहान संपलेली नाही. आजच्या जखमी, तुटलेल्या आणि दिशाहीन जगाला ख्रिस्ताची सुवार्ता अधिक खोलवर आवश्यक आहे.

### मिशनचा उगम ख्रिस्तामध्ये

चर्चचे मिशन कोणत्याही विचारसरणीचा प्रसार नाही. ते कोणत्याही संस्थेच्या विस्ताराचे साधन नाही. मिशनचे केंद्र एकच आहे : येशू ख्रिस्त. ते ख्रिस्ताचे मिशन आहे. खऱ्या सुवार्तेचा जाहीरनामा, kerygma, म्हणजे येशू ख्रिस्ताच्या जीवन, मृत्यू आणि पुनरुत्थानातील तारणाची आनंदवार्ता, हे आहे. पिता पुत्राला पाठवितो; पुत्र पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने चर्चला पाठवितो; आणि चर्च प्रत्येक बाप्तिस्मा घेतलेल्या विश्वासूला जगात पाठविते. म्हणून ख्रिस्ती जीवनाचे स्वरूपच 'पाठविलेले जीवन', a sent life आहे. ''पित्याने मला जसे पाठविले, तसे मीही तुम्हांला पाठवीत आहे.'' (योहान २०:२१) हे शब्द केवळ धर्मगुरूंना किंवा मिशनऱ्यांना उद्देशून नाहीत तर प्रत्येक बाप्तिस्मा स्वीकारलेली व्यक्ती ह्या पाठविण्यात सहभागी आहे. पोप फ्रान्सिस ह्यांनी 'Evangelii Gaudium' ह्या परिपत्रकामध्ये स्पष्ट केले आहे की बाप्तिस्म्याच्या आधारे सर्व विश्वासू 'मिशनरी शिष्य' आहेत; म्हणून मिशन संडे आपल्याला एखाद्या दूरच्या देशातील मिशनऱ्यांकडे पाहून टाळ्या वाजविण्यासाठी नव्हे, तर स्वतःच्या मिशनरी पाचारणाकडे नव्याने पाहण्यासाठी आमंत्रित करतो. पोप फ्रान्सिस ह्यांनी 'Evangelii Gaudium' मध्ये लिहिले आहे : "Every Christian is a missionary to the extent that he or she has encountered the love of God in Christ Jesus." म्हणजेच, ख्रिस्ताच्या प्रेमाचा खरा अनुभव ज्याला आला आहे तो स्वाभाविकपणे मिशनरी बनतो. पोप पुढे 'missionary disciples' ही अत्यंत सुंदर संकल्पना मांडतात. ते म्हणतात

आपण केवळ शिष्य किंवा केवळ मिशनरी नसून 'मिशनरी शिष्य' आहोत. म्हणून मिशनची सुरुवात बाहेर जाण्यापूर्वी अंतःकरणात ख्रिस्ताला भेटण्यापासून होते. जो ख्रिस्ताच्या प्रेमाने स्पर्शिला गेला आहे, तोच ते प्रेम इतरांपर्यंत पोहोचवू शकतो.

**'हृदय आमच्यात जळत नव्हते काय?'**

सांप्रतकाळी आपण ज्ञानाने समृद्ध आहोत; पण अंतःकरणाने अनेकदा तहानलेलो आहोत. तंत्रज्ञानाने जग जवळ आणले आहे; परंतु मनुष्य मनुष्यापासून दूर जात आहे. संवादाची साधने वाढली आहेत; पण अंतःकरणातील संवाद कमी होत आहे. भौतिक संपत्ती वाढली आहे; पण जीवनाचा अर्थ शोधणारी अंतःकरणे अस्वस्थ आहेत. एम्माउसच्या वाटेवरील दोन शिष्यांची अवस्था आजच्या मानवतेचेही प्रतिबिंब वाटते. त्यांची आशा मावळली होती. पण पुनरुत्थित प्रभू त्यांच्यासोबत चालू लागला. (लूक २४:३२) खरे मिशन अशाच जळत्या अंतःकरणातून जन्माला येते. अंतःकरणाला ख्रिस्ताने स्पर्श केला आहे, तो ख्रिस्ताला स्वतःपुरता ठेवू शकत नाही. ज्याला सुवार्तेचा आनंद लाभला आहे, तो, हा आनंद इतरांपासून लपवू शकत नाही. ह्यासाठीच पोप फ्रान्सिस ह्यांनी सांगितले आहे, सुवार्तेचा आनंद हा मुळातच 'मिशनरी आनंद' आहे.




**सुवार्ता प्रथम जगायची, मग सांगायची**

आज जगाला केवळ सुवार्तेचे शब्द ऐकण्याची गरज नाही; सुवार्ता जगणारे लोक पाहण्याची गरज आहे. आपण प्रेमाबद्दल बोलतो पण आपल्या कुटुंबात प्रेम आहे का? आपण क्षमेबद्दल बोलतो मग आपल्या जीवनात क्षमा आहे का? आपण गरिबांमध्ये ख्रिस्ताला पाहतो मग आपल्या जीवनात गरिबांसाठी जागा आहे का? आपण मानवी प्रतिष्ठेबद्दल बोलतो पण प्रत्येक व्यक्तीशी सन्मानाने वागतो का? आपण ख्रिस्ताच्या शांतीची घोषणा करतो, मग आपल्या शब्दांत आणि संबंधांत शांती दिसली पाहिजे. सुवार्ता आपल्या ओठांवर असण्यापूर्वी ती आपल्या जीवनात असली पाहिजे. संत फ्रान्सिस असिसी ह्यांचे एक प्रसिद्ध वाक्य : 'Preach the Gospel at all times but use words only when necessary.' आपले जीवन स्वत: सुवार्तेची साक्ष बनले पाहिजे. म्हणून आपल्या घरातील प्रेम, आपल्या सेवेतली करुणा, आपल्या कार्यातील प्रामाणिकपणा, आपल्या दुःखातील विश्वास आणि आपल्या शेजाऱ्यांशी असलेली बंधुभावाची वृत्ती, ही सर्व evangelization ची भाषा आहे.

**मिशन म्हणजे दूर जाणेच नव्हे; तर जवळ जाणे**

मिशन म्हटले की अनेकदा आपल्या मनात दूरदेशी जाणारे मिशनरी, अनोळखी प्रदेश आणि कठीण परिस्थिती ह्यांची प्रतिमा उभी राहते. निःसंशय तरीदेखील मिशनची सुरुवात अनेकदा आपल्या अगदी जवळच्या व्यक्तीपासून होते. आपल्या घरात कोणी एकटे आहे का? आपल्या गावपरिवारात व धर्मग्रामात कोणी विश्वासापासून दूर गेले आहे का? आपल्या शेजारी एखादे कुटुंब दुःखात आहे का? एखादा तरुण आशा हरवून बसला आहे का? एखादी वृद्ध व्यक्ती विस्मृतीत गेली आहे का? एखादा गरीब आपल्याकडून मदतीची अपेक्षा करीत आहे का? तर तिथेच मिशनची भूमी आहे. पोप फ्रान्सिस यांनी चर्चला तिच्या 'सुरक्षित कवच' ह्यामधून बाहेर पडून सुवार्तेच्या प्रकाशाची गरज असलेल्या 'परिघापर्यंत' पोहोचण्याचे आवाहन केले आहे. जगाचे टोक आपल्या दारातच उभे असेल.

**आपल्या धर्मप्रांतासाठी माझे पितृतुल्य आवाहन**

ह्यानिमित्ते आपल्या धर्मप्रांतातील प्रत्येक धर्मग्राम, गावपरिवार, कुटुंब, ख्रिस्ती संस्थांना आणि विशेषत: आपल्या प्रिय तरुणांना पितृभावाने मी एक आवाहन करू इच्छितो : आपण मिशनरी चर्च होऊ या. आपल्या धर्मग्रामामध्ये सहभागिता असू दे. आपल्या कुटुंबांत प्रार्थना असू दे. आपल्या उपासनेमध्ये जिवंत श्रद्धा असू दे. आपल्या सेवेत करुणा असू दे. आपल्या सुवार्ता प्रचारामध्ये धैर्य असू दे आणि आपल्या प्रत्येक कार्याच्या केंद्रस्थानी येशू ख्रिस्त असू दे. आपण जीवनाच्या समस्यांवर चिंतन करू या आणि आपण मिशन कार्य करणारे होण्यापूर्वी मिशनरी शिष्य होऊया.

**ख्रिस्तामध्ये एक, मिशनमध्ये एकजूट**

१००वा मिशन संडे हा भूतकाळाच्या गौरवात रमण्याचा दिवस नाही. तो भविष्याला होकार देण्याचा दिवस आहे. कृतज्ञतेने मागे पाहूया. विश्वासाने वर्तमान जगूया आणि पवित्र आत्म्याच्या सामर्थ्यावर विसंबून भविष्याकडे जाऊया. पोप लिओ चौदावे ह्यांच्या २०२६ च्या संदेशाचा गाभा आपल्याला एक गहन सत्य शिकवतो : ख्रिस्ताशी असलेली आपली एकता

(Communion) हीच मिशनची उगमभूमी आहे. म्हणून प्रथम ख्रिस्तामध्ये एक होऊया आणि मग मिशनमध्ये एकजूट होऊया. कारण, ''एक देह आणि एक आत्मा आहे... एक प्रभू, एक विश्वास, एक बाप्तिस्मा; एकच देव आणि सर्वांचा पिता'' (इफिसकर ४:४-६), ही आपली ओळख, शक्ती आणि साक्ष आहे आणि हेच आपले मिशन आहे.

ह्या ऐतिहासिक १००व्या मिशन संडेनिमित्त मी आपल्यासाठी मनःपूर्वक प्रार्थना करतो आणि आशीर्वाद देतो. आपला स्वर्गीय पिता, ज्याने आपल्या प्रेमातून आपल्याला ख्रिस्तामध्ये एकत्र आणले, तो आपल्या कुटुंबांना विश्वासात दृढ करो आणि आपल्या धर्मग्रामातील समुदायांना प्रेमाच्या बंधनात अधिक घट्ट बांधो. आपला प्रभू येशू ख्रिस्त, ज्याने स्वतःला जगाच्या तारणासाठी अर्पण केले आणि आपल्याला मिशनमध्ये सहभागी होण्याचे आमंत्रण दिले, तो आपल्या अंतःकरणात सुवार्तेची ज्योत प्रज्वलित करो; आपल्याला दुःखितांसाठी करुणामय, गरिबांसाठी संवेदनशील आणि सत्यासाठी धैर्यवान बनवो. पवित्र आत्मा, जो चर्चचा जीवनदाता आणि मिशनचा प्रेरक आहे, तो आपल्या धर्मप्रांतावर नव्या पेंटेकॉस्टप्रमाणे अवतरू दे; आपल्या तरुणांना पाचारणाची हाक ऐकण्याची कृपा देवो; आपल्या कुटुंबांना चिमुकली ख्रिस्तसभा (domestic churches) म्हणून फुलवो; आपल्या धर्मगुरूंना आणि धर्मभगिनींना पवित्रतेत आणि सेवेत नवी ऊर्जा देवो; आणि प्रत्येक श्रद्धावंताला आनंदी आणि विश्वासू 'मिशनरी शिष्य' बनवो.

आपल्या धर्मप्रांतातील कोणतेही घर आशेविना राहू नये. कोणतेही मूल प्रेमाविना राहू नये. कोणताही वृद्ध एकाकी राहू नये. कोणताही गरीब उपेक्षित राहू नये आणि कोणतेही अंतःकरण ख्रिस्ताच्या सुवार्तेपासून वंचित राहू नये. पवित्र मरिया, सुवार्ता प्रचाराची आश्रयदाती आणि ख्रिस्तसभेची आई, आपल्या धर्मप्रांताला ख्रिस्ताकडे घेऊन जावो.

आपण आपल्या जीवनाद्वारे सुवार्तेची साक्ष देऊ या, आपली कुटुंबे प्रेमाची शाळा बनवू या, आपले सर्व धर्मग्राम मिशनची केंद्रे करू या आणि आपल्या धर्मप्रांताला ख्रिस्ताच्या प्रकाशाचा दीपस्तंभ करू या. ख्रिस्तामध्ये एक होऊ या आणि मिशनमध्ये एकजूट दर्शवू या!

**+ बिशप थॉमस डिसोजा**

## मुखपृष्ठ




मुखपृष्ठाच्या रचनेत तीन प्रमुख संकल्पना आहेत :

महात्मा गांधी ह्यांचा सत्याग्रह आणि अहिंसेचा मार्ग,

तसेच 'जय जवान, जय किसान' ह्या दूरदर्शी घोषणेमुळे आजही ज्यांच्या आठवणी जपल्या जातात, त्या स्थितप्रज्ञ माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री ह्यांचे धोरण.

असिसीकर फ्रान्सिस ह्या संताने व्यक्ती, जग, परमेश्वर आणि पर्यावरण ह्यांना सामावून घेणारी जीवनविषयक सर्वसमावेशक संकल्पना मांडली. त्यांना 'संवादाचे पुरुष' (Man of Dialogue) मानले जाते. त्यांनी संस्कृती, गरीब, विविध धर्म आणि निसर्ग ह्यांच्याशी जीवनभर संवाद साधला. त्यांच्या शास्वत प्रस्थानाची ८००वी स्मृति.

७ ऑक्टोबर १५७१ रोजी ग्रीसच्या किनाऱ्यालगतच्या पात्रासच्या आखातात ऑटोमन साम्राज्य (तुर्कस्तान) आणि 'होली लीग' (स्पेन, व्हेनिस, जेनोआ आणि पोपचे राष्ट्र ह्यांच्या नेतृत्वाखालील आघाडी) ह्यांच्यात लेपांतो (रोम पासून ३ ते ४ किलोमीटरवरील ठिकाण) येथे लढाई झाली. ह्या लढाईत एकूण ४०० हून अधिक युद्धनौका आणि हजारो सैनिक सहभागी झाले होते; ह्यात आमनेसामने घनघोर लढाई आणि शत्रूच्या जहाजांवर चढाई करून केलेली झुंज ह्यांचा समावेश होता. प्राचीन काळापासून भूमध्य समुद्रात झालेली ही सर्वांत मोठी नौदल लढाई मानली जाते. ह्या लढाईचा शेवट 'होली लीग' च्या निर्णायक विजयाने झाला. ह्यात ऑटोमन साम्राज्याची २०० हून अधिक जहाजे (जप्त किंवा बुडवली गेली) आणि सुमारे ३०,००० सैनिक गमावले, तर सुमारे ८,००० ख्रिस्ती सैनिक गारद झाले. तसेच, या लढाईमुळे सुमारे १५,००० ख्रिस्ती गुलाम (जे युद्धनौकांवर वल्हवण्याचे काम करत होते) मुक्त झाले...

लेपांतो येथील लढाईत 'होली लीग'चा पराभव होण्याची लक्षणे दिसू लागल्याची बातमी व्हॅटिकनमध्ये पोहोचताच, पोप पाचवे पायस (डोमिनिकन पोप) ह्यांनी सर्व श्रद्धावंतांना 'रोझरी'ची (जपमाळेची) प्रार्थना करण्याचे आवाहन केले. लोक हातात रोझरी घेऊन रस्त्यांवर जमले आणि अचानक परिस्थिती पूर्णपणे पालटली व अनुकूल झाली. म्हणूनच पोप पाचवे पायस ह्यांनी ७ ऑक्टोबर हा दिवस 'विजयाचा सण' म्हणजेच 'अवर लेडी ऑफ द रोझरी'चा (रोझरी मातेचा) सण म्हणून घोषित केला. ख्रिस्ती भाविक ऑक्टोबर महिना 'रोझरीचा महिना' म्हणून साजरा करतात.

# ख्रिस्ती मिशन : बदल व परिवर्तन सेवेसाठी

प्रत्येक व्यक्तीला देवाने ध्येय दिले आहे. ते साध्य करण्यासाठी बुद्धी आणि समाजासाठी कार्य करण्यासाठी उपजत ऊर्जा बहाल केली आहे. तरीसुद्धा उभ्या आयुष्यात अंगभूत गुणांचा, देणग्यांचा आणि विशेष कृपादानांचा १००% वापर खूपच कमी लोक करतात. जे पुढाकार घेतात, ते विवेकाचा वापर करून आपल्या क्षमता आणि सामर्थ्यानुसार काम किंवा कार्य करतात आणि विकास साधतात. असे असले तरी, मानवाला आपल्या मर्यादांची जाणीव असते. कितीही नवनवीन शोध लावले आणि अभ्यास केला तरी चिंतनशील, विश्लेषक आणि विवेकी व्यक्ती **'मानव'**, **'जग'** आणि **'परमेश्वर'** ह्या तीन मूलभूत प्रश्नांचा चिकित्सेने वेध घेतात व त्यांच्यातील कार्यकारणभावावर मंथन करतात. त्यासाठी सृष्टीच्या निर्मितीपासून अनेक मानववंशशास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ व ईशपरिज्ञानी ह्या गूढ रहस्यांचा मागोवा घेण्यासाठी स्वतःला समर्पित करत आहेत.

देव तेव्हाही होता आणि आजही आहे; दूरवर तेथे होता आणि जवळ येथेही आहे; तो पलीकडे आहे आणि आतही. तो न्यायप्रिय आहे आणि दयाळूही. तो **सर्वसमर्थ, सर्वज्ञ** आणि **सर्वत्र** आहे. म्हणूनच, विशिष्ट ठिकाण (इस्रायल), विशिष्ट समाज (ज्यू संस्कृती) आणि विशिष्ट काळ (२०२५ वर्षांपूर्वी) निवडून तो येशूच्या रूपाने माणूस झाला. देवाला कसे पाहावे (त्याची दृष्टांत-कथांद्वारे शिकवण), मानवी जीवन अर्थपूर्णरीत्या कसे जगावे (त्याचे चमत्कार) आणि समाजातील विविध स्तरांतील (विविध जमाती, संस्कृती, धर्म इ.) लोकांशी कसे वागावे, हे येशूने आपल्याला स्व-उदाहरणाने दाखवून दिले. देव अनादी काळापासून अस्तित्वात असला, तरी येशू (देवाचा पुत्र) मानव झाला आणि आपल्यात राहिला; त्याने आपले शब्द, कार्य व चमत्कार ह्यांच्याद्वारे - विशेषतः आपल्या दुःखसहन, वधस्तंभावरील मरण व तीन दिवसानंतरच्या पुनरुत्थानाद्वारे - ह्या 'जखमी' जगाला बरे करण्याचे महत्कार्य सुरू केले.

येशूच्या जीवनाचा सारांश तीन शब्दांत मांडता येईल : **शिक्षण, प्रवचन** आणि **आरोग्यदान.** त्याने अनेक कथा सांगितल्या (उदा. 'उधळा पुत्र'), पण तो केवळ कथा सांगणारा नव्हता; त्याने लोकांना अत्यंत प्रभावी आणि क्रांतिकारी उपदेश केला (उदा. 'डोंगरावरील प्रवचन'), परंतु तो केवळ शिक्षक नव्हता; त्याने चमत्कार केले (उदा. वादळी समुद्र शांत करणे), तथापि तो जादूगार नव्हता; त्याने अनेक लोकांना बरे केले (उदा. अंध, लंगडे, मुके, बहिरे, मृत इत्यादी) अर्थात, तो डॉक्टर नव्हता. त्याने गरीब, आजारी, समाजातून बहिष्कृत केलेले लोक, मुले, विधवा आणि पीडित व दडपलेल्या लोकांची काळजी घेतली. प्रेम, आनंद, शांती आणि विशेषतः क्षमाशीलतेने कसे जगावे, हे त्याने आपल्या मृत्यूपर्यंत आणि पुनरुत्थानानंतरही कृतींतून दाखवून दिले. त्याचे ध्येय आणि कार्य आजही त्यांचे १२ प्रेषित, शिष्य, अनुयायी आणि चाहते ह्यांच्याद्वारे; तसेच बायबल, चर्च, परंपरा आणि अधिकृत शिकवणुकीद्वारे पुढे नेले जात आहे. ह्यामध्ये प्रामुख्याने शिक्षण, आरोग्यसेवा आणि आध्यात्मिक सेवाकार्याचा समावेश केला जातो. त्याद्वारे जगाचा इतिहास, भुगोल व चेहरा-मोहरा बदलला. अनेक संस्कृतींचे शुद्धीकरण झाले, होत आहे.



येशूचे ह्या जगात येणे, जगणे नि नव्याने जगायला शिकविणे हा केवळ एक 'धर्म' (ज्यामध्ये 'Religare' ह्या शब्दाचा अर्थ 'पुन्हा जोडणे' किंवा 'बंध निर्माण करणे', 'कुंपणा ऐवजी पूल उभारणे' असा होतो.) नाही. तर, आपल्याकडे जे काही आहे आणि आपण जे काही आहोत, ते इतरांपर्यंत पोहोचवण्याचा तो एक **'मार्ग'** आहे; प्रत्येक मानवी जीवनासाठी असलेल्या परमेश्वराच्या अंतिम ध्येयाची किंवा योजनेची जाणीव करून देणारे तो **'सत्य'** आहे; आणि मृत्यूनंतरच्या जीवनासह संपूर्ण जीवनाचा प्रवास चैतन्यपूर्ण व सर्वांगीणरीत्या जगण्यासाठी आवश्यक असलेले ते सर्वसमावेशक **'जीवन'** आहे. म्हणूनच, जी व्यक्ती ख्रिस्ती होण्याचा निर्णय घेते, ती येशूकडे येते आणि ख्रिस्ताचा संदेश इतरांपर्यंत पोहोचवते; ख्रिस्ताचा अनुयायीही तसेच करतो -म्हणजेच तो/ती शिकतो, उपदेश करतो आणि शब्द व कृतींद्वारे इतरांना बरे करतो. तो/ती संत अगस्टीन (३५४-४३०) ह्यांच्याप्रमाणे शिकतो व पश्चात्ताप करतो; संत फ्रान्सिस असिसी (११८२-१२२६) ह्यांच्याप्रमाणे अत्यंत आवश्यक असेल

तेव्हाच शब्द वापरुन उपदेश करतो; आणि मदर तेरेसा (१९१०-१९९७) ह्यांच्याप्रमाणे स्वतःच्या वेदनांची जाणीव असताना इतरांना बरे करणारे (Wounded Healer) ठरतात.

अशाप्रकारे, ख्रिस्ती धर्माचे वैशिष्ट्य दोन तत्त्वांवर आधारीत आहे: **देहीकरणाचे रहस्य** (परमेश्वर मनुष्य बनून पृथ्वीवर राहणे) आणि **पुनरुत्थानाचे वास्तव** (देव-मनुष्याचे मृतातून उठणे) आणि शांती, सलोखा, मानवतेचा देवत्वाशी संबंध प्रस्थापित करण्यासाठी क्षमेद्वारे आपल्या जीवनाची सहभागिता करणे. आपले जीवन मेणबत्तीप्रमाणे 'यज्ञ' करणे. म्हणूनच, कुणीही भय, भीती, सक्ती किंवा फसवणुकीमुळे बाप्तिस्मा घेऊ शकत नाही. जोपर्यंत पवित्र आत्मा माणसाला ख्रिस्ताकडे नेत नाही, तोपर्यंत बाप्तिस्मा मिळणे शक्य नसते. कारण जोपर्यंत एखादी व्यक्ती पश्चात्ताप करत नाही, त्रैक्यमय देवाच्या दयेवर विश्वास ठेवत नाही आणि सर्वांगी बदलण्याचा, परिवर्तन करण्याचा संकल्प करत नाही, तोपर्यंत ती व्यक्ती 'ख्रिस्ती' होऊ शकत नाही.

शेवटी, सर्वात महत्त्वाचे म्हणजे ख्रिस्ती धर्माची धारणा 'देणे' आणि 'क्षमा करणे' ह्यावरून सिद्ध होते. ग्रॅहम स्टेन्स (१९४१-१९९९), धन्यवादित राणी मारिया (१९५४-१९९५) आणि त्यांच्या कुटुंबांच्या वृत्ती-प्रवृत्तींमधून दिसून येते. ह्या संदर्भात, चर्चचे चार मिशनविषयक मार्गदर्शन आपल्याला 'मिशन'च्या समग्र संदेशावर सखोलपणे चिंतन करण्यास सक्षम करतात : ***Ad Gentes*** (व्हॅटिकन परिषद IIचा परिषदीय दस्तऐवज), ***Evangelii Nuntiandi*** (पोप संत सहावे पॉल द्वारे), आणि ***Redemptoris Missio*** व ***Ecclesia in Asia*** (पोप संत द्वितीय जॉन पॉलद्वारे).

सरतेशेवटी, बदल (बदला नव्हे!), आहोत तेथे 'येशूचा वैयक्तिक अनुभव' जगणे (दूरवरच मिशन आहे असे नव्हे!!) आणि अन्न-वस्त्र-निवारा-शिक्षण ह्या मूलभूत गरजांना मोताद झालेल्या व्यक्ती व समाजाला (केवळ आपल्याच लोकांना नव्हे!!!) धीर देणे, आधार देणे व त्यांना **''आपण सारी एकाच देवाची लेकरे आहोत''** ही भावना जातपात, धर्म, वर्ण, वर्ग, भाषा, लिंग, देश, प्रदेश, परदेश ह्यांच्या पलीकडे जाऊन रुजविणे तद्वत, पर्यावरणाचे 'जल-जमीन-जंगल-जानवर-जीव' हे घटक सांभाळून, त्यांचे रक्षण व संरक्षण करणे असे 'ख्रिस्ती मिशन'चे सध्याचे सर्वांगीण ध्येय्य होय.

**- फा. जोएल डिकुना**

●



# संपादकांस पत्रे




## खूप सुंदर

‘शिक्षण : चारित्र घडवते, माणसाला मुक्त करते, इतिहास घडवते’, हा बिशप थॉमस डिसोजा ह्यांचा लेख वाचनीय आहे. फा. (डॉ.) जोएल डिकुना ह्यांचे ‘जेन झी, सात पिढ्या, वैशिष्ट्ये’ ह्या संपादकीयातील माहिती खूपच अद्वितीय वाटली. जॉन गोन्सालवीस ह्यांच्या ‘अखेर तरुणाईने करून दाखविले’ ह्या लेखाने तर ह्या ‘सुवार्ता’ लेखमालेची हॅट्रिक पूर्ण केली. कॉम्प्युटर, गॅझेटमध्ये डोके खुपसून बसणाऱ्या Gen Z पिढीला आत्मकेंद्रित पिढी म्हणण्याची आता आपली हिम्मत होणार नाही, हे ह्या लेखातून जाणवले.

**- जॉनी फरगोज,** करमाळे, उमराळे

## चमत्कार

नुकताच सप्टेंबरचा सुवार्ता वाचून काढला. १०० पानं! तुम्ही दर महिन्याला शंभर पाने कशी काढू शकता? चमत्कार आहे. अभिनंदन अँड ऑल द ब्लेसिंग!

**- फादर मायकल जी.**

## विश्लेषण

१५ मे २०२६ हा भारताच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहिण्याचा दिवस ठरला. भारतातील सुशिक्षित बेरोजगार युवकांना न्यायधिशांनी एका खटल्याच्या संदर्भात कॉकरोच (झुरळ) असा उल्लेख केला असता अमेरिकेतून "What if all Cockroaches come together" असे ट्वीट करणारे अभिजित दिपके ह्यांना तासाभरात भरभरून प्रतिसाद मिळाला. त्यांनी ताबडतोब ‘कॉकरोच जनता पार्टी’ हा नवीन पक्ष तयार केला व काही दिवसातच कोट्यवधी चाहते त्यांना लाभले. ६जूनला पहिले आंदोलन राजधानीत, त्यानंतर इतर शहरांमध्ये सुरू केले. १२ वर्षात विरोधी पक्षांना जे जमले नाही ते ह्या युवांनी संसदेला जागे करण्यासाठी रस्त्यावर येऊन केले.

डॉ. राजेंद्र प्रसाद ह्यांच्या मते ‘तरुणांचे हात उगारण्यासाठी नाहीत तर उभारण्यासाठी असतात’, हे जेन झी शक्तीने दाखवून दिले. संपूर्ण देशाची शिक्षणव्यवस्था पारदर्शक झालीच पाहिजे हा ह्यामागचा युवा पिढीचा खरा उद्देश आहे. जॉन गोन्सालविस ह्यांनी खूप छान विश्लेषण केलेले आहे.

**- जॉन लोपीस,** रोशनी, माणिकपूर

मोबाईल : 77 09 78 23 24

## चळवळीचे बोध

सहकार क्षेत्र हे जगण्याचे साधन बनवून जनता सुखी जीवनाची पावले उचलू लागली. ह्यापुढे वसई निसर्गाने नटलेली असल्यामुळे काक नजर त्यावर पडली. विकासक गैर मार्गाने वसईत येऊन विकासाच्या नावाखाली निसर्गाने दिलेली समृद्धी ही पायदळी तुडवू लागले.

निसर्ग वाचावा म्हणून १ऑक्टोबर १९८९ रोजी हरित वसई संरक्षण समितीने मोठा मोर्चा काढला. त्याला सर्व थरांतून योग्य ती चालना व सहकार्य मिळाले. पुढे वसईचा ऱ्हास होऊ नये म्हणून ‘सिडको हटाव’ करण्यात आला. त्यासाठी २६ जानेवारी १९९३ रोजी एक लाखाचा जनसमुदाय सामील झाला व ही चळवळ फार जोमात सुरू झाली. त्यामुळे अनेकांचे जीवन सुस्थितीत आणले. त्याला कारण म्हणजे ख्रिस्ती धर्मगुरू फादर दिब्रिटो! त्यांनी ह्या चळवळीला फार मोठी दिशा दाखवून दिली.

आज आपण मागे वळून पाहिले तर ह्या चळवळीमुळे ‘मला काय मिळाले’ पेक्षा ‘इतरांना किती फायदा झाला’ हा मोठा प्रश्न तयार होत आहे. ह्या चळवळीमुळे वसईचा निसर्ग वाचला परंतु पुढे नेतृत्व बदल न झाल्याने आणि नेतृत्व देण्यासाठी योग्य ते प्रयोग न झाल्याने ही चळवळ मंदावली आहे.

आज वसईत अनेक लहान मोठ्या चळवळी होत आहेत. त्याला कारण म्हणजे भूतकाळात दिलेले नेतृत्व आहे.

**- जेम्स अंतोनी लोपीस,** पाली

मोबाईल : 84 07 93 51 78

## सूचना

बायबलमध्ये परमेश्वर मोशेला सांगतो, ‘‘तुझ्या पायातील वाहणा काढून बाजूला ठेव. कारण तू जेथे उभा आहेस ती जागा पवित्र आहे.’’ यहुदी, मुस्लिम आणि ख्रिश्चन हे तिन्ही धर्म मोशेचे नियम पाळतात. मुस्लिमांच्या मस्जिद मध्ये पायात चप्पलेसह जाण्यास सक्त मनाई आहे. तसेच आपल्या भारतातील सर्व धर्मात मंदिरात चपलेसह जाण्यास मनाई आहे. परंतु आपल्या चर्चमध्ये तो नियम का पाळत नाही? कमीत कमी पवित्र वेदीवर तरी कोणी चप्पल घालून चढू नये.

आपल्या धर्मप्रांतात मिस्सामधील गायनमंडळाची : सर्व चर्चमध्ये गीताचे बोल सारखे; परंतु चाल वेगवेगळी. ह्यावर एकवाक्यता असावी.

**- लुईस लोपीस,** नानभाट

## साद-प्रतिसाद

**‘सुवार्ता’ नोव्हेंबर २०२६च्या अंकासाठी**

**विषय : मला भावणारा संत**

शब्दमर्यादा : १०० शब्द

आपला अभिप्राय/अनुभव १० ऑक्टोबर २०२६पर्यंत

**‘सुवार्ता’ ई-मेल आयडीवर पाठविणे.**

**suvartavasai@gmail.com**

# मिशनमधील सौंदर्यस्थळे

- फा. थॉमस लोपीस, बहारे, तलासरी
- फा. रॉबर्ट डिसोझा, बहारे, तलासरी

### पारंपरिकता आणि आधुनिकता ह्यांच्यातील सुंदर सांगड

मिशन म्हटले म्हणजे दूर कुठेतरी जंगलातील दुर्गम भागांत राहत असलेल्या लोकांमधील सेवाकार्य असाच सर्वसाधारणपणे समज असतो. लाईट नाही, इंटरनेट नाही, वाय-फाय नाही, पावसाळ्यात फार पाऊस, हिवाळ्यात बोचरी थंडी आणि उन्हाळयात अंगाची लाहीलाही करणारी गरम हवा, खराब खडकाळ रस्ते, अशिक्षित माणसे, अंधश्रद्धाळू ज्येष्ठ नागरिक, व्यसनाधीन झालेला पुरुष, बेरोजगार तरुणाई, उघडीनागडी कुपोषित बालके, झावळ्यांनी शाकारलेली छपरे, कौलारू घरे, शेणाने सारवलेले ओटे, घराभोवती काट्याकुट्यांनी घातलेली कुंपणे, मोकाट रोडावलेली गायीगुरे, उघडेबोडके डोंगर, पायीपायी चालणारी, गालफाडे बसलेली, पोटे खपाटीला गेलेली मुले-माणसे, दाढीची खुंटं वाढलेले गोहले (पुरुष), नाकात शेंबूड आलेली दादू आणि बाई (तान्ही बालके), केसांचा पिसारा केलेले किशोरवयीन 'बंडे', लाजऱ्या बुजऱ्या 'लोठ्या' (युवती), शेतात राबणाऱ्या बाया-बापड्या, घरात बसून राहिलेले 'वाडघो' आणि 'वाढघीन' असेच काहीसे चित्र सर्वसामान्यांच्या डोळ्यांसमोर येते आणि आजही ते एक वास्तव काही प्रमाणात आहे.

हळूहळू परिस्थिती बदलत आहे. 'जुने जाऊ द्या मरणा लागूनि जाळूनि किंवा पुरुनि टाका' अशी केशवसुतांची तुतारी फुंकणारा एक वर्ग आज समाजात आहे. मात्र बाथरूममधील पाण्याबरोबर बाळही फेकून दिले जाणार नाही ना ह्याची



काळजी घेताना तो दिसत आहे. 'नवे ते हवे' असे मानणारी युवा पिढी उदयास येत आहे. मात्र काळाच्या कसोटीला उतरलेली जीवनमूल्ये जोपासण्याची त्यांची लकब पाहून ऊर अभिमानाने भरून येतो.

'बेस' हा येथील परवलीचा शब्द! कोणालाही विचारावं, 'बेस काय?' (बरे आहेत ना?). अगदी हसत हसत, लाजत मुरडत सगळे जण एक सुरात म्हणतात, 'बेसूच फादर!' त्या त्यांच्या उत्तरात 'चित्ती असू द्यावे समाधान' ह्या ओवीचा अर्क उतरलेला जाणवतो.

### झोळीतील बाळाचे भवितव्य

८ जून२०२५! मिस्कीटे कुटुंबाकडून आम्हांला झोळी भरण्याच्या कार्यक्रमाचे आमंत्रण देण्यात आलेले होते. रोझरी संपली. चार दिवसांच्या बाळासाठी खास प्रार्थना करण्यात आली. घराला आशीर्वाद देण्यात आला. त्यानंतरचा विधी बघण्यासारखा होता. गावातील एक वयस्कर स्त्री (सुईण) पुढे आली. सफेद धोतराचे चार कोपरे धरून चार मुले उभी राहिली. त्या धोतराची झोळी करून त्यात बाळाला घालण्यात आले. थाळी आणि विळा घेऊन त्यांचा विशिष्ट नाद करण्यात आला. वाढघीन बायने बाळाला मंत्र दिले :

''दादू, आयकजोस,
गाजल वाजल त्यालं बिहजोस नोको,
वाघा नडगालं बिहजोस नोको
सरकारी पायरी चढजोस नोको
एस वाहरल त धाव घीन पलजोस,
बास वाहरल त धाव घीन पलजोस
केलीचा खांब वाढं तसा
आमचा बाल वाढ
हाटा बाजारात जासी त एक पैसा तरी सेवाल बांधून आणजोस
सरकार दरबारात जासी त पिंपल खलालं तसा बोलजोस.''

विधी संपला. चार कोपरे धरणाऱ्या लहान मुलांच्या हातात चिरीमिरी ठेवण्यात आली. उपस्थितांवर पवित्र पाणी शिंपडण्यासाठी आम्ही घरभर फिरलो तेव्हा जमलेल्या गावकऱ्यांचा तो मोठा जमाव पाहून आश्चर्यचकित झालो. सर्व गावकरी तिथे प्रार्थनेला आणि झोळी बांधण्याच्या कार्यक्रमाला आलेले होते. बाफलेले चणे आणि कोल्ड्रिंक्स वाटण्यात आले. आम्ही निघालो. आमच्या मागोमाग चार मुले आमच्यासाठी जेवण घेऊन आली. फादरांचे आभार मानण्याची ही त्यांची पद्धत पाहून आम्ही एकमेकांकडे पाहू लागलो. मिशन भागातील सेवाकार्याला सुरुवात केल्यापासून आमच्या घरात आलेलं ते पहिलंच जिवान (जेवण) होतं. त्याची चव अजूनही जिभेवर तरळत आहे आणि त्याहीपेक्षा आमच्या लोकांनी त्यांच्या घरी केलेलं आमचं स्वागत मनावर कायमचं कोरलं गेलंय.

इथे झोळीतील बाळ दोनतीन महिन्यांचं झालं की पुष्कळदा त्या बाळाचा बाप्तिस्मा हा रविवारच्या मिस्सामध्येच साजरा केला जातो. रिव्हानच्या बाप्तिस्म्याची पूर्वसूचना देण्यासाठी त्याचे वडील केंद्रात आले होते. त्याने घरी जाऊन रीतसर बाळाचा बाप्तिस्मापूर्व अर्ज भरून आणला. रविवारी सकाळी मिस्साआधीच माता-पिता बाळाच्या धर्म आईबापांसह मिस्सा केंद्राच्या प्रवेशद्वारापाशी उभे होते. साधे परंतु स्वच्छ कपडे, नीटनेटकी वेशभूषा, केसांत फुलांची वेणी, बाळाच्या अंगावर सफेद 'झुबलं', बापाच्या हातात मेणबत्ती अशी जय्यत तयारी करून सर्व आमची वाट पाहत होते. प्रवेशविधी चर्चच्या दरवाज्यापाशीच पार पडला आणि गीत गात आम्ही मध्ये प्रवेश केला. प्रवचनानंतर बाळाला बाप्तिस्मा देण्यात आला. अर्पणाच्या वेळी मातापित्यांनी आणि धर्मआईबापांनी वेदीवर दोनदोनशेच्या दोन नोटा ठेवल्या. बाप्तिस्मा, प्रथम ख्रिस्तशरीर, लग्न, चर्चचा सण, पान मिस्सा, दिस मिस्सा, मृतांसाठी वार्षिक मिस्सा, विशेष हेतू ह्या निमित्ताने वेदीवर वेगळे दान ठेवण्याची इथल्या लोकांची ती पद्धत मनाला खूप भावली.

### चर्चचा मनमोहक वार्षिकोत्सव

३० नोव्हेंबर २०२५! बहारे येथील लुड्र्स माता चर्चचा वार्षिक उत्सव होता. त्या आधी तीन दिवस देवळातून प्रवचनांद्वारे लोकांची आध्यात्मिक तयारी करण्यात आलेली होती. बऱ्याच लोकांनी आपले पापनिवेदनसुद्धा केलले होते. पाड्यावरील जी तरुण मुलेमुली आणि स्त्रीपुरुष कामानिमित्ते किंवा अभ्यासासाठी परगावी आहेत ते सर्व हटकून सणासाठी गावात आल्याने गावाचे एकंदर वातावरणच बदलून गेलेले होते. २९ तारखेच्या संध्याकाळी सुंदर असा सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला. आदिवासी बांधव नाच-गाण्यामध्ये, कलेमध्ये आणि संगीतामध्ये किती मनापासून रममाण होतात त्याचे दर्शनच घडले.



सणाच्या मिस्साआधी तारपा नृत्य, स्वागतासाठी आरती करणाऱ्या सुवासिनी, एकसुरात गायन करणारा गायकवृंद, पाहुण्या धर्मगुरूंचे स्वागत आणि त्यांचे आभार मानण्याची न्यारी पद्धत मनाला वेगळी उभारी देत होती. मिस्सानंतर सर्वांसाठी सहभोजन होतं. गावच्याच तरुण-तरुणींनी स्वयपांक केलेला होता. इथल्या पाण्यालाच चव आहे त्यामुळे अगदी डाळ-भातापासून सुक्या बोंबलाचे कालवण अगदी मिटक्या मारीत जेवावेसे वाटते. त्यात 'कोंबडीची भाजी' आणि 'वास्ता' (विशिष्ट जातीच्या कोवळ्या

**जन्मापासून ते मरेपर्यंत हा प्रवास पारंपरिकता व आधुनिकता ह्यांमध्ये समन्वय साधत आहे.**

बांबूंचे तुकडे किंवा चकत्या) सोबत असेल तर जेवणाचा बेत काही औरच होता. सर्वजण गोलाकार गटागटाने खाली बसतात आणि वाढपी त्यांना काय हवे नको ते पाहत असतात. ती पंगत दिसायला सुरेख आणि अर्थपूर्ण असते.

### रक्तामध्ये भिनलेली श्रद्धा

''फादर, तुमची सगळी कामे बाजूला ठेवा आणि सर्वप्रथम आमच्या घरी भेट द्या.'' थोडासा त्रागा आणि थोडीशी काकुळतीची भावना रमेशच्या शब्दांमध्ये होती. आम्ही पाड्यावर पाऊल ठेवून फक्त आठ दिवस झालेले होते. एक दिवस आम्ही रिक्षाने त्यांच्या घरी पोहोचलो. बहारे केंद्रापासून कमीत कमी तीस किलोमीटर अंतरावर त्यांचे घर होते. झोपडीवजा घर.... तिथे जायला शेतातला रस्ता..... घर मात्र शेणाने सारवलेले.... नीटनेटके... आम्हाला पाहताच सगळे घराबाहेर आले.... झोपडीच्या मेढीला टेकूनच आम्ही बैठक मारली.... चर्चा सुरू झाली.... श्रद्धेसाठी त्यांनी बरंच काही भोगलेले .... मात्र तक्रारीचा सूर नव्हता... गावकऱ्यांनी वाळीत टाकलेले.... तरीही तोंडातून श्रद्धेची मुक्ताफळे बाहेर पडत होती : ''फादर, आम्ही त्यांना सांगितलं, तुम्ही आम्हाला ठार मारलं आणि डोंगराच्या पलीकडे फेकून जरी दिलं तरी आमच्या रक्ताच्या थेंबातून आणि मांसाच्या कणाकणातून तुम्हाला येशूचे नाव ऐकू येईल....'' त्यांच्या बोलण्यात त्वेष होताच; परंतु श्रद्धेचे मूळ किती खोलवर रुजलेलं आहे त्याची जितीजागती साक्ष होती.....

आमच्या भेटीने त्यांना किती फायदा झाला ते आम्हाला ठाऊक नाही परंतु 'जे आत्म्याने दीन ते धन्य कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे' ह्या ख्रिस्त वचनानुसार त्या दुर्गम भागातील झोपडीमध्ये झळकणाऱ्या ख्रिस्ताच्या प्रकाशात आम्ही न्हाऊन निघालो. तीन तासांची ती भेट; परंतु आजही त्या भेटीची आठवण इथे

कार्य करायला हजार हत्तींचे बळ देऊन जाते. मिशनऱ्यांनी केलेल्या कार्याचा सुगंध गेली कित्येक वर्षे इथे घमघमत आहे असेच वाटले आम्हाला...

उपवासकाळातील इथले वातावरण खूपच देवभीरू झालेल दिसते. संपूर्ण उपवासकाळ केवळ एक वेळचे जेवण घेण्यापासून विविध प्रकारचे उपवास करणारे स्त्री-पुरुष पाहिले की उपवासकाळाचे गांभीर्य आणि त्यातील सौंदर्य मनात घर करू लागते. वसई, मुंबई, दमण, उंबरगाव, सिल्वासा, दादरा नगर हवेली किंवा तलासरी भागांतील विविध ठिकाणी क्रुसाच्या वाटेच्या भक्तीला आलेला भाविकांचा महापूर अंतःकरणाला ओलेचिंब करून जातो. झोळी भरणे बधवनी (मुलीला पाहण्याचा कार्यक्रम, सोयरीक विधी) देज (लग्नकार्याची सुरुवात), मूल (लग्न समारंभाचा शेवटचा दिवस), पान मिस्सा (मृतासाठी पाचव्या दिवशी चर्चमध्ये केली अर्पण केली जाणारी मिस्सा) दिस मिस्सा (कुटुंबाच्या ऐपतीनुसार / सवडीनुसार मृताच्या घरी केली साजरी जाणारी मिस्सा) अशा सर्व प्रसंगी गावकऱ्यांची लाभणारी साथ माणसाला एकेक कार्य उत्साहाने करायला साहाय्यक ठरते.

### वृक्षवल्ली आम्हां सोयरे वनचरे

आदिवासींचे निसर्गप्रेम जगावेगळे आहे. घराशेजारी किंवा मागीलदारी छोटीशी फळा-फुलांची बाग असते. घरातील सांडपाणी ह्या बागेला घातले जाते. त्यातील फुले कधी कधी स्त्रियांच्या केसांतील गजऱ्यात दिमाखाने विराजमान झालेली दिसतात वर्षभर त्यांचे जीवन निसर्गचक्रानुसार सुव्यस्थितपणे नियोजित केले गेलेलं दिसते. एप्रिलपासूनच राब करायला (जमीन भाजणे) शेतकरी सुरुवात करतो. त्यासाठी गुरांचे शेण आणि झाडांचा पालापाचोळा शेतात विखुरला जातो. जून महिना उगवला की, शेतीच्या कामांना वेग येतो. पावसाच्या आगमनाने बायाबापड्या घरवाल्यांसह (पती) शेतात उतरतात. पेरण्या सुरू होतात. महिन्याभरात आवणी, आवजी (भात लावणी) ची कामे सुरू होतात. त्यावेळी 'एकमेकां साह्य करूं ! अवघे धरू सुपंथ' ह्या उक्तीनुसार सर्व कुटुंबीय, नातेवाईक सासुरवाशिणी, माहेरवाशिणी एकमेकांना मदत करीत आवणीपासून लाणी (कापणी), बांधणी, झोडणी... अशा सर्व कामात एकमेकांच्या हातात हात घालून कामे आटोपतात.

एकदा का शेतातले सोने घरातील



कणग्यात येऊन पडले की आदिवासी बंधुभगिनी सणावारासाठी सज्ज होतात. वाघ्या देव (गाव देव), नवे खाणे, लग्ने, देवळाचे सणवार, दिवाळी, दसरा, पाहणेरी (पाहुण्यांकडे ये-जा), नाताळ, नववर्ष, अशा सर्व प्रसंगी तारपा नृत्य, डी. जे., करमणुकीचे कार्यक्रम, स्पोर्ट्स क्रिकेटच्या मॅचेस ह्यांना उधाण येते.

### साधेपणातील सौंदर्य

इथलं साधं राहणीमान. घरे, पोशाख, बोलणे, वागणे, कामे ह्या सगळ्यांमध्ये एक अनोखा साधेपणा इथे राहिलेला आहे. त्या साधेपणाला लाजरेबुजरेपणाची झालर आहे. बालके (दादू आणि बाई), मुली (लोठ्या) आणि स्त्रिया ह्यांचे लाजणे आपण सर्वसाधारण सर्वच समाजांमध्ये पाहतो पण इथे मुलगे, तरुण (बंडे) आणि पुरुष (गोहले) असे सर्वच लाजताना दिसतात. मग ते त्यांच्या कमी बोलण्यातून डोकावते आणि भेटायला आले तरी दूर कुठेतरी बसण्यातून दिसून येते. 'Simple is beautiful' ह्या म्हणण्याप्रमाणे त्यांच्या साधेपणातच सौंदर्य दडलेले आहे. घरे साधी असली तरी स्वच्छ आणि आखीव - रेखीव. घरात कधीतरी कोणाच्यातरी लग्नानिमित्ते देवाचा चौक काढलेला दिसतो. त्याने त्या घराच्या सौंदर्यात आणखी भर पडते. घरात भाताचे कणगे भरलेले दिसतात त्यातून 'उंदीची (उद्याची) चिंता नाही' असा भाव प्रतिबिंबित होतो. ख्रिस्ती कुटुंबात घरोघरी साधेसुधे आल्तार दिसते त्यात येशू-मरियेच्या तसबिरी किंवा इमाजी ठेवलेल्या दिसतात. तोही साधेपणा पाहणाऱ्याच्या नजरेतून सुटू शकत नाही.

### सावध ऐका पुढल्या हाका

मिशन भागात कार्य करण्यात एक वेगळेच समाधान असते. सूर्य कितीही मनमोहक वाटला तरी तो आग ओकतो तेव्हा नकोसा होतो की नाही? चंद्र कितीही सुंदर दिसत असला तरी त्याच्यावरील डाग मनाला अस्वस्थ करतातच ना! अगदी त्याचप्रमाणे आजही मिशन भागाला नवनव्या आव्हानांचं ग्रहण लागू पाहत आहे. परंपरेत मुळावलेल्या संस्कृतीला बेलगाम आधुनिकतेचं, श्रद्धेला अंधश्रद्धेचे, बालपणाला अति लाडाचं, किशोर वयाला अवास्तव अपेक्षांचं, तरुणाईला बेधुंदपणाचं, सुशिक्षितपणाला अहंपणाचं, पुरुषांना व्यसनाधीनतेचं, एकूण समाजाला सोहळेबाजीचं ग्रहण लागण्याचा धोका असतो. ह्या पुढल्या हाका ऐकून आताच सावध पाऊले उचलली तर इथलं जीवन 'आजूक बेस' (अजूनही सुंदर ) व्हायला वेळ लागणार नाही.

मोबाईल : 99 22 18 98 92
96 37 20 44 33

●

# जागतिक मिशनचे पाचारण

## १८ ऑक्टोबर २०२६ : जागतिक मिशन दिन

- **फा. जॉन मॅथ्यू फरोज,** ये.सं.
तलासरी, उपलाट

‘मिशन’ म्हणजे आमंत्रित करणे अगर पाठवणे. हे मिशन प्रत्येक ख्रिस्ती भाविकासाठी एक पवित्र पाचारण आहे. म्हणून जागतिक मिशन दिनाचा आदर करणे आणि हे परमेश्वराचे पाचारण स्वीकारणे हा आपला धर्म आहे.

संत दुसरे पोप जॉन पॉल जेव्हा भारतात मुंबई व वसईला आले होते, तेव्हा ते आपल्या सर्वांसाठी मिशनचे आमंत्रण घेऊन आले होते. त्यांनी भारतीय ख्रिस्ती भाविकांना मिशनचे आवाहन केले. आशिया खंडातील ख्रिस्त हा आपल्याच देशाचा, गावाचा, कुटुंबाचा आहे. हा ख्रिस्त आपल्याला मिशनचे आवाहन करत आहे. भारतभूमी ही अनेक धर्म संस्थापकांची, साधू-संतांची, ऋषी-मुनींची व हजारो ख्रिस्ती मिशनऱ्यांची भूमी आहे. ह्या पवित्र भूमीतून अनेक मिशनरी जन्मास येऊ शकतात हा मोठा आशावाद पोप जॉन पॉल दुसरे ह्यांनी सर्वांना दिला. त्यांच्या पवित्र स्पर्शाने व आशीर्वादाने वसई चर्चची फार मोठ्या प्रमाणात भरभराट होऊन धार्मिक व आध्यात्मिक विकास होत आहे. अनेक भाविकांनी पोप आणि आपल्या ख्रिस्ताचे मिशन पाचारण स्वीकारले आहे आणि स्वीकारत आहेत.

संत पोप दुसरे जॉन पॉल ह्यांच्यानंतर पोप सोळावे बेनेडिक्ट, पोप फ्रान्सिस ह्यांनी मिशनकार्यासाठी अनेक वेळा मार्गदर्शन करून प्रेरणा दिल्या आहेत. आजही पोप चौदावे लिओ चर्चच्या मिशन कार्यावर भर देत आहेत. गोरगरीब, उपेक्षित, दलित, आदिवासी व बेघरांसाठी आपल्या सर्वांना मिशन कार्यात सहभागी होण्याचे आवाहन ते करत आहेत. हे ख्रिस्ताचे, चर्चचे मिशनकार्य आहे. ह्या कार्यास परमेश्वर आमंत्रित करत आहे.



२०२४च्या जागतिक मिशनदिनी पोप फ्रान्सिस म्हणाले, ‘‘चर्चचे मिशन ध्येय सर्व बाप्तिस्मा घेतलेल्या ख्रिस्ती लोकांसाठी आहे. मिशन म्हणजे सर्व पुरुष आणि स्त्रियांसाठी परमेश्वराला भेटण्यास संधी देणे, त्यांना परमेश्वराबरोबर संवाद साधण्यास आमंत्रित करणे. सर्वच ख्रिस्ती भाविकांनी ख्रिस्ती सुवार्ता पसरविण्यासाठी चर्चच्या मिशनकार्यात सहभागी होण्याची गरज आहे.’’

येशू ख्रिस्ताच्या पहिल्या शिष्यांचा मिशनरी म्हणून जरी छळ झाला, त्यांना मारण्यात आले, तरी आज ख्रिस्तसभा त्याच्या त्यागातून, कार्यातून, बलिदानातून वाढत आहे. म्हणून आजच्या ख्रिस्ताच्या मिशनरीविषयी लोकांच्या मनात आदरभावना, आपुलकी आणि सहकार्य आहे.

> **आजच्या ख्रिस्ताच्या मिशनरीविषयी लोकांच्या मनात आदरभावना, आपुलकी आणि सहकार्य आहे.**

पोप फ्रान्सिस ह्यांच्या चिंतनाप्रमाणे, ‘‘आपण सर्वच भाविक ख्रिस्ताच्या शिष्यांचे पूर्णपणे सिनोडल आणि मिशनरी चर्चमधील सार्वत्रिक मिशन आहोत. प्रत्येक जण हे मिशनचे हृदय आहे. म्हणूनच आपले सर्व मिशन ख्रिस्ताच्या हृदयातून, जीवनातून जन्मास आले आहे.’’

मिशन कार्यात स्वत:ला झोकून देणे हीच परमेश्वराची आपल्याकडून अपेक्षा आहे. परमेश्वराच्या मुक्तिकार्यात आणि देवराज्याची स्थापना करण्याच्या मिशनमध्ये आपली सामिलकी, बांधीलकी महत्त्वाची आहे. त्याच्या मिशनकार्याचे आपण भागीदार व्हावे म्हणून चर्च आज आपल्या सर्वांना ख्रिस्ताच्या मिशन योजनेत सहभागी होण्यास पाचारण करत आहे. ह्या पाचारणाला होकार देण्यास, देवाच्या आमंत्रणाला मनाचा मोकळेपणा हवा, आंतरिक स्वातंत्र्याने आमंत्रण स्वीकारावे सेवेची जबाबदारी घेण्यास तयार असावे, देवमूल्यांच्या जोपासण्यासाठी व ते पसरविण्यासाठी जीवनाची किंमत मोजायला तयार असावे. येशू ख्रिस्ताने आपल्या मिशनकार्यात मानवी मुक्तीची आणि देवराज्याची घोषणा केली आणि प्रत्येक व्यक्तीला महत्त्व दिले. येशू ख्रिस्ताचा प्रेमाचा आणि न्यायाचा संदेश मिशनच्या कृतींतून व्यक्त होत आहे. हा संदेश जगणे व कृतिशील बनविणे हे आपल्या सर्वांचे मिशन आहे.

देव मानवी मुक्तीच्या मिशन कृतीतून आणि ख्रिस्ताच्या संदेशातून प्रकट झाला आहे. परमेश्वराचा हा ख्रिस्ताविषयी आविष्कार अनुभवायचा असल्यास आपल्याला आजच्या जागतिक मिशनकार्यात सहभागी व्हावे लागेल. म्हणून जागतिक मिशनचे पाचारण आपल्या सर्वांसाठी एक आव्हान आहे. आपली मिशनसाठी सहभागिता, बांधीलकी आणि आपल्या चौकटीच्या बाहेर पडून इतरांच्या व्यापक मिशनमध्ये झोकून देणे, हा आपला धर्म आहे.

मोबाईल : 99 75 08 67 00

# असिसीचे संत फ्रान्सिस आणि आंतर-धर्मीय सुसंवाद

- **फादर विल्सन डिसोजा,** कॅप्युचिअन
संत पाद्रे पिओ नोव्हिशिएट, मालवण

असिसीचे फ्रान्सिस मिशन कार्य करत असताना असिसीपासून २८ किलोमीटर अंतरावर असलेल्या गुंबीओ शहराला भेट देत होते. अशा वेळी काही लोक ह्या सद्गृहस्थाकडे तक्रार घेऊन आले व म्हणाले, ''आमच्या शहरात कोल्हा शिरतो. आमच्या मुलाबाळांना घाबरवतो, आमच्या शेतीची नासधुस करतो. तू पशु-पक्ष्यांशी बोलतोस तर आमची ह्या दुष्ट आणि हिंसक कोल्ह्यापासून सुटका कर!''

संत पुरुष शहरात आले आहेत ही बातमी कोल्ह्याला कळते व तो आपली तक्रार घेऊन संत फ्रान्सिसकडे येतो. कोल्ह्याला पाहून गावातील लोक सळो की पळो करतात, पण फ्रान्सिस त्या कोल्ह्याकडे जातो. प्रथम त्याला 'बंधू' ह्या नावाने संबोधितो आणि त्या दोघांमध्ये संवाद सुरू होतो.

कोल्हा फ्रान्सिसला कोणत्याही प्रकारची इजा न करता आपल्या भाषेत फ्रान्सिसकडे तक्रार करतो, ''ह्या शहरातील लोक माझा जीव घेऊ पाहतात, मला खायला देत नाहीत.''

फ्रान्सिस गुंबीओ शहरातील जे लोक पळून गेले होते त्यांना बोलावतो आणि त्यांच्यात संवाद घडवून आणतो. त्यांच्यात मैत्रीचे नाते निर्माण करतो. त्यांच्यात एक करार होतो : 'लोक कोल्ह्याला खाऊ घालणार आणि कोल्हा लोकांचे संरक्षण करणार!' सगळे लोक कोल्ह्याबरोबर गुण्यागोविंदाने राहू लागले.

असिसीकर फ्रान्सिस केवळ मानवाशी संवाद करायला शिकवत नाही, तर पशु-पक्ष्यांशी नाते जोडण्यास व त्यांची भाषा शिकून त्यांच्याशी संवाद साधण्यास आमंत्रित करतो.



पोप फ्रान्सिस ह्यांनी अरब देशात म्हणजे अबुदाबी ह्या देशाला भेट देऊन इस्लामी लोकांशी संवाद साधण्याची परिपूर्ती केली. त्यांनी ''हे प्रभो, मला तुझ्या शांतीचे साधन बनव'' ह्या असिसीकर फ्रान्सिसच्या साध्या-सोप्या प्रार्थनेने सुसंवाद साधण्याचा प्रयत्न केला.

१२व्या व १३व्या शतकामध्ये ख्रिस्तसभेमध्ये अनेक वादविवाद निर्माण झाले होते. १२१९मध्ये अस्त्रशस्त्रांद्वारे युद्ध जिंकण्यापेक्षा शांती, संवादाने, बंधुप्रीतीने ही समस्या कशी दूर करता येईल ह्या विचारात असताना, फ्रान्सिस आपला बंधू इलुमीनातो ह्याला बरोबर घेऊन इजिप्तच्या सुलतानाकडे जाण्याची तयारी करतो.

**संत फ्रान्सिस मानवाप्रमाणे पशु-पक्षी, वृक्ष-वेली ह्यांच्याशी संवाद करायला शिकवतो.**

ही बातमी देऊळमातेच्या पुढाऱ्यांना कळते तेव्हा ते फ्रान्सिसला विरोध करतात. पण देवाच्या आत्म्याने भरलेला देव-मनुष्य आपल्या बंधूबरोबर कोणत्याही प्रकारचे शस्त्र न घेता केवळ एक पवित्र शास्त्र आपल्या झोळीत घेऊन निघतो.

इजिप्तच्या प्रवेशद्वाराकडे आणि मालिक एल खलिल ह्यांच्या दरबाराकडे विचित्र वेशभूषेत असलेले दोन इसम येत आहेत हे पाहून राजाने आपल्या दोन दिवस अन्नाविना असलेल्या दोन वाघांना आपल्या शत्रूकडे पाठवले. जेणेकरून ते दरबारात पोहचण्याआधी मृत्यू पावतील. प्राण्याचा दोस्त फ्रान्सिस ह्यांनी आपल्या मित्रांना आपल्या जवळ केले. त्यांच्याशी संवाद साधला आणि ह्या वाघांनी त्यांना खाण्याऐवजी महाराजाच्या दरबारात आणले.

हा विचित्र प्रकार पाहून महाराज आश्चर्यचकित झाले. हत्याराविना आपल्या दरबारात आलेल्या शत्रूचा स्वीकार केला. आपल्या विरुद्ध बंड पुकारण्यासाठी आलेल्या पाहुण्याचे त्याने स्वागत केले. शस्त्राविना सुसंवाद करण्यासाठी आलेल्या फ्रान्सिसने सर्वांची मने आणि हृदये जिंकून घेतली. महाराज मालिक ह्यांनी जी तलवार व ढाल वापरून आपल्या शत्रूचा पराभव करण्याचे ठरवले होते तीच ढाल व तलवार फ्रान्सिसला त्याच्या प्रेमाचे, मैत्रीचे व सुसंवादाचे प्रतीक म्हणून बहाल केले.

ह्या सुसंवादातून एक संदेश जगाला मिळाला. तलवारीस तलवारीने जबाब दिला तर जग जिंकता येत नाही. जगाला एकच धर्माने जिंकता येते आणि तो धर्म दुसरा तिसरा कोणता नसून केवळ प्रीतीचा, शांतीचा, समजुतदारपणाचा व त्याहूनही आधिक सुसंवादाचा!

मोबाईल : 84 82 95 03 67

●

# संत फ्रान्सिसच्या शिकवणुकीचे अनुकरण

-ब्रदर ओशन डिक्रुझ
रमेदी/गोरेगाव



निसर्गाकडून आपणाांस काय मिळेल? ह्याची अपेक्षा न ठेवता, आपण ह्या निसर्गासाठी काय करू शकतो? हा अनमोल निःस्वार्थी विचार संत फ्रान्सिस असिसी आपणास शिकवतात. ३ ऑक्टोबर १२२६ रोजी वयाच्या ४४ व्या वर्षी निधन झालेले असिसीचे संत फ्रान्सिस ह्यांच्या निधनाचे २०२६ हे वर्ष ८०० व्या स्मृतीचे वर्ष आहे. त्यांनी ह्या सृष्टीकडे ज्या प्रेमाने पाहिले, ते आजच्या युगासाठी व भविष्यातील पिढीसाठी खूप महत्त्वाचे आहे. ह्या अगाध विश्वातील अवकाश, तारे, ग्रह, जल, वायू, मृदा, सजीव हे सर्व परमेश्वराच्या विश्वनिर्मितीचे भाग आहेत व आपले जीवित कार्य सुरक्षित पार पडावे ह्यासाठी आपणांस निसर्गाची अनमोल अशी देणगी परमेश्वराने बहाल केली आहे. त्याचा आपण योग्य रीतीने साांभाळून वापर करावा अशी त्यांची भावना होती. आज मात्र आपण ह्या निसर्गावर घाला घातला आहे. हवामान बदल, वाढते तापमान, मातीचे, पाण्याचे आणि हवेचे प्रदूषण हे सर्व जंगलतोड व प्लास्टिकचा अतिवापर ह्यांचे दुष्परिणाम आहेत. माणसाच्या हव्यासापोटी पशु-पक्ष्यांचे अधिवास नष्ट होऊन अनेक प्रजाती लयाला जात आहेत. अतिवृष्टी, अवर्षण, अनियमित पाऊस, भूस्खलन, वाढती उष्णता ह्यांचा मानवी जीवनावरही परिणाम होत आहे.

पर्यावरणाचा प्रश्न हा मानवाच्या आरोग्यासाठी देखील दिवसेंदिवस घातक ठरत आहे. निसर्गाचे नुकसान म्हणजे तुमच्या आमच्या भविष्यातील पिढीचे नुकसान आहे. शुद्ध ऑक्सिजन, शुद्ध जलापासून व सुपीक मृदेतून मिळणाऱ्या धान्यापासून आज आपण वंचित होत आहोत. त्यामुळे अनेक दुर्धर आजारांनी आपणाांस विळखा घालण्यास सुरूवात केली आहे. जंगलतोडीमुळे निसर्गचक्रात देखील बदल घडून येत आहेत. म्हणूनच ह्या पृथ्वीची काळजी घेणे, तिचे संरक्षण करून स्वतःच्या आणि पुढील पिढ्यांच्या भविष्यासाठी तिचे जतन करून ठेवणे हे आपले नैतिक कर्तव्य आहे.

सुंदरलाल बहुगुणा आणि चंडीप्रसाद भट्ट ह्यांसारख्या लोकांनी 'चिपको आंदोलनाने' झाडांचे आणि जंगलाचे महत्त्व देशाला पटवून दिले. एवढेच नाही, अनेक सामाजिक संस्था, युवावर्ग, विद्याथी वर्ग, चर्च संघटना वृक्षारोपण करून वृक्ष संवर्धनाचे कार्य करत आहेत. नैसर्गिक संसाधनांचा, अपारंपरिक स्रोतांचा काळजीपूर्वक, काटकसरीने वापर करण्याचा सल्ला देत आहेत. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' व पाण्याचे पुनर्भरण करून ही नैसर्गिक संपत्ती दूषित होऊ नये म्हणून बावखले स्वच्छता उपक्रम राबवित आहेत. 'प्लास्टिक मुक्त धर्मग्राम' ही मोहीम राबवून निसर्गाला प्रदूषणमुक्त करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. आपणही ह्या पर्यावरण जागृतीच्या उपक्रमात सहभागी होणे गरजेचे आहे.

**केवळ उपक्रम घेणे नाही; तर सृष्टीकडे पाहण्याची विशाल दृष्टी अंगीकारणे**

आपल्या घरांतील पाणी वाचवणारी व्यक्ती, प्लास्टिकचा अतिवापर टाळणारा विद्यार्थी, झाडांची काळजी घेणारी तरुण पिढी, निसर्गाची काळजी घेऊन धान्य उत्पादन करणारा शेतकरी, आपल्या परिसराला दुर्गंधीपासून दूर ठेवून स्वच्छता राखणारा सामान्य नागरिक हे सर्व छोट्या छोट्या कृतींतून संत फ्रान्सिसचा अध्याय गिरवू शकतात.

आपल्या मुलांना झाडे लावून त्यांची काळजी घेण्यास शिकविणे, पाणी व वीज ह्यांचा अतिवापर टाळणे, सुका व ओला कचरा, प्लास्टिक व इलेक्ट्रॉनिक वस्तू ह्यांचे योग्यप्रकारे वर्गीकरण करणे. माझे घर, स्वयंपाक खोली, प्लास्टिकमुक्त राहील ह्यावर विशेष भर देणे. माती दूषित होऊ नये म्हणून खतांचा, रसायनांचा वापर कमी करणे, घरातील, कारखान्यातील दूषित पाणी नदी-नाल्यात, समुद्रात न सोडता माझ्या घराभोवती शोषखड्डा खोदून त्यातच दूषित पाणी मुरवणे ह्यांसारखे बदल स्वत:मध्ये घडवून इतरांनाही त्यासाठी प्रेरित करणे म्हणजेच संत फ्रान्सिसच्या शिकवणुकीचे अनुकरण करणे होय.

संत फ्रान्सिस ह्यांच्या ८००व्या स्मृती वर्षात त्यांची आठवण करून फक्त कार्यक्रम घेणे पुरसे नाही. त्यांची सृष्टीकडे पाहण्याची दृष्टी आपल्या जीवनात आणणे गरजेचे आहे. ही जबाबदारी काही निवडक लोकांची नाही. पृथ्वी सर्वांची आहे, म्हणून तिची काळजी घेण्याची जबाबदारीही सर्वांची आहे.

मोबाईल : 95 03 49 85 52

# मृत्यूविषयी संत फ्रान्सिस ह्यांचे विचार

-फा. घोन्सालो डिसिल्वा
फ्रान्सिस्कन कॅप्युचिन (रोम)

आपले परिवर्तन झाल्यापासूनच त्याने देवाला आपला पिता आणि अखिल सृष्टीतील समस्त प्राणिमात्रांना आपले बंधू आणि भगिनी मानले होते. 'विश्वबंधुत्व' हे त्याच्या जीवनाचे ब्रीद होते. त्याला आपल्याला येणाऱ्या मृत्यूची चाहूल लागली होती. तो 'शारीरिक मृत्यूला' घाबरला नाही, तो हताश आणि हतबल झाला नाही. विशेषत: मरताना त्याच्या मनात कसलीच कटुता नव्हती.

संत फ्रान्सिससाठी 'शारीरिक मृत्यू' हा जीवनाचा अंत नव्हता; तर अनंत जीवनाकडे जाणारा तो एक नैसर्गिक प्रवास होता. त्यांच्या आयुष्याच्या अखेरच्या दिवसांत त्यांची दृष्टी गेलेली होती. तीव्र शारीरिक व्याधींनी त्यांना ग्रासले होते. असे असतानाही त्यांनी त्यांच्या सुप्रसिद्ध 'सृष्टिगीतात' (Canticle of Creatures) अंतिम कडवे रचले. ह्या कडव्यात त्यांनी 'भगिनी मृत्यू' (Sister Death) बद्दल परमेश्वराची स्तुती केली. त्यांनी शिकवले की, प्रेम आणि सेवेसाठी स्वत:ला पूर्णपणे समर्पित केल्याने आपला आत्मा कधीच मरत नाही. तर तो सदासर्वकाळ अमर राहतो. फ्रान्सिस म्हणतो, 'हे माझ्या प्रभू, आमची 'भगिनी शारीरिक मृत्यू' हिच्याद्वारे तुझी स्तुती असो; जिच्यापासून कोणताही जिवंत माणूस सुटू शकत नाही.' फ्रान्सिसने मृत्यूपासून पळ काढला नाही. उलट त्याने त्याच्याकडे सृष्टीचाच एक अविभाज्य भाग आणि ईश्वराच्या अंतिम भेटीचे प्रवेशद्वार म्हणून पहिले आणि स्वीकारले.

शेवटचे श्वास घेत असताना आणि अगदी मृत्यूच्या दाराशी असताना, त्याने आपल्या शिष्यांना त्याला नग्न अवस्थेत



जमिनीवर ठेवण्याची विनंती केली. येशूचे अनुकरण करण्यासाठी त्याने सर्वसंग परित्याग केला होता. तो पूर्णत: समाधानी होता. त्याने 'शारीरिक मृत्यूचे' स्वागत शत्रू म्हणून नव्हे; तर एका 'मोठ्या भगिनी' प्रमाणे केले जी त्याला ख्रिस्ताकडे घेऊन जाणार होती. फ्रान्सिससाठी मृत्यू हा अंत नव्हता, तर ईश्वराच्या सान्निध्यातील जीवनाकडे नेणारा एक प्रकाशमय प्रवास होता.

आजचे जग सततची युद्धे, संघर्ष आणि हिंसाचार ह्यांचा सामना करीत आहे. मृत्यू सतत आपल्या जीवनाच्या दारावर ध्यानीमनी आणि स्वप्नी नसताना ठोठावत असतो. त्याला न दया नि माया. मृत्यूचा' 'भगिनी' म्हणून स्वीकार करणे म्हणजे दुखा:चे उदात्तीकरण करणे नव्हे, तर आपल्या मानवी मर्यादेंचा स्वीकार करून शांततेने जगणे. पुनरुत्थानाच्या आशेसाठी आपल्या मनाची कवाडे सतत खुली ठेवणे.

**मृत्यूची भीती बाळगण्याऐवजी 'भगिनी मृत्यू' म्हणून त्याचा सहर्ष स्वीकार केला.**

फ्रान्सिसची दृढ श्रद्धा होती की, 'मृत्यू' हा ख्रिस्ताशी होणाऱ्या भेटीचा अंतिम टप्पा आहे. 'मृत्यू' हा असा एक मार्ग आहे की, ज्यातून आपल्याला जावच लागते. तो टाळून पुढे जाता येत नाही. मृत्यूला टाळून नव्हे; तर कवटाळून, आलिंगन देऊन फ्रान्सिस येशूचा खराखुरा शिष्य बनला. तो खऱ्या अर्थाने मृत्युंजय झाला. आजही लाखो स्त्री-पुरुष, तरुण-तरुणी आपल्या सर्वस्वाचा त्याग करून त्याच्या पावलांवर पाऊल ठेवून फ्रान्सिस्कन जीवनाचा मार्ग अनुसरत आहेत. खऱ्या आंतरिक शांतीचा अनुभव घेण्यासाठी जगाच्या कानाकोपऱ्यातून अनेक लोक इटलीच्या असिसी ह्या शहरात येऊन त्याच्या थडग्याला भेट देत आहेत.

आपले ख्रिस्ती जीवन मुळात ह्या भूतलावरील एक तीर्थयात्रा आहे. आपण सर्वजण ह्या जगात देवाकडून आलेलो आहोत आणि पुन्हा ह्या जीवनाच्या अंती आपल्याला देवाकडे परत जायचे आहे. आपला शारिरीक मृत्यू हा आपल्या तीर्थयात्रेचा शेवटचा टप्पा नसून सार्वकालिक जीवनात प्रवेश करण्याची ती एक अरुंद आणि खडतर अशी वहिवाट आहे. आपल्याला जेव्हा आपल्या मृत्यूची चाहूल लागते तेव्हा आपण न डगमगता आणि न घाबरता शूर योद्ध्याप्रमाणे अर्थातच येशू ख्रिस्त, संत फ्रान्सिस प्रमाणे मृत्यूला सामोरे जायला पाहिजे.

प्रेषित संत पॉल म्हणतो, 'मी सुयुद्ध जिंकले आहे, धाव संपविली आहे, विश्वास राखिला आहे. आता जे राहिले आहे ते हेच की, माझ्यासाठी नीतिमत्त्वाचा मुकुट ठेविला आहे; प्रभू जो नीतिमान न्यायाधीश आहे तो त्या दिवशी मला तो मुकुट देईल; आणि तो केवळ मलाच नव्हे, तर त्याचे प्रकट होणे ज्यांना प्रिय झाले त्या सर्वांनाही देईल'' (२ तीमथ्य ४: ७-८).

मोबाईल : 0039-331 894 2294

# ताऊ क्रॉस

- फादर नितीन डिसोजा
संत जोसेफ चर्च, उमराळे

इंग्रजीतील ‘ऊ’ अक्षरासारखे दिसणारे हे छोटेसे चिन्ह तुम्ही कदाचित एखाद्या फ्रान्सिस्कन चर्चमध्ये, असिसीकर संत फ्रान्सिस ह्यांच्या चित्राजवळ किंवा एखाद्या फ्रान्सिस्कन धर्मबंधूच्या गळ्यात पाहिले असेल. तसेच ते ‘सुवार्ता’ मासिकाच्या मुखपृष्ठावर उजव्या बाजूला ताऊ पाहिला असेल. ते पाहून हे नेमके काय आहे? एखादे अक्षर? वेगळ्या आकाराचा क्रूस? की फ्रान्सिस्कन संघाचे चिन्ह?

हे आहे ‘ताऊ’ (TAU) असिसीकर संत फ्रान्सिस ह्यांच्या जीवनाशी इतके एकरूप झालेले चिन्ह, की अनेकदा स्वतःचे नाव लिहिण्याऐवजी ते ताऊची खूण करून आपली सही करत असत. ‘ताऊ’ हे ग्रीक वर्णमालेतील एक अक्षर असून त्याचा आकार ‘ऊ’ सारखा आहे. प्राचीन काळापासून त्याचा आकार क्रुसाशी साधर्म्य असलेला मानला गेला. असिसीकर संत फ्रान्सिस यांच्यासाठी ताऊ हा केवळ क्रुसाचा आकार नव्हता. त्यात त्यांना क्रुसावरील ख्रिस्त, त्याचे बलिदान आणि मानवजातीवरील त्याचे अपार प्रेम दिसत असे. ताऊ त्यांच्या जीवनात ख्रिस्ताशी असलेल्या नात्याची दृश्यमान खूण बनला.

### ताऊची मुळे बायबलमध्ये

जुन्या करारातील यहेज्केल ९:४मध्ये देवाशी निष्ठावंत राहणाऱ्यांच्या कपाळावर एक चिन्ह करण्याचा उल्लेख आढळतो. पुढे संत बोनाव्हेंचर ह्यांनी आपल्या Legenda Major ह्या संत फ्रान्सिस ह्यांच्या चरित्रात ह्या संदेष्ट्याच्या संदेशाचा आणि फ्रान्सिस ह्यांच्या कार्याचा सुंदर संबंध जोडला. त्यांच्या मते, मनापासून ख्रिस्ताकडे वळणाऱ्यांवर ‘ताऊ’ची खूण करण्याचा संदेश संत फ्रान्सिस ह्यांच्या जीवनात प्रतिबिंबित झाला. ताऊ हे केवळ एक चिन्ह न राहता



देवाकडे परतण्याचे व अंतःकरणाच्या परिवर्तनाचे प्रतीक बनले.

### असिसीकर संत फ्रान्सिस आणि ताऊ

इ. स. १२१५ मध्ये पोप इनोसंट तिसरे ह्यांनी चौथ्या लेटरन महासभेच्या काळात ख्रिस्ती जीवनाच्या नूतनीकरणाचे आवाहन करताना ताऊ चिन्हाचा उल्लेख केला. हा संदेश फ्रान्सिस ह्यांच्या हृदयाला भिडला. त्यानंतर ताऊ त्यांच्या जीवनात अधिक ठळकपणे दिसू लागला.

फ्रान्सिस ताऊवर इतके प्रेम करत की ते आपल्या पत्रांवर व लिखाणावर स्वतःच्या नावाऐवजी ताऊची खूण करत. एवढेच नव्हे; तर ज्या ठिकाणी ते राहत, तेथील भिंती आणि दरवाजांवरही ताऊचे चिन्ह काढत असत. जणू त्या एका साध्या खुणेतून ते सांगत होते, ‘‘माझी ओळख क्रुसावरील ख्रिस्तामध्ये आहे.’’

**माझी ओळख क्रुसावरील ख्रिस्तामध्ये आहे.**

संत फ्रान्सिस ह्यांनी आपल्या अतिशय जवळच्या सहकारी बंधू लिओ ह्यांना स्वतःच्या हस्ताक्षरात आशीर्वाद लिहून दिला होता. त्या हस्तलिखितावर त्यांनी स्वत: मोठे ताऊ चिन्ह काढले. आज आपण ते हस्तलिखित पाहतो तेव्हा केवळ इतिहासातील एखादी खूण पाहत नाही; आपण प्रत्यक्ष संत फ्रान्सिस ह्यांच्या हाताने काढलेली त्यांची ‘सही’ पाहत असतो.

### फक्त गळ्यात नाही, जीवनातही

असिसीकर संत फ्रान्सिस ह्यांच्यासाठी ताऊ धारण करणे म्हणजे केवळ क्रुसाची आठवण ठेवणे नव्हते. त्यांनी आपल्या बंधूंनाही ह्या चिन्हाचा अर्थ जगण्यास शिकवले. ताऊ बाहेरून दिसावा, पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे क्रुसावरील ख्रिस्ताचे प्रेम आपल्या जीवनातून दिसावे.

दुसऱ्यासाठी स्वतःला देणे, दुःखी माणसाजवळ उभे राहणे, क्षमा करणे, नम्रता स्वीकारणे, गरिबाला आपले मानणे, सृष्टीचा आदर करणे आणि संघर्षाच्या ठिकाणी शांतता घेऊन जाणे - असिसीकर संत फ्रान्सिस यांच्यासाठी हा होता ताऊ जगण्याचा मार्ग. प्रत्येक फ्रान्सिस्कनने जणू ‘चालता-बोलता क्रूस’ व्हावे; त्याच्या जीवनातून ख्रिस्ताचे प्रेम इतरांना अनुभवता यावे, हा ह्या चिन्हामागचा खरा संदेश होता. म्हणूनच आजही जगभरातील फ्रान्सिस्कन कुटुंबात ताऊला विशेष स्थान आहे. धर्मबंधू, धर्मभगिनी आणि सामान्य फ्रान्सिस्कन ताऊ धारण करतात. तो केवळ दागिना नाही, एखादा ‘लोगो’ नाही आणि फक्त असिसीकर संत फ्रान्सिस ह्यांची आठवणही नाही. ती एक ओळख, वचन व जबाबदारी आहे - ख्रिस्ताच्या पावलांवर चालण्याची. त्यात ख्रिस्ताचा क्रूस दिसेल. त्यावर संत फ्रान्सिसची सही दिसेल व त्यातून ख्रिस्तासारखे जगण्याचे आमंत्रण ऐकू येईल. कारण ताऊ गळ्यात घालण्याचे चिन्ह नाही; ते जीवनात उतरवण्याचे चिन्ह आहे.

मोबाईल : 94 83 24 19 82

# धर्मपरिवर्तन

- ख्रि. बिशप एडविन कोलासो
औरंगाबाद

धर्मपरिवर्तन हा विषय पुन्हापुन्हा चर्चेत राहतो. त्यामुळे एक कॅथलिक म्हणून, कॅथलिक धर्मगुरू म्हणून व कॅथलिक धर्माचा एक अधिकृत शिक्षक म्हणून कॅथलिक धर्मीयांची ह्याविषयीची भूमिका विशद करण्यास मी उत्सुक आहे.

धर्मपरिवर्तनाचा विषय निघाला की मला नाशिकच्या एका रस्त्याच्या कडेला असलेल्या द्राक्षे विकली जाणाऱ्या मंडईची आठवण येते. मी उत्तन (माझा गाव) हून अमरावतीला जात असताना ही मंडई आल्याबरोबर मी माझी जीप थांबवीत असे. नाशिकला आलोच आहे, तर बिशप हाऊससाठी व आजूबाजूच्या धर्मभगिनींना व धर्मगुरूंना द्राक्षांची भेट न्यावी म्हणून जीपमधून उतरून मी मंडईत शिरत असे. तेथे द्राक्षे विकणाऱ्यांचे दहा-पंधरा ठेले दिसायचे. त्यावर एक नजर टाकून मी काही ठेल्यांजवळ जाऊन द्राक्षे चाखायचो. द्राक्षे आंबट लागली तर आंबट तोंड करून दुसऱ्या ठेल्याकडे कूच करायचो व चांगली टवटवीत गोड द्राक्षे मिळाली तर त्यांचे खोके भरून जीपच्या डिकीमध्ये ठेवून मार्गस्थ होत असे.

द्राक्षे निवडणे व धर्म निवडणे ह्यांची तुलना करणे बालिशपणाचे लक्षण ठरेल; परंतु दोन्ही निवडणारी माणसे सारख्याच प्रक्रियेतून जात असतात हे सत्य आहे. जगातील लाखो लोकांनी ख्रिस्ती धर्मात येण्यासाठी हीच प्रक्रिया अवलंबिल्याचे दिसून येते. एखाद्या धर्मातील 'आंबटपणा' आवडला नाही, उलट ख्रिस्ती धर्मात त्यांना गोडवा सापडला म्हणून त्यांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला असे त्यांचे म्हणणे आहे.



काहींना वाटलं की ह्याच्या धर्मात माणुसकीला वेशीवर टांगविले आहे व वर्ण व्यवस्थेच्या मागे लागून माणसां-माणसांत स्पृश्य-अस्पृश्य अशा अत्यंत अमानवीय विषमतेला जन्म दिला आहे, लाखो माणसांना वाळीत टाकलं आहे, त्यांचा स्पर्श शाप मानला जातो, त्यांना पाणी बंद, त्यांना शिक्षणाचे दरवाजे बंद केले आहेत. काहींनी धर्माच्या नावाखाली सतीची प्रथा अवलंबून लाखो स्त्रियांना आगीच्या डोंबात लोटून त्यांचे प्राण घेतले आहेत व त्यांच्या मुलांना अनाथ केले आहे. काहींनी त्यांचे प्रकल्प यशस्वी व्हावे म्हणून अंधश्रद्धेच्या पोटी जाऊन नरबळी घेतले आहेत ह्याचा वीट येऊन हजारो माणसांनी ख्रिस्ती धर्म पसंत केला आहे.

''ऊन सालोंको गोली मारो'', ''भारत तुमच्या बापाचा नाही'' (आमच्या बापाचा आहे) ''तुमची जागा पाकिस्तानात आहे'', अशी मुक्ताफळे ओकणारी काही माणसे आहेत व त्यांच्या जिभेला लगाम लावणारी धाडसी माणसे त्यांच्यात नाहीत, अशा जाचाला कंटाळून काही माणसे त्यांच्यातून बाहेर पडून ख्रिस्ती धर्मात आलेली आहेत.

ख्रिस्ती उपासना विधी अत्यंत शिस्तबद्धपणे पार पडतात. तेथे सावळा गोंधळ नसतो. विधीत भाग घेणारे हजारोंच्या संख्येने जरी असले तरी तेथे प्रत्येक व्यक्तीला आपल्या मनासारखी प्रार्थना करता येते, हे पाहून अनेक माणसांच्या मनात ख्रिस्ती धर्मात प्रवेश करण्याची प्रेरणा मिळते.

प्रेषितांच्या कृत्यात आपण वाचतो की ख्रिस्ती समाजामध्ये सौहार्दाचे वातावरण पाहून त्यांच्या जवळ राहणारे इतर धर्मीय म्हणायचे, ''पाहा हे लोक कसे एकमेकांवर प्रेम करतात.'' आजही मी गावंच्या गावं पाहिली आहेत, जेथे ख्रिस्ती लोकांमध्ये अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध असतात व ते पाहून सुद्धा बरीच माणसे ख्रिस्ती धर्माकडे आकर्षित होतात.

ख्रिस्ती धर्माकडे आकर्षित करणारे सर्वांत मोठे कारण म्हणजेच प्रभू येशूचे जीवन व त्याची शिकवण. त्याच्या जीवनाने व शिकवणीने माणसं एवढी प्रभावित होतात की त्याचे अनुयायी होण्यासाठी कोणताही त्याग करण्यात व छळ सहन करण्यात माणसं स्वत:ला धन्य समजतात.

एवढी सगळी कारणे येशूचा धर्म स्वीकारण्यास पुरेशी आहेत. म्हणून ह्या कारणामुळे प्रभावित होऊन माणसे जर धर्मांतर करून ख्रिस्ती धर्मात येत असतील तर त्यांच्या मार्गात अडथळे निर्माण करणे, त्यांचा छळ करणे, त्यांच्या धर्मगुरूंचा छळ करणे हे द्वेषाचे, हेव्याचे, न्यूनगंडाचे लक्षण आहे, असे म्हणणे केव्हाही उचित आहे.

वरील कारणे ख्रिस्ती धर्म स्वीकारण्यासाठी कितीही संयुक्तिक असली तरी ईर्ष्येला पेटलेला माणूस ख्रिस्ती धर्म स्वीकारणाऱ्या माणसांचा

पिच्छा सोडीत नाहीत. तो माणूस म्हणतो की, ''कॅथलिक धर्मगुरू अशा माणसांना आमिष दाखवून व धाकदपटशा दाखवून त्यांच्यावर ख्रिस्ती धर्म लादतात.''

अशा माणसांना 'एखाद्या माणसालाा ख्रिस्ती धर्मात स्वीकारण्यापूर्वी कॅथलिक धर्मगुरू कोणते पथ्य पाळतात', हे सांगितल्यावर त्यांची बोलती बंद पडते.

**उदाहरणादाखल :** एक तरुण मुलगी माझ्याकडे आली. ती कॉलेजपर्यंत शिकली होती. ती म्हणाली, ''मला ख्रिस्ती व्हायचंय!'' मला आनंद झाला. कारण मी ख्रिस्ती धर्मात वाढलो, त्या धर्माने माझ्यावर संस्कार घडविले, त्या धर्मात ज्या अनेक गोष्टींमुळे माझी जीवनबाग फुलवली, माझ्या जीवनाचा अर्थ समजला त्यापेक्षा अधिक आनंद जगातील कोणत्याच अन्य गोष्टींनी मला मिळाला नाही. माझ्या शिक्षणामुळे नाही, पैशांमुळे नाही, लोकांनी तोंड भरून केलेल्या माझ्या प्रशंसेमुळे नाही, कशाकशानेच आनंद दिला नाही, एवढा आनंद माझ्या धर्माने मला दिला आहे. पण त्या मुलीने इच्छा प्रदर्शित केली. त्यामुळे मला खूप आनंद झाला आहे. तिला माझ्या धर्मात स्वीकारण्यासाठी खूप उत्सुक आहे असे मी दाखविले नाही. मी स्थितप्रज्ञ राहिलो. मी तिला तिच्या पार्श्वभूमीविषयी विचारले. तिने सर्व काही सांगितले. ख्रिस्ती धर्म स्वीकारण्याची इच्छा तिला का झाली, तेही तिने सांगितले. मला तिच्या प्रामाणिकपणाविषयी कोणतीच शंका आली नाही. मी तिला म्हणालो, ''मी आजपासून ख्रिस्ती धर्माची माहिती द्यायला सुरुवात करतो. आणखीन कमीत कमी सहा महिने ते एक वर्षभर मी तुला मार्गदर्शन करीन. ती माहिती पूर्ण झाल्यानंतर मी तुला विचारीन की ख्रिस्ती धर्म तुला खरोखरच आवडला का? जर आवडला तर तुला ख्रिस्ती धर्मात घेण्यासाठी पुढील पावले उचलावी लागतील.''

त्यानंतर माझी तेथून बदली झाली. माझ्या जागेवर आलेल्या धर्मगुरूंनी त्या मुलीचे शिक्षण पूर्ण केले. तिने ख्रिस्ती धर्माची दीक्षा घेतली. नंतर तिने एका सुशील ख्रिस्ती मुलाबरोबर लग्न केले. त्यांना मुले झाली व आज तिचे कुटुंब आनंदाने राहात आहे. तिच्या कुटुंबाची गणना एका भक्तिमान ख्रिस्ती कुटुंबात केली जात आहे. ती ख्रिस्ती झाली म्हणून तिला कोणी त्रास दिला नाही. परंतु अनेक ख्रिस्ती झालेल्या माणसांना येशूने भाकीत केल्याप्रमाणे छळ सोसावा लागल्याची असंख्य उदाहरणे आहेत.

एकदा एखाद्या माणसाने ख्रिस्ती धर्म स्वीकारला की तो कोणत्याही छळाला सामोरे जाण्यास तयार होतो. पण ख्रिस्ती धर्माचा इतिहास पाहिला की दिसून येते की

**भारतीय घटनेत कलम २५ प्रत्येक भारतीयाला आपल्या पसंतीचा धर्म स्वीकारण्याचा, त्याप्रमाणे जीवन जगण्याचा व त्याचा प्रसार करण्याचा हक्क आहे**

जेवढा ख्रिस्ती माणसांचा छळ होत गेला तशी ख्रिस्ती माणसांची संख्या वाढत गेली. सुप्रसिद्ध प्रॉटेस्टंट इतिहासकार मेकॉले म्हणतात की कॅथलिक धर्मावर मोठमोठी संकटे आली, राजे आणि मोठमोठे सम्राट ह्यांनी पदोपदी कॅथलिक धर्मीयांची ससेहोलपट केली पण तो धर्म नष्ट होण्याऐवजी त्यांची संख्या वाढतच गेली आणि ती संख्या कमी होईल ह्याची कोणतीच चिन्हे दिसत नाहीत.

आजही मेकॉलेचे शब्द खरे होताना दिसत आहेत. उदा. खामगाव जिल्ह्यात डोंगराच्या कडेला वसलेल्या जलगाव-जामून नावाच्या छोट्याशा गावात कॅथलिक ख्रिस्ती लोकांचा एक आदिवासी समाज आहे. काही वर्षांपूर्वी खांडवा येथे ख्रिस्ती धर्माची दीक्षा घेऊन हा समाज येथे येऊन स्थायिक झाला व ख्रिस्ती धर्माचे पूजा-पाठ, रीतिरिवाज ते पाळत राहिले; पण अचानक एके दिवशी त्यांच्या ध्यानीमनी नसताना शे-दोनशे एका अतिरेकी संघटनेचे लोक तेथे हातात काठ्या-सोटे व तलवारी घेऊन त्या गावाला घेरले व त्या गरीब बिचाऱ्या लोकांना धमक्या देत म्हणाले, ''आजपासून तुम्हाला आमच्या धर्माची दीक्षा घ्यावी लागेल आणि तुम्ही तसे केले नाही तर तुमचं प्रत्येकाचं मुंडकं उडवलं जाईल.'' भयभीत झालेल्या त्या ख्रिस्ती आदिवासी माणसांनी वेळ मारून नेण्यासाठी नुसत्या माना हलविल्या. ही बातमी जेव्हा आमच्या कानावर आली तेव्हा आम्ही प्रसारमाध्यमातील चांगल्या माणसांशी संपर्क साधला. त्या माध्यमांनी विलंब न लावता ही बातमी देशात व परदेशात वाऱ्यासारखी पसरवली. आम्हाला अमेरिकेतून फोन येऊ लागले. राज्यकर्त्यांवर कमालीचा दबाव आणला गेला. शासनातील चांगली माणसे आमच्या मदतीला धावली. त्यांनी त्या आदिवासी लोकांना सुरक्षा पुरविली. आम्हां धर्मगुरूंना व धर्मभगिनींना त्या गावात जाण्यायेण्यासाठी वाहने आणि सुरक्षा अधिकारी तणावाचे वातावरण मावळेपर्यंत पुरवीत राहिले.

जेव्हा पवित्र आत्मा प्रेषितांवर उतरला तेव्हा एकाच दिवशी ३००० माणसांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला व तेव्हापासून ख्रिस्ती धर्मीयांची संख्या वाढतच आहे आणि आजमितीस फक्त कॅथलिक ख्रिस्ती लोकांची संख्या (जे पोपचा अधिकार

मानतात) 1406 Billion इतकी आहे. कॅथलिक ख्रिस्ती लोकांचा इतिहास येशूने भाकीत केल्याप्रमाणे छळवणुकीने भरलेला आहे, असे असूनही ''सर्व जगाला माझी सुवार्ता सांगा, त्यांना माझे अनुयायी बनवा.'' ही येशूची इच्छा आणखीन वेगाने पूर्ण होत आहे, ह्यावर प्रत्येक ख्रिस्ती माणसाला आनंद झाल्याखेरीज राहणार नाही.

आपल्या देशातील सर्व सुज्ञ माणसे मानतात की ह्या देशात सर्व माणसांना त्यांच्या इच्छेप्रमाणे आपला धर्म बदलण्याचा वा नवीन धर्म स्वीकारण्याचा हक्क आहे व कोणत्या प्रवृत्तीच्या कोणत्याच माणसाला, वकिलांना, न्यायालयांना त्याला विरोध करण्याचा हक्क नाही.

भारतीय घटनेत कलम २५ प्रत्येक भारतीयाला आपल्या पसंतीचा धर्म स्वीकारण्याचा, त्याप्रमाणे जीवन जगण्याचा व त्याचा प्रसार करण्याचा हक्क आहे. म्हणून ह्या हक्कांना विरोध करण्याचा कोणत्याही धर्मीयांना, त्यांच्या दलालांना राजकीय व सामाजिक नेत्यांना हक्क नाही. त्यांनी तसं करणे घोर पाप आहे आणि त्यांना कायद्याचा बडगा दाखविणे क्रमप्राप्त आहे.

भारताच्या घटनेने धर्माच्या बाबतीत केलेली ही तरतूद अत्यंत मोलाची आहे. ख्रिस्ती होणारा माणूस ह्या तरतुदीमुळे भयमुक्त होतो.

कोणत्याही मानवी तरतुदीपेक्षा देवाचा शब्द ख्रिस्ती धर्म स्वीकारणाऱ्या माणसाला अधिक ताकद देतो हे प्रेषितांची कृत्ये ह्या अध्यायात सापडणाऱ्या घटनांमध्ये व्यक्त केले आहे.

१) प्रेषितांची कृत्ये अध्याय ३ : मंदिराचे अधिकारी पेत्र व जॉन ह्यांना येशूचा धर्म पसरविण्यास मनाई करतात तेव्हा पेत्र त्यांना प्रश्न विचारतो, ''आम्ही तुमचे ऐकावे की देवाचे ऐकावे?''

महात्मा गांधींनी धर्मपरिवर्तना विषयी हीच भूमिका घेतल्याचे आपण वाचतो. ते म्हणाले, धर्माची निवड करणे हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. त्यांना कोणी विरोध करता कामा नये.

२) गमालिएल परुशी होता. कायद्याचा जाणकार होता. जेव्हा परुशांनी त्याच्याकडे तक्रार केली की ख्रिस्ती धर्म वाढतच आहे व त्याला थोपविण्याची गरज आहे तेव्हा तो त्यांना म्हणाला, ''असे अनेक धर्म आले आणि लयास गेले. ख्रिस्ती धर्म जर मानव निर्मित असेल; तर तर तो पण लयास जाईल, पण तो धर्म देवाकडून आला असेल; तर तुम्ही आणि आम्ही त्याला अडवू शकणार नाही.

●


# व्ही.एम्. टूर्स अॅन्ड ट्रॅव्हल्स

**आयोजक : टोनी डायस,** ओळंबवाडी–पापडी

**Contact : 8485890360 / 9320385977 / 9766398405**

**सेंट ज्यूड नोव्हेना, झाँसी (२४ ते ३० ऑक्टो. २६)**

**२१,०००–** जाता–येता राजधानी 3AC+ए.सी.रूम+ जेवण+ १दिवस– आग्रा सिटी/ ताजमहाल/लाल किल्ला, १ दिवस– ग्वाल्हेर सिटी, ३ दिवस– झाँसी सिटी/ किल्ला व शॉपिंग (सर्व एन्ट्री समाविष्ट) (४ जणांसाठी १ रुम). **२४,०००–** (२ जणांसाठी १ रुम) **निवासव्यवस्था:** हॉटेल यात्रिक एसी डायनिंग हॉल+लिफ्ट+ वायफाय (स्पॉट प्राईजसह स्पेशल गेट टुगेदर– २७ ऑक्टोबरला संध्याकाळी)

**रॉयल राजस्थान : ४ ते १६ व ९ ते २१ नोव्हें. २०२६**

**जयपूर** (२ रात्र)– हवा महल, बिर्ला मंदिर, आमेर किल्ला, पॅलेस. **पुष्कर** (१ रात्र)– ब्रह्मा मंदिर, पुष्कर लेक. **बिकानेर** (१ रात्र)– जुनागड किल्ला, पटवा हवेली. **जेसलमेर** (२ रात्र)– कँपमध्ये १ रात्र वास्तव्य, कॅमल सफारी, कलबेलीया नृत्य, जेसलमेर फोर्ट, तनोत माता मंदिर, गडिसर लेक. **जोधपूर** (१ रात्र)– मेहरागड फोर्ट, जसवंत थडा, उमेद भवन. **चित्तोडगड** (१ रात्र)– कुंभा पॅलेस, मीरा मंदिर, विजयस्तंभ, जोहार स्थल, पद्मिनी पॅलेस, कीर्तिस्तंभ. **उदयपूर** (२ रात्र)– सिटी पॅलेस, सहेलीयों की बारी, पिचोला लेक, फतेहसागर लेक. **माऊंट अबू** (१ रात्र)– अचलगड किल्ला, नख्खी लेक, दिलवाडा मंदिर, सनसेट पॉईंट.

**मुंबई ते जयपूर आणि जयपूर ते मुंबई विमान प्रवास, साईटसीन 2x2 AC बस. घरगुती जेवण, (3/4 Star) हॉटेलात राहण्याची सुविधा AC रुम (दोघांसाठी १ रुम) जयपूर एअरपोर्ट ते हॉटेल पिकअप/ड्रॉप समाविष्ट, एकूण खर्च : रु. 55,000/-**

**केरळ टूर : ४ नोव्हेंबर ते १० नोव्हेंबर २०२६**

**मुन्नार** (२ रात्र)– माटुपेटी व कुंडला डॅम, टी म्युझियम, ब्लॉसम पार्क, बोटॅनिकल गार्डन ग्लास ब्रीजसह, झिप लेन, एर्नाकुलम नॅशनल पार्क, रोझ गार्डन. **ठेकडी** (१ रात्र)– मसाले प्लँटेशन, स्वखर्चाने एलिफंट सफारी, बोटींग, स्वखर्चाने कथकली नृत्य व इतर. **अलेप्पी** (१ रात्र)– हाऊसबोटमध्ये वास्तव्य. **कोवालम** (१ रात्र)– जटायू अर्थ सेंटर, वरकला बीच. मंदिरे व चर्चला भेट, शॉपिंग इ.

**वसई ते एर्नाकुलम व एर्नाकुलम ते वसई (3AC Rajdhani) साईटसीन 2x2 AC बस. घरगुती जेवण, (3/4 Star) हॉटेलात राहण्याची सुविधा AC रुम (दोघांसाठी १ रुम) एकूण खर्च : रु. 43,000/- लहान मुलांचे रु. 40,000/- (४–११ वर्षे)**

**श्रीलंका : ५ नोव्हेंबर ते १० नोव्हेंबर २०२६ (५ रात्री/६ दिवस)**

**एकूण : रु. 71,000/- (कोलंबो– कँडी– नुवारा एलिया– एला– गॅले– बेन्टोटा)**

**वास्तव्य–** सुंदर ठिकाणी वसलेल्या ४ स्टार हॉटेलमध्ये सुपर डिलक्स रुम्स, **ब्रेकफास्ट/लंच/डिनर–** श्रीलंकन/भारतीय पद्धतीचे, **एसी लक्झरी बसने सर्वत्र प्रवास, सर्व साईटसीन** प्रवेश फी समाविष्ट, इन्शुरन्ससह फ्लाईट खर्च समाविष्ट.

**वेलंकनी ख्रिसमस वीक टूर : २६ ते ३० डिसेंबर २०२६**

**रु. १०,००० :** जेवण आणि एसी रुममध्ये राहण्याची व्यवस्था (४ जणांसाठी १ रूम), **रु. २९,५०० :** संपूर्ण पॅकेज. जेवण आणि एसी रुममध्ये राहण्याची व्यवस्था (४ जणांसाठी १ रूम) मुंबई ते चेन्नई विमानप्रवास व चेन्नई ते वेलंकनी (**3AC**) रेल्वेप्रवास. सर्व साईटसीन (**१ दिवस पाँडेचेरी आणि १ दिवस पुंडीमाता तंजावर व परत वेलंकनी**)

**हैदराबाद टूर : २६ डिसेंबर ते ३१ डिसेंबर २०२६**

**१८,०००–** जाता–येता ३ टीयर एसी ट्रेन, हैदराबादमध्ये ३ रात्र/४ दिवस, ए.सी.रूम+ जेवण. निवासव्यवस्था– **सुपर डिलक्स हॉटेल** (घरगुती जेवण दिले जाईल. व्हेज/नॉनव्हेज. ब्रेकफास्ट+लंच+डिनर+गेट टुगेदर+चहा/नास्ता)

**साईटसीन–** सालारजंग म्युझियम, चारमिनार, गोळकोंडा, बिर्ला टेंपल, निजाम पॅलेस, लुंबिनी पार्क, लाइट अॅन्ड साऊंड, एनटीआर गार्डन, रामोजी फिल्मसिटी (संपूर्ण दिवस) शॉपिंग, कराची बेकरी व इतर साइटस् (वेळेनुसार)

**ख्रिसमस वीक धमाल गोवा टूर : २६ ते ३० डिसेंबर २०२६**

**रु. १८,५०० :** जेवण आणि एसी रुममध्ये राहण्याची व्यवस्था (४ जणांसाठी १ रूम), मुंबई ते गोवा व गोवा ते मुंबई (**3AC**) रेल्वेप्रवास. सर्व साईटसीन. दररोज सायंकाळी गेट टुगेदर. ख्रिसमस वीक पूर्ण धमाल! गोवा येथे राहण्यासाठी रिसॉर्ट विथ स्वीमिंग पूलची व्यवस्था. **खा.. प्या... आणि धमाल एन्जॉय करा!!**

**Contact : Alister- 9011890360 / Francis- 9765443414 / Dennis- 8766589780 / Aurice- 9960107733**

# सिंथिया ताई : एक समर्पित वाटचाल

-प्रा. (डॉ.) मेबल पिमेंटा
पापडी

सिंथिया ताई 'अपंग नव्हे अभंग' ह्या आपल्या पुस्तकात लिहितात, ''वयाच्या ४थ्या वर्षीच मी पोलिओ नामक राक्षसाच्या विळख्यात सापडले. त्याकाळी डोस उपलब्ध नव्हते. मुंबईतील हॉस्पिटलमधील वैद्यकीय उपचारांमुळे संपूर्ण शरीर सुस्थितीत आले, मात्र उजवा पाय लुळा बनला.''

ह्या कारणामुळे लहानपणापासूनच ताईंनी कॅलिपर (बूट) वापरले. त्यांचे अकरावी पर्यंतचे शिक्षण सेंट ॲलॉयशिअस गर्ल्स हायस्कूल, पापडी येथे झाले. त्यांनी पापडी येथे डी.एड कॉलेजमधून शिक्षकी प्रशिक्षण पूर्ण केले. ज्या संस्थेत त्यांचे शिक्षण झाले त्याच संस्थेत त्यांना शिक्षकी पेशा लाभला. ह्या सर्व शिक्षणात व नोकरीत त्यांना कार्मेलाईट संस्थेच्या ख्रि. मदर जेम्मा व इतर सिस्टरांचे सहकार्य मिळाले.

ताई सुशिक्षित व स्वावलंबी बनल्या त्या कुटुंबाच्या आधाराने. ख्रि. गर्टरूड बॅप्टिस्टा व जॉन बॅप्टिस्टा हे ताईंचे आई-वडील, भाऊ-बहिणी ह्या सर्वांनीच त्यांना सामर्थ्य दिले.

ताईंनी निश्चय केला की अपंगांना स्वावलंबी बनवायचे की जेणेकरून ते कुटुंबावर व समाजावर ओझे बनून राहणार नाहीत. ताईंनी बाबा आमटे ह्यांच्या आनंदवनला भेट दिली. तसेच मदर तेरेसा ह्यांचे कलकत्ता येथील पीडितांसाठीचे कार्य जवळून अनुभवले. अपंग सेवेच्या ईश्वरी हाकेला त्यांनी होकार दिला अगदी अंत:करणापासून. ह्या कार्यात ताईंना त्यांचे आध्यात्मिक सल्लागार फादर मायकल जी. ह्यांनी सतत पाठिंबा दिला. 'जर विद्यार्थी शाळेकडे येऊ शकत नसेल तर शाळेने विद्यार्थ्यांकडे जावे' ह्या उक्तीनुसार सिंथिया ताईंनी अपंग विद्यार्थ्यांच्या घरी भेटी देण्यास सुरुवात केली. शाळेमध्ये जाऊन अपंग विद्यार्थ्यांची विचारपूस करू



लागल्या. त्यांना अपंगांच्या गरजा समजल्या आणि कार्यवाहीला दिशा मिळाली. अधू पायांना कधी सायकलची गती तर कधी कुबड्यांची साथ दिली, कमकुवत हातांना कामाने बळ दिले, विकलांग शरीराला खुर्चीचे सामर्थ्य आणि मतिमंदांना सहसंवेदनेने आपलेसे केले.

अपंगांना मिळणाऱ्या सवलती, त्यांच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी 'अपंग सेवा संस्थे'मार्फत अनेक शिबिरे भरवली जातात. ह्यामध्ये अपंगत्वाचा दाखला मिळवून देणे, सरकारी निधी उपलब्ध करून देणे, वैद्यकीय साहाय्य, शस्त्रक्रिया आवश्यक असल्यास त्यासाठी आर्थिक साहाय्य करणे, रोजगार मिळविण्यासाठी मदत करणे आणि स्वयंरोजगारासाठी उद्युक्त करणे अशी कामे नेटाने सुरू आहेत.

अपंगांप्रति सहानुभूती नसावी; तर सहसंवेदना हवी. ह्यासाठी सिंथिया ताईंनी समाजमन तयार केले ते अपंग मेळावे भरवून. २६ जानेवारी १९८९ रोजी पहिला अपंग मेळावा भरवला. २०२६सालापर्यंत एकूण ३८ मेळावे संपन्न झाले.

'अपंग बोले आणि सिंथियाताई चाले' अशी त्यांची अपंगांच्या इच्छा पुरविण्याची खासियत आहे. 'थाळी जेवण' खायचे आहे तर चला मुंबईला. खूप वर्षात वेलंकनी मातेला भेट दिली नाही, असे म्हणताच लगेचच तेथील फादरांबरोबर पत्रव्यवहार सुरू होतो. परदेश वारी करू शकत नाही परंतु आम्हाला विमान तरी दाखवा अशी इच्छा व्यक्त केल्यानंतर त्यासाठी आवश्यक सर्व औपचारिकता अपंग सेवा संस्थेने पूर्ण केली आणि १०२ अपंगांना १५ ऑक्टोबर २००३ रोजी विमान उड्डाणाचा अनुभव दिला.

दिल्ली सहलीत अपंगांनी मंत्र्यांना भेटण्याचा मनोदय व्यक्त केला. त्यावेळी फा. जोएल डिकुना दिल्लीत कार्यरत होते. त्यांनी तात्कालीन लोकसभा अध्यक्ष श्री.पी.ए.संगमा ह्यांच्याबरोबर भेटीचे नियोजन केले. तेव्हा अपंग बांधवांनी अध्यक्ष संगमा ह्यांच्या घरी मान-पान, चहापाणी आणि फोटो इत्यादींचा आनंद लुटला.

ताईंची 'अपंग सेवा' चळवळ बनून समाजात रुजत आहे, ह्याची पोचपावती म्हणजे त्यांना मिळालेले ३१ पुरस्कार. पुरस्कारांना प्रतिसाद देताना ताई म्हणतात, ''हे पुरस्कार मला नाहीत तर संस्थेला व कार्यकर्त्यांना मिळाले आहेत. कारण एकटी सिंथिया काय करू शकली असती?'' ताईंचे हे उद्गार त्यांच्या कार्याची उंची अधिकच वाढवितात.

सुयोग नगर, भाबोळा येथे सुरू झालेले अपंग सेवेचे कार्यालय एका फ्लॅटपुरते मर्यादित होते २०१० साली 'अभंग भवन' ह्या वास्तूत विशेष मुलांसाठी शाळा सुरू करण्यात आली, उमेळा गावात. 'अभंग भवन' आज खऱ्या अर्थाने अपंग व्यक्तींसाठी मंदिर बनले आहे. अभंग मुलांची शाळा, अपंगांची कार्यशाळा, शिबिरे, सर्वधर्मीय प्रार्थना, व्यवसाय मार्गदर्शन मेळावे अशा अनेक कार्यक्रमांचे हे बहुउद्देशीय भवन आहे.

मोबाईल : 99 60 63 19 60

स्वास्थ्य

# बायबल आणि मानसिक आरोग्य

**(१० ऑक्टोबर- जागतिक मानसिक आरोग्यदिनानिमित्त )**

**- डॉ. सुभाष डिसोजा**
उपप्राचार्य, सेंट जोसेफ कॉलेज, सत्पाळा

आजचा माणूस पूर्वीपेक्षा अधिक शिकलेला आहे, तंत्रज्ञानाने समृद्ध आहे आणि अनेक सुखसोयींनी वेढलेला आहे. तरीही त्याच्या मनात अस्वस्थता, चिंता, निराशा, एकटेपणा व भविष्या बद्दलची अनिश्चितता वाढताना दिसते.

**कारणे**

१. सततची स्पर्धा व यशाचा दबाव : विद्यार्थ्यांवर गुण, प्रवेश, करिअर आणि नोकरीचा दबाव आहे. तरुणांना आर्थिक स्थैर्याची चिंता आहे. पालकांना मुलांच्या भविष्याची चिंता आहे.

२. सोशल मीडियामुळे वाढलेली तुलना : इतरांचे आनंदी फोटो, परदेशातील प्रवास, महागड्या वस्तू आणि यश पाहून अनेकांना स्वतःचे जीवन अपूर्ण वाटू लागते.

३. कुटुंबातील संवाद कमी होणे : एकाच घरात राहूनही अनेकदा प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या मोबाईलमध्ये दंग असतात. घर मोठे झाले; पण मनांमधील अंतर वाढले.

४. आर्थिक असुरक्षितता : महागाई, कर्ज, नोकरीची असुरक्षितता, मुलांचे शिक्षण आणि भविष्याची चिंता ह्यांमुळे अनेक कुटुंबांवर मानसिक ताण निर्माण होतो.

५. अपयशाची भीती : आजच्या समाजात यशाला खूप महत्त्व दिले जाते. त्यामुळे अपयश आले की 'मीच अपयशी आहे' असा चुकीचा विचार निर्माण होतो.

६. बदलती जीवनशैली : वाढती लोकसंख्या, शहरीकरण, वाहतूक, कामासाठी होणारा दीर्घ प्रवास, वेळेची कमतरता आणि कामाचा ताण ह्यांचा परिणाम जीवनशैलीवर झाला आहे. 'एकाकीपणा' ही एक मोठी समस्या बनली आहे. अनेक तरुण मुले-मुली उच्च शिक्षण आणि नोकरी निमित्त परदेशात जाऊन स्थायिक झाली आहेत. वाढत्या वयासोबत आजारपण, औषधोपचार



आणि हॉस्पिटलच्या फेऱ्या ह्यांसारख्या मोठ्या अडचणींना त्यांना एकट्याने सामोरे जावे लागते.

**पवित्र शास्त्रातील मार्गदर्शन**

परमेश्वर म्हणतो, माझे तुमच्या-विषयीचे जे विचार आहेत ते मी जाणतो; ते हानीचे नसून कल्याणाचे विचार आहेत, तुम्हाला भविष्याची आशा देणारे आहेत. तेव्हा तुम्ही माझा धावा कराल आणि माझ्याकडे येऊन प्रार्थना कराल आणि मी तुमचे ऐकेन. तुम्ही पूर्ण मनाने मला शोधाल तेव्हा मी तुम्हास सापडेन'' (यिर्मया २९:११-१३)'' हे प्रभूचे वचन आपल्याला सांगते की आज आपण कितीही कठीण प्रसंगातून जात असलो, तरी आपल्या आयुष्यावर देवाची सुंदर योजना कार्यरत आहे. कठीण काळात बायबलमधील महान व्यक्तींचे जीवन आपल्याला आशेचा किरण दाखवते.

**आपल्या आयुष्यात उदभवलेली समस्या ही अंतिम नाही.**

**जोसेफ :** मानसिक संघर्ष आणि जीवनातील चढ-उतार समजून घेण्यासाठी जुना करारातील जोसेफ हे अत्यंत प्रभावी उदाहरण आहे. जोसेफ हा आपल्या वडिलांचा लाडका मुलगा होता. पण त्याच्याच भावांनी त्याचा मत्सर केला. त्यांनी त्याला विहिरीत टाकले आणि गुलाम म्हणून विकले. नंतर त्याच्यावर खोटा आरोप झाला आणि त्याला तुरुंगात टाकण्यात आले. मानवी दृष्टीने विचार केल्यास योसेफ नैराश्याच्या खोल गर्तेत जाऊ शकला असता; परंतु त्याने देवाला सोडले नाही. प्रत्येक संकटात देवाची त्याच्यावर कृपा होती आणि सरते शेवटी तो संपूर्ण इजिप्तचा सुभेदार (प्रधान) बनला.

**अब्राहाम :** अब्राहमाने दीर्घकाळ मानसिक व भावनिक कसोटी अनुभवली. वृद्धापकाळात देवाने त्याला घर, नातेवाईक, परिचित वातावरण आणि सुरक्षितता सोडून अज्ञात भूमीकडे जाण्यास सांगितले. त्याला भविष्य स्पष्ट दिसत नव्हते. तरीही त्याने देवावर विश्वास ठेवून पाऊल टाकले. देवाने अब्राहामला ७५व्या वर्षी पुत्ररत्न होईल असे वचन दिले. प्रत्यक्ष त्याची परिपूर्ती अब्राहम १०० वर्षाचा झाला तेव्हा झाली.

**दानिएल :** राजाच्या कठोर कायद्यांना तोंड देताना आणि सिंहांच्या गुहेत फेकले जाण्याची भीती असतानाही दानिएलचे मन विचलित झाले नाही. दिवसातून तीन वेळा गुडघे टेकून प्रार्थना करण्याची त्याची सवय त्याला सर्वांत मोठ्या संकटातही निर्भय आणि शांत ठेवत होती. दानिएलला आपल्या देशापासून दूर बाबेलमध्ये नेण्यात आले. तो परक्या संस्कृतीत, परक्या वातावरणात राहत होता. त्याच्यावर दबाव होता. त्याला देवावरील विश्वासाशी तडजोड करण्याची संधी अनेकवेळा आली. तरीही दानिएलने आपला विश्वास सोडला नाही.

जोसेफचा तुरुंग, अब्राहामची प्रतीक्षा आणि दानिएलची सिंहांची गुहा अंतिम नव्हती. आपल्या आयुष्यातील आजची अडचणही अंतिम नाही.

मोबाईल : 98 81 62 26 61

# साहित्यप्रेमी रॉकी लोपीस

- जॉन गोन्सालविस
उमराळे



सुमारे ४० वर्षांपूर्वीची घटना. वसईमधील एक हरहुन्नरी साहित्यप्रेमी युवक नाशिकचे साहित्यिक-सांस्कृतिक तीर्थक्षेत्री तात्यासाहेब शिरवाडकर ऊर्फ कविवर्य कुसुमाग्रज ह्यांच्या भेटीला गेले. वार्तालाप करता करता तात्या साहेब म्हणाले, ''मागे मी तुम्हाला सुचवले होते की तुम्ही दिवाळी अंक संपादित करा. माझा विश्वास आहे, तुम्ही दिवाळी अंक चांगला काढाल!'' ह्यावर तो तरुण म्हणाला, ''सर, मला भीती वाटते. काहीच अनुभव माझ्या पाठीशी नाही.'' त्यावर कुसुमाग्रज म्हणाले, ''तुम्ही अभद्र विचार आपल्या मनात आणू नका. तुम्ही चांगला अंक काढाल. माझा आशीर्वाद तुमच्या पाठीशी आहे.''

भारावलेल्या अंत:करणाने तो युवक नाशिकमधून वसईत आला आणि त्याने प्रथम ऑक्टोबर १९९७ मध्ये 'एक संक्रमण' हा दिवाळी अंक प्रकाशित केला आणि त्या अंकाचे साक्षेपी संपादक होते वसईच्या माणिकपूर गावातील साहित्यप्रेमी युवक रॉकी लोपीस!

आजपर्यंत त्यांनी एकापेक्षा एक सरस असे अखंडित वैशिष्ट्यपूर्ण २९ वर्षे २९ दिवाळी अंक प्रकाशित केले. त्यातील 'कुसुमाग्रज विशेषांक' आणि 'तृतीय पंथीय विशेषांक' संपूर्ण महाराष्ट्रात रसिक श्रोत्यांनी वाखाणला. त्यांनी संपादित केलेल्या दिवाळी अंकास आजपर्यंत ५ राष्ट्रीय आणि ३८ राज्यस्तरीय पुरस्कार मिळाले आहेत. महाराष्ट्रात दरवर्षी सर्वसाधारणपणे ८०० ते ८२५ दिवाळी अंक प्रकाशित होतात. मात्र त्यात एकाच ख्रिस्ती संपादकाचा हा दिवाळी अंक प्रकाशित होतो. तो अंक वसई-मुंबई परिसराप्रमाणे पुणे-नाशिकमध्येही वाचला जातो.

त्यांनी २००१पासून एप्रिल महिन्यात 'गुडफ्रायडे विशेषांक' काढण्यास सुरुवात केली. आजपर्यंत नावीन्यपूर्ण असे २६ गुडफ्रायडे विशेषांक प्रकाशित केलेले आहेत.

१९८९साली पहिली जागतिक मराठी परिषद माहिम, मुंबई येथे संपन्न झाली. त्यात एक परिसंवाद होता 'परदेशातील वास्तव्यात जाणवलेल्या समरसतेच्या समस्या' ह्याविषयी त्यांनी आपले विचार मांडले तसेच त्या निमित्ताने एक स्मरणिका प्रकाशित करण्यात आली होती. त्यात त्यांनी लिहिलेला हा लेख समाविष्ट करण्यात आलेला होता. अर्थात त्यांच्या गुरू डॉ. सरोजनी वैद्य बाईंनी लेख लिहिण्यास त्यांना प्रवृत्त केले होते.

दिवाळी अंक असो वा गुडफ्रायडे विशेषांक असो. त्या त्या अंकात प्रथितयश, मान्यवर साहित्यिकांचे लेख, कविता लिहून ते प्रकाशित करीत. ह्यात कुसुमाग्रज, वसंत बापट, प्रा. शंकर वैद्य, प्रा. व. दि. कुलकर्णी, ग. प्र. प्रधान, ना. ग. गोरे, बाळ राणे ह्या मान्यवर साहित्यिकांचे साहित्य त्यांनी प्रकाशित केलेले आहे. नियमित, अव्याहत वाचत जाणे हा त्यांचा ध्यास आणि श्वास आहे. वसई परिसरात काही मोजक्या लोकांच्या घरी स्वत:चे वाचनालय आहे. त्यात अव्वल दर्जाचे वाचनालय म्हणून रॉकी लोपीस ह्यांच्या खाजगी वाचनालयाचा समावेश करता येईल. त्यांच्या वाचनालयात सुमारे पाच हजार ग्रंथसंपदा आहे. त्यात प्रामुख्याने महाभारताचे खंड, भारतीय तत्त्वज्ञानाचे खंड, संस्कृतिकोश, विश्वकोश, मराठी वाङ्मयाचा इतिहास, मराठी वाङ्मय कोश तसेच स्वामी विवेकानंद, गोविंद तळवलकर, माधव गडकरी, जि. ए. कुलकणी, अच्युत गोडबोले, खलिल जिब्रान, गुरुदेव रवींद्रनाथ टागोर ह्यांचे समग्र साहित्य ही सगळी पुस्तके ठेवण्यासाठी त्यांनी खास ठेवणीतली कपाटे बनवून घेतलेली आहेत. पुस्तकाच्या कपाटात पुस्तके हातात हात घालून नांदत असलेली आपणास दिसतात.

स्वत: जशी पुस्तके वाचली तशी ती आपल्या मित्रांनी, इतर वाचकांनी वाचावीत हा त्यांचा आग्रह असे. म्हणून काही मित्रांच्या ५० वाढदिवसानिमित्त त्यांनी ५० पुस्तकांचा संच वाढदिवसाची भेट म्हणून बक्षीस दिलेले आहेत. वाचन संस्कृतीच्या संवर्धनासाठी मुंबई, पुणे येथील प्रकाशकांकडून नामवंत साहित्यिकांची नवीन प्रकाशित पुस्तके सवलतीच्या दरात मित्रांना विकून जवळजवळ २८० वाचकांच्या घरी प्रत्येकी ३०० पुस्तकांचे छोटेखानी वाचनालय निर्माण करण्यास त्यांनी प्रेरणा आणि प्रोत्साहन दिलेले आहे.

एक उत्तम प्रकाशक म्हणून त्यांनी आपली मोहर उमटविली आहे. आजपर्यंत नवोदित लेखकांपासून ख्यातनाम साहित्यिकांपर्यंतच्या २७ पुस्तकांचे प्रकाशन त्यांनी आपल्या 'स्मित प्रकाशन' ह्या नावाने केलेले आहे. त्या प्रकाशनाद्वारे त्यांनी रे. ना. वा. टिळक ह्यांची 'ख्रिस्तानुवर्तन' ह्या पुस्तकाची डिलक्स आवृत्ती तसेच फा. जो. मा. पिठेकर ह्यांच्या 'समुपदेशन : तंत्र आणि मंत्र', 'समाज स्पंदने' हे लेखसंग्रह; जॉर्ज लोपीस ह्यांच्या 'जॉर्जिया' हा कवितासंग्रह ह्यांचा नामोल्लेख करावा लागेल. मुंबई, पुणे येथील मान्यवर साहित्यिकांशी त्यांचे ऋणानुबंध आहेत. गुरुवर्य व साक्षेपी समीक्षक डॉ. व. दि. कुलकर्णी म्हणायचे, ''रॉकी लोपीस वेगळ्या वाटेवरचा प्रवासी आहे. हे एकदा तुमच्या मनाने घेतलं की पुढची उत्तरे आपोआप मिळतील.''

असा हा चोखंदळ वाचक, साक्षेपी संपादक आणि दर्दी प्रकाशक ह्या नावाने त्यांनी आपली भूमिका वठविली आहे. लवकरच त्यांचे हे साहित्यिक अनुभव आत्मचरित्राच्या रूपाने वाचकांच्या भेटीला येतील हा आशावाद व्यक्त करू या.

मोबाईल : 99 60 65 92 85

●


## अल्फान्सो टूर्स ॲण्ड कॅटरर्स

**१) संत ज्यूड नोव्हेना :** झांशी, ग्वालियर, दिल्ली- आग्रा सहल. (जाता येता राजधानी प्रवास) दिनांक २४ऑक्टो. ते २नोव्हें.२०२६ एकूण खर्च प्रत्येकी रु. २९०००/-मात्र.

**२) मजेदार आणि फुल एन्जॉय सहल थायलंड बँकॉक पटाया**
दिनांक ८ नोव्हें. ते १३ नोव्हें.२०२६ (पाच दिवस सहा रात्र ) एकूण खर्च प्रत्येकी रु. ७५०००/-मात्र. फ्लाइट तिकीट व व्हिजा सर्व काही समाविष्ट.

**३) गो गोवा सहल धमाल व फुल एन्जॉय सहल**
दिनांक २६ डिसेंबर ते ३१ डिसेंबर २०२६. संपूर्ण प्रवास ३ टायर ए.सी. ट्रेनने. एकूण खर्च प्रत्येकी रु. १९०००/-मात्र.

**-: संपर्क :-**

| | | |
|---|---|---|
| नेल्सन अल्फान्सो, गास | : | 9970650770 |
| नीलम कोरिया, आगाशी (पापडी) | : | 9130541082 |
| हेलन डिमेलो, रमेदी | : | 7559125435 |
| मॅलेट फर्नांडीस, सांडोर | : | 9545329770 |

## डिसिल्वा टूर्स अँड कॅटरर्स

**आयोजक : क्लेमेंट एलायस डिसिल्वा,** गास चर्चसमोर.

**९८६०५६८५५३, ९५७९०२४६२०, ८४४६४३१९६९**

**१) सेंट ज्युड झांशी नोव्हेना : १)** दिनांक २४ ऑक्टोबर ते २९ ऑक्टोबर २०२६. ३ स्टार ए.सी. हॉटेल. जाता-येताना राजधानी ३ ए.सी. तिकीट. जेवणासहीत एकूण खर्च प्रत्येकी रु. १८,०००/-. **(फक्त झांशी नोव्हेना) २)** दिनांक २४ ऑक्टो. ते २९ ऑक्टो. २६. झांशी, ग्वालियर, साईडसीन- झांशी किल्ला, लाईट अॅन्ड साऊंड शो, म्युझियम, झांशी गार्डन, चिडीयाघर, ग्वालियर पॅलेस व सर्व एट्रीफीसहीत व गेट टुगेदर पार्टीसहीत. ३ स्टार ए.सी हॉटेल, जाता-येताना राजधानी ३ ए.सी. तिकीट. एकूण खर्च रु. १९,५००/-.

**२) केरळ दर्शन :** दिनांक ६ नोव्हेंबर ते १७ नोव्हेंबर २०२६. (एकूण १२ दिवस) एर्नाकुलम, कोची, मुन्नार, टेकडी, कोट्टयम, त्रिवेंद्रम, अलेप्पी, कन्याकुमारी. एकूण खर्च प्रत्येकी रु. ४२,०००/-. (दोन व्यक्तीस एक रूम प्रमाणे) व रु. ४०,०००/-. (फॅमिलीसाठी).

**३) कोकण-गोवा दर्शन सहल : १)गोवा-कोकण सहल :** दि. २६ डिसें ते ३१ डिसें. २६. संपूर्ण ए.सी पॅकेज. दोन रात्र कोकण मालवण, दोन रात्र गोव्यात. वसई ते सावंतवाडी ए सी ट्रेन व येताना मडगाव ते वसई राजधानी. क्रूझ सफर, एक तासाची समुद्र सफर विथ डॉल्फिन दर्शन. मसाला गार्डनमध्ये गोवानीस जेवणाचा आस्वाद. कोकण-तारकर्ली बीच, सिंधूदुर्ग किल्ला. व लाकडाच्या खेळणीचा बाजार व इतर भरपूर काही. गेट टुगेदर पार्टी. खर्च प्रत्येकी रु. १८,५००/-. (५ ते ११ मुलांस रु. १५,५००/- मात्र.).

**२)गोवा-कोकण सहल :** दि. २६ डिसें ते ३१ डिसें. २६. २ x २ पुश बॅक एसी बसने प्रवास. दोन रात्र कोकण मालवण, दोन रात्र गोव्यात. **साईडसीन -** क्रूझ सफर, एक तासाची समुद्र सफर विथ डॉल्फिन दर्शन. मसाला गार्डनमध्ये गोवानीस जेवणाचा आस्वाद. कोकण-तारकर्ली बीच, सिंधूदुर्ग किल्ला. व लाकडाच्या खेळणीचा बाजार व इतर भरपूर काही. गेट टुगेदर पार्टी. खर्च प्रत्येकी रु. १८,५००/-. (५ ते ११ मुलांस रु. १५,५००/- मात्र.)

४) **स्टॅच्यू ऑफ युनिटी-बडोदा-सुरत सहल :** दिनांक २६ डिसें. ते २८. रु. ११,०००/- (चार जणांस एक रूम). वंदे भारत व इंटरसिटी ए.सी. ट्रेन, थ्री स्टार हॉटेल. साईडसीन साठी पुशबॅक बस, व्हेज-नॉनव्हेज जेवण व गेट टुगेदर पार्टी.

* **सर्व सहलींमध्ये रु. ५,०००/- ॲडव्हान्स भरून नांवनोंदणी करणे. सर्व सहलींमध्ये बुकीग चालू आहे.**

१) वेलंकनी भुजींग सेंटर, किरावली : 8552009748,9049110595 २) सुनिता पोसा, उत्तन : 9833801263, 9222111269
३) स्वाधिना परेरा, मारीभाट, गिरीज : 9823614664 ४) क्लेरा आल्मेडा, माणिकपूर : 9892252117
५) ॲन्ड्र्यू रूमाव, नंदाखाल : 9788592847, 9284106936 ६) कॅरोल बडी, उत्तन : 9221311122

# आवे मरिया

-श्री. लुकस मतेस परेरा
भुईगाव



*'देव माते मरिया माते,*
*आमुची तू कैवारी,*
*माते आमुची तू कैवारी'...*

सप्टेंबर महिना उजाडला की चाहूल लागते ८ सप्टेंबर - पवित्र मरिया मातेच्या जन्मदिनाची. मोठ्या हौसेने, आनंदाने व श्रद्धेने मरिया मातेचा जन्मदिन साऱ्या जगभर साजरा केला जातो. नऊ दिवस तन्मयतेने नोव्हेना करून दहाव्या दिवशी मातेचा जन्मदिवस साजरा केला जातो. आठवतात ते बालपणातील दिवस... ऐन श्रावण महिन्यात निसर्गाने हिरवा शालू पांघरलेला असतो. सर्वत्र नाना प्रकारची, विविध रंगाची फुले फुललेली असतात, आसमंतात आनंद व चैतन्याचे वातावरण संचारलेले असते आणि अशाच काळात मरिया मातेच्या नोव्हेना भक्तीला सुरुवात होते. कोवळ्या हाताने फुले वेचायची, वेचलेली फुले केळीच्या पानात गुंडाळून सायंकाळी दररोज मिस्सावेळी नित्य नियमाने माउलीला अर्पण करायची. रांगेत उभे असताना कानी स्वर पडायचे... 'रूपवंत फुले निवडूनी घ्या..' माउलीच्या पायथ्याशी फुलांची रास जमा व्हायची, श्रद्धने आणि भक्तीने आम्हां मुलांनी अर्पण केलेली फुले रात्रीच्या प्रकाशझोतात उजळून निघायची. असा अनोखा देखावा आजही डोळ्यांसमोर जिवंत आहे...

**पाऊले चालती वेलंकनीची वाट**

आज बदलत्या काळाबरोबर भक्तीचे मार्ग आणि स्वरूप बदललेले आहे, मात्र माउलीप्रति प्रेम व श्रद्धा आजही काळजात जिवंत आहे माता मरियेच्या भक्तगणात दिवसेंदिवस वाढ होत आहे. पवित्र मरियेच्या चरणाशी अर्पण केलेल्या विनंत्या ती पूर्ण करते. श्रद्धा व विश्वास अंत:करणात ठेवून हजारोंच्या संख्येने भक्तगण मातेच्या चरणाशी मैलाचा प्रवास करून येत असतात. मातेचा उत्सव जगभर साजरा होत असताना देशभरातून नोव्हेनाच्या काळात ख्रिस्ती श्रद्धावंत वेलंकनी येथे प्रार्थनेसाठी एकत्र जमतात. श्रद्धावंतांचा भक्तीचा कळस ह्या ठिकाणी जवळून पाहता येतो. भल्या पहाटे चर्चमध्ये सुरू असलेल्या विविध भाषांतील मिस्साबली, विविध गीतांद्वारे मातेची केली जाणारी आळवणी, मातेच्या जीवनावर आधारित तसेच विविध सद्‌गुणाविषयी केले जाणारे प्रबोधन, नोव्हेनाच्या प्रार्थनेत केली जाणारी याचना, दुपारी मध्यप्रहरी प्रखर उन्हात बारा वाजता माउलीच्या झेंडावंदनासाठी हजारोंच्या संख्येने जमणारे भाविक, झेंड्याच्या दर्शनासाठी दाटीवाटीने, गल्लीबोळात, इमारतीच्या गच्चीवर श्रद्धावंत एकत्र जमतात. ह्यावेळी सुरुवातीला विविध भाषांत रोझरीची प्रार्थना केली जाते व त्यानंतर धीरगंभीर व शांत वातावरणात तमिळ भाषेत गीताला सुरुवात होते व दुसऱ्या बाजूला मरियेचा ध्वज हळूहळू आकाशात उंचावला जातो. गीतांची भाषा समजत नाही; परंतु त्या स्वरांनी काळजाचा ठोका चुकतो, अंगाचा थरकाप होतो, माउलीच्या ध्वजाकडे पाहताना अंत:करणात व डोळ्यांत श्रद्धेची आसवे दाटलेली असतात, मोठ्या डौलाने ध्वज आसमंतात फडकतो.

**पवित्र स्थानातील क्रुसाची वाट**

वेलंकनी तीर्थक्षेत्रात मरिया मातेचे भक्तगण रखरखत्या उन्हात, तापलेल्या वाळूत, हातात रोझरी घेऊन बालकापासून ते वयोवृद्ध श्रद्धावंत मांडी घालून क्रुसाची वाट चालत असतात. अंगातून वाहणाऱ्या घामाच्या धारा, चेहऱ्यावर साचलेला मातीचा थर, वाळूत चालताना मांडीची कातडी सोलली जाते पण ह्या क्लेशाची तमा न बाळगता मारियेची मध्यस्थी करत श्रद्धावंत येशूच्या दुःखसहनाचे वटेकरू होत असतात.

**पालखीत विराजमान झालेली माता**

रात्रीच्या घट्ट काळोखात वेलंकनीचा संपूर्ण परिसर विद्युत रोषणाईत आकर्षक दिसतो. विविध रंगाच्या रोषणाईने सारा आसमंत फुलतो आणि अशातच माता मरियेची भव्य थाटामाटात निघालेली मिरवणूक, वेलंकनी माता व इतर संतांच्या प्रतिमा आपल्या खांद्यावर घेऊन पुरुष व स्त्रीवर्ग मोठ्या भक्तीने हजारोंच्या संख्येने मिरवणुकीत सहभागी होतात.

मरिया मातेची भक्ती आणि नोव्हेना सातत्याने वर्षभर अनेक ठिकाणी सुरू असतो. आपल्या वसई धर्मप्रांतात मर्देस व किरवली पाली ह्या धर्मग्रामांत विशेष मरिया भक्तीचे आयोजन केले जाते. मुंबई सरधर्मप्रांतात भाटेबंदर-उत्तन, तसेच शेकडो वर्षाचा इतिहास असलेल्या माऊंट मेरी, बॅण्ड्रा व अन्य ठिकाणी मरिया भक्तीचे आयोजन केले जाते. श्रद्धेच्या प्रकाशात न्हाऊन निघालेल्या भक्ताच्या हृदयात मरिया मातेची भक्ती सदा वास करते आणि ओठी श्रद्धचे मधुर सूर गुणगुणत राहतात आवे मरिया....

मोबाईल : 92 73 37 62 33

# कर्जतच्या फातिमा मातेचे चर्च

-प्रा. एफिजीन आगुस्तीन तुस्कानो
गास

फातिमा मातेने मुलांना सहा दर्शने दिलेली होती. फातिमाच्या घटनांचा अभ्यास करून १९३० ला पोप ह्यांनी मारिया दर्शनाला मान्यता दिली.

त्या अगोदर १९२०ला मि. थेडियम ह्यांनी फातिमा मातेची सुंदर प्रतिमा बनवली. ती फातिमा येथील चॅपलमध्ये ठेवण्यात आली. त्यानंतर पाच खंडासाठी अशा पाच प्रतिमा बनवण्याचे ठरले. १९२०ला अशीच एक प्रतिमा आशिया खंडातील भारतात मुंबई जवळील कर्जत येथे आणली गेली. मुंबई व आजूबाजूच्या परिसरातील कॅथलिक लोकांचे धार्मिक सत्ताकेंद्र दमण होते.

कर्जत स्टेशन रेल्वे इंजिनाचे मुख्य वर्कशॉप झाल्याने, तिथे नोकरी निमित्ताने ख्रिस्ती अधिकारी, कामगार राहायला आले. तिथे चर्च नव्हते, म्हणून माथेरान, 'होली क्रॉस चर्चचे' धर्मगुरू फा. ॲनोसिटो परेरा ह्यांनी पेस्टनजी भिकाजी बोलापोरिया व अर्देसन पेस्टनजी भिकाजी ह्यांच्या कडून ५ मार्च १९१५ ला कर्जत स्टेशनच्या जवळ जमीन विकत घेतली.

दमण बिशपांच्या वतीने, रोमन कॅथलिक मिशन कर्जतकरिता हा व्यवहार झाला. कर्जतच्या चर्चकामाचे मुख्य फा. जे. ए. गोम्स होते. त्यांना येथे फातिमा मातेचे चर्च असावे, असे वाटत होते. त्यामुळे १९२०ला पोर्तुगाल मधून फातिमा मातेची प्रतिमा येथे आणण्यात आली.

प्रथम प्रतिमेचे पार्सल कर्जत स्टेशन मास्तरकडे आले. ते बरेच दिवस पडून होते. कामगारांना सोबत घेऊन उघडले असता, त्यात सफेद झगा परिधान केलली, त्याला सोनेरी किनार, डोक्यावर सोनेरी मुकूट, छातीजवळ हात जोडलेली, करुणायुक्त डोळे, मान किंचीत




झुकलेली, फातिमा मातेची सुंदर प्रतिमा होती. तेव्हा चर्च तयार नव्हते, म्हणून ती प्रतिमा काही दिवस मोटरमनच्या केबिनमध्ये टेबलवर ठेवण्यात आली. तिथे त्यांना शांती, प्रीतीचा अनुभव आला.

त्यानंतर फादरांनी घेतलेल्या जागेवर पत्र्याचे छोटे चॅपल उभारून मातेची प्रतिमा ठेवण्यात आली. तेव्हा सर्व जाती-धर्मांचे लोक तिथे प्रार्थना, उपासना करू लागले. त्यांच्या मनोकामना पूर्ण होऊ लागल्या. आजही सर्व जाती धर्मांचे लोक प्रार्थनेसाठी येऊन सेवा देतात.

आखीव रेखीव दगडी इंडो- युरोपियन शैलीचे फातिमा चर्च : १९३५-३६. माथेरान, कर्जत भायखळाच्या ग्लोरिया चर्चच्या अख्यारित होते. त्यामुळे कर्जत चर्चच्या कामासाठी ग्लोरिया चर्चचे फादर ऑर्फिन डीसा यांनी १९२९ पासून काही रक्कम जमा केली व फादर स्टीफन परेरा ह्यांच्या देखरेखीखाली १९३६ ला सध्याचे सुंदर दगडी बांधकाम असलेले चर्च पूर्ण केले.

तत्कालीन मुंबईचे आर्चबिशप ज्योकिम लिमा ह्यांनी चर्च व फातिमा मातेच्या प्रतिमेचे आशीर्वादीकरण केले. तेव्हा पुणे, मुंबई, वसई परिसरांतील मोठा जनसमुदाय हजर होता. सुरुवातीला कर्जतला २० ख्रिस्ती कुटुंबे होती, नंतर ४५ व आता ९० कुटुंबे राहतात. विशेष म्हणजे अन्य धर्मीय लोक १३तारखेला जास्त सहभागी होऊन माऊलीच्या कृपेचा अनुभव घेतात.

**कर्जत चर्चमधील महत्त्वाचे भक्ती दिवस व महिने :**

१) प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शनिवारी, 'निष्कलंक मारिया च्या हृदयाची भक्ती'.

२) तसेच प्रत्येक महिन्याच्या १३ तारखेला संपूर्ण दिवस फातिमा मातेची भक्ती (भाविकांसाठी सहभोजन).

प्रार्थनेसाठी सकाळी ६.०० ते रात्री ९.०० पर्यंत उघडे असते.

विशेषत: ह्या वर्षी फातिमा तीर्थक्षेत्राचा ९० वा वर्धापन दिन (१९३६-२०२६) साजरा होत आहे. तसेच १९१७ ते २०२६ पर्यंत १०९ वर्षाची वाटचाल पूर्ण होत आहे. म्हणून पोप लिओ यांनी संत आसिसीप्रमाणे 'मारिया भक्ती वर्ष' म्हणून कर्जत येथे १७ ते २० ऑक्टोबर २०२६ ला चार दिवसांची विशेष प्रार्थना आहे.

कर्जतचे प्रमुख धर्मगुरू फादर ज्यो डिमेलो, वसईतील गासचे सुपुत्र ह्यांनी सर्व भाविकांना प्रेमाचे आमंत्रण केले आहे. 'या, फातिमा प्रेमाचा अनुभव घ्या.' पूर्वेकडची आशियातील फातिमा माता म्हणून ओळख वाढवू या.

•

**'सुवार्ता' साठी आपली जाहिरात, वर्गणी किंवा देणगी चेकद्वारा द्यायची असल्यास कृपया आपला चेक 'The Suwarta Trust' ह्या नावाने काढावा.**

**- व्यवस्थापक**

# आपली मुलं देशोदेशी, मनःशांती जपू अशी

**१ ऑक्टोबर ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्ते**

**- डॉ. वनिता पटवर्धन**
एम.एड.पीएच.डी. (मानसशास्त्र)

विशीच्या आसपास मुले-मुली शिक्षण, नोकरी, विवाह ह्या निमित्ताने घराबाहेर पडतात. सुरुवातीला घरी जास्त येणे-जाणे असते, पण नंतर मात्र कमी-कमी होत जाते. त्यामुळे उतार वयामध्ये आपली मुले परदेशात, दुसऱ्या राज्यात, शहरांत विखुरली जातात आणि आपण मात्र एकटे पडतो.

सार्थकतेच्या भावनेबरोबरच काही सल बोचत असतात. कधी उदासपणा घेरून येतो. मुला-नातवांसाठी प्रेमाचे उमाळे येतात, पण ते दुरूनच शमवावे लागतात! अशावेळी मनःशांती जपायची तरी कशी? त्यासाठी 'स्वतःच स्वतःला रमवता येणे', हे एक विशेष कौशल्य आपल्याजवळ असायला हवे. आपला दिनक्रम हा भरगच्च ठेवायचा. मोकळ्या वेळामध्ये काही घरकामे, छंद, भेटीगाठी, वाचन, लेखन, काही नवे शिकणे हे आवर्जून चालू ठेवायचे. महिलांना तर म्हणू तेवढे घरकाम असते. ह्या जोडीने इतरांसाठी काही सेवाभावी काम केले, तर त्याचे समाधान अवर्णनीय असते. मग अस्वस्थता कुठल्या कुठे दूर पळून जाते.

वाढत्या वयाबरोबर शरीर आपले ऐकेनासे होते आणि मनावर परावलंबित्वाचे एक अदृश्य ओझे येऊ लागते. ह्यावेळी आपली कसोटी लागते. तरुण पिढी ही स्वतःच्या अस्तित्वाच्या लढाईमध्ये गुंतलेली असते. सगळे सांभाळून थकलेल्या दूरस्थ आई-वडिलांची काळजी घेणे, हे एक नवे आव्हान त्यांच्यापुढे उभे ठाकते. ह्या परदेशस्थ मुला-मुलींचा एक पाय स्वतःच्या घरात आणि एक पाय मायदेशीच्या विमानात अशी अवस्था कितीतरी काळ चालू राहते. कारण वयस्कर आई-वडिलांना केवळ व्हिडिओ कॉल करून किंवा आर्थिक मदत देऊन पुरत नाही, तर प्रत्यक्ष भेटून त्यांचा हात हातात घ्यायचा असतो. मनामध्ये



पिकलेली पाने गळून जाणार ह्याची भीती, अस्वस्थता, असाहाय्यता, दुःख, हुरहूर दाटून आलेली असते. अलीकडे आयुर्मर्यादा वाढल्यामुळे ते नव्वदीच्या घरात असले, तर त्यांची अपत्ये साठीची असतात! त्यांच्यामध्ये किती ताकद असणार? तरीही आपले वृद्ध आई-वडील, सासू-सासरे ह्यांच्याबाबतीत आस्था आहे, आपल्या परीने जमेल तशी त्यांची काळजी घेत आहेत, असे दूर राहणाऱ्या मुलामुलींबाबत आढळते. ह्याचे कारण म्हणजे भारतीय संस्कार आणि त्यांच्या बालपणी आई-वडिलांनी विचारपूर्वक केलेले संगोपन होय. तसंच, परस्परांकडून केलेल्या अपेक्षाही अगदी रास्त असतात, त्यांची सांगड घातलेली असते. आपली मुलं-मुली व सुना-जावई ह्यांच्यामध्ये परस्पर सुसंवाद आणि सलोखा असेल, तर पालकांचा कितीही अवघड भार ती समर्थपणे पेलू शकतात! काही वृद्ध हे आपल्या अपत्यांची मदत

**दोन पिढ्यांचे स्वभाव जुळणे, हा अतिशय कळीचा मुद्दा आहे.**

नाकारतात. स्वावलंबी बाण्याने स्वतंत्र राहणे पसंत करतात. मात्र ह्याबाबत विपरीत चित्रही आढळते. आपल्या घरातील ह्या वृद्धांवर राग काढणे, दोष देणे, दुर्लक्ष करणे, हेही काही वेळा दिसते.

दोन पिढ्यांचे स्वभाव जुळणे, हा अतिशय कळीचा मुद्दा आहे. उघडच आहे की, स्वावलंबी, सुस्वभावी, स्वतःची व इतरांची सर्वांगाने काळजी घेणाऱ्या कर्तृत्ववान वृद्धांची देखभाल करणे सुकर आहे; तर तक्रारखोर, आपमतलबी, संतापी, हेकट, व्यसनाधीन, बेफिकीर, कर्तृत्वशून्य वृद्धांची देखभाल ही क्षणोक्षणी कस पाहणारी असणार! कधी मुले-मुली अतिशय स्वकेंद्रित होतात, मनात अपसमज उगाळतात, काळजी घेतल्याचा देखावा करतात, केवळ जमीन-जुमल्यासाठी हपापलेली असतात. अशी 'आपल्याच दातांनी आपलेच ओठ चावल्याची' वेळ कुणावर येऊ नये.

जेव्हा अगदी टोकाची स्थिती येते, तेव्हा ह्या दोन पिढ्यांच्या रेशमी नातेबंधांचे वस्त्र ठिकठिकाणी उसवते, फाटते! असे झाले तरी ह्यावर उपाय आहेत. उभयतांची मनापासून इच्छा व सहकार्य असेल तर ह्या रेशमी वस्त्रात बेमालूम रफू शक्य होते. सतत चर्चा, अनेक पर्याय समोर ठेवणे, पडताळा घेणे, असे टप्पे ओलांडले; की सुरेखसे वळण घेऊन हे नाते नवे रूप घेते! परस्परांचे वर्तन बदलायचेय, प्रसंगी सल्ला, मार्गदर्शन, मानसशास्त्रीय समुपदेशन ह्यांची जोड असली, की हे नाते अधिकच खुलते!!

एक लक्षात येते की वृद्ध आणि त्यांची अपत्ये ह्यांनी गांभीर्याने परिपूर्ण नियोजन करणे, ह्याचा भारतात अभाव आहे. वृद्ध मंडळी ही आपला केव्हा, कोणता व किती भार पडणार ह्याचा आणि वृद्धांना सांभाळणारे ही जबाबदारी कशी पेलणार ह्याचा, थेट अंदाज करण्यात उभयता अनेकदा थिटे पडतात. ह्या दोन पिढ्यांनी सतत मनमोकळी चर्चा केली, तर उभयतांना फायदा होतो. ईश्वराने सामर्थ्य, प्रेम आणि संयम ह्यांचा ठेवा आपल्याला पुरवलेला आहेच; त्या आधारे प्रयत्नपूर्वक मनःशांती नक्की जपली जाईल!

vanita.patwardhan@gmail.com

कथा

# ऋण आईच्या मायेचे

- इझाबेल जोकीम कोरिया
नंदाखाल



गावाच्या एका टोकाला एक साधेसे घर होते. त्या घरात राहणारा अण्णा मात्र साधेपणात मोठेपणा जपणारा आणि माणसांमध्ये माणुसकी शोधणारा एक वेगळाच माणूस होता. बालपणी अण्णा वारंवार आजारी पडायचा, आई त्याला कडेवर घेऊन डॉक्टरकडे धावत जायची. आईची माया त्याला आधार द्यायची. आई-वडिलांच्या संस्कारात तो लहानाचा मोठा झाला आणि एक दिवस एक आदर्श शिक्षक म्हणून नावारूपाला आला.

शिक्षक म्हणून वर्गात जाण्यापूर्वी तो पाठाची तयारी करायचा. त्याच्या शिकवण्यात प्रचंड मेहनत होती, शिस्त होती; पण त्या शिस्तीत विद्यार्थ्यांच्या भवितव्याची काळजी होती. गरीब विद्यार्थी त्याच्या जिव्हाळ्याचे. एखाद्या मुलाकडे गणवेश नाही, बूट नाहीत, आर्थिक अडचण असेल हे त्याच्या लक्षात आले तर तात्काळ तो मदत करीत असे. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधान एवढेच त्याचे बक्षीस होते. देवधर्म हा त्याच्यासाठी केवळ बाह्य आचार नव्हता; तर तो त्याच्या जगण्याचा आधार होता.

अण्णा आई-वडिलांना देवासमान मानायचा. वडील आजारी पडले तेव्हा त्याच्या उपचारासाठी त्यांनी शक्य ते सर्व केले. ह्या कामी त्याच्या सहचारणीची त्याला मनापासून साथ होती. वडील गेल्यानंतरही अण्णांच्या मनात एक हुरहूर कायम राहिली. मी वडिलांसाठी पुरेसे काही करू शकलो नाही ह्याची त्याला कायम बोचणी असे.

काळ पुढे सरकत होता. आईच्या गुडघ्यांनी साथ सोडली. आईला चालतानाही त्रास होऊ लागला. अण्णांनी क्षणाचाही विलंब न लावता तिच्या गुडघ्याच्या उपचाराची पूर्ण जबाबदारी स्वत: घेतली. डॉक्टरी उपचार, ऑपरेशन, सेवा-शुश्रूषा ह्या सगळ्या बाबतीत त्यांनी पुढाकार घेतला. ऑपरेशननंतर आई पुन्हा व्यवस्थित चालू लागली तेव्हा तिच्या चेहऱ्यावर समाधान पाहून अण्णांच्या चेहऱ्यावर एक विलक्षण समाधान उमटले. ज्या आईने त्याला लहानपणी कडेवर घेतले होते तिचे पाय आज स्वतःच्या पायावर उभे करण्याचा

**देवधर्म हा अण्णासाठी केवळ बाह्य आचार नव्हता; तर तो त्याच्या जगण्याचा आधार होता.**

आनंद त्याला मिळाला होता. आईला पवित्र भूमीचे दर्शन घडावे म्हणून बहिणीला बोलावून तिच्या जाण्याची सगळी तयारी केली.

अण्णांच्या आयुष्यात ही माया फक्त आईपुरता मर्यादित राहिली नाही. गरजू माणसासाठी त्यांचे अंत:करण नेहमी उघडे असायचे. कुणाची आर्थिक परिस्थिती बिकट असेल तर त्याला मदत करण्यासाठी तो तयार असे, अनेकांना त्यांनी भरभरून आर्थिक मदत केली. काहींचे आयुष्य त्या मदतीनंतर उभे राहिले, काहींच्या अडचणी दूर झाल्या तर काहींना वैद्यकीय उपचार करणे सोपे गेले. मात्र मदत केल्यानंतर त्याची गुप्तता तो ठेवत असे. एका हाताचे दुसऱ्या हातालाही कळता कामा नये ह्यावर त्याचा कटाक्ष असे.

एकदा अण्णाकडे सर्वस्वाचा त्याग केलेली व्यक्ती आली व पवित्र भूमीला जाण्याची इच्छा तिने व्यक्त केली मात्र त्या व्यक्तीपुढे आर्थिक अडचण होती अण्णांनी कोणत्याही प्रकारचा विचार न करता सगळा खर्च त्यांच्या हातावर ठेवला. "जा तुमची इच्छा पूर्ण करा!" एवढेच ते म्हणाले. आज ती व्यक्ती हयात नाही पण त्या मदतीची आठवण मात्र जिवंत आहे.

बहिणीच्या संसाराबाबतीतही त्याची अशीच मदत होती. तिला काही अडचण आली की तिच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहणे अण्णांना आपले कर्तव्य वाटायचे. अण्णांचे बहिणीवरचे प्रेम काही वेगळेच होते आणि त्याला साथ त्यांच्या सहचारणीची देखील होती.

घरात आलेला माणूस पाहुणा नसून आपलाच आहे ह्या भावनेने दोघेही त्यांचा पाहुणचार करत. भाऊ असणे वेगळं आणि भावाचं नातं जगणं वेगळं, अण्णा हे नाते जगले होते.

मुलगी बाळंत झाली तेव्हा त्यांनी नातवंडाचीही आईसारखी सेवा केली. बाळाच्या चेहऱ्यावरचे निरागस हास्य

पाहून त्यांना वेगळेच समाधान वाटायचे. आई जशी आपल्या बाळाची काळजी घेते अगदी तशीच माया त्यांच्या वागण्यात दिसायची. आरोग्य बाबत त्यांना चांगले ज्ञान होते. ते डॉक्टर नव्हते; पण वैद्यकशास्त्राचा त्यांनी खूप अभ्यास केलेला होता. कुणी आजारी असल्याचे कळले तर तो अनेक उपचार सांगायचा, कुणी दुःखी असेल तर त्याला तेही जाणवायचे, शरीर दुखतंय की मन हे ओळखण्याची त्याच्यात एक विलक्षण संवेदनशीलता होती. आयुष्यभर इतके करूनही अण्णांना स्वतःबद्दल मोठेपणा कधीच वाटला नाही. आज वय झाले आहे, शरीर थकले आहे; पण आईची काळजी घेण्यात त्याचे मन अजूनही थकत नाही.

कधी कधी वाटते आईने त्याला जन्म दिला की त्यांनी आईला दुसरा जन्म दिला? लहानपणी आई त्याला कडेवर घेऊन डॉक्टरकडे धावत होती आज तो तिचा हात धरून तिच्या प्रत्येक पावलाची काळजी घेतो. नाते तेच आहे फक्त काळाने भूमिका बदललेली आहे. ती त्याची आई होती व आयुष्याच्या संध्याकाळी तो तिच्यासाठी आई झाला. आईच्या मायेचे ऋणही त्यातलेच एक आणि अण्णा आजही ते ऋण ठेवण्याचा प्रयत्न करतो आहे प्रेमाने, सेवेतून आणि न बोलता.

मोबाईल : 77 75 80 44 23

## एक सायंकाळ राखून ठेवा



आपल्या धर्मप्रांताचे मानद बिशप, आर्चबिशप फेलिक्स मच्याडो, हे आपल्या गुरुपदाची ३० ऑक्टोबर २०२६ रोजी **समर्पित ५० वर्षे** पूर्ण करीत आहेत. त्या ऐतिहासिक दिवसाचे औचित्य ओळखून, **शुक्रवार १३ नोव्हेंबर २०२६ रोजी सायं. ५.०० वा.** कृपामाता कथिड्रल, पापडी येथे पवित्र मिस्सा व नंतर सन्मान समारंभ आयोजित केला आहे. कृपया, वेळ राखून ठेवणे.


## न्यू अ‍ॅन्जल टूर्स अ‍ॅन्ड कॅटरर्स

**आयोजक : श्री. मायकल वाझ, दारसेंग, गोम्स आळी, मो. : 9209803602**

**१) सेंट ज्यूड नोव्हेना, झाँशी, ग्वाल्हेर :** दिनांक २४ ते २९ ऑक्टोबर २०२६. जाता येता ३ AC राजधानी + AC रूम + घरघुती जेवण + ग्वाल्हेर सिटी व झांशी सिटी साइटसीन (४ जणांस १ रूम), गेट-टुगेदर पार्टी सहीत एकूण खर्च रू. १८,५००/- प्रति व्यक्ती.

**२) सेंट ज्यूड नोव्हेना : झांशी, ग्वालियर आग्रा, दिल्ली :** दिनांक २४ ऑक्टो. ते १ नोव्हेंबर २०२६. जाता-येताना ३ AC राजधानी + AC रूम + घरगुती जेवण + दिल्ली + आग्रा + ग्वालियर व झांशी साईटसीन (चार जणांस एक रूम), एकूण खर्च प्रत्येकी रु. २५,५००/- मात्र. प्रति व्यक्ती.

**३) संपूर्ण केरळ दर्शन : कोचीन, मुन्नार, टेकडी, अलेप्पी, कोवलम, त्रिवेंद्रम सहल :** दिनांक ६ ते १४ नोव्हें. २०२६. जाताना ३ AC. (वसई ते कोचीन) येताना राजधानी (त्रिवेंद्रम ते वसई)+AC रूम+घरगुती जेवण+साईटसीन (३जणांस एक रूम), गेट टुगेदर पार्टीसहीत एकूण खर्च प्रत्येकी रु. ३५,०००/-.

**४) ख्रिसमसच्या सुट्टीत कोकण-मालवण-गोवा.**

* **लग्न, कुमसार, बर्थडे पार्टीच्या ऑर्डस स्वीकारल्या जातील.**

**संपर्क :**

प्रितम आल्मेडा, भुईगाव : 9271938211
क्लिफर्ड वाझ, दारसेंग : 8149208027
अ‍ॅलीयन डाबरे, वाघोली : 9987336830

## निसर्ग टूर्स आयोजित सहल

**आयोजक : ऑस्टीन : 9270080947 / 9422681516**
**विनय : 9225432233 / 9322046212**

**१) हैद्राबाद-रामोजी फिल्मसीटी :** दिनांक ८ नोव्हें. ते १३ नोव्हें. २०२६. प्रवास ३ ए.सी ने असेल. वास्तव्य डिलक्स हॉटेल, ए.सी. बस व ए.सी रूम. सर्व साईटसीन, एन्ट्री फीस, गेट टुगेदर पार्टीसहीत एकूण खर्च रु. १८,५००/-(ट्रेन खर्च समाविष्ट). (चार जणांस एक रूम).

**२) बडोदा स्टॅचू ऑफ युनिटी :-** दिनांक १६नोव्हें. ते १८ नोव्हें. २०२६ (नोव्हेंबर मध्ये) जाताना वंदेभारात ट्रेनला AC Chair Car साईटसीन ए सी बस व वास्तव्य ३ star हॉटेल भोजन, नास्ता ,जेवण,व्हेज -नॉन व्हेज लावेश बुफे सर्व साईट सीन एन्ट्री फी सहीत एकूण खर्च रु. १०,०००/-(चार जणांस एक रूम). रु. ११,०००/- (तीन जणांस एक रूम). रु .१२,०००/- (दोन जणांस एक रूम).

**४) बरोडा : स्टॅच्यू ऑफ युनिटी, सुरत सहल :** दिनांक २८ डिसें. ते ३० डिसें. २०२६. जाताना वंदेभारात ट्रेनला AC Chair Car साईटसीन ए सी बस व वास्तव्य ३ star हॉटेल भोजन, नास्ता ,जेवण,व्हेज -नॉन व्हेज लावेश बुफे सर्व साईट सीन एन्ट्री फी सहीत एकूण खर्च रु. ११,५००/-. (चार जणांस एक रूम). रु. १२,५००/- (तीन जणांस एक रूम). रु .१३,५००/- (दोन जणांस एक रूम). (जंगल सफारी, लक्ष्मी पॅलेस, सयाजी गार्डन, निराधार माता चर्च, सुरत साडी मार्केटमध्ये खरेदी.)

* **हनीमून पॅकेज, टूर्स पॅकेज, बस बुकिंग, फ्लाईट बुकिंग, रेल्वे बुकिंग आणि हॉटेल बुकिंग करून देतो.**

# कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) : उदय आणि आव्हाने

**- जोसेफ एस. डाबरे**
मावंडा, निर्मळ

जेव्हा नवीन तंत्रज्ञान आले (मग ते संगणक असो की इंटरनेट), तेव्हा जुन्या पद्धतीच्या नोकऱ्या कमी झाल्या तरी त्याहून कितीतरी पटीने नवीन रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या. AIच्या बाबतीतही तेच घडणार आहे.




'गॉडफादर ऑफ 'AI' म्हणून ओळखले जाणारे नोबेल विजेते जॉफ्री हिंटन (Geoffrey Hinton) ह्यांनी 'CBS Mornings'ला दिलेल्या मुलाखतीत कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (AI) वेगाबद्दल व भविष्यातील धोक्यांबद्दल अत्यंत महत्त्वाचे विचार मांडले. AI मुळे कॉल सेंटर्स, डेटा एंट्री, पॅरालीगल आणि अकाउंटिंग क्षेत्रांतील पारंपरिक नोकऱ्यांवर परिणाम होईल, हा त्यांचा इशारा गंभीर आहे.

**१) जॉफ्री हिंटन ह्यांनी मांडलेले प्रमुख मुद्दे आणि धोके**

AI **चा प्रचंड वेग :** पुढील ४ ते १९ वर्षांत मानवी बुद्धिमत्तेला मागे टाकणारे AI सिस्टीम्स (AGI) प्रत्यक्ष जगात काम करताना दिसतील.

**दुष्प्रवृत्तींचा धोका :** निवडणुकांमध्ये फेरफार, बनावट व्हिडिओ (Deepfakes), सायबर हल्ले आणि जैविक धोके निर्माण करण्यासाठी AIचा गैरवापर होऊ शकतो.

**सुरक्षेची गरज :** AI कंपन्यांनी केवळ नफ्यामागे न धावता सुरक्षेच्या संशोधनावर (Safety Research) अधिक भर दिला पाहिजे.

**२. AI च्या युगात रोजगाराच्या नव्या दिशा**

तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले, तरी माणसाची गरज व प्रत्यक्ष कौशल्यांचे (Physical Skills) महत्त्व कधीही संपणार नाही. उलट AI मुळे खालील दोन क्षेत्रांत मोठी क्रांती आणि उत्पन्नाच्या संधी निर्माण होत आहेत :

I. **उच्च शिक्षित आणि आयटी क्षेत्रासाठी निर्माण होणाऱ्या संधी**

AI मुळे नोकऱ्या नष्ट होणार नाहीत, तर त्या 'अपग्रेड' होतील. ज्यांना AI चा वापर करता येतो, ते न वापरणाऱ्यांची जागा घेतील.

> **कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे उत्पादकता वाढवणारे एक शक्तिशाली साधन**

**प्रॉम्प्ट इंजिनिअरिंग** (Prompt Engineering) : AI मॉडेल्सकडून अचूक काम करून घेण्यासाठी योग्य सूचना (Prompts) देणाऱ्या तज्ज्ञांना आज जगभरात प्रचंड मागणी आहे. (ज्याप्रमाणे सॉफ्टवेअर कंपनीला डोमेन एक्स्पर्टची गरज असते)

AI **सेफ्टी आणि एथिक्स एक्सपर्ट** (AI Safety & Ethics Specialist) : जॉफ्री हिंटन ह्यांनी म्हटल्याप्रमाणे, AIचा चुकीचा वापर रोखण्यासाठी आणि सुरक्षा नियमावली बनवण्यासाठी 'AI एथिक्स ऑडिटर्स' ची मोठी गरज भासणार आहे.

**डेटा क्युरेटर आणि सायबर सुरक्षा** (Data & Cybersecurity) : AI ला शिकवण्यासाठी लागणारा शुद्ध डेटा तयार करणे आणि AI आधारित सायबर हल्ल्यांपासून कंपन्यांचे रक्षण करण्यासाठी 'AI - Cybersecurity' तज्ज्ञांची गरज कैक पटीने वाढणार आहे.

**आरोग्य व शिक्षण** (Healthcare & Ed Tech Specialists) : AI रोगाचे निदान करील किंवा वैयक्तिक शिक्षण देईल; पण ते रुग्णाला किंवा विद्यार्थ्याला समजावून सांगण्यासाठी, त्याचे समुपदेशन करण्यासाठी डॉक्टर आणि शिक्षकांची गरज कायम राहील. AI हे त्यांचे साधन बनेल, ज्यामुळे त्यांचे काम अधिक सोपे व प्रभावी होईल.

II. **शारीरिक कौशल्ये आणि स्थानिक सेवा** (Skill-Based & Blue-Collar Jobs)

जॉफ्री हिंटन ह्यांनी सांगितलेले

भविष्यातील रोजगार हे उच्च शिक्षितांसाठी असले, तरी काही मानवी कौशल्याधारित रोजगारांची जागा AI इतक्यात घेऊ शकेल असे वाटत नाही. त्यामुळे त्या संधींचा योग्य फायदा घेणारे आपले वेगळे अस्तित्व टिकवू शकतील.

आजच्या काळात वेळेवर प्लंबर, इलेक्ट्रिशियन, कारपेंटर किंवा पेंटर मिळणे कठीण झाले आहे. AI कॉम्प्युटरवर काम करू शकते, पण प्रत्यक्ष घरात येऊन नळ दुरुस्त करणे किंवा वायरिंग बदलणे AI ला शक्य नाही.

**कौशल्याधारित कामे :** सुतारकाम, ए.सी. सर्व्हिसिंग, होम मेंटेनन्स, वायरमन आणि फॅब्रिकेशन ह्यांसारख्या सेवांना AI च्या काळात सोन्याचे दिवस येतील; कारण ह्या कामांसाठी मानवी कौशल्याचीच गरज भासणार आहे.

एखादी व्यक्ती, जी व्यवस्थापन क्षेत्रात तरबेज असेल, ती अशा सर्व वेगवेगळ्या सेवा देऊ इच्छिणाऱ्या कुशल कारागिरांना घेऊन एखादे कॉल सेंटर काढू शकते ज्याद्वारे ह्या सेवा गरजू लोकांना त्याच्या घरपोच दिल्या जातील.

परदेशात प्लंबर, टेलर, ड्रायव्हर, कारपेंटर, वायरमन, माळी, पेंटर ह्यांना प्रचंड आदर आणि उच्च उत्पन्न मिळते. दुर्दैवाने आपल्याकडे काम लहान-मोठे मानण्याची चुकीची मानसिकता आहे. पण आज स्विगी / झोमॅटोचे डिलिव्हरी बॉईज किंवा अर्बन कंपनीचे तंत्रज्ञ दिवसाला १,००० ते १,५०० रुपये सन्मानाने कमावत आहेत.

**भीती नको, कौशल्याची कास धरा!**

इतिहासात जेव्हा कॉम्प्युटर आला, तेव्हाही 'आता बेकारी वाढणार' अशीच आवई उठवली गेली होती. परंतु संगणकाने संपूर्ण जगाचा कायापालट करून कोट्यवधी नवीन नोकऱ्या निर्माण केल्या. AI बाबतही तेच होत आहे.

AI कडे एक धोका म्हणून न पाहता 'उत्पादकता वाढवणारे एक शक्तिशाली साधन' म्हणून पाहिले पाहिजे. जुन्या पद्धती बदलून नवीन तंत्रज्ञान शिकणे आणि हातांमधील प्रत्यक्ष कौशल्यांचा (Skills) विकास करणे, हाच AI च्या युगात यशस्वी होण्याचा उत्तम मार्ग आहे.

मोबाईल : 94 23 36 48 96

●

**DOLPHIN INDIA TOURS**

**9158853498, 9765875470, 7507532449**

**१) सापूतारा नाशिक सहल :** दि. ०६ ते ०८ नोव्हें.२०२६. ए. सी. पॅकेज, स्विमिंग पूल. खर्च प्रत्येकी रु. ९,५००/-मात्र.

**२) गोवा, सिंधुदूर्ग, तारकर्ली, देवबाग बीच सहल :** दि. १० ते १५ नोव्हें.२०२६. ए. सी. पॅकेज. खर्च रु. १८,०००/- मात्र.

**३) औरंगाबाद, नाशिक, एवला (शॉपिंग) सहल :** दि. १७ ते २० नोव्हें.२०२६. ए. सी. पॅकेज. खर्च रु. १३,०००/-मात्र.

**४) सिल्वासा, दुधनी, खानवेल सहल :** दि. २१ ते २२ नोव्हें. २०२६. ए. सी. पॅकेज. एकूण खर्च प्रत्येकी रु. ६,२५०/-मात्र.

**५) बडोदा (स्टॅच्यू ऑफ युनिटी) व सुरत सहल :** दि. १५ ते १७ जाने.२०२७. वंदे भारत व इंटरसिटी, ३ए.सी., थ्री स्टार हॉटेल सयाजी, ए.सी.पॅकेज. खर्च रु. १०,५००/-मात्र.

**६) केरळ-मुन्नार, कोचीन, टेकडी, अलॅप्पी, त्रिवेंद्रम, सेंट अल्फान्सो, कन्याकुमारी सहल :** दि. २२ जाने. ते १ फेब्रु. २०२७. रेल्वे प्रवास ३ ए.सी. खर्च प्रत्येकी रु. ३९,०००/-.

**७) राजस्थान-जयपूर, जोधपूर, उदयपूर, मा.अबू, बीकानेर, जैसेलमेर, चित्तोडगड सहल :** दि. ११ ते २२ फेब्रु. २०२७. ए. सी. पॅकेज. एकूण खर्च प्रत्येकी रु. ४१,०००/-मात्र.

**८) म्हैसूर, कुर्ग, उडीपी सहल :** दि. ०८ ते १६ फेब्रु. २०२७. ए. सी. पॅकेज. एकूण खर्च प्रत्येकी रु. ३०,०००/- मात्र.

**ॲरॉन टूर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स**

**आयोजक : श्री. मायकल बरबोज व सौ. आर्पिना बरबोज**

**मो. : 9850533214, 9284503961**

**१) कोकण-गोवा सहल:** दि. १६ नोव्हें. ते २२ नोव्हें. २६. बस प्रवास २x२ बुश बॅक एसी, एसी रूम (चार जणांस एक रूम).गेट टुगेदर पार्टीसहीत खर्च रु.१९,५००/-.

**२) सेंट ज्युड-झांशी :** दि. २४ ते २९ ऑक्टोबर २०२६. एसी हॉटेल, जाताना-येताना राजधानी ३एसी. झांशी किल्ला, ग्वालियर, साईडसीन सर्व एन्ट्री फी व गेट टुगेदर पार्टीसहीत एकूम खर्च रु. १९,५००/-.

**३) केरळ सहल :** दि. २४ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर २०२६. वसई ते अर्नाकुलम व त्रिवेंद्रम ते वसई राजधानी ३ एसी रु. ४२,५००/- (दोन जणांस एक रूम). एसी रूम व २x२ बुश बॅक एसी बस.

**४) बडोदा (Statue of Unity) व सुरत सहल :** दि. २५ ते २७ जानेवारी २७. बोरीवली-बडोदा वंदे भारत व सुरत-विरार इंटरसिटी एसी ३ स्टार हॉटेल सयाजी इफोटल. खर्च रु. ११,०००/- (४ जणांस एक रूम).

**५) राजस्थान सहल :** दि. २८ जानेवारी ते ८ फेब्रु. २०२७. (एकूण १२ दिवस). एकूण खर्च रु. ४२,५००/- (दोन जणांस एक रूम).

**६) दुबई-अबुधाबी :** जाने. २०२७

# जगाचे पर्यावरण

- आलेक्स पिटर डाबरे
'स्पंदन', निर्मळ

आजच्या काळातील पर्यावरण ही अत्यंत गंभीर आणि चिंताजनक बाब आहे. मानवाने आधुनिकीकरण म्हणजे जागतिक विकास करण्यासाठी निसर्गाच्या अतिवापरामुळे आज आपली पृथ्वी अनेक संकटाच्या वादळात सापडली आहे. नैसर्गिक गोष्टींची म्हणजे अवकाशातील उपग्रह, अंतराळातील स्टार वॉर, भूतलावरील वृक्षतोड व जलाशय तलावावर भराव, समुद्रातील जागेवर अतिक्रमण करून आपल्या स्वत:च्या जीवनात संकट ओढवून घेतले आहे.

हवामान बदलामुळे संयुक्त राष्ट्रांच्या नव्या अहवालानुसार पृथ्वीचे तापमान वेगाने वाढत आहे. ते १.५ अंश सेल्सियसची पातळी ओलांडण्याच्या उंबरठ्यावर आहे. ह्यामुळे जगात तीव्र उष्णतेच्या लाटा, अवकाळी पाऊस आणि महापूर येण्याचे प्रमाण वाढले आहे. सप्टेंबर २०२६ मध्ये नेपाळमध्ये झालेल्या निसर्गकोपाने महापूराचे ताजे उदाहरण आहे.

महासागर, विशाल अरण्य आणि महाकाय पर्वत ही पृथ्वीवरील अमूल्य संपदा आहे. जगातील हा ठेवा जपण्यासाठी शास्त्रज्ञाचे आंतरराष्ट्रीय नेटवर्क तयार केले आहे. पृथ्वीवरील बहुविध प्रणालींचे सूक्ष्म निरीक्षण आणि आंतरज्ञानशाखीय संशोधनार्थ गोड्या पाण्याचे स्त्रोत, जैवविविधता, जलचक्र, वायूचे चक्र व बर्फाच्छादन ह्या पृथ्वीतलावरील परिस्थितीचा अभ्यास केला असता सादर केलेल्या अहवालात म्हटले आहे, ''पृथ्वीच्या प्रकृतीला धोका निर्माण झाला आहे. त्याची अवस्था चिंताजनक आहे.'' उष्णतेचा बॉम्बहल्ला, अरण्यहोळी, मेघ पर्वतांची रुद्रावर्षा आणि भवताल गिळणारा महाप्रलय आणि २०२३च्या सप्टेंबर महिन्यात संबंध पृथ्वीवर सलग नऊ दिवस दोन ते चार रिश्टर तीव्रतेच्या भूकंपलहरी जाणवत राहिल्या.

त्या शोधमोहिमेत वैज्ञानिकांना समजले की, आर्क्टिकवरील 'ग्रीनलँड फजॉर्ड' ह्या भागात १२०० मीटर उंचीचा महाप्रचंड हिमकडा तुटला आणि आर्क्टिक महासागरात कोसळला. आठ दिवसानंतर महासागरात महात्सुनामी आली. समुद्रात २००मीटर उंचीच्या



लाटा निर्माण झाल्या आणि पुढील नऊ दिवसांपर्यंत प्रत्येक नऊ सेकंदाला संबंध पृथ्वी हादरत राहिली. तीस किलोमीटर परिसरातील पाण्याच्या पातळीत दहा मीटरने वाढ झाली.

त्यावेळी जागतिक हवामानशास्त्रज्ञ संघटनेने सांगितले की तिन्ही ध्रुवावर (तिसरा : हिमालय) दोन ते तीन अंश सेल्सिअसने तापमान वाढलंय. पृथ्वीवरून दरवर्षी दीड लाख टन बर्फ वितळेल. ही वाटचाल २०५०साली उत्तर ध्रुव बर्फमुक्त होण्याकडे निघालीय. बर्फ वितळताना मिथेन वायू बाहेर पडेल. जो कार्बनडाय ऑक्साईडपेक्षा दहा पटीने घातक असेल.

काठमांडू येथे १९८३साली 'इंटरनॅशनल सेंटर फॉर इंटिग्रेटेड माऊंटन डेव्हलपमेंट' (इसिमोड) ह्या आंतरराष्ट्रीय संस्थेची स्थापना करण्यात आली. अफगणिस्तान, बांगला देश, भूतान, चीन, भारत, म्यानमार, नेपाळ आणि पाकिस्ताने हे आठ देश ह्यात समाविष्ट आहेत. ताज्या पाण्याचा सदैव साठा हिमालयावर अवलंबून आहे. उत्तर ध्रुव आणि दक्षिण ध्रुवानंतर सर्वाधिक बर्फ आणि हिमनद्या ह्याच प्रदेशात आढळतात. म्हणून हा आहे तिसरा ध्रुव.

आपल्या वसईचे पर्यावरण हे अत्यंत समृद्ध, हिरवेगार आणि जैवविविधतेने नटलेले आहे. परंतु गेल्या काही दशकांत झालेल्या वेगवान शहरीकरणामुळे आणि औद्योगिक विकासामुळे येथील पर्यावरणावर मोठा बदल जाणवू लागला आहे. वसईतील समुद्रकिनाऱ्याजवळ असलेल्या हरित पट्ट्यात मोठ्या प्रमाणातील शेतीक्षेत्रात केळीच्या आणि नारळी पोफळीच्या बागा तसेच रंगीबेरंगी सुवासिक फुलबागांनी नटलेला हा हरित पट्टा आता सिमेंट कॉंक्रिटच्या जंगलांनी व्यापला आहे. उल्हास नदी ही वसईची जलस्त्रोत जीवनदान आहे. तिच्या किनारी तिवरांची जंगले आहेत. ती माशांच्या प्रजननासाठी आणि वादळवाऱ्यांपासून रक्षण करण्याकरिता महत्त्वाचे केंद्र आहे. ती आता आक्रोशाने ओरडू लागली आहेत. वसईतील मिठागरे आणि पाणथळ जागा हे स्थलांतरित पक्षी आणि स्थानिक वन्य जीवांसाठी मोठे आश्रयस्थान होते.

नैसर्गिक पाण्याचे स्त्रोत, तलाव आणि बावखले, नाले बुजवून बेसुमार अनधिकृत बांधकामे झाल्यामुळे पावसाळ्यात वसई-विरार भागांत गंभीर पूरपरिस्थिती निर्माण होते. पूर्वभागातील डोंगर उतारावरून येणाऱ्या पाण्याचा नैसर्गिक मार्ग बंद झाल्याने हे पाणी शहरी भागात साचले जाते.

वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रातील कचऱ्यावर वैज्ञानिक पद्धतीने प्रक्रिया न केल्यामुळे गोखिवरे आणि इतर भागांतील डम्पिंग ग्राऊंडवर कचऱ्याचे डोंगर उभे राहिले आहेत. ह्या डोंगराला आग लावल्यानंतर हवेचे प्रदूषण प्रचंड वाढत आहे. औद्योगिक वसाहतीमधील रासायनिक सांडपाणी आणि प्रक्रिया न केलेले मैलपाणी वसईच्या खाडीत सोडले जात असल्याने पाण्याचे रासायनिक मूल्य बिघडले असून जलचरांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. रानगाव, भुईगाव, कळंब, राजोडी व अर्नाळा ह्यांसारखे समुद्रकिनारे प्लास्टिकच्या कचऱ्यामुळे गुदमरले आहेत.

जंगलातील झाडांची होणारी प्रचंड कत्तल ह्यामुळे दुर्मीळ पशु-पक्षी आणि वनस्पतींच्या प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. त्याचबरोबर वाढत्या वाहनांच्या भेसळीच्या इंधनामुळे हवेची गुणवत्ता खालावत चालली आहे. तसेच प्लास्टिक कचरा आणि रसायनांमुळे नाले, नद्या व समुद्र प्रदूषित होत असून पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता ढासळत आहे.

वसईच्या पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास रोखण्यासाठी स्थानिक नागरिक आणि सामाजिक संस्था नेहमीच अग्रभागी राहिल्या आहेत. हरित पट्टा वाचविण्यासाठी आणि अनधिकृत बांधकामा विरोधात स्थानिक जनतेने हरित वसई चळवळ १९८०साली उभारली आहे. जी आज सक्रिय सहभागाने कार्यरत आहे. पारंपरिक विहिरी, तलाव, बावखल आणि पिण्याचे नैसर्गिक स्रोत वाचविण्यासाठी पाणी आंदोलनसारख्या मोहिमा राबविल्या जात आहेत.

वसईला निसर्गाचे मोठे वरदान आहे, ते टिकवण्यासाठी प्रशासनानी शाश्वत विकास आणि पर्यावरण पूरक नगररचना केली पाहिजे.

वसईचे शिल्लक असलेले नैसर्गिक सौंदर्य टिकवण्यासाठी नागरिकांनी झाडे लावून जगविली पाहिजेत. प्लास्टिक पिशव्यांचा वापर टाळून कापडी पिशव्यांचा वापर करावा. पाणी आणि ऊर्जेची बचत करण्यासाठी सौरऊर्जा वापरात आणावी. कचऱ्याची विल्हेवाट पर्यावरणपूरक आणि पर्यावरणावर विपरीत परिणाम करणाऱ्या वस्तूंचा वापर मर्यादित ठेवण्याचा प्रयत्न करावा. पर्यावरणांची सद्य:स्थिती सुधारण्यासाठी आपण सर्वांनी मिळून पावले उचलली पाहिजेत. आपल्या परिसरात स्वच्छता ठेवावी. निसर्गाचे संतुलन राखणे ही केवळ सरकारी यंत्रणेबरोबर आपल्या प्रत्येकाची वैयक्तिक जबाबदारी आहे.

मोबाईल : 86 98 96 96 51


# ‘गीत’ नाताळ अंक २०२६ ( वर्ष १५ वे )

**साहित्यिकांना विनम्र आवाहन आणि मनःपूर्वक आभार!**

मित्रांनो, आज आम्ही सर्व साहित्य प्रेमींसाठी एक आनंदाची बातमी देत आहोत. आपल्या ‘गीत’ नाताळ अंकाला ‘छंदश्री आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक स्पर्धा’ पुणे आयोजित, ‘वर्ष २०२४ आणि २०२५’ असे सलग दोन वर्षे उत्कृष्ट नाताळ अंकाचे पारितोषिक लाभले आहे. आम्ही ‘गीत’ नाताळ अंकाचे आधारस्तंभ असलेले सर्व साहित्यिक, साहित्यप्रेमी, वाचक, वितरक बंधू-भगिनी, सर्व जाहिरातदार आणि शुभेच्छुक ह्यांचे मनःपूर्वक आभार मानतो आणि आपल्या सर्वांना धन्यवाद देतो. आपल्या येणाऱ्या अंकासाठी, कथा, कविता, ललित, विविध विषयांवरील लेख, आयुष्याच्या वाटचालीत आलेले हृदयस्पर्शी अनुभव, देशविदेशातील प्रवास व तेथे आलेले अनुभव, आवडलेल्या पुस्तकाचा, नाटक, चित्रपटाचा परिचय, विविध बोली भाषेतील दुर्मिळ गाणी आणि त्याचा भावार्थ इत्यादी साहित्य मागविण्यात येत आहे. साहित्य शक्यतो आटोपशीर शब्दांत आणि अप्रकाशित असावे ही विनंती! (अंकासाठी जाहिरात व शुभेच्छा स्विकारल्या जातील.)

*** साहित्य पाठविण्याची अंतिम तारीख ३१ ऑक्टो २०२६ असेल. ***



**: संपर्क :**

**संपादक - लेस्ली से. डायस**

डायस रेसिडेन्सी, मुगभाट वाडी सांडोर,
पापडी पोस्ट, वसई वेस्ट, जि. पालघर-४०१२०७.

मो.: **9923581757 / 9869181682**

ई-मेल : **diasleslie@gmail.com**



FLORENCE
TOURS & TRAVELS

# FLORENCE TOURS & TRAVEL

## • INTERNATIONAL •

**CHINA HONG KONG AND MACAO**
6th November 2026
20th April 2027
7N / 8D

**VIETNAM**
4th November 2026
26th January 2027
7N / 8D

**DUBAI FESTIVAL**
January 2027
4N / 5D

**SOUTH KOREA**
CHERRY BLOOSAM
April 2027

**JAPAN**
CHERRY BLOOSAM
April 2027

**EUROPE**
May 2027

**SRI LANKA**
May 2027
5N / 6D

**SINGAPORE MALAYSIA AND THAILAND**
May 2027

**ONLY THAILAND**
May 2027

**BHUTAN**
April and May 2027
6N / 7D

## • DOMESTIC •

**ASSAM MEGHALAYA**
10N / 11D
April & May 2027

**DARJILING AND GANGTOK**
05N / 06D
20th April 2027

**KASHMIR**
May 2027

**INCLUSIONS**
- Pickup Drop
- Flight
- Visa
- Hotels
- Sightseeing
- All Meals.

Brian Dabre 7710027271 | Wilfred Pereira 9922638520

# फातिमा माता तीर्थक्षेत्र, कर्जत



(आशियातील पहिले तीर्थस्थान)

**९१ वा वार्षिक सोहळा**

**रविवार दिनांक १८ ऑक्टोबर २०२६**

**विषय : पवित्र मरिया, शांतीची राणी**

**पवित्र मिस्साबली वेळापत्रक :**

सकाळी ७. ०० : मराठी
सकाळी ८.०० : कोंकणी
सकाळी ९.०० : मराठी
सकाळी १०.०० : इंग्रजी
सकाळी ११.०० : झेंडावंदन आणि भव्य मिरवणूक.
**दुपारी १२.०० : सणाची मुख्य मिस्सा (इंग्रजी) (आर्चबिशप जॉन रॉड्रिग्ज)**
दुपारी २.३० : तामिळ मिस्सा
संध्याकाळी ४.०० : मळयालम मिस्सा

**सणाच्या हार्दिक शुभेच्छा**

**फादर ज्यो डिमेलो, प्रमुख धर्मगुरू - फातिमा माता चर्च, कर्जत**

SINCE 1979

# sapna

SUIT MAKER & TAILORING





SUITS | TUXEDO | JODHPURI | SHERWANI
KURTA - PATHANI | INDO - WESTERN

DELIVERY WITHIN 8 HOURS

SPECIAL OFFERS ON FIRST HOLY COMMUNION SUITS & DRESSES

93217 95015 EXCLUSIVE WEDDING COLLECTION 86989 76169

Viva Malange, Madhuram Hotel Lane, Next To Cocoa Confections, Jakat Naka Signal , Virar (w).

## ७५व्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा

०१/१०/१९५१ ते ०१/१०/२०२६







**श्री. आलेक्स सिल्वेस्टर डाबरे**

'फेथ', वाघोली, मांडलय

प्रिय बाबा,

परमेश्वराच्या कृपेने दिनांक ०१/१०/२०२६ रोजी तुम्ही आपल्या वयाची ७५वर्षे पूर्ण करीत आहात, त्याबद्दल देवाला धन्यवाद व तुमचे हार्दिक अभिनंदन! तुमचे पुढील आयुष्य निरोगी, सुखा-समाधानाचे जावो हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!

**: शुभेच्छुक :**

**पत्नी : रोजी आलेक्स डाबरे**

**मुले : ऑफिना नितिन डाबरे** (वाघोली, मांडलय) **शेरोना जॉन रॉड्रिग्स** (नंदाखाल, पेडी)

**डायना विल्यम डिसोजा** (वाघोली, पोंडा) **डेरीक आलेक्स डाबरे**

**नातवंडे : ब्राइस, स्विनी, स्ट्रुएन, ॲशर, ओरसन, निओमी**

**REX AIRCONDITIONING CO**

तुमच्यासाठी एक्स्पर्ट AC सोल्यूशन्स

तुमच्या एसीचा थंडपणा कमी झाला आहे?
एसी चे लाईट बिल जास्त येते?
एसी मधुन सारखा पाणी गळतो?

**कॉल करा: 93222 28859**




सर्व कंपनीच्या नवीन एसी | नवीन बंगल्याची कॉपर पायपिंग आणि प्रॉपर ड्रेनेज लाईन | स्प्लिट एसी, डक्टेबल एसी इंस्टॉलेशन आणि रिपेरिंग

३० वर्षांचा विश्वास! वसई व मुंबईत एसी दुरुस्तीची अनुभवी सेवा!

Rudolf Dmello
93222 28859

Chatriwala Bldg, 2nd Floor, Wadia Street,
Tardeo, Mumbai Central west, 400007.

Pokharni Wadi,
Tamtalao, Vasai west

## ७५ व्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा

१९/१०/१९५१ - १९/१०/२०२६



**श्री. पिटर व्हिक्टर आल्मेडा**
भुईगाव, मारियानगर

प्रिय पप्पा,

परमेश्वराच्या कृपेने दिनांक १९/१०/२०२६ रोजी तुम्ही आपल्या वयाची ७५वर्षे पूर्ण करीत आहात, त्याबद्दल देवाला धन्यवाद व तुमचे हार्दिक अभिनंदन! तुमचे पुढील आयुष्य निरोगी, सुखा-समाधानाचे जावो हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!

**पत्नी : मर्सी; मुली : मॅकलीना, शितल; जावई : आनंद फिगेर, संदेश डायस; मुलगा : ब्रायन; सून : सुवर्णा; नातवंडे : लिसा, लेवीस, शाईन, बेसील, ब्लाईथ, लिझ, इरॉस**



## ९०व्या वाढदिवसानिमित्त हार्दिक अभिनंदन

२७/१०/१९३६ - २७/१०/२०२६



**सौ. स्तेला जोजेफ कोयलो**
जुने बरामपूर, सध्याचे वास्तव्य : मुक्टीवाडी, रमेदी

अतिप्रिय आई,

देवाच्या आशीर्वादाने तू दिनांक २७ ऑक्टोबर २०२६ रोजी आपल्या वयाची ९०वर्षे पूर्ण करीत आहेस, त्याबद्दल देवाला धन्यवाद व तुझे हार्दिक अभिनंदन! तुझे उर्वरित आयुष्य आरोग्यदायी, सुखी-समाधानी व आनंदी जावो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!

**मुली : जॉयसी लेस्ली डिसिल्वा; लिना रेमंड घोन्सालविस नातवंडे : ॲरॉन-डेलिया; रिमा-रॉसली, ॲकलीन-सेलेस्ट पतवंडे : गॅरेथ, एज्रा**



BLESSED NUTRIFIT
GYM & STUDIO
Sneha Malgaonkar
Founder
Functional Nutritionist
& Wellness Coach
आरोग्याची खरी सुरुवात
योग्य आहारापासून!
तुमच्या शरीराच्या गरजेनुसार, तुमच्या Lifestyle ला अनुरूप वैयक्तिक आहार मार्गदर्शन.
वजन कमी करायचे असेल, वजन वाढवायचे असेल किंवा एखादी आरोग्य समस्या असेल – योग्य आहार आणि संतुलित पोषण हेच निरोगी जीवनाचे गमक!
आमच्या Nutrition & Diet Consultation Services
वजन कमी करण्यासाठी योग्य Diet Plan
निरोगी पद्धतीने Weight Gain
Diabetes / Thyroid / PCOS साठी योग्य आहार मार्गदर्शन
Children Nutrition Guidance
Senior Citizen Nutrition
Gut Health & Detox Plans
Skin & Hair Nutrition
Personalised & Balanced Diet Plans (Veg & Non-Veg)
आजच तुमच्या आरोग्यासाठी योग्य पाऊल उचला!
90282 74585
9769604446
blessednutrifitgymstudio
Consultation available in Virar (W), Vasai (W) & Borivali (E)
Eat Right • Live Healthy • Stay Strong




६० व्या वाढदिवसानिमित्त व यशस्वी सेवानिवृत्तीबद्दल
हार्दिक अभिनंदन
०९/१०/१९६६ - ०९/१०/२०२६
श्री. मायकल व्हिक्टर रॉड्रिग्ज
रांबाई, गोम्सआळी
परमेश्वराच्या कृपेने तुम्ही दिनांक ०९/१०/२०२६ रोजी वयाची ६०वर्षे पूर्ण करून 'भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड'(BPCL) मध्ये ३६ वर्षे सेवा करून 'प्रभारी अग्निशमन दल अधिकारी'(Acting Officer) ह्या पदावरून ३१/१०/२०२६ रोजी सेवानिवृत्त होत आहात, त्याबद्दल तुमचे हार्दिक अभिनंदन व देवाला धन्यवाद! तुमचे पुढील आयुष्य निरोगी, सुखी-समाधानी व आनंदाचे जावो, हीच प्रार्थना !
शुभेच्छुक : 'सुस्मित' कुटुंबीय




PETERMARY
पिटरमेरी इंडिया निधी लि. (वित्तसंस्था)
मुख्य कार्यालय व शाखाः बंगली वसई
पहिला माळा, बिल्डींग नं. १, न्यु श्रीजी कृपा कॉम्प्लेक्स, बंगली हॉस्पीटल समोर, बंगली, वसई (प), पालघर - ४०१ २०१.
Registration No -: U65999MH2019PLC323412
Establishment -: 2019
Contact Details : 8669955317 / 18 | email: petermary.nidhi@gmail.com | web: www.petermary.com
वसईत प्रथमच !!! कंपनी कायदा २०१३ व कंपनी (स्थापना) नियम २०१४ अन्वये नोंदणी झालेली निधी कंपनी
आमची वैशिष्ट्ये:
• आकर्षक व्याजदराच्या बचत ठेव
• ज्येष्ठ नागरिकांसाठी ठेवीवर अधिक व्याजदर.
• वसईच्या भुमीपुत्राकडून संचलित वित्त संस्था
Enjoy Higher Returns in FIXED DEPOSIT Scheme
Sr. No. | Deposit Period | Interest % General | Interest % Sr. Citizen
1. | Deposit for 12 Months | 9.00% | 9.30%
2. | Deposit for 60 Months | 11.00% | 11.50%
3. | Dam Duppat in | 72 Months
कार्यालयीन वेळ: सकाळी ९:३० ते संध्याकाळी ७:०० पर्यंत
75+
12%
ALOYSIUS PEREIRA
Managing Director



— A PROJECT BY —
RUBY LIFESPACES
ALTURA UMELE
Strategic Selling Partner
NAAUV
YOUR NEXT BEGINS NOW
A Home Beyond Expectations
Residences crafted for comfort, elegance, and family living.
1 & 2 BHK Homes
Avaliable At
₹39.99 LACS*
ONWARDS
NAIGAON WEST
9920 305 655 | 9702 500 555
MAHA RERA NO.: P99000048381

## WHEL SHETI UTPANNA




Farm Add: Whel Sheti Utpanna, Sadewadi, Whel Lanja, Ratnagiri.

Vasai Add: Raphael House, Shetodi Wadi, Papdy - Bangli Road, Vasai (W)

**Persis - 9322110590**
**Rohan - 9821584146**


## २९ वर्षांची आठवण



**ख्रिस्तवासी ब्रिनल गॅब्रियल डिसिल्वा**

सिलचीवाडी, सालोली

जन्म : १७/१०/१९७७; मृत्यू : २२/०३/१९९७

***''परमेश्वर माझा प्रकाश व माझे तारण आहे.''***
(स्तोत्र २७:१)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**कुटुंबीय**

## ७५व्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा

**१९/०९/१९५१ ते १९/०९/२०२६**



**श्रीमती जॉना मायकल गोम्स**

चुळणे

प्रिय मम्मी,

परमेश्वराच्या कृपेने तुम्ही दिनांक १९/०९/२०२६ रोजी वयाची ७५ वर्षे पूर्ण केल्याबद्दल देवाचे आभार व तुमचे हार्दिक अभिनंदन!

तुमचे पुढील आयुष्य निरोगी सुखी-समाधानाचे जावो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!

**कुटुंबीय**

## ७५व्या जन्मदिवसाचे पुण्यस्मरण



**ख्रिस्तवासी मायकल फ्रान्सिस गोम्स**

चुळणे

जन्म : ३१/१०/१९५१; मृत्यू : २१/१२/२०१७

***''मी देहाने दूर आहे तरी आत्म्याने तुम्हांजवळ आहे आणि प्रभूवरील तुमचा विश्वास पाहून आनंद करीत आहे.''***
(कलस्सै. २:४-५)

*हे प्रभू, तुझ्या स्वर्गीय नंदनवनात आमच्या डॅडींना चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**कुटुंबीय**



सायकल खरेदीसाठी वसईतील एकमेव विश्वसनीय ठिकाण
मेट्रो एन्टरप्रायझेस
तरखड, वसई
डिक्रूझ बंधू - मो. 8408872249 / 9923015970 / 7757061141
E MOTORAD
Electric Cycles
METRO ENTERPRISE
AUTHORISED EMOTORAD DEALER
Experience the Future of Mobility with
INDIA'S #1
ELECTRIC CYCLE
Pedal Like a Cycle, Throttle Like a Bike!
VISIT TODAY FOR
FREE
TEST RIDE
₹79,999
₹56,999
LIMITED TIME OFFER
PREMIUM QUALITY
AFTER SALES SUPPORT
TRUSTED DEALER
GENUINE PRODUCTS
DOPE
₹26,999
₹21,999
X1
₹32,999
₹27,999
T-REX AIR
₹47,999
₹37,499
RANGER
₹74,999
₹58,999
TOP BRANDS | ALL TYPES OF ACCESSORIES
E MOTORAD
SCHNELL
KEYSTO
HERCULES
HERO CYCLES
STURDY BIKE
OYEKIDS
AND ALL TYPES OF CYCLE ACCESSORIES AVAILABLE
VISIT US AT:
Shop No. 5 & 6, King Anthony Building,
Opposite Stella Petrol Pump,
VASAI WEST, 401202.
SHOP NO-
9307277142
9545471328
R DCRUZ-
7757061141
मेट्रो टायर सेंटर कॅथॉलिक बँकेजवळ, होळी, वसई
अधिकृत विक्रेते : सिएट टायर, एम्‌आरएफ, ब्रिजस्टोन, टीव्हीएस, जेके टायर इ.
कार, मोटरसायकल, स्कूटर, रिक्षा, इन्व्हर्टरसाठी लागणाऱ्या एक्साईड, एमरॉन व पॉवर झोन
कंपनीच्या बॅटऱ्यांचे अधिकृत विक्रेते. नायट्रोजन हवेची सुविधा उपलब्ध
गेल्या ४२ वर्षांपासून वसईकरांच्या सेवेत असलेले एकमेव विश्वसनीय ठिकाण

## One Year Mass Remembrance in Loving Memory of



**One year Mass will be offered on Sunday 18th October, 2026 at 7.00 a.m. at St. Michael's Church, Manickpur.**

*"If we live, we live for the Lord; and if we die, we die for the Lord. So, whether we live or die, we belong to the Lord."*

(Romans 14:8)



### Late Robert John Vaz

Old Barampur, Manickpur

D.O.B. : 02/02/1959; D.O.D. : 16/10/2025

**Fondly Remembered By :**

**Wife : Lata Robert Vaz**
**Son : Roger & Levis Vaz**
**Daughter-in-Law : Gracy Roger Vaz**
**Grand-Children : Cruz and Luke Vaz**
**Sr. Maggie Vaz & Vaz Family**

## सहा महिन्यांची आठवण



### ख्रिस्तवासी जोसेफ मार्कुस डिकुना

आल्मोदरवाडी, रमेदी

जन्म : २१/१०/१९५८; मृत्यू : १५/०४/२०२६

सहा महिन्यांची मिस्सा : १८/१०/२०२६

सकाळी ७.३०वाजता, रमेदी माता तीर्थस्थान, रमेदी.

***''मी देहाने दूर आहे तरी आत्म्याने तुम्हांजवळ आहे आणि प्रभूवरील तुमचा विश्वास पाहून आनंद करीत आहे.''***

(कलस्सै. २:४-५)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात आमच्या वडिलांना चिरंतन शांती लाभो!*

**पत्नी : रोजीना; मुले : गॉडसन, जॉर्डन; सुना : स्टेफी, प्रणाली; नातवंडे : सिनेरा, सिविना व कुटुंबीय**



## ९३ व्या जन्मदिवसाची आठवण



### ख्रिस्तवासी फिलीप पेद्रीन कुलास

लेवडीवाडी, सालोली

जन्म : १०/१०/१९३३; मृत्यू : १६/०३/२००७

***प्रभू येशू म्हणतो, ''जेथे मी आहे तेथे त्यांनीही असावे, अशी माझी इच्छा आहे.''***

(योहान १७:२४)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हाला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**कुटुंबीय**

## तीन महिन्यांची आठवण



**ख्रिस्तवासी जॉन डॉम्णीक घोन्साल्वीस**

खिवणी, नंदाखाल

जन्म : २५/१२/१९४२; मृत्यू : १३/०७/२०२६

तीन महिन्यांची मिस्सा : रविवार दिनांक १८/१०/२०२६

सकाळी ७.३० वाजता, पवित्र आत्म्याचे चर्च, नंदाखाल.

***प्रभू परमेश्वर म्हणतो, ''पुनरुत्थान व जीवन मीच आहे. जो माझ्यावर विश्वास ठेवतो, तो मेला तरी जगेल.''***

(योहान ११:२५)

*हे प्रभू, आमच्या वडिलांना तुझ्या स्वर्गीय नंदनवनात सुखी ठेव, हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**कुटुंबीय**




## सहा महिन्यांची आठवण



**ख्रिस्तवासी स्टेला विल्फ्रेड (निकलांव) कर्व्हालो**

सालभाटवाडी, गिरीज

जन्म : १९/०६/१९५०; मृत्यू : २०/०४/२०२६

सहा महिन्यांची मिस्सा: मंगळवार दिनांक २०/१०/२०२६

सकाळी ७.०० वाजता, संत फ्रान्सिस झेविअर चर्च, गिरीज.

***''तू जेथे जाशील तेथे परमेश्वर तुझ्या बरोबर आहे.''***

(यहोशवा १:९)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**शैलेश कर्व्हालो व कुटुंबीय**

## सहा महिन्यांची आठवण



**ख्रिस्तवासी एलिझाबेथ लॉरेन्स गोन्सालविस**

जुने बरामपूर

जन्म : १०/०५/१९३८; मृत्यू : १५/०४/२०२६

सहा महिन्यांची मिस्सा : रविवार दिनांक १८/१०/२०२६

सकाळी ७.०० वाजता, सेंट मायकल चर्च, माणिकपूर.

***''मी देहाने दूर आहे तरी आत्म्याने तुम्हांजवळ आहे आणि प्रभूवरील तुमचा विश्वास पाहून आनंद करीत आहे.''***

(कलस्सै. २:४-५)

*हे प्रभू, आमच्या आईला तुझ्या स्वर्गीय नंदनवनात सुखी ठेव!*

**मुलगा : संजय; सून : लुबिना; मुली : शर्ली व शालन; जावई : व्हिक्टर, रॉबीन व नातवंडे**

## वार्षिक पुण्यस्मरण



### ख्रिस्तवासी वॉल्टर जशीन डायस

नेवर्लेवाडी, सांडोर

जन्म : ०८/०५/१९४७; मृत्यू : १२/१०/२०२५

वार्षिक मिस्सा : रविवार दिनांक १८/१०/२०२६ सकाळी ७.३०वाजता, सेंट थॉमस चर्च, सांडोर.

***प्रभू परमेश्वर म्हणतो, ''पुनरुत्थान व जीवन मीच आहे.***
***जो माझ्यावर विश्वास ठेवतो, तो मेला असला तरी जगेल.''***

(योहान ११:२५)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात आमच्या डॅडींना चिरंतन शांती लाभो,*
*हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**-: तुमचेच शोकाकुल :-**

**पत्नी : जोविता वॉल्टर डायस; मुलगा : शामुवेल वॉल्टर डायस**

**सून : क्लोरीन शामुवेल डायस; मुली : कविता सचिन डिसिल्वा व वैशाली वॅलेन्स मच्याडो**

**नातवंडे : ॲलिस, ग्रेस, डॅनियल व सिमोन**

## एक वर्षाची आठवण



**ख्रिस्तवासी विन्सेंट पास्काल परेरा**
कोंडाळेवाडी, सांडोर
जन्म : २४/०९/१९५१; मृत्यू : ०५/१०/२०२५
एक वर्षाची मिस्सा : रविवार दिनांक ०४/१०/२०२६
सकाळी ७.३० वाजता, सेंट थॉमस चर्च, सांडोर.

***प्रभू परमेश्वर म्हणतो, ''पुनरुत्थान व जीवन मीच आहे. जो माझ्यावर विश्वास ठेवतो, तो मेला तरी जगेल.''***
(योहान ११:२५)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हाला चिरंतन शांती लाभो!*

**पत्नी :क्लेरा; मुले : क्लाईव्ह व सॅविओ; मुलगी : क्लेविया**
**जावई : निलराज से. अलोज; नातवंडे : ओझील व एस्मी**

## 100years Birth Anniversary



**Late Esprance Raphael D'Mello**
Pokharni Wadi, Papdy
D.O.B. : 01/10/1926; D.O.D. : 06/11/2012

***They replied, "Believe in the Lord Jesus, and you will be saved - you and your household."***
(Acts 16:31)

*I believe you are saved, in the name of Lord Jesus.*

**Love,**
**Angeline Robert Carneiro**

## एक वर्षाची आठवण        ३९ वर्षांची आठवण





**ख्रिस्तवासी रोजमेरी (ममूबाय) फ्रान्सिस डिसा**        **ख्रिस्तवासी फ्रान्सिस झुजू डिसा**
सहजीवन, मर्सिस
जन्म : १७/०३/१९३६        जन्म : १६/०४/१९३१
मृत्यू : ०८/१०/२०२५        मृत्यू : १९/०५/१९८७
एक वर्षाची मिस्सा : रविवार दिनांक ०४/१०/२०२६
सकाळी ७.१५ वाजता, मर्सिस चर्च..

***''नीतिमानांचा मृत्यू परमेश्वराच्या नजरेत मौल्यवान असतो.''***
(स्तोत्र ११६:१५)

*हे प्रभू, आमच्या आई-वडिलांना तुझ्या स्वर्गीय नंदनवनात सदैव सुखी ठेव, हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**मुले-सुना : केविन-एमिला, फ्रिमन-ग्रेटा, बॅरन-मेरी;**
**मुली-जावई : प्रेसिला-थॉमस, हेलन-नेपोलियन,**
**नातवंडे-पतवंडे**

## पाच वर्षांची आठवण



**ख्रिस्तवासी डेझी लॉरेन्स डिसोजा**
चुळणे चर्चजवळ
जन्म : १९/१२/१९७२; मृत्यू : १४/१०/२०२१

***''आपला जीवितक्रम परमेश्वरावर सोपवून दे; त्याच्यावर भाव ठेव म्हणजे तो तुझी कार्यसिद्धी करील.''***
(स्तोत्र ३७:५)

*हे प्रभू, तुझ्या स्वर्गीय नंदनवनात आमच्या डेझीला चिरंतन शांती दे, हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**लॉरेन्स, सारा, समायरा**

## प्रेमळ स्मरणार्थ



## सहा महिन्यांची आठवण



**ख्रिस्तवासी कोसू मार्शल फर्नांडीस**

मृत्यू : २८/०६/२०१९

**ख्रिस्तवासी मॅग्दलेना एलायस डिसोजा**

सुतारभाट, मुळगाव

मृत्यू : २४/०४/२०२६

सहा महिन्यांची मिस्सा : रविवार दिनांक २५/१०/२०२६
सकाळी ७.३० वाजता, मेरी मॅग्दलेना चर्च, मुळगाव.

***''जे आत्म्याने लीन ते धन्य; कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे***
***जे अंत:करणाचे शुद्ध ते धन्य; कारण ते देवाला पाहतील.''***

(मत्तय ५:३,८)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हांला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**कुटुंबीय**

## नऊ वर्षांची आठवण



**ख्रिस्तवासी आलेक्स डॉमणिक फोन्सेका**

होळीबाजार, घरभाटवाडी, रमेदी

जन्म : ०२/०५/१९४२; मृत्यू : ३०/१०/२०१७

***''जे येशूवर विश्वास ठेवतात, त्यांना सार्वकालिक***
***जीवन प्राप्त होईल.''***

(योहान ६:४०)

*हे प्रभू, आमच्या डॅडींना तुझ्या स्वर्गीय नंदनवनात सुखी ठेव,*
*हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**पत्नी : आयरीन; मुले : रिगन व ॲश्ली;**
**सुना : ब्रिनल व स्वीडल; नातवंडे : ग्रेस, ट्रिस्टन व कालेब**

## चौदा वर्षांची आठवण



**ख्रिस्तवासी वसंत राघ्या माढा**

वडोली, हाडळपाडा, तलासरी,

जन्म : ०१/०६/१९५३; मृत्यू : ०६/१०/२०१२
स्मरणार्थ मिस्सा : रविवार दिनांक ११/१०/२०२६
सकाळी ८.३०वाजता, नित्यसाहाय्यक माता चर्च, तलासरी.

***प्रभू परमेश्वर म्हणतो, ''पुनरुत्थान व जीवन मीच आहे.***
***जो माझ्यावर विश्वास ठेवतो, तो मेला तरी जगेल.''***

(योहान ११:२५)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हाला चिरंतन शांती लाभो, हीच प्रार्थना!*

**पत्नी : तेरेजा; मुलगी: सरीना; मुलगा-सून : निखील-नयना;**
**नातवंडे : नित्या, नेविन, निवान व कुटुंबीय**

# पाण्याची बचत

- फ्रँक मिरांडा
उमराळे

युरोप म्हटले की आपल्याला स्वच्छता, शिस्त, हिरवागार निसर्ग, सतत पडणारा पाऊस, बर्फाच्छादित डोंगर आणि थंड वातावरण आठवते. त्यामुळे युरोपमध्ये पाण्याची कधीच कमतरता भासणार नाही, असा बहुतेकांचा समज असतो. परंतु आज तिथली परिस्थिती वेगाने बदलत आहे. ब्रिटनसह फ्रान्स, जर्मनी, इटली, हंगेरी, रोमानिया, ऑस्ट्रिया आणि युरोपातील अनेक भागांना आज गंभीर पाण्याच्या कमतरतेचा सामना करावा लागत आहे.

युरोपमधील प्रसिद्ध 'पो' नदी आणि 'ऱ्हाईन' नदी, ह्यांमधील पाण्याची पातळी खालावली आहे. ह्यामुळे केवळ पिण्याच्या पाण्याचाच प्रश्न निर्माण झालेला नाही, तर नद्यांमधून होणाऱ्या जलवाहतुकीवर, उद्योगांवर व वीज निर्मितीवरही विपरीत परिणाम झाला आहे. भूजलाची पातळी दिवसेंदिवस खाली जात आहे, ज्याचा थेट फटका शेती क्षेत्राला बसत आहे. अनेक युरोपीय देशांमध्ये नागरिकांना गाड्या धुणे, बागांना पाणी देणे किंवा स्विमिंग पूल भरणे ह्यावर बंधने आणावी लागली आहेत.

जागतिक तापमानवाढ, पावसाचे अनियमित आणि बदलते प्रमाण, तीव्र उष्णतेच्या वाढत्या लाटा व अनिर्बंध जंगलतोड ह्यामुळे संपूर्ण हवामान चक्र बिघडले आहे. हवामान बदलाचा परिणाम केवळ तापमान वाढण्यापुरता मर्यादित राहिलेला नाही; तर त्याचा थेट परिणाम पाणी, अन्नसुरक्षा, शेती व आपल्या रोजच्या जगण्यावर होत आहे.

भारतातील पाण्याचे गणित मुख्यत: चार महिन्यांच्या मान्सूनवर अवलंबून असते. जून ते सप्टेंबर ह्या काळात जर चांगला पाऊस झाला, तरच वर्षभरासाठी पाण्याची सोय होऊ शकते. परंतु जर पावसाचे हे पाणी आपण योग्य प्रकारे



साठवले नाही आणि ते समुद्राला जाऊन मिळाले, तर पावसाळा संपताच काही महिन्यांतच पाण्याची टंचाई निर्माण होते.

केवळ पाऊस पडतो म्हणून पाणी कायम उपलब्ध राहील, असे गृहीत धरता येत नाही. पाणी जपावे लागते आणि त्याची व्यवस्था करावी लागते.

आपल्या वसई-विरार व आसपासच्या परिसरातही पाण्याचा प्रश्न आपण दरवर्षी पाहतो. शहराची लोकसंख्या आणि नागरीकरण प्रचंड वेगाने वाढले आहे. जुने तलाव, विहिरी आणि नैसर्गिक जलस्रोत ह्यांच्या जागी सिमेंटची जंगले उभी राहिली आहेत. उन्हाळ्याच्या शेवटी अनेक गावांमध्ये आणि पाड्यांमध्ये विहिरींचे पाणी तळाशी जाते किंवा विहिरी पूर्णपणे कोरड्या पडतात. अशावेळी पाण्यासाठी नागरिकांना मैलोन्‌मैल पायपीट करावी लागते किंवा टँकरवर पूर्णपणे अवलंबून राहावे लागते.

शहरातील परिस्थितीही फारशी वेगळी नाही. उन्हाळा वाढला, धरणांतील साठा कमी झाला की पालिका किंवा प्रशासनाकडून २०% ते ३०% पाणीकपात जाहीर केली जाते. सोसायट्यांमध्ये टँकर मागवावे लागतात. पाण्याची काळजी किंवा उपाययोजना पावसाळ्याच्या पहिल्या दिवसापासूनच केली पाहिजे. पावसाचे पाणी शक्य तितके साठवले पाहिजे आणि ते जमिनीत मुरवले पाहिजे. विहिरी, तलाव व इतर नैसर्गिक जलस्रोत नियमित साफ केले पाहिजेत.

'रेन वॉटर हार्वेस्टिंग' ही अत्यंत प्रभावी पद्धत आहे. आपल्या घराच्या किंवा इमारतीच्या छतावर पडणारे पावसाचे शुद्ध पाणी पाईपद्वारे एकत्र करून ते थेट विहीर किंवा जमिनीतील विशेष टाकीमध्ये सोडता येते. यामुळे भूजलाची पातळी वाढते आणि उन्हाळ्यात बोअरवेल किंवा विहिरी कोरड्या पडत नाहीत. आज प्रत्येक मोठ्या इमारतीत आणि वैयक्तिक घर मालकाने रेन वॉटर हार्वेस्टिंग करणे ही काळाची गरज बनली आहे

घरातही आपण रोजच्या व्यवहारात पाण्याची बचत करू शकतो. दात घासताना, भांडी घासताना किंवा दाढी करताना नळ सतत सुरू ठेवू नये. गाडी धुताना पाईपचा वापर न करता बादली वापरली पाहिजे. नळांचे लिकेज त्वरित दुरुस्त केले पाहिजेत.

सामाजिक, राजकीय आणि धार्मिक कार्यक्रमांमध्येही पाण्याची नासाडी टाळणे अत्यंत गरजेचे आहे. लग्न समारंभ, जत्रा किंवा इतर मोठ्या सभांमध्ये पिण्याच्या पाण्याची होणारी नासाडी आपण रोखली पाहिजे.

पाणी वाचवणे ही फक्त सरकारची किंवा प्रशासनाची एकट्याची जबाबदारी नाही. प्रत्येक कुटुंब, प्रत्येक सोसायटी आणि प्रत्येक नागरिकाने ह्यामध्ये आपले योगदान दिल पाहिजे. पाणी आहे म्हणून जीवन आहे; त्यामुळे पाण्याची बचत ही केवळ आजची गरज नाही, तर आपल्या येणाऱ्या पुढच्या पिढ्यांचे भविष्य सुरक्षित ठेवण्याची आपली नैतिक जबाबदारी आहे.

●


Angel
Tours & Travels Pvt. Ltd.
GROUP DEPARTURES
2026-2027
ALL INTERNATIONAL TOURS
Discover Incredible World
EXPLORE THE WORLD Together
01 ALMATY 19 OCT 2026 5 NIGHTS / 6 DAYS RS :- 1,22,000 /- DISCOUNT OF RS 3,000
02 HONG KONG & MACAU 04 NOV 2026 5 NIGHTS / 6 DAYS RS :- 1,77,500 /- DISCOUNT OF RS 3,000
03 SRI LANKA 05 NOV 2026 5 NIGHTS / 6 DAYS RS :- 80,000/- DISCOUNT OF RS 3,000
04 VIETNAM 05 NOV 2026 7 NIGHTS / 8 DAYS RS :- 1,30,000 /- DISCOUNT OF RS 5,000
05 SOUTH KOREA 06 NOV 2026 7 NIGHTS / 8 DAYS RS :- 2,38,000 /- DISCOUNT OF RS 6,000
06 SRI LANKA & MALDIVES 06 NOV 2026 6 NIGHTS / 7 DAYS RS :- 1,20,000 /- DISCOUNT OF RS 5,000
07 TURKEY 10 NOV 2026 10 NIGHTS / 11 DAYS RS :- 1,93,000 /- DISCOUNT OF RS 4,000
08 THAILAND 16 NOV 2026 4 NIGHTS / 5 DAYS RS :- 69,000 /- DISCOUNT OF RS 2,000
09 DUBAI 26 DEC 2026 4 NIGHTS / 5 DAYS RS :- 1,24,000 /- DISCOUNT OF RS 2,000
10 GREECE 22 JAN 2027 7 NIGHTS / 8 DAYS RS 2,27,000 /- DISCOUNT OF RS 4,000
11 JAPAN 30 MARCH 2027 9 NIGHTS / 10 DAYS RS :- 2,90,000 /- DISCOUNT OF RS 10,000
12 JAPAN 03 APR 2027 9 NIGHTS / 10 DAYS RS :- 3,40,000 /- DISCOUNT OF RS 10,000
13 BAKU 12 APR 2027 4 NIGHTS / 5 DAYS * RS :- 68,000 /- T/C APPLY DISCOUNT OF RS 5,000
14 VIETNAM 08 MAY / 22 MAY 2027 8 NIGHTS / 9 DAYS RS :- 1,40,000 /- DISCOUNT OF RS 4,000
15 SOUTH AFRICA 08 MAY 2027 7 NIGHTS / 8 DAYS RS :- 2,99,999 /- DISCOUNT OF RS 3,000
16 SINGAPORE MALAYSIA & THAILAND 10 MAY 2027 9 NIGHTS / 10 DAYS RS :- 1,43,000 /- DISCOUNT OF RS 3,000
17 SUPER SAVER EUROPE 07 MAY 2027 13 NIGHTS / 14 DAYS * EURO 1980 + INR 1,15,000 /- T/C APPLY DISCOUNT ON INR RS 5,000
18 LUXURIOUS EUROPE 15 MAY 2027 12 NIGHTS / 13 DAYS * EURO 2540 + INR 1,41,000 /- T/C APPLY DISCOUNT ON INR RS 5,000
19 AMERICA WITH BAHAMAS CRUISE 15 MAY 2027 16 NIGHTS / 17 DAYS * USD 4280 + RS 51,000 /- T/C APPLY DISCOUNT ON INR RS 5,000
20 20 MINI EUROPE 17 MAY 2027 9 NIGHTS / 10 DAYS * EURO 1750 + RS 1,19,000 /- T/C APPLY DISCOUNT ON INR RS 5,000
PICKUP AND DROP FROM YOUR DOOR STEP FOR VASAI AND MUMBAI
OUR SERVICES
AIRLINE TICKETS
VISA SERVICES
INTERNATIONAL GROUP TOURS
DOMESTIC GROUP TOURS
CUSTOMIZE TOUR PACKAGES
PASSPORT
MICE
CRUISE BOOKINGS


Angel
Tours & Travels Pvt. Ltd.
Discover Incredible India
GROUP DEPARTURES
2026-2027
ALL DOMESTIC TOURS
EXPLORE THE WORLD Together
01 KERALA WITH CORDELIA CRUISE
23 OCT 2026
6 NIGHTS / 7 DAYS
ACCOMODATIONS
RS :- 69,000 /-
DISCOUNT OF RS 5,000
02 BOMBAY TO COCHIN CORDELIA CRUISE
23 OCT 2026
2 NIGHTS / 3 DAYS
ACCOMODATIONS
RS :- 24,000 /-
DISCOUNT OF RS 2,000
03 BHUTAN (BAGDOGRA)
09 NOV 2026
7 NIGHTS / 8 DAYS
RS 80,000 /-
DISCOUNT OF RS 2,000
04 RAJASTHAN (LAND)
13 NOV 2026
7 NIGHTS / 8 DAYS
ACCOMODATIONS
RS :- 45,000 /-
DISCOUNT OF RS 2,000
05 HYDERABAD (LAND)
OCTOBER 26 - MARCH 27
3 NIGHTS / 4 DAYS + TRAIN JOURNEY
ACCOMODATIONS
RS :- 19,000 /-
DISCOUNT OF RS 1,000
06 KASHMIR (LAND)
15 APRIL 2027
6 NIGHTS / 7 DAYS
ACCOMODATIONS
RS :- 46,500 /-
DISCOUNT OF RS 2,000
07 ASSAM MEGHALYA (LAND)
APRIL - MAY 2027
6 NIGHTS / 07 DAYS
ACCOMODATIONS
RS :- 48,000 /-
DISCOUNT OF RS 2,000
08 ANDAMAN (LAND)
NOV 2026 - MARCH 2027
5 NIGHTS / 6 DAYS
ACCOMODATIONS
RS :- 41,000 /-
DISCOUNT OF RS 2,000
09 GOA (LAND)
02 MAY 2027
3 NIGHTS / 4 DAYS
ACCOMODATIONS
RS :- 17,000 /-
DISCOUNT OF RS 1,000
10 SHIMLA, KULU MANALI (LAND)
06 MAY 2027
5 NIGHTS / 6 DAYS
ACCOMODATIONS
RS :- 25,000 /-
DISCOUNT OF RS 2,000
11 KASHMIR (LAND)
15 MAY 2027
6 NIGHTS / 7 DAYS
ACCOMODATIONS
RS :- 46,500 /-
DISCOUNT OF RS 2,000
12 MYSORE COORG, OOTY (LAND)
NOV 2026 - FEB 2027
6 NIGHTS / 7 DAYS
ACCOMODATIONS
RS :- 35,000 /-
DISCOUNT OF RS 2,000
ALL THE ACCOMODATION IN TWIN SHARING ROOM
One Stop Solution for all your Travel Needs
Travel Explore Repeat
HEAD OFFICE - VASAI WEST
8830845202 / 7499832889 / 8799853496
Joana Anna Smruti Bldg., 1st Floor, M.G. Road, Tamtalao, Vasai West - 401207, Palghar, MH, INDIA
BRANCH - ORLEM, MALAD
9511891845 / 8830845202 / 7499832889
Springfield - 1A, Shop 02 Sunder Lane, Behind St. Anne's School, Orlem, Malad (W), Mumbai - 400064

इशारा

# सायबर गुन्हेगारीचे वाढते प्रमाण

-जॉन लुईस परेरा
घोसाळी, नंदाखाल

सायबर गुन्हेगारीने सध्या लोकांचे जीवन अत्यंत असुरक्षित आणि अस्वस्थ केले आहे. तंत्रज्ञानाचा वापर जितका वाढला आहे, तितक्याच वेगाने डिजिटल फसवणुकीचे प्रकार घडत आहेत.

ऑनलाईन गुन्हेगार निरनिराळ्या युक्त्या शोधून लोकांना फसवण्यास यशस्वी होत आहेत. काही वेळा एखाद्या व्यवस्थेचा बारकाईने अभ्यास केला आणि तिच्यातील कमतरता शोधली आणि त्या उणिवेचा गैरफायदा घेतला तर पुरेसे ठरते.

सायबर फसवणूक हे त्यातील सर्वांत आधुनिक आणि गंभीर उदाहरण आहे. आज एका मोबाईलच्या माध्यमातून माणसाच्या बँक खात्यापर्यंत पोहोचता येते. खोटे संदेश, नकली लिंक्स, बनावट ओळख, फसवे फोन आणि मानसिक दबाव ह्यांच्या साहाय्याने सामान्य माणसाची वर्षानुवर्षांची कमाई काही मिनिटांत धोक्यात येऊ शकते.

व्यवस्थेतील काही पळवाटांचा फायदा घेऊन डिजिटल गुन्हेगारी करणाऱ्या टोळीने विशेषतः ज्येष्ठांकडे असलेल्या निवृत्तीच्या पुंजीला लक्ष करून त्यांचे बँक खाते रिकामी करण्याचा देशभर सपाटा सुरू केला आहे. फक्त विश्वास निर्माण करा व भीती दाखवा - आणि माणूस स्वतःच आपल्या सुरक्षेची दारे उघडतो. हीच ह्या नव्या गुन्हेगारीची सर्वांत धोकादायक बाजू आहे.

प्रत्येक व्यवस्थेत काही ना काही त्रुटी असतात. कोणतीही व्यवस्था पूर्णपणे त्रुटी विरहित असू शकत नाही. इथे प्रश्न जितका व्यवस्थेतील कमतरतेचा आहे तितकाच आपल्या शिक्षणाचा आहे. आपण जर खरोखर शिक्षित असाल तर एखादी तज्ज्ञ व्यक्ती व्यवस्थेतील त्रुटी



संबंधित संस्थेला सांगून भविष्यात होणारे नुकसान टाळू शकते. काही मंडळी अशा पळवाटांचा गैरवापर आपल्या विकृत हुशारीने सहज खिसे भरण्यासाठी अंगीकारत आहे.

अलीकडे नाशिकमध्ये एका ६० वर्षीय व्यक्तीला ''तुमच्या नावाने जम्मूमध्ये बँक खाते उघडण्यात आले आहे, ह्या खात्याचा वापर दहशतवाद आणि मनी लॉन्ड्रिंगसाठी झाला आहे', असे सांगून तब्बल सुमारे ९० लाख रुपयांची फसवणूक झाल्याची घटना समोर आली आहे.

**प्रश्न जितका व्यवस्थेतील कमतरतेचा आहे तितकाच तो आपल्या शिक्षणाचा आहे.**

आरोपींनी स्वतःला पोलीस आणि तपास यंत्रणांचे अधिकारी असल्याचे भासवून पीडिताला सुमारे १२ दिवस मानसिक दबावाखाली ठेवले. व्हिडिओ कॉलवर सतत संपर्कात राहण्यास भाग पाडले आणि तपासाच्या नावाखाली पैसे विविध खात्यांमध्ये वर्ग करण्यास सांगितले.

ही घटना केवळ एका व्यक्तीची आर्थिक फसवणूक नाही. सायबर गुन्हेगार आता तंत्रज्ञानापेक्षा माणसाच्या भीतीचा अधिक प्रभावी वापर करत आहेत, हे ह्या प्रकरणातून स्पष्ट होते. सामान्य नागरिकाला पोलीस, कोर्ट, मनी लॉन्ड्रिंग, दहशतवाद, अटक अशा शब्दांची भीती वाटणे स्वाभाविक आहे. आरोपी ह्या भीतीचा फायदा घेतात.

आजची फसवणुकीची पद्धत पूर्वीसारखी नाही. आज एकाच वेळी हजारो लोकांना फसविले जाऊ शकते. त्यातील काही जण फसले तरी गुन्हेगाराला मोठा आर्थिक फायदा होऊ शकतो. ह्याला केवळ 'लोक सावध नसतात' म्हणून दुर्लक्षित करणे चुकीचे आहे. कारण सुरक्षा ही जितकी तांत्रिक उपकरणे वापरणाऱ्यांची जबाबदारी असते तितकीच ती व्यवस्था तयार करणाऱ्यांचीही असते.

संपूर्ण जबाबदारी फक्त सरकार, बँका किंवा तंत्रज्ञान कंपन्यांवर टाकून चालणार नाही. आपणही बदलले पाहिजे. अनोळखी व्यक्तीच्या फोनवर विश्वास ठेवणे, घाईघाईने आर्थिक निर्णय घेणे, कोणालाही संवेदनशील माहिती देणे, ह्या सवयी बदलणे गरजेचे आहे.

आपल्याला जागरूकतेची आणि सावधगिरीची गरज आहे. आपण व्यवस्था बदलू शकत नाही. मात्र परिस्थितीप्रमाणे बदलावे लागेल हेच अंतिम सत्य आहे.

मोबाईल : 90 96 98 29 85

# तुम्ही जगा, आम्हालाही जगू द्या!



**-फिलीप चांदी**
पाचूबंदर, वसई कोळीवाडा

मच्छीमारांना 'तुम्ही जगा व आम्हालाही जगू द्या?' ह्या न्यायाने आर्थिक मदत मिळवून देणे हे राष्ट्रीय मच्छीमार संघटना, अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समिती व महाराष्ट्र मच्छिमार कृती संघटनांच्या नेत्यांचे नैतिक कर्तव्य असेल!

मो. : 90 49 66 77 74

दरवर्षीप्रमाणे ह्यावर्षीही महाराष्ट्र शासनाच्या मत्स्यखात्याने पावसाळी मासेमारी बंदी १जून ते १५ ऑगस्ट पर्यंत सुमारे ७५ दिवसांची करून तसा कायदेशीर आदेश काढला. त्यानुसार मे २०२६ पासून किनाऱ्यावरील सर्व बोटी पावसाळ्यासाठी ताडपत्रींनी शाकारून ठेवल्या.

पावसाळी बंदीचा कालावधी सुरू असतानाच मंत्रालयातील काही जबाबदार पदाधिकाऱ्यांनी १ ऑगस्ट पासून महाराष्ट्राच्या दक्षिणेकडील रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग येथील पर्ससेनेट व एलटीडी लाईट ह्या जाळ्यांवर केंद्र शासनाची कायमची बंदी असूनदेखील तेथील मोठ्या फिशिंग ट्रॉलर्सना मच्छीमारीस परवानगी दिल्याने तेथील शेकडो ट्रॉलर्सनी अरबी समुद्रातून रात्रंदिवस मच्छीमारी करून पापलेट, सुरमई, घोळ, भिंगपाले व रावस मासळी ओरबाडून नेली. त्यावेळी प्रत्येक ट्रॉलर्सने लाखो-लाखोंची मासळी विक्री करून आपला वार्षिक नफ्याचा कोटा ह्या पंधरा दिवसांत पूर्ण करून घेतला.

महाराष्ट्राच्या पश्चिमेकडील ठाणे, पालघर व मुंबईतील सातपाटी, अर्नाळा, वसई व उत्तनचे मच्छीमार 'रायगड - रत्नागिरीच्या ट्रॉलर्सनी बेकायदेशीर मासेमारी करून करोडोंचा नफा कमावला?' ह्या बातमीने हे कसे शक्य आहे? असा जाब शासनाला विचारला. ह्याची सार्वजनिक चर्चा होऊन पुढे १५ ऑगस्टनंतर पारंपरिक कव धंद्याच्या सर्व बोटी मच्छीमारीस गेल्या. एकदा नव्हे; तर तीन-चार मासळी ट्रिपा केल्यानंतरही तुटपुंजीच मासळी मिळाली. त्यामुळे डिझेल, बर्फ, खावटी व खपणाऱ्यांचा पगार वजा जाता हाती अत्यल्प नफा मिळाला. त्यामुळे मागील वर्षी अपूर्ण राहिलेले घराचे बांधकाम, मुला-मुलींची लग्नकार्ये व बँकांचे व्यवहार पूर्ण करू न शकल्याने सागरपुत्र कमालीचे अस्वस्थ झाले.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री महोदय व मत्स्य मंत्रीमहोदयांना विचारावेसे वाटते की आपल्या महाराष्ट्राच्या समुद्रात सर्व मच्छीमारांसाठी एकच कायदा व एकच नियम असताना दोन वेगवेगळे कायदे कसे झाले? महाराष्ट्राच्या समुद्रात संविधानानुसार बाराही महिने सर्व धर्माचे, जातीचे सागरपुत्र पिढ्यान्‌पिढ्या, बंधुत्वाच्या नात्याने समंजसपणे आजपर्यंत मच्छीमारी करीत आहेत.

१ ऑगस्टच्या चुकीच्या आदेशा-प्रमाणे पुन्हा चूक होणार नाही ह्याची नोंद घेऊन मत्स्यमंत्रालयातील जबाबदार पदाधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी व पारंपरिक धंदा करणाऱ्या कष्टकरी


## 'सुवार्ता' जाहिरात दर

**कमर्शियल**

**कलर :-**

| | |
|---|---|
| पूर्ण पान | रु. २६,२५०/- |
| अर्धे पान | रु. १३,६५०/- |
| पाव पान | रु. ७,३५०/- |

**ब्लॅक ॲण्ड व्हाईट :-**

| | |
|---|---|
| पूर्ण पान | रु. १५,७५०/- |
| अर्धे पान | रु. ७,३५०/- |
| पाव पान | रु. ५,२५०/- |
| छोटी (१/६) | रु. ३,१५०/- |
| छोटी (१/१२) | रु. २,१००/- |

**शोक/अभिनंदन फोटो**

**कलर :-**

| | |
|---|---|
| पूर्ण पान | रु. २३,१००/- |
| अर्धे पान | रु. ११,५५०/- |
| पाव पान | रु. ६,३००/- |

**ब्लॅक ॲण्ड व्हाईट :-**

| | |
|---|---|
| पूर्ण पान | रु. १२,६००/- |
| अर्धे पान | रु. ६,३००/- |
| पाव पान | रु. ४,२००/- |
| छोटी (१/६) | रु. २,६२५/- |
| छोटी (१/१२) | रु. १,५७५/- |

## 'सुवार्ता' वर्गणी दर

| | |
|---|---|
| वार्षिक वर्गणी | रु. २००/- |
| पोस्टाने वार्षिक वर्गणी | रु. २५०/- |
| पाच वर्षांची वर्गणी | रु. ९५०/- |

**संपर्क : 'सुवार्ता' कार्यालय**
जीवन दर्शन केंद्र, गिरीज,
वसई - ४०१२०१.
**मोबाईल : 9702090231**
E-mail : suvartavasai@gmail.com

# अनोखा वाढदिवस

- मॅटिल्डा ॲन्थनी डिसिल्वा
मर्सेस



"आजोबा, बघा ना ! चार दिवस राहिले माझ्या वाढदिवसाला, पण अजून आईची काहीच तयारी दिसत नाही." सारा तक्रार करत होती. "ह्या वर्षी कधी नव्हे तो माझा वाढदिवस नेमका रविवारी आला आहे." सारा आजोबांच्या कानाजवळ पुटपुटत होती. ते ऐकून आजोबांना हसू येत होते. पण आपण आता हसलो तर सारा रडायला लागेल हे त्यांना माहीत होते.

साराचा हा पाचवा वाढदिवस होता. तिला आठवत होते. दोन महिन्यांपूर्वी साराची मैत्रीण सोफिया हिचा वाढदिवस तिच्या मम्मा- डॅडाने खूप मोठा केला होता. सोफियाच्या मैत्रिणी आणि त्यांचे नातेवाईक अशा सगळ्यांना आमंत्रण होते. त्यासाठी मोठा हॉल घेतला होता. हॉलमध्ये छान सजावट केली होती. डी.जे.वर गाणी लावली होती आणि साराच्या मैत्रिणी आणि सगळी लहान मुले त्या तालावर थिरकत होती. खायची-प्यायची चंगळ होती. सोफियाचा वाढदिवसाचा केक 'बार्बी डॉल' होता. मिकी माउसचे कार्टून सगळ्यांचे मनोरंजन करीत फिरत होते. खूप धमाल आली होती.

तेव्हापासून सारालाही आपला वाढदिवस आईबाबांनी असाच साजरा करावा असे वाटत होते. तिने तसे आईबाबांना सांगितलेही होते. आणि आता ती सारखी आईच्या मागे लागली होती.

"आई सांग ना गं, कोणा कोणाला आमंत्रण करू माझ्या वाढदिवसाला?"

"सारा, मी करीन हं बाळा सगळी आमंत्रणं! तू काही काळजी करू नकोस." हसत हसत आई साराला म्हणाली.

"मला पण सोफियासारखा 'बार्बी डॉल'चा केक हवाय..." सारा जोरातच बोलली.

"हो गं बाई, बघू ते आपण..." आई समजावत म्हणाली.

अजून घरात कसलीच तयारी दिसत नव्हती. म्हणून ती आज आजोबांकडे तक्रार करत होती..

त्या संध्याकाळी बाबा खूप स्कूल बॅग घेऊन आले. साराला खूप आश्चर्य वाटले.

**साराला अजून कळत नव्हते आपल्या वाढदिवसाला कोणकोण येणार आहेत?**

"बाबा, माझ्याकडे ऑलरेडी दोन स्कूल बॅग आहेत. आणखी कशाला आणल्यास ह्या?" साराने बाबांना विचारले.

"असू दे! एक गंमत आहे आमची!" बाबा हसत म्हणाले. सारा परत फुरगटून बसली.

साराला अजून कळत नव्हते आपल्या वाढदिवसाला कोण कोण येणार आहेत. वाढदिवसाच्या दिवशी घालायला आईने छान फ्रॉक मात्र आणला होता.

रविवार... साराच्या वाढदिवसाचा दिवस उजाडला. सकाळीच आजी - आजोबा, आई-बाबा आणि सारा चर्चला गेले. त्यानंतर मात्र घरी न येता दुसरीकडेच बाबा गाडी घेऊन निघाले.

"बाबा, आपण कुठे चाललो आहोत... आज माझा वाढदिवस आहे. लक्षात आहे ना तुमच्या?" साराला काही कळेना.

"हो गं बाई. लक्षात आहे सगळ्यांच्या. सारा, तुलाच एक मोठं सरप्राइज आहे." आईने सांगितले.

गाडी एक वळण घेऊन थांबली. साराने पाहिले समोर एक इमारत होती. त्यावर नाव लिहिले होते 'स्नेहालय.' रक्षकाने दरवाजा उघडला. गाडी आत जाताच एक सफेद साडी नेसलेल्या नन समोर आल्या.

"या.. या.. मी तुमचीच वाट पाहत होते. सारा, तुला वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा बेटा.." त्या हसून म्हणाल्या. साराला कळेना, ह्यांना कसे कळले आज माझा वाढदिवस आहे ते..?

त्या सगळ्यांना मोठ्या हॉलमध्ये घेऊन गेल्या. सगळा हॉल पताका आणि फुग्यांनी सजवला होता. मधोमध एक रांगोळी काढली होती. त्यावर मोठ्या अक्षरात 'हॅपी बर्थडे सारा' असे लिहिले होते. हे सगळे पाहून साराला खूप आश्चर्य

वाटले. तेवढ्यात त्यांनी कुणालातरी आवाज दिला.

''राधा... मुलींना घेऊन ये...'' त्याबरोबर आतल्या भागातून रांगेने एकामागोमाग एक मुली आल्या. त्यात लहानांपासून मोठ्यांपर्यंत मुली होत्या. त्यांनी सगळ्यांना एकसाथ नमस्ते केले. तेवढ्यात साराचे मामा-मामी, आत्या नी काका आले. त्यांनी बराचसा खाऊ आणि वाढदिवसाचा केक आणला होता.

मामाने टेबलावर केक काढला. तो पाहून सारा खुश झाली. कारण तिला हवा होता तसा 'बार्बी डॉल'चा तो केक होता. मग घरातील लोक आणि सर्व मुलींनी सारासाठी वाढदिवसाची गाणी म्हणून शुभेच्छा दिल्या. साराला एकदम भारी वाटले. साराने केक कापला. सर्वांना खाऊ आणि केक वाटप केला. खाणे संपल्यावर त्यातील काही मुलींनी गाणी म्हटली तर काही मुलींनी नाच सादर केला.

''सारा चल आमच्याबरोबर...'' त्यातील एका मोठ्या मुलीने साराचा हात धरला आणि सगळ्या मुली तिला बाहेर घेऊन गेल्या. समोरच्या अंगणात मग बरेच खेळ झाले. लगोरी, आईचा रुमाल हरवला , असले काही खेळ सारा त्यांच्याबरोबर खेळली. ह्यात किती वेळ गेला हेही तिला समजले नाही. ती पूर्णपणे समरस झाली होती.

''सारा आज घरी जायचं ना आपण?'' आजोबा हसत विचारत होते.

''आजोबा, खूप मजा येते खेळायला... तुम्ही पण या...'' सारा तेथे रमली होती. पण निघायची वेळ झाली होती. परत मग त्या राधाताईने मुलींना साराबरोबर हॉलमध्ये आणले.

मुलींनी स्वतःच्या हाताने बनविलेली भेटकार्डे साराला दिली. आणि साराने बाबांनी आणलेल्या बॅगा प्रत्येकीला रिटर्न गिफ्ट म्हणून दिले. सर्वांना खूप आनंद झाला. निघताना मात्र साराला थोडे वाईट वाटले. अजूनही खेळायची तिची इच्छा होती.

''सारा कसं वाटलं तुला सरप्राइज...? चांगला झाला ना तुझा वाढदिवस?'' बाबांनी गाडीत येताना साराला विचारले.

''खूप खूप छान बाबा... पुढच्या वेळी पण आपण इथेच येऊ या...'' सारा खूश होऊन म्हणाली.

हे ऐकल्यावर साराबरोबर घरातील सर्व मंडळीही खूश झाली.

मोबाईल : 95 45 09 34 36

•


## SARAH & SARAH TOURS - Since 2005

**१) व्हिनस व्हिएतनाम - हनोई, होई एन, दा नांग, हालाँग बे क्रूज, हो ची मिन्ह सहल :**
दिनांक 06 NOV. TO 15 NOV. 2026. RS. 1,22,000/- व्हिएतनाम एअरलाइन्सने.

**२) रमणीय श्रीलंका - कॅन्डी बेनटोटा, न्यूवारा एलिया, कोलंबो सहल :**
दिनांक 07 NOV. TO 12 NOV. 2026. RS. 72,000/- एअर इंडियाने.

**३) थायलँड - बँकॉक - पटाया सहल :** दिनांक Dt. 16 NOV. TO 22 NOV. 2026.

**४) रॉयल राज्यस्थान-जयपूर, बिकानेर, जैसलमेर, जोधपुर, उदयपूर, चितोडगड सहल :** Dt. 13 TO 22NOV.2026. RS. 43,000/-. All 3 STAR HOTELS, 3 AC SUPERFAST TRAIN (2 SHARING)

**५) दिल्ली, आग्रा, ग्वाल्हेर, सेंट ज्यूड नोव्हेना झाशी राजधानी** 3 AC ट्रेनने - दिनांक 20 TO 29 OCT. 2026. रू. ३१,०००/- प्रती व्यक्ती (4 SHARING).

**६) सेंट ज्यूड नोव्हेना झाशी राजधानी** 3 AC ट्रेनने - दिनांक 24 TO 29 OCT. 2026. रू. २१,०००/- प्रती व्यक्ती (4 SHARING).

**७) धमाल ख्रिसमस गोवा सहल** कोकण 3 AC रेल्वेने VASAI TO VASAI. दिनांक 26 TO 30 DEC.2026. रू. १९,०००/- प्रती व्यक्ती (4 SHARING).

**८) हैदराबाद-रामोजी फिल्मसिटी-स्नो वर्ल्ड ख्रिसमस सहल :** 26 TO 31 DEC.2026. RS. 18,500/- प्रती व्यक्ती (4 SHARING), 3 A.C. RAILWAY VASAI TO VASAI.

**९) स्टॅच्यू ऑफ युनिटी-बडोदा-सुरत** : दिनांक 28 to 29 DEC.2026. रू. ११,०००/- प्रती व्यक्ती (4 SHARING) वंदे भारत व इंटरसिटी, थ्री स्टार हॉटल सयाजी इंफोटेल. सर्व सहलींचे रेल्वे बुकिंग ६१ दिवस आगाऊ.

**१०) DUBAI SHOPPING FESTIVAL WITH ABU DHABI :**DT. 09 TO 14 JAN. 2027.

**११) JAPAN - CHERRY BLOSSOM TOUR :** DT. 2ND APRIL 2027.

* आम्ही देश विदेशातील हनिमून पॅकेजेस तसेच शाळा-कॉलेज, चर्चसंलग्न संघटना, सीनियर सिटीजन आणि स्वतंत्र ग्रुप सहली करतो.

**Cont. : Prop. Charles - 9930871303 C/O William - 9930832035**

# मूठभर पीठ

-विजया डिसा
बोरीवली

दुःखाने विणलेली होती माझ्या आयुष्याची कथा. माझ्या पतीचे निधन झाले होते. त्याच्या मृत्यूनंतर मी निराधार अबला कोंडयाचा मांडा करून जीवन कंठीत होते. माझ्याकडे जगण्याचे एकच कारण होते, माझा छोटा मुलगा!

गरीब विधवेचे जीवन नेहमीच कठीण असते. समाजात तिची फारशी दखल घेतली जात नाही. असुरक्षितता, एकाकीपणा, कष्ट हेच तिचे रोजचे वास्तव. मुखात दोन घास घालण्यासाठी मला संघर्ष करावा लागत होता. अशातच, दुष्काळ पडला. दिवस सरले, महिने सरले, पण पावसाचा एक थेंबही पडला नाही. सगळेच हवालदिल झाले आणि माझा मुलगा, हाडांचा सापळाच जणू; त्याच्याकडे पाहिल की माझे हृदय गलबलून जाई.

माझ्या घरात थोडेसे धान्य होते. मी ते खूप जपून वापरत होते. पण जसजसे दिवस सरत होते, तसतसे माठ रिकामा होत चालला होता आणि तेलाचा घडा आटत गेला. जेव्हा मी माठ उघडत असे तेव्हा माझे हृदय पिळवटून निघत असे. पण मी स्वतःलाच धीर देत असे, ''आजचा दिवस निभावू दे, उद्याचे उद्या पाहू.'' पण एक सकाळ अशी उगवलीच, मी माठ उघडला.

आत फक्त एक मूठभर पीठ उरले होते आणि घड्यात थोडेसे तेल. जड अंतःकरणाने मी घराबाहेर पडले. चुलीसाठी काही काटक्या गोळा करू लागले. शेवटचे जेवण. उद्याचा दिवस जणू आमच्यासाठी अस्तित्वातच नव्हता ह्या विचाराने माझे हृदय विदीर्ण झाले.

तेवढ्यात एक माणूस माझ्याकडे आला. त्याचे कपडे प्रवासामुळे धुळीने भरलेले होते. पण त्याच्या डोळ्यांत एक गूढ शांतता होती. नंतर मला समजले तो देवाचा संदेष्टा एलायजा होता. त्याने मला हाक मारली आणि म्हणाला, ''मला थोडे



पाणी दे.'' माझ्याकडे देण्यासारखे दुसरे काहीच नव्हते. मी पाणी आणण्यासाठी वळले. पण तो पुन्हा हाक मारून म्हणाला, ''मला थोडी भाकरही दे.'' त्याचे शब्द ऐकून माझे मन वेदनेने कळवळले. मी त्याच्याकडे वळून प्रामाणिकपणे सांगितले, ''महाराज, माझ्याकडे भाकर नाही. फक्त एका माठात मूठभर पीठ आहे आणि घड्यात थोडेसे तेल. मी ह्या काटक्या गोळा करत आहे, जेणेकरून घरी जाऊन मी आणि माझा मुलगा शेवटचे जेवण बनवू. ते खाऊन आम्ही मरू.'' हे शब्द बोलताना माझ्या काळजाला घरे पडत होती. पण तो शांतपणे म्हणाला, ''घाबरू नकोस भाकरी कर आणि प्रथम मला दे.'' माझ्या मनात प्रश्नांचे वादळ उठले. घाबरू नकोस? मरणाच्या दारात उभे आहोत आम्ही, कशावर विश्वास ठेवू? आणि ही काय मागणी?

**विश्वास म्हणजे नक्की काय? हे जाणून घेऊ या!**

मग त्याने देवाचे वचन सांगितले, ''परमेश्वर म्हणतो, पाऊस पडून दुष्काळ संपेपर्यंत तुझ्या माठातील पीठ संपणार नाही आणि घड्यातील तेलही आटणार नाही.'' त्या क्षणी भीती आणि विश्वास ह्यांचे द्वंद माझ्या मनात उत्पन्न झाले. माझ्याकडे उरलेले सर्व काही म्हणजे केवळ एक मूठभर पीठ व थोडेसे तेल.

माझ्या मुलाच्या तोंडचा घास मी दुसऱ्याला देत होते! मनाची चलबिचल चालली होती, पण खोल अंतःकरणात एक शांत आवाज उमटला, ''देवावर विश्वास ठेव, त्याला काहीच अशक्य नाही.''

मी घरात गेले. थरथरत्या हातांनी माठ उघडला. तेलही घेतले आणि त्याने सांगितल्याप्रमाणे भाकर केली व ती भाकर मी प्रथम त्याला दिली. मग मी माठाकडे पाहिले, माझा माझ्या डोळ्यांवर विश्वास बसेना! अजूनही तेवढेच पीठ माठात होते! मी तेलाचा घडा पाहिला, तो सुद्धा रिकामा नव्हता.

आम्ही त्या दिवशी जेवलो, दुसऱ्या दिवशीही आणि दररोज सकाळी मी जेव्हा माठ उघडत असे, दर दिवशी त्यात पीठ असायचे आणि तेलही. ते कधीच संपले नाही, जेवताना माझे डोळे भरून येत. हृदय देवाच्या कृपेने भारावून जाई. चमत्कार माठात नव्हता; तर मी निराशेच्या गर्तेत जेव्हा देवावर विश्वास ठेवला तेव्हा तो माझ्या हृदयात सुरू झाला होता. जेव्हा मी माझी शेवटची मूठ देवाच्या हातात दिली, तेव्हा देवाने तिला अखंड आशीर्वादित केले, थोडी आशा... थोडा धीर... थोडा विश्वास...

देवाला आपल्या भरलेल्या कोठाराची गरज नसते. तो आपला अढळ विश्वास आणि समर्पणभाव बघतो. आज माझे हृदय कृतज्ञतेने म्हणते, ''प्रभू, माझ्याकडे काहीच नव्हते, पण तू माझ्या रिकामेपणालाच तुझ्या कृपेने भरून टाकले.'' एक गोष्ट कायमची माझ्या मनावर कोरली गेली, विश्वास म्हणजे केवळ विपुल असताना देवावर भरवसा ठेवणे नव्हे; तर हातात फक्त एक मूठभर उरले असतानाही देवाच्या हाती सर्व काही सोपवणे!

**एक वर्षाची आठवण** **४२ वर्षांची आठवण**




**ख्रिस्तवासी मनीबाई जॉकीम घोन्साल्वीस** **ख्रिस्तवासी जॉकीम अमार घोन्साल्वीस**

उमराळा, वळंबाव, मरियाभवन

मृत्यू : १७/१०/२०२५ मृत्यू : १६/०७/१९८४

वार्षिक मिस्सा : रविवार दिनांक १८/१०/२०२६
सकाळी ७.०० वाजता, सेंट जोसेफ चर्च, उमराळा.

***प्रभू परमेश्वर म्हणतो, ''पुनरुत्थान व जीवन मीच आहे. जो माझ्यावर विश्वास ठेवतो, तो मेला असला तरी जगेल.''***
(योहान ११:२५)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हांला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**कुटुंबीय**

**पाच वर्षांची आठवण**



**ख्रिस्तवासी जोसेफ ॲन्ड्र्यू रूमाव**

'सप्तसूर', रूमावआळी, नंदाखाल

जन्म : २१/०१/१९६३; मृत्यू : ०८/१०/२०२१

***प्रभू म्हणतो, ''पहा, मी तुला कधीच विसरणार नाही. कारण मी तुला माझ्या तळहातावर कोरले आहे.''***
(यशया ४९:१५-१६)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हाला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना !*

**पत्नी, मुली व कुटुंबीय**

**In Loving Memory**



**Late Pantius M. Pereira**

Big Carpentry, Ex - Giriz

D.O.B. : 27/10/1943; D.O.D. : 15/10/2025

First Anniversary Mass : 15/10/2026 at 8.00 a.m. at Our Lady of Grace Cathedral, Papdy.

***"Blessed are the pure in heart, for they shall see God."***
(Mt. 5:8)

*May the Lord grant him Eternal Peace!*

**From : Mrs. Anita Pereira & Family**

**वार्षिक स्मृती**



**ख्रिस्तवासी थॉमस सायमन घोन्साल्विस**

उमराळे, जोसघर

जन्म : ०७/११/१९५४; मृत्यू : २७/१०/२०२५

वार्षिक मिस्सा : रविवार दिनांक २५/१०/२०२६
सकाळी ७.०० वाजता, संत जोसेफ चर्च, उमराळे.

***''नीतिमानांचा मृत्यू परमेश्वराच्या नजरेत मौल्यवान असतो.''***
(स्तोत्र ११६:१५)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हाला चिरंतन शांती लाभो!*

**कुटुंबीय**

## एक वर्षाची आठवण



**ख्रिस्तवासी आल्फ्रेड डॉमणिक वाझ**

जुने बरामपूर, माणिकपूर

जन्म : ११/०३/१९४५; मृत्यू : २३/१०/२०२५

एक वर्षाची मिस्सा : रविवार दिनांक २५/१०/२०२६
सकाळी ७.०० वाजता, माणिकपूर चर्च.

***प्रभू म्हणतो, ''पहा, मी तुला कधीच विसरणार नाही. कारण मी तुला माझ्या तळहातावर कोरले आहे.''***
(यशया ४९:१५-१६)

*हे प्रभू, तुझ्या स्वर्गीय नंदनवनात आमच्या डॅडींना सहभागी कर, हीच तुझ्याचरणी विनम्र प्रार्थना !*

**शोकाकुल कुटुंबीय**

## वार्षिक स्मृती



**ख्रिस्तवासी निर्मला डिक्सन वाझ**

जुने बरामपूर, माणिकपूर

जन्म : १२/०९/१९६५; मृत्यू : २०/१०/२०२५

वार्षिक मिस्सा : मंगळवार दिनांक २०/१०/२०२६
सकाळी ८.०० वाजता, संत मायकल चर्च, माणिकपूर.

***''मी देहाने दूर आहे तरी आत्म्याने तुम्हांजवळ आहे आणि प्रभूवरील तुमचा विश्वास पाहून आनंद करीत आहे.''***
(कलस्सै. २:४-५)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात आमच्या मम्मीला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना !*

**वाझ व लोपीस कुटुंबीय**

## एक वर्षाची आठवण



**ख्रिस्तवासी जॉनमेरी पास्काल घोन्सालविस**

गोखिवरे

जन्म : २७/०३/१९४८; मृत्यू : १५/१०/२०२५

एक वर्षाची मिस्सा : रविवार दिनांक १८/१०/२०२६
सकाळी ७.३० वाजता, सेंट रॉक चर्च, गोखिवरे.

***प्रभू परमेश्वर म्हणतो, ''पुनरुत्थान व जीवन मीच आहे. जो माझ्यावर विश्वास ठेवतो, तो मेला तरी जगेल.''***
(योहान ११:२५)

*हे प्रभू, आमच्या मावशीला तुझ्या स्वर्गीय नंदनवनात चिरंतन शांती लाभो, हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**शोकाकुल : रिटा व कुटुंबीय**

## Six Months Remembrance



**Late Madlayan William D'cunha**

Tivliwadi, Remedy

D.O.B : 30/09/1949; D.O.D. : 28/04/2026

Six Months Mass : Tue. 20/10/2026 at
7.00 a.m. at Remedy Church.

***"Blessed are the pure in heart, for they shall see God."*** (Mt. 5:8)

**Wife of : William; Mother of : Sheetal, Willis, Swapnali; Mother-in-law of : William D'Silva, Jasmine Willis D'cunha, Joel Carvalho; Grandmother of : Asher, Anthony, Amy, Alden, Adam & Blaise**

**प्रेमळ स्मरणार्थ** **सहा महिन्यांची आठवण**



**ख्रिस्तवासी फ्रान्सिस इनास परेरा** **ख्रिस्तवासी तेरेजा फ्रान्सिस परेरा**

नागळई वाडी, सालोली

जन्म : १८/१२/१९३५ जन्म : ०१/०४/१९३८

मृत्यू : ०६/०३/२०१२ मृत्यू : ०३/०४/२०२६

सहा महिन्याची मिस्सा : रविवार दिनांक ०४/१०/२०२६

सकाळी ७.३० वाजता, सेंट थॉमस चर्च, सांडोर.

***प्रभू परमेश्वर म्हणतो, ''पुनरुत्थान व जीवन मीच आहे. माझ्यावर विश्वास ठेवतो, तो मेला असला तरी जगेल.''***

(योहान ११:२५)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हांला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**मुले : फा. (डॉ.) अनिल परेरा, विवियन व अशोक परेरा; सविता, सेल्वीन व सारा**

**पाच वर्षांची आठवण**



**ख्रिस्तवासी एलिझाबेथ जॉन परेरा**

काळभाटवाडी, पापडी

जन्म : २७/१०/१९५८; मृत्यू : १६/१०/२०२१

***प्रभू येशू म्हणाला, ''आज तू माझ्याबरोबर सुखलोकांत असशील.''***

(लूक २३:४३)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**शोकाकुल :- आई : मार्तिन; पती : जॉन;**
**मुले : रॉयडन, जॉयसन; सुना : रोशल, सॅमन्था;**
**नातवंडे : वेन्डल, शेल्डन, जॅसलिन, जेफरसन व कुटुंबीय**

**चौदा वर्षांची प्रेमळ आठवण**



**ख्रिस्तवासी मवीन मायकल घोन्सालवीस**

रोमवाडी, मर्सिस

जन्म : १७/०१/१९८८; मृत्यू : १५/१०/२०१२

***प्रभू म्हणतो, ''पहा, मी तुला कधीच विसरणार नाही. कारण मी तुला माझ्या तळहातावर कोरले आहे.''***

(यशया ४९:१५-१६)

*हे प्रभू, आमच्या मवीनला तुझ्या स्वर्गीय नंदनवनात चिरंतन शांती दे, हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**-: तुझेच शोकाकुल :-**
**मम्मी-डॅडी, बहीण, भाऊजी व भाचे**

# सहामाही स्मृती



# ख्रिस्तवासी जॉन अँन्थनी डिमेलो

**शितल वाडी, वडवली, पाली**

**मार्टिना बेकरीचे मालक**

**जन्म: ०६/०९/१९५३ वय: ७३ वर्षे मृत्यू: ०६/०४/२०२६**

**: सहा महिन्यांची मिस्सा :**

**रविवार दिनांक ११/१०/२०२६ सकाळी ७.०० वाजता,**
**मदर ऑफ गॉड चर्च, पाली.**

"मी देहाने दूर आहे तरी, आत्म्याने तुम्हांजवळ आहे. आणि प्रभूवरील तुमचा विश्वास पाहून आनंद करीत आहे"
कलस्सै (२:४:५)

**प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हांला चिरंतन शांती लाभो.**
**हीच ईश्वरचरणी प्रार्थना**

**शोकाकुल :- पत्नी : हेलन जॉन डिमेलो, डिमेलो व मच्याडो परिवार**

**प्रेमळ स्मरणार्थ** **वार्षिक स्मृती**





**ख्रिस्तवासी जॉना इग्नेशियस बुतेलो** **ख्रिस्तवासी इग्नेशियस अंतोन बुतेलो**

ओळंबवाडी, पापडी

जन्म : १४/१२/१९४४
मृत्यू : २६/१०/२०१५

जन्म : ३१/१०/१९४३
मृत्यू : ०६/१०/२०२५

वार्षिक मिस्सा : रविवार दिनांक ११/१०/२०२६
सकाळी ७.१५ वाजता, कृपामाता कथिड्रल, पापडी.

***''नीतिमानांचा मृत्यू परमेश्वराच्या नजरेत मौल्यवान असतो.''***
(स्तोत्र ११६:१५)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हांला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**कुटुंबीय**

---

**In Loving Memory**



**Late Enid W. Sequeira** **Late Walter A. Sequeira**

Small Giriz, Vasai

D.O.D. : 31/07/2026 D.O.D. : 06/01/2012

***"The souls of the righteous are in the hand of God, and no torment will ever touch them."***
(Wisdom 3:1)

*May God grant them Eternal Peace!*



**Deeply Remembered By**
**Sequeira Families**



---

**सहा वर्षांची आठवण**





**ख्रिस्तवासी इग्नेशियस फ्रान्सिस डिकुन्हा**

घोटेभाट, नानभाट

जन्म : २४/१०/१९३८; मृत्यू : १५/१०/२०२०

***प्रभू परमेश्वर म्हणतो, ''पुनरुत्थान व जीवन मीच आहे. जो माझ्यावर विश्वास ठेवतो, तो मेला तरी जगेल.''***
(योहान ११:२५)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हाला चिरंतन शांती लाभो,*
*हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**कुटुंबीय**

## वार्षिक पुण्यस्मरण



**ख्रिस्तवासी सॅन्ड्रा ग्रेगरी रिबेलो**

धमामीवाडी, पापडी

जन्म : ०५/०८/१९७०; मृत्यू : १७/१०/२०२५

वार्षिक मिस्सा : रविवार दिनांक १८/१०/२०२६

सकाळी ७.१५ वाजता, कृपामाता कथिड्रल, पापडी.

***''देवाचे होते ते देवाने नेले; त्याचे नाव धन्यवादीत असो!''***

(ईयोब १:२१)

*हे प्रभू, तुझ्या स्वर्गराज्यात आमच्या सॅन्ड्राला सामावून घे,*
*हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना !*

**पती : ग्रेगरी; मुलगा : ॲल्विस; सून : कॅन्डीडा व कुटुंबीय**

## एक वर्षाची आठवण



**ख्रिस्तवासी सेंजॉन इग्नेशियस डिकोष्टा**

लुईजा निवास, चुळणे

जन्म : १९/०७/१९६९; मृत्यू : ०८/१०/२०२५

वार्षिक मिस्सा : रविवार दिनांक ११/१०/२०२६

सकाळी ७.१५ वाजता फातिमा माता चर्च, चुळणे.

***प्रभू परमेश्वर म्हणतो, ''पुनरुत्थान व जीवन मीच आहे. माझ्यावर विश्वास ठेवतो, तो मेला असला तरी जगेल.''***

(योहान ११:२५)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुला चिरंतन शांती लाभो,*
*हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**कुटुंबीय**

## चार वर्षांची आठवण



**ख्रिस्तवासी मायकल सेंजॉन डिकोष्टा**

चुळणे

जन्म : ०४/०९/१९४५; मृत्यू : ०४/१०/२०२२

चार वर्षांची मिस्सा : रविवार दिनांक ०४/१०/२०२६

सकाळी ७.१५ वाजता, चुळणे चर्च.

***प्रभू येशू म्हणाला, ''आज तू माझ्याबरोबर सुखलोकांत असशील.''***

(लूक २३:४३)

*हे प्रभू परमेश्वरा, तुझ्या स्वर्गीय नंदनवनात आमच्या डॅडींना*
*चिरंतन शांती लाभो, हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**शोकाकुल : पत्नी, मुले, सुना व नातवंडे**

## सहा महिन्यांची आठवण



**ख्रिस्तवासी फ्रान्सिस आगोस्तीन करवालो**

खारोडीवाडी, मुळगाव

जन्म : ०३/०५/१९४२; मृत्यू : १२/०४/२०२६

सहा महिन्यांची मिस्सा : रविवार दिनांक १८/१०/२०२६

सकाळी ७.३०वाजता, संत मेरी मॅग्दलेन चर्च, मुळगाव.

***प्रभू परमेश्वर म्हणतो,***
***''माझ्याकडे या आणि मी तुम्हांला विसावा देईन.''***

(मत्तय ११:२८)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हाला चिरंतन शांती लाभो!*

**मुले : नोव्हेल व निलेश; मुलगी : नेहा आनंद घोन्सालवीस;**
**सुना : क्रिस्मीता व ब्रिनल;**
**नातवंडे : कॅरेन, कायरॉन, लिनेल, इलेन व नॅश**

**१० वर्षांची आठवण** **३३ वर्षांची आठवण**



**ख्रिस्तवासी फिलीप झु. फर्नांडिस** **ख्रिस्तवासी इजमाल फिलीप फर्नांडिस**

मर्देस

मृत्यू : ०७/१०/२०१६ मृत्यू : १७/०५/१९९३

***''जे आत्म्याने लीन ते धन्य; कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे जे अंत:करणाचे शुद्ध ते धन्य; कारण ते देवाला पाहतील.''***

(मत्तय ५:३,८)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हांला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**मुले : व्हिक्टर, विजेक, विल्यम; सुना : ज्योत्स्ना, सुनीता; नातवंडे : जेस्लीन, जेरवीस, ब्लेस व इवेट**

**पाच वर्षांची आठवण**



**ख्रिस्तवासी डेझी लॉरेन्स डिसोजा**

'माऊंट मेरी', मेर्की वाडी, चुळणे चर्चजवळ

जन्म : १९/१२/१९७२; मृत्यू : १४/१०/२०२१

***''मी सार्वकालिक प्रेमवृत्तीने तुझ्यावर प्रेम करीत आलो म्हणून मी तुला वात्सल्याने जवळ केले आहे.''***

(यिर्मया ३१:३)

*हे प्रभू, तुझ्या स्वर्गीय नंदनवनात आमच्या डेझीला चिरंतन शांती दे, तिला सुखी ठेव, हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**भाऊ : डॉन घोन्सालविस**

**बहिणी : डायना कोटीयन व डेलिना कोलासो**

**बारा वर्षांची आठवण** **अकरा वर्षांची आठवण**





**ख्रिस्तवासी प्रमिला आल्मेडा**

जन्म: ०९/०१/१९६८ - मृत्यू: ०९ /१०/२०१४

**ख्रिस्तवासी जॉन आल्मेडा**

जन्म: ०७/०६/१९३१ - मृत्यू: १७/१०/२०१५

सापोडी, मर्सेस

प्रभू म्हणतो, "कारण माझ्या योजना ह्या तुमच्या योजना नव्हेत आणि माझे मार्ग हे तुमचे मार्ग नव्हेत" (यशया ५५:८)

प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हाला चिरशांती लाभो, हीच विनम्र प्रार्थना !

**ओशन आल्मेडा**

## सहा महिन्याची आठवण



### ख्रिस्तवासी आंजेलीना कैतान दोडती

दोडतीआळी, निर्मळ

जन्म : ०५/०६/१९४०; मृत्यू : १०/०४/२०२६

सहा महिन्याची मिस्सा : रविवार दिनांक ११/१०/२०२६
सकाळी ७.३० वाजता, होली क्रॉस चर्च, निर्मळ.

**प्रभू परमेश्वर म्हणतो, ''पुनरुत्थान व जीवन मीच आहे. माझ्यावर विश्वास ठेवतो, तो मेला असला तरी जगेल.''**
(योहान ११:२५)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**मुलगा, सून, मुली, जावई, नातवंडे व शब्दसृष्टी परिवार**

## प्रेमळ स्मरणार्थ



### ख्रिस्तवासी कॅथरीन ॲलेक्स फर्नांडिस

इनोडीवाडी, मुळगाव

जन्म : २०/१०/१९४०; मृत्यू : २४/०७/२०२५

**''जे आत्म्याने लीन ते धन्य; कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे जे अंत:करणाचे शुद्ध ते धन्य; कारण ते देवाला पाहतील.''**
(मत्तय ५:३,८)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात आमच्या आत्याला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**रोनिता लिओनार्ड डिकोष्टा व स्विडल लॉन्जिनस डिसा**

## वार्षिक स्मृती



### ख्रिस्तवासी ॲना फ्रान्सिस फलकाव

डोलार वाडी, मर्सेस

जन्म : १५/०९/१९५७; मृत्यू : २२/१०/२०२५

वार्षिक मिस्सा : रविवार दिनांक १८/१०/२०२६
सकाळी ७.१५ वाजता, दयामाता चर्च, मर्सेस.

**''तो त्यांच्या डोळ्यांचे सर्व अश्रू पुसून टाकील; ह्यापुढे मरण राहणार नाही; शोक, रडणे, कष्ट हे राहणार नाही.''**
(प्रकटीकरण २१:४)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात आमच्या ॲना बायला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**शोकाकुल :- पती, मुली व मामाकडचे**

## सहा वर्षांची आठवण



### ख्रिस्तवासी अनिल भालचंद्र घरत

आगाशी, अर्नाळा

जन्म : ३१/०७/१९६५; मृत्यू : २२/१०/२०२०

**प्रभू परमेश्वर म्हणतो, ''पुनरुत्थान व जीवन मीच आहे. माझ्यावर विश्वास ठेवतो, तो मेला असला तरी जगेल.''**
(योहान ११:२५)

*हे प्रभू, आमच्या डॅडींना तुझ्या स्वर्गीय नंदनवनात चिरंतन शांती दे, हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**पत्नी : सुनिता घरत; मुलगी : रुचिता प्रितेश लेमॉस;**
**सासू : मॅगी कोरीया; जॉन्सन व सोनाली कोरीया;**
**नातवंडे : झेमीरा व झायेरा लेमॉस**

**वार्षिक स्मृती** **प्रेमळ स्मरणार्थ**







## ख्रिस्तवासी मॅग्दलेना जोसेफ परेरा

जन्म : ११/११/१९३९
मृत्यू : १०/१०/२०२५

## ख्रिस्तवासी जोसेफ जसीन परेरा

जन्म : ०२/०४/१९४१
मृत्यू : २८/०४/२०२१

मुक्ती बेणे, मर्सिस

**वार्षिक मिस्सा:**
**रविवार दि. ११ ऑक्टोबर २०२६, सकाळी ७.१५ वा. दयामाता चर्च, मर्सिस**

***''आम्हांसाठी सार्वकालिक निवासस्थान स्वर्गात आहे.''***
(२ करींथ ५:१)

*हे प्रभू, आमच्या मम्मी-डॅडीला तुझ्या स्वर्गीय नंदनवनात चिरंतन शांती लाभू दे, हीच आमची ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

- कुटुंबीय

---

**दहा वर्षांची आठवण** **दोन वर्ष व चार महिन्यांची आठवण**





## ख्रिस्तवासी लॉरेन्स अंतोन परेरा

## ख्रिस्तवासी कॅथरीन लॉरेन्स परेरा

गास, लहान सरगोडी

जन्म : २५/११/१९४३ जन्म : १४/०१/१९४८
मृत्यू : १५/१०/२०१६ मृत्यू : ०९/०६/२०२४

***''हे परमेश्वरा, तुझ्या घरातील समृद्धीने त्यांची तृप्ती होईल. कारण जीवनाचा झरा तुझ्याजवळ आहे.''***
(स्तोत्र ३६:८-९)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हांला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**तुमचीच शोकाकुल मुलगी : सिल्वीरूपा लुकस फर्नांडीस**

---

**एक महिन्याची आठवण**



***प्रभू परमेश्वर म्हणतो, ''पुनरुत्थान व जीवन मीच आहे. जो माझ्यावर विश्वास ठेवतो, तो मेला तरी जगेल.''***
(योहान ११:२५)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुला चिरंतन शांती लाभो, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*



**पती : मिलिंद मार्शल डाबरे**
**मुलगी : मॅलिटा मिलिंद डाबरे**
**व तुझे शोकाकुल कुटुंबिय**

## ख्रिस्तवासी डॉमिनिका (उजा) मिलिंद डाबरे

मारियानगर (भुईगाव)

जन्म : ०४/१०/१९८२; मृत्यू : ०९/०९/२०२६

एक महिन्याची मिस्सा : रविवार दिनांक ०४/१०/२०२६
सकाळी ६.०० वाजता, होली फॅमिली चर्च, भुईगाव



## In Loving Memory of



# Late Audette Salil Coutinho

Dolari wadi, Sandor

D.O.B. : 23/08/1979; D.O.D. : 01/09/2026

One Month Mass : 04/10/2026 at 7.30a.m. at St. Thomas Church, Sandor.

Six Month Mass : 28/02/2027 at 7.30a.m. at St. Thomas Church, Sandor.

***"My Comfort in my suffering is this : your promise preserves my life."***
(Psalm 119:50)

*We humbly pray that may you find eternal peace in the heavenly paradise of the Lord!*

**Deeply Remembered By**

**Coutinho and Dias Families**

## एक महिन्याची आठवण



**ख्रिस्तवासी फ्लॉरी कॅस्टलिनो फर्नांडीस**
तरखड, रमेदी
जन्म : २०/०९/१९४५; मृत्यू : ११/०९/२०२६
एक महिन्याची मिस्सा : रविवार दिनांक ११/१०/२०२६
सकाळी ७.३० वाजता, रमेदी माता तीर्थस्थान, रमेदी.

***प्रभू परमेश्वर म्हणतो,***
***''माझ्याकडे या आणि मी तुम्हांला विसावा देईन.''***
(मत्तय ११:२८)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुला चिरंतन शांती लाभो,*
*हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**फर्नांडीस व डिमेलो कुटुंबीय**

## वार्षिक स्मृती



**ख्रिस्तवासी ट्रीजा लॉरेन्स बार**
नायगाव, पाली
जन्म : ०४/१२/१९४६; मृत्यू : २०/१०/२०२५
वार्षिक मिस्सा : रविवार दिनांक १८/१०/२०२६
सकाळी ७.०० वाजता, देव माता चर्च पाली.

***''जे आत्म्याने लीन ते धन्य; कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे***
***जे अंतःकरणाचे शुद्ध ते धन्य; कारण ते देवाला पाहतील.''***
(मत्तय ५:३,८)

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुला चिरंतन शांती लाभो !*

**मुली व जावई : मीना सुनील डिसिल्वा, विना सेल्विन फरेल;**
**नातवंडे : क्रिस, सिओना, क्लॅरिसा, सलोनी**

## प्रेमळ मासिक स्मृती



**ख्रिस्तवासी जोसेफ आलेक्स लोपीस**
माणिकपूर
जन्म : २१/१२/१९४१; मृत्यू : ०८/०९/२०२६

प. मिस्सा : रविवार दिनांक ११/१०/२०२६
सकाळी ७.००वाजता, सेंट मायकल चर्च, माणिकपूर.

***''जे सुयुद्ध ते मी केले आहे, धाव संपविली आहे,***
***विश्वास राखिला आहे''***
(२ तिमथी ४:७)

*हे प्रभू परमेश्वरा, आमच्या डॅडींच्या / पप्पांच्या आत्म्याला*
*चिरशांती दे,*
*हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**पत्नी : मेरी जोजेफ लोपीस**
**मुले-सुना : अमित व सुमीत लोपीस**
**: स्वप्नाली व निशा लोपीस**
**नातवंडे : ॲशर, ॲवनर, आर्यन व इशान**

## एक महिन्याची आठवण



**ख्रिस्तवासी आल्बर्ट जॉन परेरा**

ओळंबवाडी, पापडी, वसई

जन्म : ०८/०६/१९३२ ; मृत्यू : १२/०९/२०२६

एक महिन्याची मिस्सा : रविवार दिनांक ११/१०/२०२६
सकाळी ७.१५वाजता, कृपामाता कथिड्रल, पापडी.

***''नीतिमानांचे आत्मे देवाच्या हातात आहेत; कोणतीही पिडा त्यांना स्पर्श करणार नाही.''***

(शलमोनचा ज्ञानग्रंथ ३:१)

*हे प्रभू परमेश्वरा, तुझ्या स्वर्गीय नंदनवनात त्यांना चिरंतन शांती दे, हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**बिशप आयवन परेरा व कुटुंबीय**

## प्रेमळ स्मृती



**ख्रिस्तवासी डायगो जॉन घोन्सालविस**

भाबोळा रोड गावपरिवार, चुळणे

जन्म : ०४/१०/१९५२; मृत्यू : २५/०८/२०२६

***''धन्य ते जे प्रभूमध्ये मरण पावतात; आता पुढे ते त्यांच्या कष्टांपासून विश्रांती घेतील.''***

(प्रकटीकरण १४:१३)

*हे प्रभू, स्वर्गीय नंदनवनात आमच्या बाबांना चिरंतन शांती दे, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**शोकाकुल :- पत्नी : वेरोणिका घोन्सालविस;**
**मुलगा-सून : जोन्स - मेरीलीन; नात : सॅम्युएला;**
**मुलगी-जावई : क्लिया - रॉजर डिसोजा; व कुटुंबीय**

## प्रेमळ स्मरणार्थ २३ वर्षांची आठवण



**ख्रिस्तवासी विक्टर सायमन डिमेलो** **ख्रिस्तवासी मागरिट विक्टर डिमेलो**

होळी, रमेदी

जन्म : २८/०६/१९५० जन्म : २१/०८/१९५६
मृत्यू : ०९/०९/२०२६ मृत्यू : २४/०७/२००३

एक महिन्याची मिस्सा : रविवार दिनांक ११/१०/२०२६
सकाळी ७.३० वाजता, रमेदी माता तीर्थस्थान, रमेदी.

***''आम्हांसाठी सार्वकालिक निवासस्थान स्वर्गात आहे.''*** - (२करिंथ ५:१)

*हे प्रभू, तुझ्या स्वर्गीय नंदनवनात आमच्या मम्मी-पप्पांना सदैव आनंदी ठेव आणि त्यांना चिरंतन शांती दे, हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**कुटुंबीय**

# संत ब्रुनो

-ॲड. बॅरी डाबरे
भुईगाव

६ ऑक्टोबर हा दिवस कॅथलिक ख्रिस्ती बांधवांसाठी संत ब्रुनो ह्यांच्या स्मरणाचा व त्यांच्या पवित्र जीवनातून प्रेरणा घेण्याचा दिवस आहे. संत ब्रुनो हे प्रार्थना, शांतता, साधेपणा आणि देवाशी असलेल्या अतूट नात्यासाठी ओळखले जातात. त्यांनी आपले संपूर्ण जीवन ऐहिक सुख-सुविधांपेक्षा देवाच्या शोधासाठी अर्पण केले.

संत ब्रुनो ह्यांचा जन्म इ.स. १०३० मध्ये जर्मनीतील कोलोन येथे झाला. ते अत्यंत बुद्धिमान आणि अभ्यासू होते. त्यांनी धर्मशास्त्राचा सखोल अभ्यास केला आणि पुढे ते एक उत्तम शिक्षक व धर्मगुरू झाले. त्यांना मोठ्या पदाची, प्रतिष्ठेची आणि संपत्तीची संधी होती. परंतु त्यांच्या मनाला ह्या गोष्टींमध्ये खरा आनंद मिळत नव्हता. त्यांच्या अंतःकरणात एकच इच्छा होती - देवाला अधिक जवळून ओळखणे आणि त्याच्यासाठी पूर्णपणे जगणे. त्यामुळे त्यांनी शांत, साधे आणि प्रार्थनामय जीवन स्वीकारण्याचा निर्णय घेतला.

संत ब्रुनो ह्यांच्या जीवनातील सर्वांत महत्त्वाचे कार्य म्हणजे कार्थुशियन (Carthusian) धार्मिक संघाची स्थापना. त्यांनी काही सहकाऱ्यांसह फ्रान्समधील पर्वतीय परिसरात एकांत, प्रार्थना आणि तपश्चर्येवर आधारित जीवन सुरू केले.

संत ब्रुनो ह्यांचा विश्वास होता की, जगापासून दूर जाणे म्हणजे लोकांपासून प्रेम दूर करणे नव्हे. उलट, देवाच्या प्रेमात खोलवर जाणारा मनुष्य जगासाठी अधिक प्रार्थना करू शकतो आणि अधिक प्रेम देऊ शकतो. त्यांचे जीवन आपल्याला शिकवते की, सततच्या धावपळीतही मनात देवासाठी शांत जागा निर्माण करणे आवश्यक आहे.

संत ब्रुनो ह्यांचे जीवन आपल्याला सांगते, ''थोडा वेळ शांत बसा. प्रार्थना करा. स्वतःकडे पाहा आणि देवाला आपल्या जीवनात बोलू द्या.''



शांतता म्हणजे रिकामेपणा नाही. शांतता म्हणजे देवाच्या उपस्थितीचा अनुभव घेण्याची संधी. संत ब्रुनो ह्यांना चर्चमध्ये मोठी जबाबदारी स्वीकारण्याची संधी मिळाली. परंतु त्यांचे मन अधिक साध्या आणि प्रार्थनामय जीवनाकडे होते. त्यांनी वैभव आणि प्रतिष्ठेपेक्षा देवाच्या इच्छेला महत्त्व दिले. संत ब्रुनो आपल्याला एक वेगळा प्रश्न विचारतात, ''आपण जगाच्या नजरेत मोठे होण्याचा प्रयत्न करत आहोत की देवाच्या नजरेत चांगले होण्याचा?'' हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारण्याची गरज आहे.

**''शांततेत देवाचा आवाज ऐका!''**

संत ब्रुनो ह्यांचे जीवन केवळ धार्मिक व्यक्तींसाठी नाही. प्रत्येक कुटुंब त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊ शकते. कुटुंबात रोज काही क्षण एकत्र प्रार्थना केली, एकमेकांचे ऐकून घेतले, मोबाईल बाजूला ठेवून संवाद साधला आणि देवाचे आभार मानले, तर घरातील अनेक तणाव कमी होऊ शकतात.

संत ब्रुनो ह्यांचे जीवन तरुणांना सांगते की, आपली खरी किंमत इतरांच्या मतांमध्ये नाही; तर देवाच्या प्रेमात आहे. यश मिळवा, शिक्षण घ्या, करिअर करा, मोठी स्वप्ने पाहा; परंतु ह्या सर्व गोष्टींच्या केंद्रस्थानी देवाला विसरू नका. त्यांनी जगाला एक साधा पण अत्यंत महत्त्वाचा संदेश दिला, ''देवाला शोधण्यासाठी नेहमी दूर जाण्याची गरज नाही; शांत अंतःकरणाने त्याच्याकडे वळणे आवश्यक आहे.''

संत ब्रुनो ह्यांचे जीवन आपल्याला शिकवते की खरे समाधान बाहेरच्या जगात नव्हे; तर देवाशी असलेल्या नात्यात मिळते.

मोबाईल : 92 70 63 15 99

## शोकसमाचार व इतर जाहिरातीविषयी पाळावयाची पथ्ये

'सुवार्ता' मासिकात शोकसमाचाराची माहिती दिली जाते. लांब-दूरच्या लोकांना मृत व्यक्तीविषयी व मरणोत्तर होणाऱ्या विधीविषयी माहिती मिळते. मृत व्यक्ती त्या कुटुंबाला आणि नातेवाईकांना फार मोलाची असते. त्या व्यक्तिविषयी स्मृती उजळविण्यासाठी चांगल्या शब्दांत कुटुंबातील मंडळी त्यांच्याविषयी काव्यात्मक गुंफण करून किंवा अन्य प्रकारे भावना व्यक्त करून मजकूर पाठवत असतात. आपल्या भावनांचा आम्ही आदर करतो. तथापि सारासार विचार करता व संपादक मंडळाचा अनुभव लक्षात घेता, अशा कविता किंवा मृत व्यक्तींना वाहिलेली स्तुतिसुमने 'सुवार्ता' मासिक छापू शकत नाही. त्याऐवजी आपण बायबलमधील सुवचने अंतर्भूत करावी, ही विनंती!

**- संपादक**

# सहवासाचे सेवाकार्य

- **फादर पीटर डिकुन्हा**, आंबोली, अंधेरी
**अनुवाद : विलास परेरा**,वसई



अलीकडेच मी एका वृद्ध दांपत्याला भेट देण्यासाठी त्यांच्या घरी गेलो. पती ९० वर्षांचे व पत्नी ८२ वर्षांच्या होत्या. घरात प्रवेश करताच मला एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली. त्यांना माझी नव्हे, तर चर्चच्या आशीर्वादाची आणि प्रेमळ सहवासाची गरज होती. वर्षानुवर्षे त्यांनी आपल्या कुटुंबासाठी, चर्चसाठी आणि समाजासाठी केलेल्या सेवेमुळे त्यांना आपुलकी, कृतज्ञता आणि आधाराची अपेक्षा होती.

अशा भेटींमध्ये मला नेहमी जाणवते की, याजकाच्या सेवेत उपस्थिती (Presence) ही केवळ औपचारिक भेट नसून, ती देवाच्या प्रेमाची साक्ष असते.

धर्मगुरूंची सेवा केवळ मिस्सा, संस्कार, प्रवचन, प्रशासन किंवा धार्मिक कार्यक्रमांपुरती मर्यादित नसून, दुःखी, आजारी, वृद्ध, एकाकी आणि गरजू लोकांच्या जीवनात प्रत्यक्ष उपस्थित राहून त्यांना ख्रिस्ताचे प्रेम, आधार, करुणा आणि आशा देणे हे देखील महत्त्वाचे अंग आहे.

आज आपण याजकांकडे प्रशासक, व्यवस्थापक, आयोजक किंवा विविध समित्यांचे सदस्य म्हणून पाहतो. ह्या जबाबदाऱ्या महत्त्वाच्या असल्या, तरी त्या याजकाच्या मूळ ध्येयाची जागा घेऊ शकत नाहीत. याजकाचे खरे कार्य म्हणजे लोकांमध्ये राहणे, त्यांना जाणून घेणे व त्यांच्या जीवनप्रवासात त्यांच्यासोबत चालणे.

येशू ख्रिस्त सतत लोकांमध्ये वावरत होता. तो गावोगावी फिरला, लोकांच्या घरी गेला, त्यांच्या टेबलावर बसून भोजन केले, आजारी लोकांना भेटला, दुःखी लोकांना धीर दिला आणि विस्मरणात गेलेल्यांना आशा दिली. तो केवळ उपदेश करत नव्हता; तो लोकांमध्ये राहिला आणि त्यांच्यासोबत जगला. म्हणून प्रत्येक याजकानेही हा सहवासाचा वारसा पुढे नेला पाहिजे.

जेव्हा आपण एखाद्या घराच्या उंबरठ्यावर पाऊल ठेवतो, तेव्हा आपण केवळ औपचारिक भेट देत नसतो; आपण ख्रिस्ताची उपस्थिती त्या घरात घेऊन जात असतो. भाविकांना फक्त एवढे जाणवावे

**याजकाचे खरे कार्य म्हणजे लोकांमध्ये राहणे.**

की, चर्च त्यांच्यासोबत आहे, त्यांना विसरलेले नाही आणि त्यांच्या जीवनप्रवासात ख्रिस्त त्यांच्यासोबत चालत आहे. अशा भेटीनंतर ते अनेकदा म्हणतात, ''फादर, आज तुम्ही आलात, म्हणून ख्रिस्त आमच्या घरी आला.'' हे शब्द कोणत्याही प्रशासकीय यशापेक्षा अधिक मौल्यवान असतात.

याजकाचे प्राथमिक ध्येय म्हणजे लोकांना जाणून घेणे, आनंद करणाऱ्यांसोबत आनंद करणे, रडणाऱ्यांसोबत रडणे आणि त्यांच्या श्रद्धेच्या प्रवासात त्यांना साथ देणे.

माझ्या याजकीय जीवनात घरभेटी हे माझ्यासाठी मोठा आशीर्वाद ठरल्या आहेत. प्रत्येक कुटुंब मला श्रद्धा, चिकाटी, उदारता, त्याग आणि देवावरील विश्वास ह्यांचे नवे धडे शिकवते. अनेकदा मी अशा भेटीतून अधिक समृद्ध होऊन बाहेर पडतो.

माझ्या मनात नेहमी ही भावना असते की, मी जितके दिले आहे, त्यापेक्षा कितीतरी अधिक मला लोकांकडून मिळाले आहे.

पोप फ्रान्सिस याजकांना वारंवार स्मरण करून देतात, ''याजक हा असा मेंढपाळ असावा की ज्याच्यामध्ये मेंढ्यांचा सुगंध असतो.'' हे चित्र याजकीय सेवेचे हृदय सुंदरपणे व्यक्त करते. एखादा मेंढपाळ टेबलामागे बसून आपल्या कळपाला ओळखू शकत नाही. त्याने त्यांच्या सोबत चालले पाहिजे, त्यांच्या आनंद-दुःखात सहभागी झाले पाहिजे आणि त्यांच्या इतके जवळ राहिले पाहिजे की, त्याला त्यांची नावे, त्यांच्या जखमा आणि त्यांच्या आशा-आकांक्षा समजू शकतील.

लोकांना असा याजक हवा आहे ज्याच्याकडे त्यांच्यासाठी वेळ आहे, जो घाई न करता त्यांचे म्हणणे ऐकतो, जो त्यांच्यासोबत प्रार्थना करतो आणि जो

त्यांना सतत हे स्मरण करून देतो की, देव त्यांच्या जवळ आहे.

एकाकीपणा आणि तुटलेपणाने ग्रासलेल्या ह्या जगात सहवासाचे सेवाकार्य (Ministry of Presence) हे सुवार्तेच्या सर्वात प्रभावी अभिव्यक्तींपैकी एक ठरते.

चर्च केवळ रचना, इमारती किंवा योजनांमुळे वाढत नाही; ती नातेसंबंधांमुळे, प्रेमळ पाळकत्वामुळे आणि याजकांच्या जीवनातून प्रकट होणाऱ्या ख्रिस्ताच्या जिवंत उपस्थितीमुळे वाढते.

देवाच्या लोकांमध्ये राहणे हे याजकीय सेवेला केवळ मानवी रूप देत नाही, तर ते ख्रिस्ताच्या प्रेमाला प्रत्यक्ष स्पर्श करण्याजोगे बनवते. धर्मगुरू जेव्हा लोकांच्या घरात जातात, त्यांच्या दुःखात सहभागी होतात, त्यांच्या आनंदात आनंद मानतात आणि त्यांच्या सोबत प्रार्थना करतात, तेव्हा त्यांची उपस्थितीच एक प्रकारची सुवार्ता बनते.

याजकीय सेवेचे खरे मोजमाप आपण किती घरांना भेट दिली ह्यावर नसून, प्रत्येक भेटीत आपण किती प्रेम, करुणा, आशा आणि ख्रिस्ताची जिवंत उपस्थिती पोहोचवली ह्यावर अवलंबून असते.

मोबाईल : 98 20 20 34 62

●






# कान-नाक-घसा ( ENT ) उपचार समजून घेताना...

- डॉ. एल्टन क्लॉड मेंडोन्सा
(MBBS, MS ENT)

‘आरोग्य हीच संपत्ती’ ही जुनी आणि सर्वपरिचित म्हण आहे. आजच्या वेगवान आणि डिजिटल युगात आपले आरोग्य चांगले राखण्यासाठी आपण जाणीवपूर्वक प्रयत्न करणे आवश्यक आहे. ‘दररोज एक सफरचंद खाल्ल्यास डॉक्टरपासून दूर राहता येते’ ही आणखी एक इंग्रजी म्हण आहे. आपल्या शरीराकडून मिळणारे छोटे संकेत ओळखणे आणि त्याबाबत सतर्क राहणे यामुळे मोठ्या आजारांना काही वेळा सुरुवातीलाच प्रतिबंध करता येतो.

### ENT **म्हणजे नेमके काय?**

ह्या वैद्यकीय शाखेचे अधिकृत नाव Ear, Nose, Throat & Head-Neck Surgery म्हणजेच कान, नाक, घसा तसेच डोके-मान शल्यचिकित्सा असे आहे. जरी ह्याला संक्षेपाने E, N आणि T ह्या तीन अक्षरांनी संबोधले जात असले, तरी आपल्या शरीराच्या ह्या संपूर्ण भागाच्या आरोग्याशी संबंधित आजारांवर ह्या शाखेत उपचार केले जातात.

### इंद्रियांचे महत्त्व

ENT शाखेचा मुख्य संबंध आपल्या इंद्रियांशी आहे. ही इंद्रिये आपल्या आजूबाजूच्या वातावरणा विषयी महत्त्वाची माहिती आपल्याला देतात. त्याचबरोबर भावनिक दृष्ट्याही आपल्या इंद्रियांमुळे दैनंदिन जीवनाला अर्थ आणि आनंद प्राप्त होतो; काही अनुभव तर आपल्या मनात खोलवर रुजलेल्या समृद्ध आठवणी बनतात. आपले आवडते गाणे ऐकणे, आपल्या प्रिय व्यक्तींशी मनमोकळ्या गप्पा मारणे किंवा नुकत्याच जन्मलेल्या बाळाचा पहिला रडण्याचा आवाज ऐकणे - हे सारे कानातील अत्यंत



गुंतागुंतीच्या श्रवण यंत्रणेच्या कार्यामुळे शक्य होते. शरीराचा समतोल राखण्यातही कान महत्त्वाची भूमिका बजावतात आणि ही अशी जाणीव आहे जी आपण सतत वापरत असतो.

वास घेण्याची क्षमता आपल्या दैनंदिन अनुभवांना अधिक समृद्ध करते - घरातील स्वादिष्ट अन्नाचा तोंडाला पाणी आणणारा सुगंध असो किंवा मंदिर-चर्चमधील धूपाचा मनाला समाधान देणारा सुगंध असो. वास आणि चव ह्या दोन्ही इंद्रियांच्या मदतीने आपण आपल्या आवडत्या पदार्थांचा आनंद घेतो वेळी खराब झालेले अन्न किंवा गॅस गळतीसारख्या लपलेल्या धोक्यांपासूनही स्वतःचे संरक्षण करतो.

### आजार व समस्या

ENT मध्ये केवळ इंद्रियांशी संबंधित आजारांवरच उपचार केले जात नाहीत. पुढील विविध समस्या आणि आजारांवरही उपचार केले जातात :

**‘तुझ्या शब्दाप्रमाणे होवो’ ह्या तिच्या शब्दांत आज्ञाधारकपणा होता.**

* कान, नाक, सायनस, घसा व टॉन्सिल्सचे संसर्ग - उदा. कानाच्या पडद्याला छिद्र पडणे.

* कान, नाक, घसा, अन्ननलिका किंवा श्वासनलिकेत अडकलेली बाह्य वस्तू.

* कान बंद होणे, कानात मळ साचणे किंवा कानात सतत आवाज येणे.

* नाकाची रचनात्मक विकृती आणि नाक बंद होण्याच्या समस्या.

* नाक, घसा किंवा अन्ननलिकेशी संबंधित ॲलर्जी.

* गिळताना होणारा त्रास तसेच आम्लपित्ताशी संबंधित घसा व अन्ननलिकेच्या समस्या.

* स्वरयंत्र किंवा श्वासनलिकेचे आजार, ज्यामुळे बोलताना किंवा श्वास घेताना अडचण येऊ शकते.

* घोरणे आणि झोपेशी संबंधित विकार.

* चेहऱ्याच्या विविध हाडांना झालेली फ्रॅक्चर.

* मानेतील थायरॉईड ग्रंथीचे आजार.

* लाळ निर्माण करणाऱ्या ग्रंथींचे आजार.

* डोके व मानेचा कर्करोग तसेच अशा रुग्णांना आवश्यक भासणारी कायमस्वरूपी श्वासनालिका (Tracheostomy) बसविण्याची प्रक्रिया.

* नाकाच्या मार्गाने शस्त्रक्रिया करून उपचार करता येणारे डोळ्यांचे काही आजार.

### मुलांमधील ENT समस्या

मुलांमधील ENT समस्या स्वतंत्रपणे समजून घेणे आवश्यक आहे, कारण शरीराच्या या भागाचा मुलांच्या सामान्य वाढी-विकासात महत्त्वाचा सहभाग असतो. वारंवार होणारे कानाचे, टॉन्सिल्सचे आणि ॲडिनॉइड्सचे संसर्ग यामुळे शाळेतील

उपस्थिती कमी होणे तसेच मुलांच्या योग्य वाढी-विकासावर परिणाम होणे ह्याची नोंद आढळते. घोरणे आणि तोंडाने श्वास घेणे ही या समस्यांची शांत, पण महत्त्वाची लक्षणे असू शकतात. त्यामुळे पालकांनी त्याकडे विशेष लक्ष द्यावे.

बालपणी होणारी श्रवणक्षमता कमी होणे, विशेषत: नवजात बाळामध्ये श्रवणदोष असणे आणि त्यासोबत बोलण्याच्या विकासात अडथळा येणे, ही मुलाचे संपूर्ण आयुष्य बदलून टाकणारी परिस्थिती ठरू शकते.

कानाच्या शल्यचिकित्सक म्हणून अशा मुलांना शक्य तितक्या लवकर ओळखून त्यांना योग्य उपचार देणे हे आमचे उद्दिष्ट असते. उपचारांमध्ये साधी औषधे, श्रवणयंत्रे किंवा Cochlear Implant अथवा BAHA सारखी शस्त्रक्रियात्मक साधने यांचा समावेश असू शकतो.

लवकर श्रवणक्षमता सुधारल्याने आणि बोलण्याचा विकास योग्य प्रकारे झाल्याने मुलाचे शालेय शिक्षण अधिक चांगले होऊ शकते आणि अन्यथा ‘दिव्यांग’ असा शिक्का बसू शकलेल्या मुलाला इतर मुलांप्रमाणे समान संधी मिळू शकतात.

**उपचारांमधील प्रगती**

आपण एंडोस्कोपच्या मदतीने शरीरातील आजारांचे प्रत्यक्ष निरीक्षण करू शकतो आणि नवजात बाळांमधील श्रवणदोषदेखील ओळखू शकतो. आधुनिक औषधांमुळे पूर्वी केवळ शस्त्रक्रियेने उपचार करावे लागत असलेल्या काही आजारांवर आता औषधोपचाराने उपचार करता येतात.

ज्या आजारांसाठी शस्त्रक्रिया आवश्यक असते, त्यासाठी आता मायक्रोस्कोप आणि एंडोस्कोपच्या साहाय्याने कमीतकमी आक्रमक तसेच व्रण विरहित किंवा लपलेला व्रण राहील अशा शस्त्रक्रिया करता येतात. हे सर्व उपचार आपल्या वसई-विरार परिसरातही उपलब्ध आहेत. त्यामुळे प्रत्येक तपासणी किंवा उपचारासाठी मुंबईला जाण्याचा ताण कमी होतो

**संदेश**

आपल्या घराजवळच वेळेवर आणि लवकर उपचार घेणे कधी कधी उपचारांच्या परिणामात मोठा फरक घडवून आणू शकते. आपल्या शरीराकडे सतर्कतेने लक्ष देऊया -कानात आवाज जाणवला तर त्याकडे लक्ष द्या, नाकातून श्वास घेण्यास त्रास होत असेल तर शांतपणे आणि योग्य पद्धतीने श्वास घेण्याचा प्रयत्न करा, आणि घसा मदतीची हाक देत असेल; तर योग्य वैद्यकीय सल्ला घ्या.

**अनुवाद : लॉना फुर्ट्याडो-वाझ, पापडी**




## वाढत्या वीज बिलाची चिंता? लोडशेडिंगचा त्रास?
## स्मार्ट मीटरची काळजी?
## मग उपाय एकच — स्वतःची वीज स्वतः तयार करा!

**६ KW सोलर सिस्टीम फक्त ₹४,९७,००० + GST.**
लोड क्षमता: इन्व्हर्टर एसी (१.५ टन), फ्रिज (३०० लिटर), वॉशिंग मशीन (७ किलो), १ एचपी मोटर, ५ पंखे, २० वॅटचे दिवे

| | |
|---|---|
| * बॅटरीवर १० वर्षांची वॉरंटी | * फक्त ५% व्याजदराने EMI सुविधा |
| * दररोज मिनिमम २०-३० युनिट वीज तयार होईल (पावसाळा व्यतिरिक्त) | * हे आमचे स्वतःचे उत्पादन आहे |




## सर्व प्रकारची सोलार उत्पादने व सेवा

* सोलार वॉटर हीटर — २४ तास गरम पाणी
* सोलार इन्व्हर्टर — ५ वर्षाची वॉरंटी
* आशा पॉवर चार्ज कंट्रोलर
* लिथियम बॅटरी — ५ आणि १० वर्षाची वॉरंटी
* सर्व प्रकारच्या सोलार सिस्टमला सर्व्हिस
* सर्व प्रकारचे स्टॅबिलायझर उपलब्ध
* मोठ्या क्षमतेची UPS सिस्टम भाड्याने
* बिनातेल स्वयंपाकासाठी सोलर ओव्हन
* सोलार स्ट्रीट लाईट
* BLDC फॅन
* HJT क्वालिटी पॅनल्स — ३५ वर्षाचे आयुर्मान
* लिफ्ट इन्व्हर्टर
* लेड-असिड बॅटरी
* सोलार एसी — ८०% कमी वीज वापर
* सोलार पॅनेल ऑटो वॉशिंग सुविधा
* ऑनलाईन ते ऑफलाईन UPS — १ KW ते १०० KW पर्यंत
* जुन्या बॅटरीचे रिजनरेशन करून बॅकअप वाढवा
* सोलार वॉटर पंप
* पवनचक्की
* इलेक्ट्रीक शेगडी

## स्वतःची वीज स्वतः तयार करा — सोलरकडे वळा!

**Electro Solar & Security System.** Shiv Kuteer Co-Op Hsg, Shop No 5, Papdy Bangli Rd, Brahman Ali, Vasai (W), Dist: Palghar, Maharashtra, Pin: 401207
**9185048008 / 9890298008 / 9022098008.** electronunes@yahoo.in

# अंतरीचा दीपोत्सव : विवेकाची दिवाळी

-प्राचार्य डॉ. सोमनाथ विभूते
संत गोन्सालो गार्सिया महाविद्यालय, वसई

दरवर्षी कार्तिक महिन्याच्या कृष्ण पक्षातील अमावास्येला दिवाळी संपूर्ण भारतभर अत्यंत उत्साहात आणि धुमधडाक्यात साजरी केली जाते. अंगणात काढलेल्या सुंदर रांगोळ्या, आकाशात झळकणारे बहुरंगी आकाशकंदील, तेवणाऱ्या दिव्यांच्या लखलखत्या रांगा, आप्तेष्टांच्या सुखद भेटीगाठी आणि जोडीला चविष्ट व रुचकर फराळाची मेजवानी... ह्यामुळे दिवाळी हा वर्षातील सर्वात मोठा व लाडका सण ठरतो. खरे तर हा दीपोत्सव वर्षभरातील चिंता, धावपळ आणि संकटे दूर सारून नवा उत्साह देणारा आनंदोत्सवच असतो.

तमसो मा ज्योतिर्गमय

वसुबारस ते भाऊबीज ह्या दिवसांत रात्रीच्या वेळी दीपोत्सवातून आपण अंधारावर प्रकाशाचा विजय साजरा करतो. हे करत असताना मनातून एकच प्रार्थना उमटत असते - 'तमसो मा ज्योतिर्गमय' (अंधाराकडून मला प्रकाशाकडे ने). सर्वसामान्यांसाठी ही दिवाळी जरी पाच-सहा दिवसांची असली, तरी ती केवळ बाजारातील वस्तूंची भरमसाठ खरेदी आणि उपभोग घेण्यापुरतीच मर्यादित राहू नये. ह्यासाठीच संतांनी ह्या प्रकाशोत्सवाचा खरा आणि उदात्त अर्थ स्पष्ट केला आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींनी ज्ञानेश्वरीच्या चौथ्या अध्यायात फार सुंदर ओवी लिहिली आहे :

'मी अविवेकाची काजळी
फेडूनी विवेकदीप उजळी
तै योगिया पाहे दिवाळी
निरंतर'

संत ज्ञानेश्वरांना आपण माऊली मानतो. माऊलीचे आपल्या लेकरांवर असीम प्रेम असते. म्हणूनच ती आपल्या



लेकरांच्या मनातील 'अविवेकाची काजळी' दूर करून 'विवेकदीप' प्रज्वलित करण्याची प्रेरणा देते. असे झाले तर माणसाचे जीवन समाधानी, तृप्त आणि आनंदी होईल. मग ही दिवाळी केवळ चार दिवसांची न राहता, अखंड तेवणारी अंतर्मनातील दिवाळी ठरेल.

संतांची शिकवण

गुरुगीतेतील प्रसिद्ध श्लोक सांगतो:

'अज्ञानतिमिरान्धस्य
ज्ञानाञ्जनशलाकया।
चक्षुरुन्मीलितं येन
तस्मै श्रीगुरवे नमः॥'

**विवेकाची दिवाळी साजरी करायला शिकवणारे संत हेच आपले खरे मार्गदर्शक आहेत.**

अज्ञानाच्या अंधाराने आंधळ्या झालेल्या व्यक्तीला ज्ञानरूपी अंजन घालून डोळे उघडणाऱ्या गुरूंची महती यात सांगितली आहे. विवेकाची दिवाळी साजरी करायला शिकवणारे संत हेच आपले खरे मार्गदर्शक आहेत.

जगद्गुरू संत तुकाराम महाराजांनीही म्हटले आहे :

'साधुसंत येती घरा।
तोचि दिवाळी दसरा॥'

सत्पुरुष आणि सज्जनांचा सहवास लाभणे हाच आयुष्यातील खरा महासण असतो. दिवाळीत आपण आप्तेष्टांना भेटतो, फराळ वाटतो. आजच्या काळात संपर्काची साधने विपुल झाली आहेत, परंतु माणसा-माणसांमधील आत्मीय संवाद कमी होत चालला आहे. अशा वेळी माणसाने माणसाच्या मनाजवळ जाणे अधिक गरजेचे आहे.

संत नामदेव महाराज म्हणतात :

'नाचू कीर्तनाचे रंगी।
ज्ञानदीप लावू जगी॥'

कीर्तनाच्या माध्यमातून जगभर ज्ञानाचा दीप लावून निराशेची जागा आशा घेईल, द्वेषाची जागा प्रेम घेईल आणि एकाकीपणाची जागा सहजीवन घेईल; हीच संतांच्या दृष्टीने खरी दिवाळी आहे. घराचा अंधार घालवण्यासाठी तेला-वातीतला दिवा लागतो; तर मनातील अंधार दूर करण्यासाठी 'ज्ञानदीप' हवा असतो.

आजच्या संदर्भात विवेकाची दिवाळी

आज विज्ञानाने भौगोलिक अंतर कमी केले असले तरी माणसांमधील नातेसंबंध दुरावत चालले आहेत. समाजमाध्यमांचा सुळसुळाट, उपभोगाची लालसा, राग, द्वेष, मत्सर आणि अहंकार ह्या विकारांची काजळी दाटून आली आहे. त्यामुळे मनातील सदसद्विवेकबुद्धीचे दिवे झाकोळले गेले आहेत. ह्या पार्श्वभूमीवर केवळ फटाक्यांच्या आतषबाजीत न अडकता ज्ञानाच्या प्रसाराने मनातील अज्ञान दूर करूया. प्रेमाने द्वेष मिटवून निराशेच्या जागी आशेचे किरण पेरूया. पर्यावरण, निसर्ग, वृद्ध, दिव्यांग व गरजू बांधवांना मायेचा हात देऊन माणुसकी उजळवू या. चला, अंधार दूर सारत अंतःकरणात माणुसकीचा दीप प्रज्वलित करूया आणि खऱ्या अर्थाने 'विवेकाची दिवाळी' साजरी करूया!

मोबाईल : 77 67 81 11 94

# आफ्रिकेतील माझा मिशन अनुभव

- सिस्टर ज्योती परेरा MSI
गास / अल्जेरिया, आफ्रिका



मी 'द मिशनरी सिस्टर्स ऑफ द इमॅक्युलेट' ह्या व्रतस्थ संघाची सदस्या आहे. मागील १५ वर्षांपासून मी अल्जेरियामध्ये 'मिशनरी' म्हणून कार्यरत आहे. हा उत्तर आफ्रिकेतील एक देश असून, येथे प्रामुख्याने मुस्लिमबहुल लोक आणि काही ख्रिस्ती लोक राहतात. ह्या ख्रिश्चनांपैकी बहुतेक जण पेट्रोल कंपन्यांमध्ये काम करणारे परदेशी, सहाराच्या दक्षिणेकडील देशांतील विद्यार्थी, तसेच जगभरातील धर्मगुरू आणि धार्मिक व्यक्ती आहेत. हा देश जवळपास १५० वर्षे फ्रेंच वसाहतवाद्यांच्या अधिपत्या खाली होता. येथे फार कमी लोक फ्रेंच आणि अधिक लोक अरबी भाषा बोलतात. हा देश जगप्रसिद्ध संत अगस्टीन आणि त्यांची आई संत मोनिका ह्यांचाही आहे.

सुरुवात सोपी नव्हती. मला अरबी भाषा येत नव्हती; उत्तरेकडील भागाच्या तुलनेत दक्षिणेकडे फ्रेंच बोलणारे लोक खूपच कमी होते. भाषा, संस्कृती, तिथले लोक आणि खाद्यपदार्थ – ह्या सर्वच गोष्टींशी जुळवून घेणे हे एक मोठे आव्हान होते आणि त्या सर्व गोष्टींची भीतीही वाटत होती. तिथे पोहोचल्यावर आम्ही विविध कुटुंबांना भेटायला सुरुवात केली. तेव्हा आमच्या लक्षात आले की अनेक कुटुंबांमध्ये विविध प्रकारच्या दिव्यांगत्वाशी (उदा. बौद्धिक व शारीरिक अक्षमता, तसेच ऑटिझम आणि डाऊन सिंड्रोम) मुले झुंजत होती. (तेथील तत्कालीन केंद्रांमध्ये गंभीर स्वरूपाची दिव्यांग मुले सांभाळली जात नसत.) त्यामुळे आम्ही स्वत: अशा कुटुंबांपर्यंत जाऊन त्यांना सेवा पुरवू लागलो. कालांतराने परिस्थिती बदलत आणि सुधारत गेली. सुरुवातीला आम्ही मुलांची देखभाल त्यांच्या घरीच जाऊन करत असू. नंतर, आम्ही आमच्या आवारातच आवश्यक त्या साधन-सामुग्रीसह काही खोल्या तयार केल्या. सुरुवातीला लोकांना ह्याचे आश्चर्य वाटायचे की आम्ही मुस्लिम नसतानाही त्यांच्या मुलांसाठी काम करत होतो; पण हळूहळू त्यांना ते समजले.

> **मिशन म्हणजे जीवनाचा संवाद...**
> **आंतरधर्मीय संवाद...**
> **शांती सलोख्यासाठी संवाद...**

येथील लोकांबद्दल मला आवडणाऱ्या अनेक गोष्टींपैकी काही : त्यांची अतिथींचा सन्मान करण्याची वृत्ती, औदार्य आणि बंधुभाव. येथील लोक अत्यंत उदार, दयाळू आणि स्वागतशील आहेत. येथील बहुतांश लोक एकाच धर्माचे असल्याने, त्यांना इतर धर्मांच्या लोकांना समजून घेणे कधीकधी कठीण जाते. भारतात अनेक धर्म आहेत आणि आम्ही सर्वजण गुण्यागोविंदाने एकत्र राहतो, हे आमच्याकडून ऐकून त्यांना आश्चर्य वाटते. त्यामुळे, ह्या लोकांमध्ये चर्च म्हणून आमचे अस्तित्व असणे हे एक आव्हान आहे; त्याच वेळी, त्यांना हे सांगण्यासारखे आहे की जरी आपण वेगळे असलो तरी आपण एकत्र राहू शकतो आणि वेगवेगळ्या धर्मांचे लोक एकमेकांच्या श्रद्धेचा आदर करून शांततेने एकत्र राहू शकतात.

मला पोप फ्रान्सिस आणि अल-अझहर विद्यापीठाचे ग्रँड इमाम अहमद अल-तैय्यब ह्यांनी अबू धाबी येथे स्वाक्षरी केलेल्या दस्तऐवजातील एका वाक्याची आठवण येते, ''देवाने सर्व मानवांना हक्क, कर्तव्ये आणि प्रतिष्ठेच्या बाबतीत समान निर्माण केले आहे आणि त्यांना 'बंधू' म्हणून एकत्र राहण्याचे आवाहन केले आहे.'' आम्ही लोकांच्या जीवनातील विविध प्रसंगांमध्ये सहभागी होतो. उदारणार्थ, विवाह, जन्म व मृत्यू इत्यादी प्रसंगांमुळे एक घट्ट नाते निर्माण होते.

येथील लोक आपल्या श्रद्धेत मुळावलेले आहेत; प्रार्थना आणि गरीब व गरजू लोकांना दानधर्म करण्यातील त्यांच्या निष्ठेतून हे स्पष्टपणे दिसून येते. आमचे

प्रार्थनापूर्ण जीवन सर्वश्रुत आहे आणि कठीण प्रसंगांतून जाणाऱ्या अनेक कुटुंबांकडून आमच्याकडे प्रार्थनेची विनंती केली जाते. एक चर्च म्हणून आम्ही समाजसेवा, महिला सक्षमीकरण, दिव्यांग मुलांसाठी कार्य, ग्रंथालये व कारागृह सेवा (prison ministry) ह्यांसारख्या उपक्रमांमध्ये सक्रियपणे सहभागी आहोत.

हे एक आव्हानात्मक कार्यक्षेत्र आहे; इथे कौमार्य व ब्रह्मचर्याची संकल्पना फारशी समजली जात नाही आणि ख्रिस्ती म्हणून आम्ही अल्पसंख्यांक आहोत. आमची लोकसंख्या लहान आहे आणि आमच्याकडे संस्थात्मक पाठबळही नाही. अशा परिस्थितीतही आमचे छोटे ख्रिस्ती समुदाय अस्तित्वात आहेत; ते लहान असले तरी चैतन्यशील आहेत आणि अल्जेरियन समाजात पूर्णपणे मिसळून गेले आहेत आणि ते भयमुक्त आहेत! आमची समृद्धी आणि ताकद कदाचित ह्याच नाजुकपणात आणि आमच्या सदस्यांच्या आंतरराष्ट्रीय स्वरूपामध्ये दडलेली आहे. आम्ही एका अरब-मुस्लिम समाजात राहतो. आमच्यापैकी प्रत्येक जण अगदी वेगळ्या पार्श्वभूमीतून आले आहेत आणि आम्ही सर्वजण मिळून -आमच्या ह्या वैविध्यपूर्ण समृद्धीसह विविध फुलांची बाग बनवू शकतो.

पहिल्या दिवसापासून मला राहून-राहून वाटते की मिशन म्हणजे जीवनाचा संवाद, आंतर-धर्मीय संवाद, पिढ्या-पिढ्यांतील संवाद, देशा-देशातील संवाद, शांती-सलोख्यासाठी संवाद.

मला आमच्या संस्थापिका एम. डोनेस ह्यांचे शब्द आठवतात, ''जी व्यक्ती आपल्या जीवनातून, शब्दांतून आणि सेवाभावातून सदैव आणि सर्वत्र ख्रिस्ताचा संदेश पोहोचवत असते अशा मिशनरी भगिनींची जिवंत तळमळ कोणतीही जागा किंवा परिस्थिती कमी करू शकत नाही.''

काळाच्या ओघात समर्पित जीवनाविषयीची समज आणि त्याचे आविष्कार बदलले असले, तरी त्याचे मूळ सार मात्र तेच राहिले आहे. आज आपण जिथे कुठे असू आणि जे काही कार्य करत असू, तिथे बंधुभावावर आधारित समुदाय उभारण्यास हातभार लावणे हेच आपले ईश्वरी पाचारण (व्होकेशन) आहे. •


## वर पाहिजे

**वधू :** जन्म : दिनांक ३ मार्च १९९४, उंची : ५'-५'', शिक्षण : M.Sc. Chemistry, B.Sc. Computer Science, B.Ed., D.Ed., इंग्लिश मिडियम, नोकरी : शिक्षिका.

**अपेक्षित वर :** रोमन कॅथलिक, अनुरूप.

**Contact : 82 61 02 58 65**

## वधू पाहिजे

**वर :** वय ३१ वर्षे, I. T., इंजिनिअर, R. C., डेनमार्क (युरोप) मध्ये नोकरी, उंची : ६ फूट.

**अपेक्षित वधू :** वरास अनुरूप, शक्यतो युरोपमध्ये नोकरी करणारी.

**Suvarta Box No. : OCT 01**
Giriz, Vasai 401 201.

## Wanted Bride

Age 27. B.com Graude, IATA, DGR, Custom Logistics Degree. Own independent Busines, located in Mumbai in Logistics/Freight Forwarding Industry. Branches in all over world. Well settled with its own independent Bungalow and Farm House. Roman catholic, East Indian.
We are looking for a suitable girl from a well cultured catholic family.

**Contact : 9819424705**

## Wanted Bride

**Groom :** 25 yrs, Roman Catholic, good - looking, from a decent family. **Edu. :** MBA, well-qualified professional, working with a reputed company.

**Expected Bride :** Suitable, good behaviour, caring, Roman Catholic

**Mob : 9021894129**
**E Mail ID:**
**gentlesoul.connects@gmail.com**

## वधू पाहिजे

**वर :** रोमन कॅथलिक, वाडवळ, वसईत वास्तव्य, मुंबईत कायम स्वरूपी नोकरी. शिक्षण : B.Sc. IT, वय ३४ वर्षे.

**अपेक्षित वधू :** रोमन कॅथलिक, वाडवळ, वसईत वास्तव्य, वय ३० वर्षेपर्यंत.

**शिक्षण :** ग्रॅज्युएट, शिक्षिकेस पसंती, इतर ठिकाणीसुद्धा चालेल.

**Suvarta Box No. : Oct. 02**
Giriz, Vasai 401 201.

## Wanted Groom

**RC.** Maharashrian Spinster **Born :** March 1996, Fair, 5-5", BMS, B.Com Working In Mumbai. Religious with good family, Christian values, seeks alliance from mature responsible Bachelor age upto 34 years from good family background.

**Contact : 9820126355**

# देवाची हाक

-फा. सुहास फरेरा (OFM Cap)
उमराळे/पापडी



आपल्या जीवनात आपण अनेक आवाज ऐकत असतो. घरच्यांचे आवाज, मित्रांचे आवाज, सोशल मिडियाचा गोंगाट... ह्या सगळ्या आवाजामध्ये एक आवाज मात्र अतिशय शाांत असतो, तो म्हणजे देवाचा आवाज! देव मोठ्याने ओरडून आपल्याशी बोलत नाही. तो अनेकदा आपल्या अंतःकरणाच्या शांततेतून बोलतो. कधी एखाद्या व्यक्तीच्या शब्दांतून, प्रसंगातून, अनुभवातून आणि छोट्याशा प्रश्नातून तो आपल्याला हाक मारतो. पण प्रश्न असा आहे, देव बोलत नाही म्हणून आपण त्याचे ऐकत नाही का? की आपण इतके व्यग्र आहोत की त्याचा आवाज ऐकण्यासाठी थांबतच नाही?

देव प्रत्येक व्यक्तीला त्याच्या जीवनाच्या परिस्थितीनुसार हाक मारतो. कुणाला तो प्रेम करण्यासाठी बोलावतो, कुणाला क्षमा करण्यासाठी, कुणाला दुःखी व्यक्तीच्या सोबत उभे राहण्यासाठी, कुणाला अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्यासाठी, तर कुणाला स्वतःचे जीवन बदलण्यासाठी. येशू म्हणतो, ''तुम्ही मला निवडले नाही, तर मी तुम्हाला निवडले आहे'' (योहान १५:१६). देवाची हाक ही प्रथम त्याच्या निवडीची आणि प्रेमाची अभिव्यक्ती आहे. शमुवेलच्या जीवनातही अशीच एक हाक आली. रात्री त्याला आवाज ऐकू आला 'शमुवेल!' त्याला वाटल की एली त्याला बोलावत आहे. परंतु एलीला समजले की प्रभू शमुवेलला बोलावत आहे. त्याने शमुवेलला सांगितले, 'जा, निज'; आणि पुन्हा तुला हाक आली तर म्हण, ''बोल, प्रभू, तुझा सेवक ऐकत आहे.'' शमुवेलने तसेच केले आणि प्रभूने त्याच्याशी संवाद साधला (१ शमुवेल ३:१-१०). आपण प्राथानेत म्हणतो, ''प्रभू, माझे ऐक.'' पण कदाचित देव आपल्याला विचारत असेल, ''एकदा तू माझे ऐकशील का?'' देवाची हाक ऐकण्यासाठी शांतता आवश्यक आहे. आज आपण सतत काही ना काही ऐकत असतो, पाहत असतो, बोलत असतो आणि धावत असतो. हातात मोबाईल आहे, पण मनात शांतता नाही. माहिती भरपूर आहे, पण अंतर्मुख होण्यासाठी वेळ कमी आहे. सदेष्टा एलियाला प्रभू वादळात, भूकंपात किंवा अग्नीत नव्हे, तर 'शांत, मंद स्वरात' अनुभवायला मिळाला (१राजे १९:११-१२).

देवाची हाक ऐकून थांबणे पुरेसे नाही; त्या हाकेला उत्तर देणे आवश्यक आहे. संत फ्रान्सिस असिसीच्या जीवनातही अशीच एक निर्णायक हाक आली. तरुणपणी ते ऐश्वर्य आनंद आणि प्रतिष्ठेचे जीवन जगत होते. परंतु त्यांच्या अंतःकरणात देवाने हळूहळू एक वेगळा आवाज जागवला. सान दामियानोच्या क्रुसासमोर प्रार्थना करताना त्यांना प्रभूचे आवाहन जाणवले, ''फ्रान्सिस, जा आणि तुझ्या चर्चची दुरूस्ती कर.'' सुरुवातीला त्यांना ह्या हाकेचा अर्थ समजला नसेल; परंतु त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले नाही. त्यांनी आपल्या जीवनाचा मार्ग बदलला, संपत्ती आणि सुखसोयींचा त्याग केला आणि गरीब, गरजू व उपेक्षित लोकांच्या सेवेत स्वतःला अर्पण केले. त्यांच्या जीवनातून दिसून येते की देवाची हाक ऐकणे म्हणजे केवळ आवाज ऐकणे नव्हे; तर त्या आवाजाला आपल्या जीवनाने उत्तर देणे होय. अनेकदा आपणही देवाची हाक ऐकतो, पण उत्तर देण्यास घाबरतो. ''लोक काय म्हणतील?', 'माझ्याकडून हे होईल का?', 'मला काहीतरी गमवावे लागेल का?' असे अनेक प्रश्न मनात निर्माण होतात. मोशेलाही देवाच्या हाकेने भीती वाटली. त्याने विचारले, ''मी कोण आहे की फारोकडे जाऊन इस्त्राएल लोकांना मिसरातून बाहेर आणावे?'' (निर्गम ३:११). देवाने त्याला त्याच्या स्वतःच्या सामर्थ्यावर नव्हे, तर आपल्या उपस्थितीवर विश्वास ठेवायला शिकवले ''मी तुझ्याबरोबर असेन'' (निर्गम ३:१२). अब्राहामलाही देवाने फक्त एवढे सांगितले, ''तुझ्या देशातून निघून मी तुला दाखवीन त्या देशात जा' (उत्पत्ती १२:१). त्याने विश्वासाने पुढचे पाऊल टाकले.

विश्वास म्हणजे देवाने संपूर्ण मार्ग आधी दाखववा आणि मग आपण चालावे

असे नाही; पुढचे पाऊल कुठे पडेल हे पूर्णपणे माहीत नसतानाही देवावर विश्वास ठेवून पुढे जाणे होय. देवाची हाक स्वीकारणे म्हणजे इतरांवर अधिकार गाजवणे नव्हे, तर सेवेसाठी स्वतःला अर्पण करणे. देवाने आपल्याला दिलेल स्थान, अधिकार आणि जबाबदारी ही स्वतःला मोठे दाखवण्यासाठी नसून इतरांच्या सेवेसाठी आहेत. मी ह्याचा उपयोग स्वतःसाठी करणार की इतरांच्या सेवेसाठी? कदाचित देव आजही आपल्याला हाक मारीत आहे. त्याला फक्त आपल्या हृदयातून निघालेला एक शब्द हवा आहे, ''हो, प्रभू!''

•

## जाहिरातदारांसाठी खुलासा

**'सुवार्ता' मध्ये जाहिराती व शोकसमाचार प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंतच स्वीकारल्या जातात** हे आपणास माहीतच आहे. मात्र एकूण पृष्ठसंख्या व जाहिरातींची पृष्ठसंख्या मर्यादित ठेवावी लागत असल्यामुळे रंगीत व कृष्णधवल जाहिरातींची पाने वरील तारखेच्या आत भरली गेल्यास नाईलाजास्तव आम्ही आपली जाहिरात स्वीकारू शकणार नाहीत. म्हणून कृपया शेवटच्या घटकेपर्यंत थांबणाऱ्यांना जाहिरातीसाठी जागा उपलब्ध होऊ शकेलच ह्याची शाश्वती आम्ही देऊ शकत नाही.

**- व्यवस्थापक**


**CHEM-TECH केम-टेक**
**पेस्ट कंट्रोल सर्विसेस**



*** सरकारमान्य ***

**(ISO 9001 : 2015) (LIC NO : LAID-35020075)**

* आम्ही सोसायटी, बंगलोज, फ्लॅट्स, हॉटेल्स, कारखाने, दवाखाने, शाळा, महाविद्यालये इत्यादींचे पेस्ट कंट्रोल सर्विसेसचे कॉन्ट्रॅक्ट घेतो.
* नवीन व जुन्या कोणत्याही बांधकामाच्या वेळी वाळवी तसेच झुरळ, मुंग्या, उंदीर, ढेकूण ह्यांच्या त्रासापासून मुक्त होण्यासाठी संपर्क साधावा.

(डहाणू ते चर्चगेट वाजवी दरात सेवा उपलब्ध)

**प्रो. : रोनाल्ड क्रॉस्टा**

**आमच्या शाखा :** विरार । नालासोपारा । वसई । नायगाव । सफाळे । पालघर ।




**- : संपर्क :-**

**M. : 7558355880 / 8855869080**



35 YEARS OF SERVICE



**Bassein Furnishings**

**SOFAS, CURTAINS & MATTRESSES**

**Edward : 9673511222 Priyal : 9890135888 Eldred : 9545378252**

**Authorised Dealers of**
**Refresh & Sleepwell Products, Dr. Back Orthopaedic Mattresses and Netlon Mosquitto Net**

**Decorating Your Homes Since 1991**

☞ We Make All kinds of Cotton, Fibre, Foam Coir Mattresses & Repair your Old Ones !!
☞ We Refurbish Your Old Sofas into Brand New Sofas of Your Choice



**OUR OTHER SPECIALITIES**



☞ Curtains, Roman Blinds, Vertical Blinds ☞ Window Net, Mosquito Net For Bed

Sleepwell Gallery
Shop No. 2 & 3, Pushkar CHS., Opp. D'mart & Vijay Sales, Bhabola Road, Vasai (W) Dist. Palghar-401202. Off.: 9370588226



refresh™ MATTRESS STUDIO
Shop No. 2, Audumber CHS, Near Janaki Cinema, Opp. Saraswat Bank, Parnaka, Vasai (W) 401201. Tel. Off. : 7709626361

निरसन

# पवित्र अवशेष किंवा Holy Relic

**-फा. ग्लेन फर्नांडीस**
OFM Cap

अनेक वेळा आपल्या इथे जेव्हा पवित्र संतांचे पवित्र अवशेष किंवा 'Holy Relic' आणले जातात तेव्हा त्या ठिकाणी भाविक गर्दी करतात. संत पाद्रे पिओ ह्यांच्या मठात कार्य करत असताना, मला असा अनुभव आला की फक्त त्याच्या रेलिकला पाहण्यासाठी व ते मिळवण्यासाठी अनेक धर्मगुरू व भाविकही प्रयत्न करतात. पवित्र अवशेष म्हणजे नक्की काय?

एका ख्रिस्ती व्यक्तीने मला विचारले होते, ''फादर, मला थोडासा संभ्रम वाटतो. संतांची हाडे, त्यांच्या शरीराचा काही भाग किंवा कपडे घरात किंवा चर्चमध्ये ठेवणे आणि त्यांना वंदन करणे हे मला थोडे अंधश्रद्धेसारखे व मूर्तिपूजेसारखे वाटते. आपण थेट देवालाच प्रार्थना का करू शकत नाही? अवशेषांमध्ये स्वतःची काही शक्ती असते का, की हे फक्त मानसिक आधार आहे?'' हे प्रश्न स्वाभाविक आहेत, कारण बाहेरून पाहताना अवशेष हे फक्त मृत व्यक्तीच्या वस्तू वाटतात. पण संतांचे पवित्र अवशेष म्हणजे फक्त हाडे, केस, कपडे किंवा वस्तू नाहीत. ते त्या संताच्या पवित्र जीवनाची, त्यांच्या प्रेमाची आणि देवाशी असलेल्या गूढ नात्याची जिवंत साक्ष आहेत. जेव्हा आपण ह्या अवशेषांना आदराने वंदन करतो, तेव्हा आपण फक्त वस्तूला स्पर्श करत नाही, तर त्या संताच्या विश्वासाला, त्यांच्या दुःखाला आणि त्यांच्या स्वर्गीय मध्यस्थीला स्पर्श करतो. हे अवशेष आपल्याला आठवण करून देतात की पवित्रता शक्य आहे आणि संत आजही आपल्यासाठी प्रार्थना करतात.



सुरुवातीच्या ख्रिस्ती समाजातच ह्या परंपरेची मुळे दिसतात. पहिल्या शतकांपासूनच ख्रिस्ती लोक रक्तसाक्ष्यांच्या अवशेषांना आदराने जपत असत. रक्तसाक्षी संत पॉलीकार्प (इ. स. १५५) ह्यांच्या शरीराचे अवशेष विश्वासू भाविकांनी काळजीपूर्वक जतन केले व त्यांच्या थडग्याजवळ प्रार्थना करत होते.

**संतांचे अवशेष फक्त इतिहास नाही; तर विश्वास, मध्यस्थी आणि पवित्रतेची साक्ष आहेत.**

रोममधील कॅटकुंम्बमध्ये रक्तसाक्ष्यांच्या कबरेवर वेदी बांधली जात असे. ही प्रथा आजही चर्चमधील पवित्र वेदीत अवशेष ठेवण्याच्या रीतीत दिसते. बायबलमध्येही ह्याचा स्पष्ट आधार आढळतो. दुसऱ्या राजांच्या पुस्तकात एलिशाच्या हाडांना स्पर्श होताच मृत माणूस उठला (२ राजे १३:२), तर प्रेषितांच्या कृत्यांमध्ये संत पौलाच्या हातातल्या रूमाल आणि कपड्यांनी अनेक रोग बरे झाले (प्रेषितांची कृत्ये १९:११-१२). ह्यामुळे सुरुवातीच्या विश्वासू लोकांना खात्री झाली की संतांचे शरीर आणि त्यांच्याशी संबंधित वस्तू देवाच्या कृपेचे साधन बनू शकतात.

मध्यकाळात ह्या पवित्र अवशेषांना मोठे महत्त्व प्राप्त झाले. लोक मोठ्या तीर्थयात्रा करत, अवशेषांच्या उपस्थितीत चमत्कार व बरे होण्याची अपेक्षा ठेवत. अवशेषांचे स्थानांतर हा एक मोठा धार्मिक उत्सव असायचा. ह्या काळात काही ठिकाणी बनावट अवशेषांचा व्यापारही झाला, पण चर्चने नेहमी खऱ्या अवशेषांची परीक्षा व मान्यता ह्यावर भर दिला. प्रॉटेस्टंट सुधारकांनी अवशेषांचा आदर करणे आणि प्रार्थना करणे ही प्रथा नाकारली, तेव्हा कॅथलिक चर्चने ट्रेंट परिषदेत स्पष्टपणे सांगितले की, संतांचे अवशेष आदराने ठेवावेत, कारण त्यांच्याद्वारे देवाची कृपा कार्य करते आणि विश्वास मजबूत होतो.

आजही संतांचे अवशेष, विशेषतः प्रथम श्रेणीचे शरीराचे भाग, हे स्वर्गातील संतांशी आपले जिवंत नाते म्हणून मानले जातात. ते फक्त इतिहास नाहीत, तर विश्वास, मध्यस्थी आणि पवित्रतेची जिवंत साक्ष आहेत. पण अवशेषांमध्ये स्वतःची कोणतीही जादुई शक्ती नसते. कोणताही चमत्कार किंवा बरे होणे फक्त देवाच्या कृपेने आणि संतांच्या मध्यस्थीने होते. अवशेष हे फक्त त्या कृपेचे साधन आहेत. घरी किंवा चर्चमध्ये अवशेष ठेवल्याने संताच्या पवित्र जीवनाची आणि देवाशी

असलेल्या नात्याची आठवण होते. त्यामुळे प्रार्थना करायला आणि संतासारखे जगायला प्रेरणा मिळते. मध्यस्थीची जाणीव होते आणि एकटेपणा कमी होतो. खरा आशीर्वाद देवाकडून येतो, अवशेष स्वत: कुठलाही आशीर्वाद देत नाहीत. देव कार्य करतो. जेव्हा एखादी विश्वासू व्यक्ती अवशेषाला आदराने स्पर्श करते आणि प्रार्थना करते, तेव्हा देव त्या व्यक्तीच्या विश्वासानुसार आणि संतांच्या मध्यस्थीनुसार कृपा देऊ शकतो.

अवशेषांना वंदन करणे म्हणजे मूर्तिपूजा नव्हे. आपण संतांना देव मानत नाही. आपण फक्त देवाची कृपा मागतो आणि संतांच्या मध्यस्थीची प्रार्थना करतो. आदर आणि देवाची उपासना ह्यात फरक ठेवावा. अतिरेक, अंधश्रद्धा किंवा अवशेषांना जादूचे साधन समजणे टाळावे. पवित्र अवशेष हे ख्रिस्ती विश्वासाच्या सुरुवातीपासून आजपर्यंत चालत आलेली एक पवित्र परंपरा आहे. ते आपल्याला आठवण करून देतात की संत फक्त भूतकाळातील लोक नाहीत, तर आजही आपल्यासाठी प्रार्थना करणारे जिवंत मध्यस्थ आहेत. त्यांच्याद्वारे आपण देवाकडे अधिक जवळ जातो आणि पवित्रतेच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा घेतो.

•


# जॉली टूर्स

**दिवाळी सुट्टीतील सहली**

**१) केरळ दर्शन : त्रिवेंद्रम, कन्याकुमारी, अलॅप्पी (हाऊसबोट), थेक्कडी व मुन्नार सहल :**
दिनांक ५ नोव्हें. ते १४ नोव्हें. २०२६.
एकूण खर्च प्रत्येकी रु. ३९,०००/-मात्र.

**२) हैद्राबाद-रामोजी सिटी-स्नोवर्ल्ड-गोवळकोंडा सहल**
दिनांक ७ नोव्हें. ते १२ नोव्हें. २०२६.
एकूण खर्च प्रत्येकी रु. १७,५००/- मात्र.

**३) स्टॅच्यू ऑफ युनिटी - बडोदी-सुरत सहल :**
दिनांक १२ नोव्हें. ते १४ नोव्हें. २०२६.
एकूण खर्च प्रत्येकी रु. ११,०००/- मात्र.

**-: संपर्क :-**

१) श्री. डॉमणिक : 8087036615
२) श्री. लुईस : 9823844883
३) श्री. पिटर : 8806212751



# पक्षीरोधक पेत्रस जाळे




**होय! आम्हीच देतो कबुतरांपासून कायमची मुक्ती.**



* पक्ष्यांच्या त्रासांपासून मुक्त होण्यासाठी संपर्क करा.
* प्रोफेशनल व टेक्नीकल पद्धतीने हुशार कारागिरांकडून जाळी फिटींग करून मिळतील.
* घराच्या पॅरेपीटमध्ये, गॅलरीत, बिल्डिंग, शाळा, महाविद्यालये व इतर सर्व ठिकाणी नायलॉनची मजबूत जाळी फिटींग करून मिळतील.
* कुत्रा, मांजर, साप व लहान मुलांच्या संरक्षणासाठी जाळी फिटींग करून मिळतील.
* लोखंडी (स्टील) जाळी फिटींग करून मिळेल.

**प्रो. आग्नेल पिटर पांबुज्या**
किल्लाबंदर, कोळीवाडा, वसई.

**Mob. : 9209804821, 7498826366**
**9923153671**





# भारत पेस्ट कंट्रोल



*** सरकारमान्य ***

* नवीन व जुन्या घराला लागणारी वाळवी प्रतिबंधक योजना.
* घरावर आक्रमण करणारे कीटक, झुरळ, मुंग्या, पाली, ढेकूण, डास, माश्या व उंदीर इत्यादींच्या त्रासांपासून मुक्त होण्यासाठी जनरल पद्धतीने पेस्ट कंट्रोल केले जाईल.

**-: आमची वैशिष्ट्ये :-**

१) पेस्ट कंट्रोल योग्य व टेक्निकल पद्धतीने केले जाईल.
२) विश्वासात काम करणारे व कामाचा अनुभव असलेले टेक्निशियन.
३) आधुनिक पद्धतीने वासाचे व विनावासाचे केमिकल व जेल वापरून तसेच आयुर्वेदिक हर्बल वापरून पेस्ट कंट्रोल केले जाईल.
४) बंगलोज, फ्लॅट, शाळा, हौसिंग सोसायटी, ऑफिसेस इत्यादीं सर्वांचे पेस्ट कंट्रोल केले जाईल.

**प्लबिंगची कामे करून मिळतील. संपर्क : 7498033211**



**प्रो. आग्नेल पिटर पांबुज्या**
किल्लाबंदर, कोळीवाडा, वसई



**मो. : 9209804821, 9923153671**

# अहिंसात्मक चळवळी : दिशा व दशा

## अहिंसा हेच जीवनमूल्य



आजच्या काळातही अन्याय, भ्रष्टाचार, सामाजिक विषमता आणि पर्यावरणाच्या प्रश्नांविरोधात अहिंसात्मक आंदोलने केली जातात. अहिंसात्मक आंदोलन हे लोकशाहीतील एक प्रभावी माध्यम आहे. शांततेच्या मार्गाने आपले विचार मांडल्यास समोरच्याशी संवाद साधण्याची आणि सकारात्मक बदल घडवून आणण्याची शक्यता अधिक असते. कोणत्याही प्रश्नांवर राग किंवा हिंसेपेक्षा संयम, संवाद आणि शांततामय मार्ग अधिक परिणामकारक ठरतो. आपल्या आजूबाजूला एखादा सामाजिक प्रश्न निर्माण झाला तर आपणही प्रथम चर्चा करून तो सोडवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अहिंसा ही केवळ आंदोलनाची पद्धत नसून समाजात शांतता, एकता आणि सकारात्मक परिवर्तन घडवून आणणारी जीवनमूल्ये आहेत.

**- डोनाल्ड डिमेलो,** गास, कांदोक १

## लोकशाही बळकट करण्यासाठी

अहिंसात्मक चळवळ म्हणजे हिंसा, शस्त्रे किंवा बळाचा वापर न करता, सत्य, न्याय, सहकार्य ह्यांच्या आधारावर अन्यायाविरुद्ध शांततामय मार्गाने केलेला सामाजिक अथवा राजकीय  लढा होय.

अहिंसात्मक चळवळींचा मुख्य उद्देश जुलमी सत्ता, अन्यायकारक कायदे आणि सामाजिक विषमतेला विरोध करणे हा असतो. भारतात महात्मा गांधी ह्यांनी अहिंसा व सत्याग्रहाच्या माध्यमातून स्वातंत्र्य लढ्याला  नवी दिशा दिली. तसेच मार्टिन ल्यूथर किंग ज्युनिअर ह्यांचे नागरी हक्क आंदोलन ही ह्या चळवळींची उत्कृष्ट उदाहरणे आहेत. बहिष्कार, उपोषण, शांततापूर्ण मोर्चे आणि असहकार ही ह्या चळवळींची मुख्य शस्त्रे असतात. विरोधकाला शत्रू न मानता त्याचे हृदयपरिवर्तन करणे, ही या आंदोलनांची मूळ दिशा असते. ह्या चळवळींचे उद्दिष्ट केवळ सत्ता बदलणे नसून समाजात नैतिक मूल्ये, बंधुभाव, समानता आणि न्याय प्रस्थापित करणे हे आहे.

आधुनिक काळात अहिंसात्मक चळवळींचे स्वरूप बदलले आहे. डिजिटल युगात 'सोशल मीडिया'चा वापर करून जनमत तयार केले जात आहे. आजच्या काळात अहिंसात्मक चळवळींची दिशा पर्यावरण संरक्षण, स्त्री-पुरुष समानता, शिक्षणाचा अधिकार, सामाजिक न्याय आणि भ्रष्टाचारविरोध ह्यांसारख्या प्रश्नांकडे वळली आहे. अशा प्रकारच्या आंदोलनात अहिंसक मार्गाचा प्रभाव दिसून येतो.

काहीवेळा आंदोलनांमध्ये चुकीची माहिती, राजकीय हस्तक्षेप किंवा हिंसक प्रवृत्ती शिरल्याने चळवळींच्या मूळ उद्देशाला धक्का बसतो. त्यामुळे अहिंसात्मक चळवळी यशस्वी होण्यासाठी संयम, शिस्त, सत्य, संवाद आणि संविधानिक मार्ग ह्यांचा अवलंब करणे आवश्यक आहे. असे असले तरी, शाश्वत बदल आणि लोकशाही मूल्यांच्या रक्षणासाठी अहिंसात्मक मार्ग हाच सर्वांत प्रभावी आणि न्याय्य मार्ग मानला जातो.

**- सौ. कॅथरीन इरेमस फरगोज,** गास

## जोपर्यंत अन्याय आहे...

अहिंसात्मक चळवळ म्हणजे शस्त्राशिवाय, हिंसेशिवाय सत्याच्या मार्गाने अन्यायाविरुद्ध लढा देणे. अहिंसक चळवळीचा मंत्र बायबलमधील स्तोत्र ३४:१४ मध्ये दिला आहे : ''वाईटापासून दूर हो , चांगले कर , शांती शोध आणि तिचा पाठलाग कर.'' नवीन करारातील येशूची शिकवण : ''वाईटाचा प्रतिकार करू नका. कोणी उजव्या गालावर मारले तर त्यांच्यापुढे दुसराही कर'' (मत्तय ५:३९)  हीच आहे खरी अहिंसा, बदला न घेणे! पवित्र बायबलमधील अहिंसात्मक चळवळीचा अनुभव :  'येशूला जेव्हा सैनिकांनी पकडले तेव्हा पेत्राने तलवार काढली, येशू म्हणाला 'तुझी तलवार म्यानात ठेव' (मत्तय २६:५२); येशूने क्रुसावर मरताना हिंसा केली नाही उलट मारणाऱ्यांसाठी प्रार्थना केली, ''पित्या त्यांना क्षमा कर.'' हिंसेला उत्तर सहनशीलपणे देणे म्हणजे अहिंसा! भारतात भगवान महावीर, गौतम बुद्ध ह्यांनी अहिंसा हा 'धर्म' म्हणून सांगितला. महात्मा गांधींनी अहिंसेला हत्यार बनवले. ते म्हणायचे, ''अहिंसा ही दुबळ्यांचे शस्त्र नाही; तर शूरांचे भूषण आहे!'' त्यानुसार,

त्यांनी चंपारण्य (१९१७), खेडा, असहकार (१९२०), दांडी यात्रा (१९३०), भारत छोडो (१९४२) ह्या अहिंसात्मक चळवळी केल्या. विनोबा भावेंची भूदान चळवळ (१९५१), बाबा आमटे, मेधा पाटकर ह्यांचे नर्मदा बचाव आंदोलन.

परदेशात मार्टिन ल्यूथर किंग (अमेरिका), नेल्सन मंडेला (दक्षिण आफ्रिका), दलाई लामा ह्यांनी अहिंसात्मक मार्ग आपआपल्या देशात अंगीकारले . अलीकडील जंतरमंतर, दिल्लीतील जेन झी / अल्फा विद्यार्थी आंदोलन, ही 'अहिंसात्मक चळवळ' संपलेली नाही, ह्यांचे उदाहरण आहे, फक्त रूप बदलले आहे. TI, PIL, कोर्टात याचिका - आजच्या काळातील अहिंसात्मक चळवळीतील हत्यार आहे. पर्यावरणवादी चळवळ Chipko आंदोलनापासून ते आजच्या Climate Strike पर्यंत , सोशल सत्याग्रह : आरक्षण : मराठा / O B C / ME TOO, ह्याही अहिंसात्मक आंदोलनाचेच नवे रूप आहे. अहिंसात्मक चळवळीस अभिप्रेत गोष्टी : चळवळ सूडासाठी नाही; तर बदलासाठी आहेत. सत्यासाठी ठाम राहणे पण हातात दगड न घेता. हिंसेला हिंसेने नव्हे; तर वाटाघाटी करून प्रश्न सोडवणे.

- **ॲन्थनी मनवेल डाबरे,** गिरीज
मोबाईल : 98 22 89 31 78

## सातत्याने पाठपुरावा करणे

जोडणाऱ्या चळवळी हव्यात, तोडणाऱ्या नकोत. हातात दगड घेतल्याशिवाय आपले म्हणणे ऐकलेच जात नाही, अशी अनेकांची समजूत झाली आहे. पूर्वीच्या चळवळी माणसे जोडायच्या, तर आजच्या चळवळी माणसे तोडतात. ह्याचे कारण दिशा चुकली आहे. आपण प्रश्नांवर बोलण्यापेक्षा व्यक्तीवर टीका करण्यात जास्त वेळ घालवतो. अहिंसा ही काही कमजोरी नाही, तर सगळ्यात मोठी ताकद आहे. ती समोरच्याला शत्रू न मानता माणूस मानायला शिकवते आणि आपल्याच मनातील रागावर व द्वेषावर विजय मिळवायला लावते. आजची दशा अशी आहे की प्रत्येकालाच आपले म्हणणे खरे वाटते, पण दुसऱ्याचे ऐकून घेण्याची तयारी कोणाचीच नाही. सोशल मीडियावर दोन ओळी लिहिल्या की चळवळ झाली असे आपल्याला वाटते, पण प्रत्यक्षात जमिनीवर काहीच बदल होत नाही. खरी दिशा म्हणजे शांतपणे, सातत्याने आणि अभ्यास करून पाठपुरावा करणे. राग येणे स्वाभाविक आहे, पण रागावर नियंत्रण ठेवून आपले काम करत राहणे हीच खरी अहिंसा आहे आणि हाच टिकणारा मार्ग आहे.

- **नागेश प्रमोद राऊत,** आगाशी, भंडारवाडा
मोबाईल : 90 28 28 38 75

## मनात सत्य आणि विचारांत अहिंसा

अहिंसात्मक चळवळीचा विचार येताच आठवण येते ती चिपको आंदोलनाची. पर्यावरण सुरक्षिततेसाठी ग्रामस्थांनी झाडांना मिठी मारून वृक्षतोडीला विरोध केला होता.

हिंसेचा मार्ग न स्वीकारता सत्य, शांतता आणि संयमाच्या माध्यमातून अन्यायाविरुद्ध लढा देणे विचार करण्याइतके काही सोपे नाही. त्यासाठी योग्य दिशा देणे व शिस्त बाळगणे गरजेचे असते.

आजच्या काळात पर्यावरण संरक्षण, सामाजिक समानता, भ्रष्टाचार व अन्याय ह्यांसारख्या समस्यांविरुद्ध अहिंसात्मक चळवळींची गरज आहे. आजची दशा फार काही स्थित्य नाही. सोशल मीडियामुळे अशा चळवळींना व्यापक स्वरूप मिळू शकते; मात्र त्यामध्ये सत्यता राखणे आवश्यक आहे. कारण इतिहासाने हेच सिद्ध केले आहे. हातात शस्त्र नसले तरी मनात सत्य आणि विचारांत अहिंसा असेल, तर एक सामान्य माणूसही संपूर्ण समाजाच्या परिवर्तनाची सुरुवात करू शकतो आणि हेच जंतर मंतर मैदानात आपण अनुभवले.

- **ब्रिनल सेल्विन क्रास्टो,** नंदाखाल, परसाव


**GHM TRAVELS**

GHM TRAVELS, Office. 8, Divine Residency,
Opp. Mulgaon Church, Mulgaon, Vasai West, Vasai – 401201
Ruth: 9730421602 / Gavin: 7709561700 / 9890214681
https://ghmtravels.my.canva.site

**** Customised Domestic Tours ****
* Goa - 3N/4D * Vadodara with Statue of Unity - 3D
* Kerala - 5N/6D * Velankanni / Pondicherry * Konkan - 5N/6D
* Hyderabad - 3N/4D * Mahableshwar / Panchgani * Kashmir
* Himachal with Shimla / Kullu Manali - 5N/6D * Andaman Island ...

**** International Tours ****
* Nepal * Sri Lanka * Maldives * UAE (Dubai) * Vietnam
* Singapore * Malaysia * Thailand (Bangkok / Phuket / Pattaya) ...

** We Offer **
Train Booking / Bus Booking / Airline Tickets / Hotel Booking
(Best Hotels with Good Deals)
Passport (New & Renewal) / Tourist Visa / Customized Tours
Car – Mini Bus Rental / Honeymoon Package

BOOK NOW

## भीती

असे म्हटले जाते, की समुद्रात प्रवेश करतेवेळी
नदी भीतीने कंपित झालेली असते.
ती वळून बघते, पर्वताच्या शिखरावरून येताना
किती अंतर तिने कापलेय
दऱ्याखोऱ्यांतून व गावांतून, असंख्य वळसे घेत
किती क्षेत्र तिने व्यापलेय
आणि आता ती पाहते तर काय?
पसरलाय समोर सागर महाकाय
क्षितिजापर्यंत दिसतेय, फक्त पाणीच पाणी
प्रवेश करताच, नष्ट होणार का
आपली नामोनिशाणी?
आता न उरलाय पर्याय, न दुसरा थारा
नदीला तर माघारी वळता येत नाही
खळखळणाऱ्या निर्झराच्या ओघवत्या धारा
पर्वतावर परत नेता येत नाही
तसं कुणालाच जीवनात परत फिरता येत नाही
दैवाने आखलेली वाट, नाकारता येत नाही.
जोखीम आहे पण नदीला ती
स्वीकारावीच लागेल
सागरामध्ये स्वतःला झोकून द्यावेच लागेल
कारण तेव्हाच पळून जाईल भीती नदीची
तेव्हाच होईल नदीला जाणीव एका सत्याची
सागरात विलीन होणार असे वाटले होते क्षणभर
पण आता ती स्वतःच बनली होती सागर.

(खलील जिब्रान ह्यांच्या FEAR ह्या कवितेचे स्वैर रूपांतर)

**दीपक मच्याडो,** वडवली,पाली
मो.: 99 67 23 86 11



## सारीपाट



राहून गेले..
नव्हे , बरेच वाहून गेले...
म्हातारपण जवळ दिसले
रुपेरी केस हळूच हसले.

जीवनाचा अर्थ
अजूनही आम्हांस ना उमगला
जीवन एक आठवण
त्या आठवणींचा सारीपाट नी सोंगट्या
का बरे रुसले...

विरहाचे दुःख हळूच विरत गेले
नव्या मातीत हृदयाचे रोपटे
तग धरून गेले...
तिच्या सोबतच्या श्वासांचा आनंद
चांदण्यासम भासे.

वर्षे, दशके सरत गेले
त्रास, त्रागा, भीती,
चाळिशीतही वाटणारे
नाना गोष्टींचे कुतूहल
अन् बाप गमावल्याचे दुःख
मन आभाळ करून गेले...

**-विजय डायगो रॉड्रिग्ज,** गास
मोबाईल : 8830244293

## निसर्गाचा आक्रोश

फुलंच फुलं दाही दिशांनी, रंग उधळती आभाळी
पाकळ्यांमधुनी मंद सुवास,
भरुनी टाके अंतरी कळी। 'वा! किती सुंदर!'
उद्गार निघे, डोळे होती कृतार्थ;
देवा, तुझ्या या देणगाला नाही कुणाचा पार।
अचानक अंतर्मनी वेदनांचा स्पर्श होई;
आठवती ते रिते डोंगर, वृक्षतोडीची राख उरे।
कुठे गेले ते हिरवे वन? कुठे पक्ष्यांचे गीत?
लोभाच्या त्या कुऱ्हाडीखाली सांडले जीवन नीत।
सपाट केले डोंगर रांगा, जंगल झाले विराण;
विकासाच्या नावाखाली उजाडला
जीवसृष्टीचा प्राण।
अजुनी वेळ गेलेली नाही,
अजुनी धरती श्वास घेई;
एक वृक्ष जरी लावला प्रेमाने,
आशेचा किरण पुन्हा फुले।
जपू या धरतीमातेचा श्वास;
निसर्ग वाचवूनी वाचवू आपला श्वास।

**बॅप्टिस्ट एम वाझ,** दारसेंग, गोम्सआळी.
मोबाईल : 99 70 65 07 57

## माहेर : हक्काचे आभाळ

येथे ना कोणाची पत्नी, सून वा आई
फक्त ती असते
आई बाबांची लाडकी चिमुकली,
थकलेल्या जीवाला थंडगार वाऱ्याची
फुंकर देणारी,
हृदयातील एक हळवा कोपरा
म्हणजेच माहेर.

संसारात कितीही खंबीर राहावे लागले
कितीही दुःख मनात दडवावे लागले
तरी आठवणीच्या झुल्यावर
मन झुलत झुलत रमते
जेथे मन लहान होते ते म्हणजेच माहेर.

आईच्या हातचे जेवणं म्हणजे अमृततुल्य
बाबांच्या मायेचा स्पर्श म्हणजे सुख सावली
भावाच्या मिठीत जणू जाणीव
मी आहे तुझ्यासाठीची
मनातले तुफान शांत करण्याची
जागा म्हणजेच माहेर.

ना स्वयंपाकाची चिंता, ना कामांचा व्याप
ना कोणाचे पारखणे, ना कोणाच्या अपेक्षा
मनमोकळ वागणे, गप्पागोष्टी आणि
दिलखुलास हसणे
जबाबदारीच्या ओझ्यातून मिळालेला
विरंगुळा म्हणजेच माहेर.

जिथे आपण काही न सांगता समजले जातो
काही न मागता मिळते
फक्त आपले असणे पुरेशे असते
प्रेमाने, आपुलकीने,
आपल्या माणसाने भरलेले,
निघताना पावले जड करणारे घर
म्हणजेच माहेर.

**सौ. रोविना प्लेविन वाझ,** पापडी



## आता जगायचं तरी कसं?

आता जगायचं तरी कसं? कुठे?
आणि कुणाबरोबर?
हेच काही कळेनासं झालंय
पूर्वी आईचा गर्भ सुरक्षित वाटायचा
पण हल्ली मारेकऱ्यांनी
आपली हत्यारं बदलून
वेशही बदललाय...
कोण? कुठून? कधी आणि
कसा वार करील
काही सांगता येत नाही.
का कोण जाणे प्रत्येक पाऊल टाकताना
भीती वाटायला लागलीय...
विश्वास ठेवायचा तरी कुणावर?...
गळा काढून रडणारी व्यक्तीच
तुमचा गळा चिरणारी असू शकते
हल्ली कुणाला मारायला मारेकऱ्यांकडून
धडे गिरवण्याची गरजही भासत नाही
कारण माणसंच हत्यार बनलीत.
विश्वासघाताने माणुसकीचा कडेलोट
अगदी सहज करता येतो...
म्हणूनच वाऱ्याने आपली दिशा
बदललीय...
कधी नव्हे तो सूर्य
आग ओकू लागलाय...
पाऊस पाणी नाकातोंडात फेस आणतो
तर कधी घसा कोरडा ठाक करतो
दफनभूमी आणि स्मशानभूमीने
आपली जागा सोडून
शहराकडे धाव घेतलीय...

**- मायकल थॉमस लोपीस,** माणिकपूर
मोबाईल : 99 23 01 08 33



# माझे मत

## भारतीय संविधान आणि लोकशाही



भारत हा विविध धर्म, जाती, भाषा, संस्कृती आणि परंपरा ह्यांचा देश आहे. ह्या विविधतेला एकत्र बांधून ठेवणारी सर्वांत मोठी शक्ती म्हणजे भारतीय संविधान. हे केवळ कायद्यांचे पुस्तक नाही; तर प्रत्येक भारतीयाच्या स्वातंत्र्याचे, समानतेचे, न्यायाचे आणि बंधुतेचे संरक्षण करणाऱ्या राष्ट्राचा आत्मा आहे. आज देशात विविध सामाजिक, राजकीय आणि राष्ट्रीय प्रश्नांवर अनेक ठिकाणी आंदोलने होत आहेत. लोकशाहीमध्ये प्रत्येक नागरिकाला शांततेच्या मार्गाने आपले मत मांडण्याचा अधिकार आहे. हा अधिकार संविधानाने दिला आहे. लोकशाही फक्त निवडणुकांपुरती मर्यादित नसते. ती नागरिकांचा सहभाग, मतभिन्नतेचा आदर, संवाद आणि कायद्याच्या चौकटीत राहून संघर्ष करण्याची संस्कृती ह्यावर उभी असते.

आज गरज आहे ती जात, धर्म, पंथ, भाषा आणि पक्षीय राजकारणाच्या पलीकडे जाऊन भारताच्या संविधानिक मूल्यांचे संरक्षण करण्याची. संविधान मजबूत राहिले तरच प्रत्येक नागरिकाचे हक्क सुरक्षित राहतील. अभिव्यक्ती स्वातंत्र्य, न्यायव्यवस्था, मतदानाचा अधिकार, समान संधी आणि मूलभूत अधिकार ह्यांचे अस्तित्व संविधानामुळेच आहे.

भारतातील तरुणांनी संविधानाचा अभ्यास करावा. शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था आणि नागरिकांनी संविधानाबद्दल जनजागृती करावी. मतभेद असू शकतात; पण ते संवादाने आणि संविधानाच्या चौकटीत सोडवले गेले पाहिजेत.

लोकशाही टिकवण्याची जबाबदारी फक्त सरकारची किंवा विरोधी पक्षांची नाही. ती प्रत्येक भारतीय नागरिकाची आहे. आपण संविधानाचा सन्मान केला; लोकशाही मूल्यांचे रक्षण केले आणि शांततापूर्ण मार्गाचा स्वीकार केला, तर भारत अधिक मजबूत, न्याय्य आणि प्रगत राष्ट्र म्हणून जगासमोर उभा राहील. 'पक्ष बदलू शकतात, सरकार बदलू शकते; पण संविधान आणि लोकशाही टिकली पाहिजे. कारण त्यातच भारताचे भविष्य सुरक्षित आहे.'

**-डेव्हिस डाबरे**, भुईगाव

# मनोरी - धारावी बेटावरील जल शुद्धीकरण प्रकल्पाविरोधात शांती मोर्चा





**मनोरी :** धारावी बेटावरील मनोरी गावाच्या हद्दीत मुंबई महापालिकेचा जल शुद्धीकरण प्रकल्प (समुद्राच्या खाऱ्या पाण्यापासून पिण्याचे पाणी तयार करणारा प्रकल्प) करण्याचे काम सुरू आहे. ह्या प्रकल्पाविरोधात २१ ऑगस्ट २०२६ रोजी शांती मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. मच्छीमारांची संघटना, महाराष्ट्र मच्छीमार कृती समिती व नॅशनल फिशवर्कर्स फोरम मुंबई, ठाणे, पालघर जिल्ह्यांतील मच्छीमार सहकारी संस्था तसेच धारावी बेटावर राहणाऱ्या कोळी, आगरी, कुणबी, भंडारी, आदिवासी भूमिपुत्रांनी प्रकल्पाचा मनोरी ते बनडोंगर प्रकल्प स्थळावर 'शांती मोर्चा'द्वारे आपला विरोध दर्शविला.

महाराष्ट्र मच्छीमार कृती समितीचे अध्यक्ष लिओ कोलासो ह्यांनी सांगितले की, ''मनोरी-गोराईच्या लोकांना आजही पिण्याचे पाणी देण्यास असमर्थ ठरले असून मच्छीमारांच्या समुद्रकिनाऱ्यावर मुंबईत मरीना पार्क, महाकाय वाढवण बंदर, मुरबे, जिंदाल, बंदर, सी लिंक रोड, समुद्रात विमानतळ, टेक्साटाईल पार्क, त्याच्या बाजुला नवीन एम आय डी सी इत्यादी प्रकल्प आणून किनारपट्टीवर सरकार कब्जा करू पाहत आहे. पारंपरिक लहान मच्छीमारांचा दैनंदिन उदारनिर्वाह हातून काढला जाईल, असे षड्यंत्र रचले जात आहे. हा तुघलकी प्रकार सर्वत्र कदापिही होऊ देणार नाही.''

सरचिटणीस किरण कोळी ह्यांनी सांगितले की, ''डिसलायनेशन प्लांट मध्ये दररोज ५०० दशलक्ष लिटर म्हणजे ५० कोटी लिटर समुद्राचे पाणी घेऊन २०० दशलक्ष लिटर म्हणजे २० कोटी लिटर पाण्याचे शुद्धीकरण केले जाणार आहे. ह्या प्रक्रियेतून निघणारा रासायनिक गाळ (केमिकल) तळोजा येथे नेणार असे बीएमसी सांगत आहे. उरलेले ३०० दशलक्ष लिटर म्हणजे ३० कोटी लिटर अतिक्षारयुक्त, अतिखारे पाणी पुन्हा समुद्रात सोडणार आहेत. त्यामुळे समुद्राची जैवविधता नष्ट होणार, माशांचे ऑक्सिजन बंद झाले की प्रजनन, मत्स्य संवर्धन आणि पर्यायाने किनाऱ्यापासून १० वावापर्यंतची लहान मच्छीमारांची मासेमारी संपुष्टात येणार आहे. हा प्रकल्प गरीब मच्छीमार समाजाच्या रोजी-रोटीवर घाव घालणारा प्रकल्प असून येत्या १५ दिवसात काम बंद करून प्रकल्प गुंडाळावा, अन्यथा मोठा मोर्चा काढू.''

मासेमारी व्यवसायातून प्रतिवर्ष १९.७२ लाख मेट्रिक टन मासळी निर्यात होऊन रु. ७३,९८०,४६ कोटींचे परकीय चलन देशाला मिळवून देणारा हा व्यवसाय आहे. तो संपुष्टात आणण्याचे षड्यंत्र रचले आहे. चारकोपवरून प्रकल्पापर्यंत भुयारी बोगदा कशासाठी खणला जात आहे? गोराई - मनोरीला फक्त २% पाणी देणार आहेत. मग ४०७७कोटी कशासाठी खर्च करता? ह्या खर्चात दोन धरणे बांधता येतील, असे सांगितले. ह्यावेळी राजश्री भानजी (मरोळ सुकी मासळी बाजार अध्यक्ष, गोराई मच्छीमार सहकारी संस्था अध्यक्ष, श्री. ऑलडीन वसईकर, भाटी संस्थेचे अध्यक्ष राजीव कोळी, फादर ऑस्कर, श्रीमती स्वीटसी हॅन्रीक्स, रॉनी किणी, हरबादेवी संस्थेचे सचिव दिपक वासावे, माजी नगरसेवक निकोलस आल्मेडा (वॉचडॉग फाऊंडेशन), नगरसेवक ऑस्कर मेन्डोंसा, सिस्टर क्रिस्टल, पर्यावरण कार्यकर्ते श्री. मॅक्सवेल डाबरे, नगरसेवक शॉन कोलासो, नगरसेविका शर्मिला गंडोळी, मालवणी अध्यक्ष गोविंद कोळी, हरबादेवी अध्यक्ष प्रमोद पाटील, मढ मच्छीमार संस्थेचे सुरेश नगी, मढ दर्यादीप अध्यक्ष रमाकांत कोळी इत्यादी उपस्थित होते.

धारावी बेट बचाव समितीचे नेव्हील डिसोजा ह्यांनी सूत्रसंचालन केले. गोराई मच्छीमार सहकारी संस्थेचे सचीव रॉनी किणी, मनोरी फिशरमन अध्यक्ष सायमन गारोडी व संचालक मंडळ ह्यांनी सभेचे आयोजन केले.

ह्या मोर्चात धारावी बेटावरील तमाम चर्चचे धर्मगुरू व धर्मभगिनी ह्यांनी शांती मोर्चात सहभाग घेऊन येथील रहिवाशांच्या भवितव्यावर येणाऱ्या संकटात आम्ही भूमिपुत्राच्या बाजूने उभे आहोत, हे त्यांनी आपल्या उपस्थितीतून दाखवून दिले.

\- **नेव्हील डिसोजा** (धारावी बेट बचाव समिती)

## जागतिक फ्रान्सिस्कन संस्था



फा. प्रकाश तुस्कानो अनुवादित 'जीवनाचा पवित्र मार्ग' हे पुस्तक वाचनात आले. यंदाचे वर्ष हे संत फ्रान्सिस असिसीकर ह्यांच्या ८००व्या स्मृतीचे वर्ष म्हणून जाहीर करण्यात आले आहे. एक जागतिक फ्रान्सिस्कन संस्था स्थापन करण्यात आलेली आहे. ह्या संस्थेत १८वर्षांवरील सर्व अविवाहित, विवाहित, मग ते ब्रह्मचारी असोत, धर्मप्रांतीय धर्मगुरू, विधवा किंवा विधूर असोत, त्या सर्वांचे स्वागत करून त्यांना त्या संस्थेचे सभासद होता येते.

धर्मगुरूंना किंवा धर्मभगिनींना आज्ञापालन, गरिबी, शुद्धता ह्या तीन शपथा घ्याव्या लागतात. विवाहितांनी मनाने आणि अंत:करणाने पवित्र शुद्धता पाळायची, पती-पत्नीचे परस्पर संबंध पवित्र शुद्धतेचे आणि एकनिष्ठतेचे असावेत आणि विवाह संस्काराचे बाह्य संबंध नसावेत, त्यांना सभासद होता येते. सामान्य ख्रिस्ती विश्वासू, पुरुष स्त्रिया, प्रापंचिक, अविवाहित, विवाहित, विधुर, विधवा, सर्व तरुण-तरुणी ह्यासाठी ही संघटना आहे. ह्या संघटनेची नियमावली, माहिती आपणांस ह्या पुस्तकात वाचावयास मिळेल.

ह्या पुस्तकात मुंबईचे आर्चबिशप जॉन रॉड्रिग्ज, वसईचे बिशप थॉमस डिसोजा, 'सुवार्ता'चे संपादक फा. जोएल डिकुना ह्यांचे अभिप्राय आहेत.

**- बावतीस पेडीकर**

**'जीवनाचा पवित्र मार्ग'**

अनुवाद : फा. प्रकाश तुस्कानो

मोबाईल : 97 69 79 57 46

## विज्ञानकथांची अनोखी सफर



ज्येष्ठ विज्ञान लेखक जोसेफ तुस्कानो ह्यांचा 'भातुकलीच्या खेळामधली' हा विज्ञान कथासंग्रह बालकांच्या मनातील कुतूहल व उत्कंठा वाढविण्यास मदत करतो. विज्ञान व मनोरंजन ह्यांची सांगड घालणाऱ्या एकूण २३ कथांचा समावेश ह्या पुस्तकात आहे.

वनस्पतीतील हरितद्रव्य व मानवी रक्तातील हिमोग्लोबीन ह्यांच्या संकराने 'क्लोरोग्लोबीन' ह्या संयुगाद्वारे हिरव्या रक्ताची निर्मिती करणारी 'रंग रक्ताचा' ही विज्ञानकथा विचारप्रवृत्त करते. धर्म आणि विज्ञान ह्यांची सांगड घालणारी 'भातुकलीच्या खेळामधली' ही कथा मृत्युगीतातून मृत्यूचे सत्य अधोरेखित करते. पृथ्वीवरील लोकसंख्येच्या स्फोटातून मंगळावर स्थायिक होण्याचा विचार करणारी पाच जोडपी 'वस्ती' ह्या कथेतून गूढतेकडे नेणारी आहे. सुनियोजित नियोजन करण्यासाठी 'वेळेची किंमत' ही कथा प्रेरणा देते. 'ई-मेल' ही मृत्युकथा नसून जीवघेण्या स्पर्धेत धावणाऱ्या सामान्य माणसाच्या विनाशाचा संदेश देते. मातेच्या दुधासदृश्य द्रव निर्माण करणाऱ्या 'पोट्युनिया' नावाच्या रोपट्याचा शोध लावून मातेसमान दूधनिर्मिती करणारी 'दुग्धास्पतीची देणगी' ही कथा लेखकाच्या विलक्षण कल्पकतेला दाद द्यावी अशी आहे.

रहस्यमय आजाराने विकलांग झालेला शाम; त्याच्या रक्तपेशीतील जेनुकांमध्ये वंशीय बदल घडणारी 'जेनूक' ही कथा वेगळ्या धाटणीची परंतु दिशादर्शक आहे. जेनुकाचे कार्य मनोरंजनाद्वारे, सहजतेने मांडण्याचा समतोल लेखकाने साधलेला आहे. 'उडत्या तबकड्या'मधील फसवणूक 'पितळ उघडे पडले' ह्या कथेतून मजेशीर अनुभव देते. 'श्रेष्ठदान' कथेद्वारे अवयवदानाचे महत्त्व पटवून सामाजिक बांधीलकीची जाणीव मनाला भिडते. पाण्याचे महत्त्व आणि भविष्यात निर्माण होणाऱ्या पाणीटंचाईचा धोका प्रभावीपणे मांडून निसर्गाचे संवर्धन ही प्रत्येकाची जबाबदारी 'ड्रायहायड्रोजन मॉनोक्साईट' ह्या कथेतून व्यक्त होते. मानवाची हाव सृष्टीचा कसा घात करते त्याविषयी देवाला साकडं घालणारा निसर्गाचा आक्रोश 'झाडांना फुटले हात' ही कथा डोळ्यात अंजन घालते.

'वनस्पतींना संवेदना असतात' हे अधोरेखित करणारी 'इच्छापूर्ती' कथा, अंधश्रद्धा निर्मूलन करणारी 'रक्ताळलेला भात', एड्सची लागण कोवळ्या जिवांना कशी झाली ह्याचा शोध घोणारी 'कुणाच्या खांद्यावर' ही कथा व रुट कॉज व नोबेल बेबीचे रहस्य उलगडून दाखविणाऱ्या ह्या रहस्यकथा उत्सुकतेबरोबरच अस्वस्थ करतात. वस्त्राला जळण्यापासून वाचविणारे मूलद्रव्य 'ल्युकेमिया'ला कसे आमंत्रण देते त्याची रंजक कहाणी 'फसलेला प्रयोग' ह्या कथेत सुंदररीत्या मांडलेली आहे. चॅटिंगच्या फसव्या दुनियेतील बिंग 'घटस्फोट' ह्या कथेतून सजगतेचा इशारा देते.

ह्या विज्ञानकथा वाचताना गोष्टीरूप विज्ञानविश्वाची एक वेगळी ओळख मुलांच्या मनात निर्माण होईलच पण त्याचबरोबर विज्ञानाकडे त्यांचा ओढा वाढेल. गहन, गूढ विश्व, वास्तवाची जाणीव करून देणारे लेखन मुलांसाठी उपयुक्त व प्रेरणादायी आहे. सहजसोप्या भाषेतून विज्ञानाची उकल करण्याचे लेखकाचे कसब वाखाणण्याजोगे आहे. मुखपृष्ठ बालमानाचा वेध घेणारे आकर्षक झाले आहे.

**'भातुकलीच्या खेळामधली'**

लेखक : जोसेफ तुस्कानो

अनघा प्रकाशन, ठाणे

पृष्ठे १३१; मूल्य रु. २३०/-

## बालमन समृद्ध करणाऱ्या गोष्टी




'ससा हरला त्याची गोष्ट' ज्येष्ठ विज्ञानलेखक जोसेफ तुस्कानो ह्यांचा हा कथासंग्रह बालगोपालांसाठी गोष्टींचा खजिना आहे. जुन्या गोष्टींना नवा साज सजवून त्याची उंची वाढविलेली आहे. १२ छोट्या गोष्टींचा हा संग्रह आनंदाचा ठेवा सापडल्याची जाणीव वाचताना होते.

'ससा हरला' ही गोष्ट प्रातिनिधिक आहे. ससा - जलद धावणारा; कासव मंद, सावकाश, खाचखळगे पार करणारे जगण्याच्या स्पर्धेत मुक्कामाला पोहचण्यापेक्षा आनंददायी प्रवास महत्त्वाचा! हे जीवनातील सत्य विचार करण्यास प्रेरित करते. मदर तेरेसा म्हणतात, ''मी एक पेन्सिलीचा तुकडा आहे आणि परमेश्वर माझा वापर करून महान कलाकृती घडवून आणतो.'' ब्राझिलियन लेखक, पावलो कोयलो ह्यांचे ''पेन्सिलीचे पाच पैलू'' वरील चिंतन अंतर्मुख करते. ताटातूट झालेल्या बंधूची भेट संगणक-इंटरनेट कशी घडवून आणतो ही उत्सुकता वाढविणारी 'उधळ्या बंधूची गोष्ट' नवीन जगाची ओळख करून देते.

एका टोपीवाल्याची गोष्ट, जंगलातील गोष्ट ह्या जुन्या गोष्टी नवीन विचार घेऊन पुढे येतात. माकडाची हुशारी व जंगलचा राजा सिंह ह्याला फसविणारा धूर्त कोल्हा बालकांची उत्कंठा वाढवितात. भिकाऱ्याविषयी कुतूहल जागृत करणारी, भिकाऱ्यांचे ज्वलंत प्रश्नांना भिडणारी 'भिकाऱ्यांचे भरले संमेलन' ही गोष्ट मजेशीर वाटते.

बाळ येशूच्या दर्शनाच्या आंतरिक ओढीने प्रवास करणारे, रहस्यमय ताऱ्यांचा शोध घेणारे खगोल शास्त्रज्ञ तीन राजे, कपटी हेरोद 'गोष्ट ख्रिस्ताच्या जन्माची' ह्या गोष्टीतून बालकांची उत्कंठा लेखक सोप्या भाषेतून वाढवितात. ख्रिस्ती श्रद्धेनुसार 'नाताळ' साजरा करण्याच्या अनेक देशांतील परंपरा, नाताळ गोठा, ख्रिस्मस ट्री, सांताक्लॉजचे बालकांना असणारे प्रचंड आकर्षण 'सण नाताळचा, आनंदाचा!' ही गोष्ट ज्ञानात भर घालणारी आहे. कॅनडातला नातू व इंडियातले आाजोबा ह्यांची मैत्री स्काइपच्या मदतीने, निखळ नातेसंबंध जोडण्यासाठी धडपडणारी नवी पिढी 'जेडेनच्या करामती' तून बालकांना आनंदाचा ठेवा सापडेल अशी आहे. साधी, सोपी प्रवाही भाषा हे लेखकाचे बलस्थान आहे. छोट्या छोट्या गोष्टींतून बालकांना विशाल विश्वाची ओळख करून देण्याची लेखकाची हातोटी विलक्षण आहे.

**- हेलन रॉबी डिसिल्वा**

**'ससा हरला त्याची गोष्ट'**
लेखक : जोसेफ तुस्कानो
प्रकाशिका : सौ. विद्या मुरलीधर नाले
अनघा प्रकाशन, ठाणे
पृष्ठे ४०; मूल्य रु. ७५/-

●

Sophia
BEAUTY PARLOUR
"HIGHLIGHT YOUR NATURAL BEAUTY"
SOPHIA
ANDRADES
9823301327
7744000333
9049000555
◈ अपॉईन्टमेन्ट स्विकारल्या जातील ◈

* रोज Rs.99 फक्त 15 वर्षे बचत करा आणि Rs. 9 करोडची Property बनवा.
*बचत करा रोज Rs.333 व Rs.1,40,000 दरवर्षी आयुष्यभर, टॅक्स फ्री घ्या. सोबत Rs. 40 लाखांची **Maturity** पण मिळवा. तसेच Rs. 80 लाख **Family** साठी देखील.
*ही Offer मर्यादित कालावधीसाठीच उपलब्ध.
* Contact For Mediclaim Policy, Cancer Cover Plan, Pension, SIP & SWP.
**Jayesh Chaudhari**
**9422483785**

**जेरूसलेम टूर्स ॲन्ड कॅटरिंग सर्व्हिस, आगाशी**

१) **मँगलोर, उडीपी, कुर्ग सहल** : दिनांक ७ ते १४ नोव्हें. २०२६. ए.सी.ट्रेन, ए.सी.बस, ए.सी.रुम, सर्व साईट सीन, एन्ट्री फी व पार्टीसहीत खर्च रु. २७,०००/- व लहान मुलांस रु. २२,०००/-
२) **कोकण, मालवण, तारकर्ली सहल** : दिनांक २१ ते २६ नोव्हें. २०२६. थंड व हिरव्यागार निसर्गाची मजा लुटण्यासाठी ए.सी.ट्रेन, ए.सी.बस, ए.सी.रुम, सर्व साईटसीन, एन्ट्री फी व पार्टीसहीत खर्च रुपये १९,०००/- व मुलांस रु. १५,०००/-.
३) **दिल्ली, आग्रा, जयपुर** : दिनांक १२ डिसें. ते १९ डिसें. २०२६. संपूर्ण एसी पॅकेज. सर्व साईटसीन रु. ३०,०००/-

* **Quality And Quantity No Compromise.**
* संज्याव घोन्सालवीस, आगाशी : **9320888907**(Whatsap)
* पायस घोन्सालवीस, उमराळे : **C/O 9766092738**

**युनिक पेस्ट कंट्रोल**

**प्रो. : थॉमस वर्गिस**
माळुंगी, मुळगाव, वसई.
**7770026783,**
**9320032074**



१) २६ वर्षे कार्यरत असलेली.
२) सेवाभावी संस्था, हॉस्पिटल्स, कार्यालये, हाऊसिंग सोसायटी, हॉटेल्स, बंगलोज, फॅक्टरी यांसारखे संतुष्ट ग्राहक.
३) नवीन बांधकाम, नूतनीकरण व राहत्या घरासाठी वाळवी प्रतिबंधक योजना.
४) झुरळ, मुंग्या, कोळी, रांगणारे किटक, उंदीर, पाली ह्यांच्यासाठी जनरल प्रतिबंधक योजना.
५) नॉन टॉक्सीन केमिकल हर्बल व जेलमध्ये सर्विस उपलब्ध.

**-: संपर्क :-**
**9323232074, 7768000260**
**ऑफिस :** डिकुनावाडी, मुळगाव, वसई.

- झेविअर डिमेलो

## सी सी बी आय चे पदाधिकारी भेटले पोपना

**व्हॅटिकन :** कॉन्फरन्स ऑफ कॅथलिक बिशप्स ऑफ इंडियाच्या पदाधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ पोप लिओ ह्यांना भेटले. भारतीय कॅथलिक चर्चसंबंधी त्यांनी पोपबरोबर चर्चा केली.



प्रतिनिधी मंडळाचे नेतृत्व सीसीबीआयचे अध्यक्ष कार्डिनल फिलीप नेरी फेराव ह्यांनी केले. त्यांच्या सोबत सीसीबीआयचे उपाध्यक्ष आर्चबिशप पिटर मच्याडो, सेक्रेटरी जनरल आर्चबिशप विन्सेंट आइंद, डेप्युटी सेक्रेटरी जनरल रेव्ह. डॉ. स्टीफन अलथेरा हे होते. द ऑर्डर ऑफ सेन्ट अगस्टीनचे 'प्रायर जनरल' असताना पोपनी अनुक्रमे २००४ व २००६मध्ये भारताला भेट दिली असल्याने त्यांना भारताविषयी बरीच माहिती आहे. सीसीबीआय भारतातील १३२ कॅथलिक (लॅटिन) धर्मप्रांत, २१७ बिशप्स, ५६४ धर्मसंघ आणि १ कोटी ८०लाख कॅथलिक लोकांचे प्रतिनिधित्व करते.

## व्हॅटिकनचे परराष्ट्रमंत्री आर्चबिशप गॅलाघर मॉस्कोत



**मॉस्को (रशिया) :** व्हॅटिकनचे परराष्ट्रमंत्री आर्चबिशप पॉल गॅलाघर ह्यांनी मॉस्कोला भेट दिली. त्यांनी रशियाचे परराष्ट्रमंत्री सर्गेई लबारोव ह्यांच्याबरोबर विविध आंतरराष्ट्रीय विषयांवर चर्चा केली. उभय प्रतिनिधी मंडळाच्या चर्चेत रशियातील कॅथलिक समाज व रशिया-युक्रेन ह्यांच्यामधील युद्ध हे विषय महत्त्वाचे होते. सदर युद्ध लष्करी मार्गाने सुटू शकणार नाही. त्यासाठी वाटाघाटी सुरू करण्याची गरज आहे, असे आर्चबिशपांनी सांगितले. दोन्ही देशांना आंतरराष्ट्रीय मानवतावादी कायद्यांचे पालन करण्याचे आणि युद्धकैदी तसेच जखमींचे रक्षण करण्याचे आवाहन करून कोणत्याही परिस्थितीत युद्ध थांबले पाहिजे, असे आर्चबिशपांनी आवर्जून सांगितले.

## साजरा होणार ख्रिस्ताच्या बाप्तिस्म्याचा वर्धापनदिन

**जेरूसलेम (इस्राएल) :** २०३०साली ख्रिस्ताच्या बाप्तिस्म्याचा दोन हजारावा वर्धापन दिन साजरा केला जाणार आहे. त्यासाठी इस्राएल व जॉर्डन एकत्र काम करीत आहेत. इस्राएलचे परराष्ट्रमंत्री गिडियन साआर त्या संदर्भात म्हणाले, ''वर्धापन दिनानिमित्ताने जगभरातील ख्रिस्ती लोकांना पवित्र भूमीत येण्याची संधी मिळेल, आपल्या श्रद्धेच्या मुळाशी स्वत:ला जोडता येईल आणि जिथे ख्रिस्ती धर्माचा प्रारंभ झाला त्या जागेचा अनुभव घेता येईल.''

## कारितासची नेपाळ मदत

**काठमांडू (नेपाळ) :** ''नेपाळमधील दुर्घटनेनंतर आम्हाला त्वरित मदत पाठवणाऱ्या आणि आमच्यासाठी प्रार्थना करणाऱ्या पोप महोदयांचे आम्ही ऋणी आहोत. पोपना आमची काळजी वाटते ह्या भावनेने आम्ही भारावून गेलो आहोत,'' फा. सिलास बोगाटी म्हणाले. त्यांनी आणखी सांगितले की, पूरप्रवण भागांतील २५ कॅथलिक कुटुंबे बाधित झाली आहेत. कारितास नेपाळ मदत कार्यात सहभागी झाली आहे.

## सर्वांत उंच पुतळ्याचे अनावरण



**कोनोटोपी (पोलंड) :** युरोपमधील मरिया मातेच्या सर्वांत उंच पुतळ्याचे अनावरण येथे बिशप वेटकोस्की ह्यांच्या हस्ते झाले. ह्या पुतळ्याची उंची १८२ फूट आहे. प्रार्थना आणि तीर्थयात्रेसाठी प्रसिद्ध असलेल्या अवर लेडी ऑफ सॉरोज चॅपलजवळ हा पुतळा उभारण्यात आला आहे, जिथे मरिया मातेने अनेक वेळा दर्शन दिल्याचे सांगितले जाते. बिशप वेटकोस्की म्हणाले की, मरिया मातेच्या पुतळ्याकडे आपण डोळे उंचावून पाहतो, जणू काही ती आपल्याला देवाकडे पाहायला सांगते.

## सिस्टर लिजी काय सांगताहेत

**किव (युक्रेन) :** ''आम्ही रात्री झोपायला जाताना मनात भीती असते की, कधी मिसाईल किंवा ड्रोनचा आमच्यावर हल्ला होईल. प्रत्येक सकाळी आणि संध्याकाळी आम्ही देवाचे आभार मानतो, आम्हाला जीवंत ठेवल्याबद्दल. अत्यंत धोकादायक परिस्थितीत युक्रेनमधील लोक रोजचे जीवन जगत असतात'', सिस्टर लिजी व्हॅटिकन रेडिओला मुलाखत देताना म्हणाल्या. सिस्टर लिजी येथे कॅथलिक व अन्यधर्मीय लोकांमध्ये प्रसिद्ध आहेत. त्या प्रत्येक धर्मग्रामात जातात, प्रार्थना करतात, लोकांना रिट्रिट देतात, त्यांचे समुपदेशन करतात.

## पोप लिओ व्हॅटिनी फेअरच्या यादीत

**न्यूयॉर्क (अमेरिका) :** पोप लिओ चौदावे ह्यांना प्रतिष्ठित मानल्या जाणाऱ्या व्हॅनिटी फेअरच्या २०२६च्या उत्तम पोशाख



यादीत स्थान मिळाले आहे. पोप लिओ ह्यांनी त्यांच्या पारंपरिक आणि आकर्षक पोशाखासोबत कधीकधी बेसबॉल कॅप आणि नाईकेचे शूज वापरून एक अनोखी शैली सादर केली आहे. त्यांच्या ह्या अनपेक्षित व साध्या शैलीमुळे त्यांना फॅशन जगतात मोठी पसंती मिळत आहे. ह्यापूर्वी २०२५मध्ये 'व्होग' आणि 'न्यूयॉर्क टाईम्स' सारख्या प्रसिद्ध माध्यमांनीही त्यांच्या साध्या व नीटनेटक्या फॅशन कृतीचे कौतुक केले होते.

## व्हॅटिकन प्रशासनात भारतीय व्यक्तींच्या नेमणूका

**व्हॅटिकन :** १) सिस्टर मारिया निर्मालिनी ह्यांची व्हॅटिकनच्या इन्स्टिट्युट्स ऑफ कॉन्सिक्रेटेड लाईफ अॅन्ड सोसायटीज ऑफ अॅपोस्टोलिक लाईफ ह्या खात्यामध्ये सल्लागार म्हणून नेमणूक झाली आहे. त्या सिस्टर्स ऑफ अॅपोस्टोलिक कार्मेलच्या सुपिरिअर जनरल आहेत.

२) आर्चबिशप एलायस फ्रँक, कोलकाता ह्यांची सुवार्ताप्रसार खात्यात सदस्य म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

३) डॉ. कॅरेन रॉड्रिग्ज ह्यांची एकात्मिक मानवी विकास प्रोत्साहन विभागात सल्लागार म्हणून नेणूक झाली आहे. त्या बंगळूरमध्ये प्राध्यापिका आहेत.

## मुलांचा शोध घेणाऱ्या माता

**मॅक्सिको सिटी :** मॅक्सिकोमध्ये 'माद्रेस बुस्कारोदास' म्हणजेच हरवलेल्या मुलांचा शोध घेणाऱ्या माता ही चळवळ उभी




राहिली आहे. येथे अंमली पदार्थांचा व्यापार करणाऱ्या टोळ्यांमधील हिंसाचारामुळे हजारो तरुण मुले गायब झाली आहेत. ह्या मुलांच्या मातांनी एकत्र येऊन ही चळवळ उभी केली आहे. कॅथलिक चर्च ह्या मातांना शोधकार्यात मदत करीत आहे. ह्या संघर्षात हजारो लोक मारले जात आहेत.

## पोप लिओ जाणार दक्षिण अमेरिकेत

**व्हॅटिकन :** पोप लिओ नोव्हेंबरमध्ये दक्षिण अमेरिकेतील उरुग्वे, अर्जेंटिना व पेरूच्या प्रेषितीय दौऱ्यावर जाणार आहेत. ६ नोव्हेंबर ते १७ नोव्हेंबर असा त्यांचा दौरा असेल. अर्जेंटिना हा पोप फ्रान्सिस ह्यांचा मातृदेश. पण आपल्या १२ वर्षांच्या कार्यकाळात ते तेथे जाऊ शकले नाहीत. पेरू ही पोप लिओ ह्यांची कर्मभूमी, जिथे ते १९८०पासून कार्यरत होते. पोपचा हा सहावा आंतरराष्ट्रीय दौरा असून ते अकरा दिवसांत दहा शहरांना भेट देणार आहेत.

## हजर असणे हेच आमचे प्रेषित कार्य-फा. पावेल

**अश्गाबात (तुर्कमेनिस्तान) :** १९९७मध्ये रशियामधून विभक्त झालेल्या स्वतंत्र तुर्कमेनिस्तानध्ये मुस्लिम धर्मीय लोक जास्त असून देश धर्मनिरपेक्ष आहे. ह्या देशात लहान धर्मप्रांताचे



(Mssio Sui iuris) प्रमुख धर्मगुरू म्हणून फा. पावेल क्युबियाक ह्यांची व्हॅटिकनने नेमणूक केली असून त्यांना दोन साहाय्यक धर्मगुरूही दिले आहेत. येथील कॅथलिक लोकसंख्या आहे फक्त ३००. फा. पावेल म्हणतात, "आम्ही लोकांना भेटतो, त्यांच्याबरोबर बोलतो, त्यांच्या सुख-दु:खात सहभागी होतो आणि आमच्या वागण्याद्वारे श्रद्धा म्हणजे काय हे त्यांना दाखवून देतो. ते आणखी म्हणतात, "लोकांबरोबर हजर असणे हेच आमचे प्रेषितकार्य आहे." २०१०मध्ये तुर्कमेनिस्तान सरकारने कॅथलिक चर्चला मान्यता दिली. २०२५मध्ये येथे छोटेसे चर्च बांधण्यात आले. कारितास गरजवंतांना मदत देते. चर्चने गरीब लोकांना आंघोळ करण्यासाठी व कपडे धुण्यासाठी सोय केली आहे.

## धर्मगुरूंच्या पाचारणाचा वाढता आलेख

**सेऊल (दक्षिण कोरिया) :** कोरियामध्ये पहिले कॅथलिक धर्मगुरू म्हणून संत अॅन्ड्र्यू किम डे-जिओन ह्यांनी दीक्षा घेतली ह्या घटनेला १८०वर्षे पूर्ण झाली. आज सेऊल सरधर्मप्रांतातील धर्मगुरूंची संख्या १००० झाली आहे. त्यानिमित्त आर्चबिशप चुंग म्हणाली की, आपण ऐतिहासिक क्षण गाठलेला आहे. सेऊलमधील कॅथलिक लोकसंख्या पंधरा लाख पन्नास हजार आहे.

## आध्यात्मिक शांतीसाठी पायी प्रवास



**सँटियागो डी काँपोस्टेला :** हे स्पेनमधील गॅलिसिया प्रांताच्या राजधानीचे शहर असून येथे ख्रिस्ताचा प्रेषित सेन्ट जेम्स ह्याचे थडगे असल्याचे मानले जाते. ह्या ठिकाणी जाण्यासाठी भाविक पायी किंवा सायकलने प्रवास करतात. जाण्याचे मार्ग अनेक आहेत. त्यापैकी कॅमिनो सांतियागो हा जगातील सर्वात लोकप्रिय पायी प्रवास करण्याचा सुमारे ८००कि.मी. लांबीचा मार्ग असून आध्यात्मिक नूतनीकरण, आंतरिक शांती आणि आरोग्य प्राप्तीच्या शोधात असलेले भाविक ह्या मार्गाचा अवलंब करतात. गतवर्षी तीथयात्रेकरूंची संख्या ५,३०,७२४ होती.

## लक्ष वेधून घेण्यासाठी...

**क्युनिशस्टाइन (जर्मनी) :** एड टू द चर्च इन नीडच्या २०२५च्या अहवालात म्हटले आहे की, जगातील ६२ देशांमध्ये ५४०कोटी लोकांचा धार्मिक कारणांवरून छळ होत आहे. श्रद्धेसाठी त्यांना छळ, हिंसाचार आणि प्रसंगी मृत्यूला सामोरे जावे लागत आहे. ह्या गंभीर समस्येकडे संयुक्त राष्ट्रे, युरोपियन कौन्सिल, तत्सम संस्था व सरकार ह्यांचे लक्ष वेधून घेण्यासाठी वरील संस्थेने सध्याची मोहीम हाती घेतली आहे.

## सामान्यांमधून त्या झाल्या असामान्य!



**व्हॅटिकन :** वांशिक अल्पसंख्याक अशी पार्श्वभूमी असलेल्या टॅमी संधू ह्यांनी ब्रिटनच्या व्हॅटिकनमधील राजदूत म्हणून आपले अधिकारपत्र पोप लिओ ह्यांना सादर केले. अल्प संख्याकांमधून आलेल्या त्या पहिल्या महिला राजदूत आहेत. त्यांचे आई-वडील हे मूळचे पंजाबमधील आहेत. व्यावसायानिमित्त ते इंग्लंडला गेले व तिथेच स्थायिक झाले.

## चर्च नेत्यांचे पार्थिव अवशेष मायदेशी

**दिली (तिमोर-लेस्ते) :** तीन ऐतिहासिक कॅथलिक चर्चनेत्यांचे पार्थिव अवशेष पोर्तुगालहून सन्मानाने तिमोर-लेस्तेला आणण्यात आले. ख्रि. बिशप जेमी गुलार्ट, ख्रि.बिशप होजे रिबेरो आणि मॉन्सि. मार्टिनो लोपीस ह्या धर्मनेत्यांनी अनेक दशकांच्या युद्धकाळात जपानी आक्रमणात आणि आत्मनिर्णयाच्या लढ्यात लोकांचे रक्षण केले. देशाच्या कठीण काळात ते आवाजहीन जनतेचा आवाज बनले. दिलीचा कथिड्रलमध्ये त्यांच्या पार्थिव अवशेषांचे शासकीय इतमामात दफन करण्यात आले.

●


## ट्रिनिटी टूर्स ॲण्ड ट्रॅव्हल्स्

**१) राजस्थान सहल :** दिनांक ५ ते १६ नोव्हें. २०२६. संपूर्ण ए.सी.प्रवास. जोधपूर, जैसलमेर, बिकानेर, जयपूर, चितोडगढ, उदयपूर, माऊंट अबू, एक दिवस ट्रेंटमध्ये वास्तव्य. एकूण खर्च प्रत्येकी रु. ४४,०००/-मात्र.

**२) केरळ-कन्याकुमारी सहल :** दिनांक ६ ते १६ नोव्हें.२०२६. त्रिवेंद्रम, कन्याकुमारी, कोट्टायम, टेकडी, मुन्नार, कोचिन. संपूर्ण ए.सी.प्रवास. एकूण खर्च प्रत्येकी रु. ४४,०००/-.

**संपर्क :**

मोजेस : 9850429351
राजेश : 9881489610
एलायस : 9767250373
पॅट्रीक : 9226181212
मतेस : 9561707125

## परिचय टूर्स अँड कॅटरर्स

**आगामी सहली**

**१) संपूर्ण केरळ दर्शन सहल :** दिनांक ५ नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर २०२६. कोची,मुन्नार टेकडी, त्रिवेंद्रम, अलेप्पी, कन्याकुमारी व एक रात्र बोट हाऊस. संपूर्ण प्रवास निवास खर्च रु. ४०,०००/-.

**२) हैदराबाद, रामोजी फिल्म सीटी सहल** : दिनांक ७ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबर २०२६. स्नोवर्ल्ड,लिंबोणी पार्क, लेजर शो, चारमिनार, शॉपिंग, झु पार्क इ, खर्च रु. १८,५००/-.

**संपर्क**

**कैतान तुस्कानो : 9423947534**

**सोपान खरात : 9503598153**

## ग्लोरिया मंडप डेकोरेटर

मुसारवाडी, गिरीज : **9822608898**

१)ऑक्टो.-नोव्हें.२०२६ महिन्यातील कार्यक्रमासाठी मंडपात ३०% पर्यंत सूट.१ डिसेंबर २०२६पासून बुकिंगनुसार सूट दिली जाईल.
२)कार्यक्रमासाठी जागा उपलब्ध आहे. पार्कीगसह ७००/८०० लोकांची सोय. १ऑक्टो. ते ३१ डिसें. २०२६ पर्यंत सदर जागेवरील मंडपात विशेष सूट मिळेल. ठिकाण : बाळ येशू चर्च, मर्सेस (ग्लोरिया मंडप).
३)गिरीज, भुईगाव, सांडोर, रमेदी, होळी ह्या ठिकाणी कार्यक्रमास जागा भाड्याने द्यायची असल्यास संपर्क साधा.
४) नवीन खुर्च्या विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

## फ्लॅट विकणे आहे

**(2 BHK)**

* **प्रकल्प :** महिंद्रा हॅपिनेस्ट, बेटेगाव, बोईसर (पूर्व)
* **वैशिष्ट्ये :** निसर्गरम्य परिसर, २४ तास पाणी, क्लबहाऊस व उत्तम सोयीसुविधा.
* **किंमत :** संपर्क केल्यावर सांगण्यात येईल.

**संपर्क : 9967146259**
**(कॉल / व्हॉट्सॲप)**

## सामाजिक

### बार कौन्सिलच्या अध्यक्षपदी ॲड. जयंत जायभावे



**नाशिक :** महाराष्ट्र व गोवा ह्या राज्यांतील वकिलांची सर्वोच्च संघटना मानल्या जाणाऱ्या 'बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र ॲंड गोवा'च्या अध्यक्षपदी नाशिकचे ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ ॲड. जयंतराव जायभावे ह्यांची निवड झाली आहे. ह्यापूर्वी २०१०-११मध्ये जायभावे ह्यांनी हे पद भूषविले होते. ॲड. जायभावे दीर्घ काळापासून विधी क्षेत्रात सक्रिय आहेत. वकिली व्यवसायातील अनुभव, संघटनात्मक कामातील सातत्य आणि वकिलांच्या प्रश्नांवरील भूमिकेमुळे त्यांची राज्यभरातील विधी वर्तुळात विशेष ओळख आहे. ह्यापूर्वी त्यांनी बार कौन्सिलमध्ये विविध महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या असून, त्या अनुभवाच्या बळावर सक्षमपणे पार पाडण्याचा विश्वास व्यक्त होत आहे. 'सुवार्ता' परिवारातर्फे त्यांचे अभिनंदन व त्यांच्या कार्यास शुभेच्छा!

### प्रशिक्षण शिबिर

**पापडी :** सोसायटी ऑफ सेंट विन्सेंट डी पॉल, दक्षिण वसई एरिया कौन्सिलच्या वतीने सभासदांसाठी प्रशिक्षण शिबिर रविवार २३ ऑगस्ट रोजी थॉमस बॅप्टिस्टा ज्यु. कॉलेज हॉल, पापडी येथे पार पडले. ह्या शिबिरात १५६ सभासदांनी सहभाग दर्शविला.



उद्‌घाटन पापडी कॉन्फरन्सचे आध्यात्मिक सल्लागार फा. लेस्ली आल्मेडा ह्यांनी केले. डिजिटल युगात कसे सर्तक रहावे, सायबर सुरक्षा जनजागृती, सोशल मीडिया फसवणूक ह्याबद्दल माहिती सायबर सुरक्षातज्ज्ञ विशाल होळीकर व ड्रिझल घोन्सालविस ह्यांनी दिली.

ह्याप्रसंगी सेंट्रल कौन्सिलचे जेम्स डाबरे व अध्यक्ष मॉर्गन डिमेलो ह्यांनी मार्गदर्शन केले. वसई सेंट्रल कौन्सिलचे आध्यात्मिक सल्लागार फा . बॅप्टिस्ट लोपीस ह्यांनी सांगितले, ''लोकांनी गरिबासाठी दिलेले दान बँकेत सेव्हींग न करता त्याचा विनियोग गरीब व गरजवंतासाठी करावा.''

रॉक सिक्वेरा ह्यांनी आभार मानले. समारोपाची प्रार्थना पापडी कॉन्फरन्सचे अध्यक्ष जो डिमेलो यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हेलन डिमेलो ह्यांनी केले.

- **स्टीफन डिमेलो**, रमेदी

### बहारे युवा दिन

**बहारे :** हळदपाडा, शिसणे आणि बहारे-पारसपाडा येथील ८७ युवक-युवतींचा मेळावा रविवार ३० ऑगस्ट रोजी आदिवासी जीवन विकास केंद, बहारे (डहाणू-तलासरी) येथे पार पडला.

''आजचे तरुण देशाचे भविष्य नव्हे; वर्तमान आहेत. तरुण-तरुणींनी 'कन्फर्ट झोन' सोडून जिद्दीने शेवटपर्यंत विद्यार्थी राहावे'', असे आवाहन वर्तक कॉलेजमधील भौतिक शास्त्राचे प्राध्यापक (डॉ.) प्रवीण धांगडा ह्यांनी केले.

समाजकार्यात 'मास्टर्स डिग्री' मिळवलेले कु. कल्पेश रमेश मासमार सध्या मुंबईच्या दिव्यांग्याच्या शाळेत अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना समुपदेशन करतात. त्यांनी 'कितीही अडचणी समोर येवोत मला शिकायचंच आहे', ह्या प्रेरणेने गरूड भरारी मारली, असे मनोगत व्यक्त केले.

'माझे बाबा गावातील 'तंटामुक्त गाव' ह्या माध्यमातून गावातील भांडणे मिटवायचे, तेथून मी वकील होण्याचा निर्णय घेतला', असे सांगताना ॲड. अंकिता लाखन हिने ''डिग्रीच्याही पलीकडे जा, कम्युनिकेशन स्किल्स वाढवा, नावीन्याचा ध्यास घ्या'', अशा शब्दांत युवकांचे उद्‌बोधन केले.

दयानंद हॉस्पिटल, वडवली नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्या सिस्टर लवीना ह्यांनी मेडिकल क्षेत्रात विविध संधी कशा उपलब्ध आहेत ह्याबरोबरच फिजिओथेरेपिस्ट, मसाजची डिग्री, मेडिकलचे दुकान, मेडिकल रेप्रसेंटे लॅव टेक्नेशियन, नर्सिंग असे अनेक कोर्सेस ह्या क्षेत्रात उपलब्ध असल्याचे सांगितले. युवकांच्या वतीने सायली प्रदिप मासमार, प्रीती लुकस धांगडा, ज्योती दीपक धांगडा आणि प्रिया एवजीन वरखंडे ह्यांनी प्रतिसाद दिला.

खास युवकांसाठी आयोजित पवित्र मिस्सामध्ये फा. रॉबर्ट डिसोजा ह्यांनी तयार केलेल्या 'संत मार्कच्या शुभवर्तमानाचे अंतरंग' फा. थॉमस ह्यांनी भाविकांसमोर उलघडून दाखवले.

गांगणगाव पॅरिशमधील रोहन तांडेल, प्रतिमा तांडेल आणि रुचिता तांडेल ह्यांनी ओळख-अध्याय खेळाद्वारे मेळाव्यास सुरुवात केली.

- **स्वप्निल रमेश, पारू मासमार,** हळदपाडा, बहारे

## वसई धर्मप्रांतीय आशादीप संघटना

**मर्देसे :** ५ सप्टेंबर रोजी वेलंकनी माता चर्च, मर्देस, वाघोली येथे वसई धर्मप्रांतीय आशादीप भगिनींसाठी वेलंकनी मातेच्या



नोव्हेनाच्या काळात मिस्साचे आयोजन केले होते. ह्याप्रसंगी ६०० आशादीप भगिनींची उपस्थिती होती. मिस्साचे मुख्य पौरोहित्य वसई धर्मप्रांताचे व्हिकर जनरल फा. जोएल डिकुना ह्यांनी केले.

ह्यावेळी आशादीप संघटनेचे माजी आध्यात्मिक सल्लागार फा. लिओ फरगोज व आध्यात्मिक सल्लागार फा. स्टिफन मच्याडो, फा. पावकर, फा. बॅप्टिस्ट डाबरे, फा. रेनविक डाबरे, फा. ज्यो आल्मेडा उपस्थित होते. फा. जोएल ह्यांनी आपल्या प्रवचनात अनेक धर्मग्रामामध्ये धर्मगुरू म्हणून सेवा देत असताना त्यांना आलेल्या विविध अनुभवांची उदाहरणे बायबलमधील वचनांशी आणि वाचनाच्या संदर्भाशी जोडून आशादीप भगिनींनी परमेश्वरावर दृढ विश्वास ठेवून प्रत्येक परिस्थितीकडे सकारात्मक दृष्टीने पाहावे ह्याबाबत प्रेरणादायी प्रबोधन केले.

ह्यावेळी फा. लिओ फरगोज ह्यांचा फा. जोएल डिकुना ह्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. त्याचप्रमाणे माजी कार्यकारिणी ज्युली डिमेलो (अध्यक्ष), रिना फलकाव, (सचिव) मेबल घोन्साल्वीस (खजिनदार), कॅथरीन डिकोष्टा, (उपसचिव) व नवीन कार्यकारिणी वर्जिन परेरा (अध्यक्ष), क्लेरा रिबेलो (उपाध्यक्ष), क्रिस्टल लोपीस (सचिव) सिबल डिसिल्वा (उपसचिव), लुईजा डिसोजा (खजिनदार) ह्यांचा गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन वर्जिन परेरा ह्यांनी केले.

## 'द्विधा' सिनेमा प्रदर्शित



**मुंबई :** वसईकर निलेश भास्कर नाईक, सन्माळे, उंबरगोठण ह्यांनी कथा-पटकथा लेखन, दिग्दर्शक आणि संकलन अशी चौफेर जबाबदारी सांभाळीत केलेला पहिला मराठी चित्रपट 'द्विधा' सर्वत्र प्रदर्शित झाला आहे. बाप आणि लेक ह्यांच्या भावनिक नात्यावर आधारलेली ही एक संवेदनशील कथा आहे. सतीश पुळेकर, मानसी कुलकर्णी, रेणुका दप्तरदार, आस्ताद काळे, निमिष कुलकर्णी हे कलाकार ह्या सिनेमात आहेत. वसई-विरारचा मोहक निसर्ग परिसर ह्या सिनेमात छायांकित केलेला आहे. 'सुवार्ता' परिवारातर्फे निलेश नाईक ह्यांचे अभिनंदन!

## शैक्षणिक

## थॉमस बॅप्टिस्टा ज्युनिअर कॉलेज उपविजेता

**वसई :** विजयाची जिद्द, सांघिक खेळ आणि शेवटच्या क्षणापर्यंत लढण्याच्या वृत्तीच्या जोरावर थॉमस बॅप्टिस्टा ज्युनिअर



कॉलेज, वसईच्या फुटबॉल संघाने महाराष्ट्र राज्यस्तरीय सुब्रतो मुखर्जी फुटबॉल स्पर्धेत दिमाखदार उपविजेतेपद पटकावले.

दिनांक २६ व २७ ऑगस्ट २०२६ रोजी अकोला येथील लाल बहादूर शास्त्री स्टेडियमवर पार पडलेल्या ह्या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत थॉमस बॅप्टिस्टा ज्युनिअर कॉलेजने उत्कृष्ट सांघिक खेळ, शिस्त, आत्मविश्वास आणि जिद्दीच्या जोरावर दमदार कामगिरी केली. अंतिम सामन्यात थॉमस बॅप्टिस्टा ज्युनिअर कॉलेज आणि क्रीडा प्रबोधिनी ह्यांच्यात रंगलेल्या चुरशीच्या लढतीत क्रीडा प्रबोधिनीने विजेतेपद मिळवले. मात्र थॉमस बॅप्टिस्टा ज्युनिअर कॉलेजने राज्यस्तरीय उपविजेतेपद मिळवले. डियोन फर्नांडिस आणि ट्रेवी नुनीस ह्या दोन्ही खेळाडूंना त्यांच्या उत्कृष्ट खेळासाठी 'बेस्ट प्लेअर' पुरस्काराने गौरविण्यात आले.

## कृतज्ञतेची आनंदसंध्या

**सांडोर :** ''शिक्षक केवळ विद्यार्थी घडवत नाहीत, तर भविष्यातील समाज घडवत असतात!'' ह्या भावनेतून रविवार ६ सप्टेंबर रोजी सेंट थॉमस धर्मग्रामात उत्साहपूर्ण वातावरणात शिक्षकदिनाचा सोहळा पार पडला.

युवा पाळकीय समितीच्या पुढाकाराने 'Celebrating Our Changemakers' ह्या संकल्पनेखाली पॅरिशमधील आजी-



माजी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

Fun Activities, Dance, Action Songs, Spot Prizes आणि Snacks अशा विविध उपक्रमांनी कार्यक्रमात उत्साहाची रंगत भरली. फादर ॲण्ड्र्यू रॉड्रिग्ज ह्यांनी प्रार्थना करून उपस्थित शिक्षकांना आशीर्वाद दिला, तर फादर रेमंड रुमाव ह्यांनी आपल्या मोजक्या शब्दांत शिक्षकांच्या अमूल्य कार्याचे कौतुक केले.

बालगायिका मिकायला अंड्राडीस हिने आपल्या सुरेल वाडवळी गीताने वातावरण अधिकच आनंदमय केले. तिला जोशवा फरेरा आणि  ब्रेनॉल परेरा ह्यांनी वाद्याची साथ दिली. ह्या सोहळ्यात १३६ शिक्षकांनी सहभाग नोंदवला.

## वर्गात सर्वात सुंदर शिक्षक असतो

**उमराळे :** रविवार  १३सप्टेंबर  रोजी शिक्षक गौरव दिन आणि गुणवंत विद्यार्थी कौतुक सोहळा उमराळे येथे संपन्न झाला.



प्रमुख वक्ते म्हणून बोलताना गोम्सआळी चर्चचे प्रमुख धर्मगुरू फा. फिलिप गोन्सालविस म्हणाले, ''वर्गात सर्वात सुंदर शिक्षक असतो. शिक्षक घडवतो लेखक, कवी, संशोधक, शास्त्रज्ञ, डॉक्टर, वकील, तत्त्वज्ञ, गायक, समाज सुधारक. आपण जे घडवता ते लक्षवेधी शिल्प आहे.''

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उमराळे चर्चचे प्रमुख धर्मगुरू फा. नितीन डिसोजा होते. ह्याप्रसंगी दहा सेवानिवृत्त शिक्षक आणि वयाची ७५पूर्ण केलेले शिक्षक, गुणवंत शिक्षक आणि गुणवंत विद्यार्थी ह्यांचा सन्मान करण्यात आला. विशेष अतिथी म्हणून सामाजिक कार्यकर्ते  विल्यम गोन्सालविस आणि दीपक डिब्रिटो ह्यांनी मनोगत व्यक्त केले. प्रसिद्ध गायक संजीव गोन्सालविस ह्यांनी गायिलेल्या 'गगन सदन तेजोमय' ह्या प्रार्थनागीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लीना डिकुन्हा यांनी केले. प्रास्ताविक ज्ञानज्योत संघटनेचे अध्यक्ष बॅानी पेगाडो यांनी केले. आभार प्रदर्शन थॉमस लोपीस ह्यांनी केले.

## आदर्श शिक्षक पुरस्कार

**राजोडी :** शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय व मोलाची भूमिका बजावल्याबद्दल अथर्व विद्यापीठातर्फे ज्ञानदीप मंडळ संचलित




सेंट जोसेफ कॉलेजचे उपप्राचार्य डॉ. सुभाष डिसोजा ह्यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. 'सुवार्ता' परिवारातर्फे त्यांचे अभिनंदन!

## आदर्श शिक्षिका पुरस्कार



**उमराळे :** येथील न्युमिना नेल्सन लोपीस, वळंबाव ह्यांना रोटरी क्लब ऑफ पालघर ह्या संस्थेतर्फे 'आदर्श शिक्षिका पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले आहे. 'सुवार्ता' परिवारातर्फे त्यांचे अभिनंदन!

## साहित्यिक

## शतायुषी भाषाविदुषीचे निधन



**पुणे :** ''भाषा हा सर्वश्रेष्ठ सांस्कृतिक वारसा आहे. तो जपणे व समृद्ध करणे, हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे'', हा विचार आयुष्यभर आचरणात आणणाऱ्या ज्येष्ठ भाषा अभ्यासक आणि व्याकरणकार प्रा. यास्मिन शेख ह्यांचे पुणे येथे वयाच्या १०१व्या वर्षी दिनांक २४ ऑगस्ट रोजी निधन झाले. ''ललित वाङ्मय असो किंवा वैचारिक लेखन, ते करताना प्रमाण भाषेचाच वापर झाला पाहिजे'', असे त्या आग्रहाने मांडत. त्यांनी ३४ वर्षे मराठीच्या प्राध्यापिका म्हणून योगदान दिले. बालभारतीच्या मराठी भाषेच्या

पाठ्यपुस्तकाचे सात वर्षे संपादन करण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. ‘अंतर्नाद’ मासिकाच्या व्याकरण सल्लागार म्हणून त्यांनी भूमिका निभावली. ‘मराठी लेखन मार्गदर्शिका, ‘मराठी शब्दलेखन कोश’ आणि ‘सुगम मराठी व्याकरण कोश’ हे त्यांचे ग्रंथ मराठी अभ्यासकांसाठी मूलभूत मार्गदर्शक आहेत. ‘सुवार्ता’ परिवारातर्फे त्यांना आदरांजली!

## जोसेफ तुस्कानो ह्यांच्या पुस्तकाचे प्रकाशन



**बोरीवली :** विज्ञानलेखक जोसेफ तुस्कानो ह्यांच्या घरी त्यांच्या ‘वामनाचे पाचवे पाऊल’ (दुसरी आवृत्ती) ह्या पुस्तकाचे अनौपचारिक प्रकाशन फा. मायकल जी. ह्यांच्या हस्ते झाले. ह्यावेळी श्री. व सौ. मार्शल कोरिया, गुलाब तुस्कानो, ब्लांची परेरा, जिम रॉड्रिग्ज आणि सिंथिया बॅप्टिस्टा उपस्थित होते. जोसेफ तुस्कानो ह्यांचे हे १२४वे पुस्तक आहे. ह्यावेळी मार्शल कोरिया ह्यांनी जोसेफ तुस्कानो ह्यांच्या साहित्याचा आढावा घेतला. ‘सुवार्ता’ परिवारातर्फे त्यांचे अभिनंदन!

## पुस्तक प्रकाशन




**पाली :** सामाजिक कार्यकर्ते सिडनी मोरायस ह्यांनी आपल्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त ‘मी जे कल्पिलेच नाही’ लिखित आत्मचरित्राचे प्रकाशन पाली चर्च येथे रविवार ६ सप्टेंबर रोजी प्रमुख धर्मगुरू फा. विजय आल्मेडा ह्यांच्या हस्ते झाले. ‘सुवार्ता’ परिवारातर्फे त्यांचे अभिनंदन!

## सिंथिया ताई ह्यांचे अभिनंदन

**पापडी :** आपल्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्ताने रविवार १३ सप्टेंबर रोजी ज्येष्ठ समाजसेविका सिंथिया बॅप्टिस्टा लिखित ‘अपंग नव्हे अभंग’ आणि ‘टेकडीवरील फुले’ (ग्रंथाली प्रकाशित) ह्या दोन्ही पुस्तकाचे प्रकाशन वसईचे बिशप थॉमस डिसोजा ह्यांच्या हस्ते कृपामाता सभागृह, पापडी येथे झाले. सिंथिया ताईंचे अभिनंदन!



## आशीर्वाद पुरस्कार



**रमेदी :** प्रा. हेलन रॉबी डिसिल्वा ह्यांच्या ‘शायेलीचा झेला’ (लोकगीत) ह्या पुस्तकास मुंबईतील वंदना प्रकाशनतर्फे ‘आशीर्वाद पुरस्कार’ मिळालेला आहे. ‘सुवार्ता’ परिवारातर्फे त्यांचे अभिनंदन!

## धार्मिक

## दृढीकरण साक्रामेंत स्वीकारलेल्या युवकांची सभा

**निर्मळ :** शनिवार १९ सप्टेंबर रोजी संत गोन्सालो गार्सिया चर्च, गास प्रांगणात निर्मळ डिनरीमधील तसेच आगाशी चर्च येथे नंदाखाल डीनरीसाठी गतवर्षी दृढीकरण सांक्रमेंत स्वीकारलेल्या युवकांसाठी सभा आयोजित केली होती. ह्या सभेसाठी वसईचे



मेंढपाळ बिशप थॉमस डिसोझा, निर्मळ डिनरीचे डीन फा. जॉनी निग्रेल, जीवन ज्योतीचे संचालक फा. निलेश तुस्कानो, फा. अविनाश, सेंट जोसेफ धर्मग्रामाचे धर्मगुरू फा. नितीन, फा. जेम्स, फा. जो डिमोन्टी, धर्मशिक्षक, धर्मगुरू, धर्मभागिनी आणि १०० युवक निर्मळ डीनरीतील तसेच नंदाखाल डीनरीसाठी संत जेम्स चर्च, आगाशी येथे एकूण ८० उमेद्‌वार उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात परमेश्वराच्या स्तुती आराधनेने झाली. युवकांनी ॲक्शन साँग सादर करून देवाचा महिमा वर्णिला. त्यानंतर संत गोन्सालो गार्सिया धर्मग्रामाचे धर्मगुरू फा. जेम्स ह्यांनी सर्वांचे स्वागत केले. निर्मळ डिनरीचे डीन फा. जॉनी निग्रेल ह्यांनी मुलांशी हितगुज साधले. तसेच नंदाखाल डीनरीमध्ये शिरलय येथील युवा संघांनी स्तुती गौरव केला, डियांड्रा डोनाल्ड पिंटो व रेवण मिनिजीस ह्यांनी साक्ष दिल्या.

त्यानंतर फा. निलेश ह्यांनी ‘‘दृढीकरण म्हणजे केवळ सर्टिफिकेट नव्हे; तर ते एक उत्तम मिशन आहे’’, अशा भाषेत युवकांशी चर्चा केली. मिशल डिमेलो, स्कायरा डाबरे, नोवेल डिसोझा ह्या तीन युवक-युवतींनी साक्ष दिली. फा. नितीन डिसोझा ह्यांनी मार्गदर्शन केले. बिशप थॉमस डिसोझा ह्यांनी सेंट इग्नेशियस ऑफ लोयेला आणि सेंट फ्रान्सिस ह्यांच्या जीवनाशी सांगड घालून युवकांच्या अंतःकरणाला हात घातला. फा. अविनाश ह्यांनी गटचर्चा घेतली. सूत्रसंचालन सुनिता परेरा आणि फेबिना मोत ह्यांनी केले.

**- सौ. सुनिता बर्नड परेरा,** गास

## सहवेदना



**पापडी :** बिशप आयवन परेरा ह्यांचे वडील आल्बर्ट जॉन परेरा (ओळंबवाडी) ह्यांचे दिनांक १२ सप्टेंबर रोजी वयाच्या ९४व्या वर्षी निधन झाले.



**नानभाट :** ओलोली-अटोळी गावपरिवारातील सेवानिवृत्त प्राचार्य लुईस बेंजामिन रॉड्रिग्ज ह्यांचे दिनांक १९ सप्टेंबर रोजी वयाच्या ८८व्या वर्षी निधन झाले. त्यांनी इंग्रजी माध्यमातील शाळेसाठी इयत्ता १ली ते १०वी पर्यंतच्या वर्गासाठी मराठी विषयाची पाठ्य पुस्तके लिहिली. ती मॅकमिलन इंडियातर्फे प्रकाशित झालेली आहेत. तसेच त्यांनी 'कृतार्थ मी' ही कादंबरी आणि 'मनडोह' हा कथासंग्रहही लिहिलेला आहे.

'सुवार्ता' परिवारातर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**२६ वर्षांची आठवण**

**ख्रिस्तवासी पास्काल थॉमस कुटिनो**

सागरशेत, पापडी

जन्म : १७/०१/१९४३

मृत्यू : २९/१०/२०००

**कुटुंबीय**




## "ख्रिस्मस स्टॉल : २०२६"

**जीवन दर्शन केंद्र, गिरीज**

**वेळ : सकाळी ९.०० ते संध्याकाळी ७.००**

**संपर्क : रॉयल डिसोजा**

**98 23 34 68 01 / 9702090232**


## लिहिते व्हा : दक्षता सूत्र

**आपले कोणत्याही प्रकारचे लेखन महिन्याच्या १० तारखेपर्यंत सुवार्ता कार्यालयात पोहोचवावे.**

* अन्य नियतकालिकात किंवा व्हॉट्‌ॲपवर आलेला मजकूर 'सुवार्ता' मासिकात छापला जात नाही.
* आपण पाठविलेल्या साहित्याची एक प्रत कृपया, आपल्या दप्तरी असावी.
* आपला लेख शक्यतो ५५० ते ६०० शब्दांपर्यंत असावा. कविता ६० ते ८० शब्दांपर्यंत असावी.
* आपले लेखन पुढील स्वरूपाचे असू शकते : लेख, कविता, संपादकास पत्र, विषयानुरूप प्रतिसाद, ललित, कथा, वैचारिक, प्रासंगिक, विनोद, इत्यादी.
* आपले लेखन संपादक मंडळापुढे ठेवले जाईल.
* 'सुवार्ता' मासिकाच्या ध्येय-धोरणाप्रमाणे लेखन असेल तर त्या त्या महिन्याच्या विषयांप्रमाणे यथावकाश प्रसिद्ध केले जाईल.
* मजकूर स्वीकारणे अगर नाकारणे आदींचा अधिकार संपादक मंडळाचा असेल.

**- संपादक**

**प्रेमळ स्मरणार्थ**



**ख्रिस्तवासी थॉमस कैतान आल्फान्सो**

गास, मोठी सरगोडी - २

जन्म : ०७/०३/१९५३; मृत्यू : १७/०९/२०२६

***''जे आत्म्याने लीन ते धन्य; कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे. जे अंतःकरणाने शुद्ध ते धन्य; कारण ते देवाला पाहतील.''***

(मत्तय ५:३,८)

*हे प्रभू, आमच्या बाबांना तुझ्या स्वर्गीय नंदनवनात चिरंतन शांती लाभू दे हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**पत्नी : फातिमा; मुले : सॅनल, मेरवीन, स्टेफी**

## वार्षिक स्मृती



**ख्रिस्तवासी अंतोनी पास्काल फलकाव**

मडवाडी, पापडी

जन्म : ११/०५/१९४४; मृत्यू : १०/१०/२०२५

वार्षिक मिस्सा : रविवार दिनांक ११/१०/२०२६

सकाळी ७.१५वाजता, कृपामाता कथिड्रल, पापडी.

## प्रेमळ स्मरणार्थ





**ख्रिस्तवासी पास्काल व रोजी फलकाव**

मडवाडी, पापडी

## प्रेमळ स्मरणार्थ





**ख्रिस्तवासी पॉल व जॉना डिमेलो**

घोगाळेवाडी, रमेदी

*प्रभूच्या स्वर्गीय नंदनवनात तुम्हांला चिरंतन शांती लाभो,*
*हीच ईश्वरचरणी विनम्र प्रार्थना!*

**देणार : ज्युली अंतोनी फलकाव व कुटुंबीय**

## प्रेमळ स्मरणार्थ





**ख्रिस्तवासी जोसेफ थॉमस रिबेलो** — **ख्रिस्तवासी तिरेज जोसेफ रिबेलो**

भातोडीवाडी, सांडोर

मृत्यू : १६/०७/२००४ — मृत्यू : ०६/१०/१९९१

***प्रभू परमेश्वर म्हणतो, ''पुनरुत्थान व जीवन मीच आहे. जो माझ्यावर विश्वास ठेवतो, तो मेला असला तरी जगेल.''***

(योहान ११:२५)

*हे प्रभू, तुझ्या स्वर्गीय नंदनवनात आमच्या आई-बाबांना*
*सामावून घे, हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**मुलगी : टेसी व कुटुंबीय**

## प्रेमळ स्मरणार्थ



**ख्रिस्तवासी मागरिट फ्रान्सिस कार्लोस**

कोकरमवाडी, दिघा, पापडी

जन्म : ०१/०५/१९५४; मृत्यू : १९/१२/२०२०

***''जे आत्म्याने लीन ते धन्य; कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे. जे अंत:करणाने शुद्ध ते धन्य; कारण ते देवाला पाहतील.''***

(मत्तय ५:३,८)

*हे प्रभू, आमच्या आईला तुझ्या स्वर्गीय नंदनवनात चिरंतन शांती*
*लाभू दे हीच तुजचरणी विनम्र प्रार्थना!*

**मुले, सून, मुलगी, जावई व नातवंडे**

शब्दकोडे

# 'सुवार्ता' शब्दकोडे क्रमांक - १४

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ | X | ६ |
| ७ | | X | ८ | | | X | |
| ९ | | X | १० | | | X | |
| X | X | X | | X | X | ११ | |
| १२ | X | X | १३ | १४ | X | १५ | |
| X | १६ | १७ | | | X | १८ | |
| १९ | | | X | X | २० | | X |
| २१ | | X | २२ | | | X | २३ |

**रचना : अनिल डायगो गोन्साल्वीस**
उमराळे

**आडवे शब्द :-**

१) ×××× ×× (६) हे महाराष्ट्रातील प्रामाणिक, कर्तव्यदक्ष व कडक प्रशासकीय अधिकारी (IAS) म्हणून ओळखले जातात.
७) खोकला, उबळ ×× (२)
८) कठीण, मजबूत, ताठ ××× (३) ९) राजा, नृप, भूप ×× (२)
१०) धावणारा, धावपटू (इंग्रजी) ××× (३)
११) एखाद्या वस्तूचा/फुलांचा विखुरलेला थर ×× (२)
१२) इंग्रजी मुळाक्षरांमधील अकरावे अक्षर × (१)
१३) परिवर्तन, उलथापालथ, मनोज कुमारचा हिंदी चित्रपट ×× (२)
१५) देव, परमेश्वर, ईश्वर (हिंदी) ×× (२)
१६) शाश्वत, चिरंतन, नित्य ×××× (४)
१८) दारचे अनेकवचन ×× (२)
१९) ओझे वाहून नेणारा मजूर ××× (३)
२०) गाभा, तत्त्व, मर्म, मुख्य भाग ×× (२)
२१) धूळ, मातीचे बारीक कण ×× (२)
२२) आधार, आश्रय, सहारा ××× (३)
२३) मराठी मुळाक्षरांमधील चौथे अक्षर × (१)

**उभे शब्द :-**

२) कच्छप, पाठीवर कठीण कवच असलेला एक जलचर किंवा स्थलचर प्राणी ××× (३)
३) ह्या दिवशी तिळगुळ देऊन 'तिळगुळ घ्या, गोडगोड बोला' असे म्हणतात ××× ××× (६)
४) केशवपन, क्षौर ××× (३)
५) ××× (३) म्हणजे जेवण किंवा पेय घेतल्यानंतर पोटातील हवा/वायू तोंडावाटे बाहेर पडणे होय.
६) ××× ××× (६) ही 'हरित वसईशी' संबधित सक्रिय कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. त्यांचे कार्य प्रामुख्याने पर्यावरण संवर्धन, वसई परिसरातील पर्यावरणविषयक जनजागृती ह्याच्यांशी संबंधित आहे.
११) प्रमुख सेनापती, नायक ×××× (४)
१४) एक विषम संख्या ×× (२)
१६) जनसमुदाय, लोकसमूह ××× (३)
१७) घोड्याच्या खुराला ठोकलेली लोखंडी पट्टी ×× (२)
१९) प्रत्येक ×× (२) २०) संपूर्ण, सर्व, अवघा ×× (२)

**'सुवार्ता' शब्दकोडे क्रमांक - १३ चे उत्तर**

**आडवे शब्द :-** १) स्पेन ५) कात ६) प्रतिज्ञा ७) ललना १०) महेवा १२) खण १३) खाद्य १४) वाटा १५) वर १७) वतन १९) झारखंड २१) समाजधुरीण

**उभे शब्द :-** १) स्पेशल २) वात ३) अप्रतिम ४) विज्ञानवाटा ५) काना ८) लसूण ९) वखार ११) हेवा १२) खरवस १५) वनज १६) सरण १८) तमा १९) झारी २०) डल्ला

# हास्यरंग

## गुण

सुरेश आपल्या आई-वडीलांबरोबर मुलगी बघायला गेला होता. मुलीची आई आपल्या मुलीचे गुणगान गात म्हणाली, ''माझ्या मुलीचा आवाज कोकिळेसारखा आहे, तिची मान मोरासारखी आहे, तिचे डोळे हरणासारखे आहेत आाण स्वभाव गायीसारखा आहे.''

ह्यावर सुरेशची आई म्हणाली, ''पण माणसाचे काही गुण तुमच्या मुलीत आहेत की नाहीत?''

## टू व्हिलर गाडी

तीन मित्र एका टू व्हिलर गाडीवर जात होते. त्यांना पाहताच एका ट्रॅफिक पोलिसाने त्यांना गाडी थांबवण्यासाठी हात दाखवला तेव्हा
पहिला मित्र : अरे वेडा आहेस का तू?
दुसरा मित्र : हात कशाला दाखवतोस?
तिसरा मित्र : गाडीवर आम्ही तिघे आहोत. जागाच नाही. तुला कुठे बसवणार आम्ही?

## प्रामाणिक नवरा

कोर्टात वकील साक्षीदार बाईची उलट तपासणी घेत होते.
वकील : बाई, तुम्ही आरोपीच्या पत्नी आहात ना?
बाई : होय.
वकील : आरोपी खोट्या सह्या करून दुसऱ्यांच्या खात्यावरचे चेक वटवतो हे तुम्हाला माहीत आहे का?
बाई : आहे!
वकील : हे तुम्हाला लग्नाच्या आधीपासून माहीत होतं का?
बाई : होय!
वकील : अशा लबाड, खोट्या माणसाशी तुम्ही लग्न केलंतच कसं?
बाई : काय करणार? माझं लग्नाचं वय उलटून गेलं होतं. माझ्यापुढे निवडीकरिता दोनच स्थळं होती?
वकील : कोणती?
बाई : एक हा नवरा आणि दुसरं स्थळ तुमचंच वकिलाचंच होतं. मी त्यातल्या त्यात प्रामाणिक नवरा निवडला!

# पार्थिव जीवन, दैवी गर्भितार्थ

ॲलेक्झांडर द ग्रेट ऊर्फ 'जगज्जेता सिकंदर' (ख्रिस्तपूर्व ३५६-३२३) ह्याची जीवनकथा रोमहर्षक आहे. तो प्राचीन ग्रीसमधाल मॅसेडोनियाचा राजा होता. सारे जग जिंकण्याचे स्वप्न उराशी बाळगून त्याने इजिप्त, इराण व मेसोपोटेमियासह अनेक प्रांत पादाक्रांत करून महाकाय साम्राज्य निर्माण केले. आपली लष्करी मोहीम पुढे रेटत-रेटत तो भारतीय उपखंडापर्यंत, सिंधू नदीकिनारी, दाखल झाला. येथे सम्राट ॲलेक्झांडरचे आपल्या पंजाबचे सम्राट पुरू (ख्रिस्तपूर्व ३४०-३२१) ह्यांच्याशी तुंबळ युद्ध झाले होते ह्याची नोंद जाणते इतिहासकार विस्तृतपणे करतात ह्याची आपणाला कल्पना असेलच.

एकदा सम्राट ॲलेक्सझांडर विजिगीषू वृत्तीने एक अजिंक्य युद्ध जिंकला. तद्नंतर तो ग्रीसच्या करिंथ शहरात पोहोचला. तेथे त्याने सिनोप (सांप्रतकालीन तुर्कस्तानात) येथील फकीर डायोजेनिस (ख्रिस्तपूर्व ४१२-३२३) ह्यांच्याविषयी ऐकले होते. फकीर एका मोठ्या लाकडी पिंपामध्ये राहत असे. त्यांना कशाचीही हाव किंवा पर्वा नव्हती. निव्वळ विरक्तीसाठी ते सुपरिचित होते.

तर, ते हिवाळ्याचे दिवस होते. थंडी मी म्हणत होती. पण फकीर डायोजेनिस उन्हात, शेकोटीजवळ, शांतपणे बसले होते. त्यांच्या अवती-भवती कुणीही नव्हते. त्यांच्या चेहऱ्यावर विलक्षण सुख, शांती, समाधान, तृप्ती झळकत होती. अशावेळी सोने-चांदी परिधान करून, ॲलेक्सझांडर आपल्या सैन्याच्या लवाजम्यासह, थाटामाटात फकिराजवळ येऊन पोहोचले. मात्र एवढा मोठा सम्राट समोर उभा असूनही डायोजेनिस ह्यांनी त्याच्याकडे ढुंकुनदेखील पाहिले नाही. ते आपल्याच स्थितप्रज्ञ अवस्थेत बसून राहिले.

सम्राट ॲलेक्सझांडरला डायोजेनिसचे हे वागणे पाहून आश्‍चर्य वाटले. तरीसुद्धा फकीर डायोजेनिस ह्यांच्या अधिक जवळ जात सम्राट म्हणाला, ''मी जगज्जेता ॲलेक्सझांडर! मी तुमच्या फकिरीवर आणि जीवनशैलीवर प्रसन्न झालो आहे. तुम्हाला माझ्याकडून जे हवे ते मागा, मी तुमची कोणतीही इच्छा आत्ता पूर्ण करू शकतो!''

डायोजेनिसने शांतपणे डोळे उघडले, ॲलेक्सझांडरकडे पाहिले व सहजतेने म्हणाले, ''तुम्हाला माझ्यासाठी काही करायचेच असेल तर, जरा बाजूला सरका. कारण तुम्ही माझ्या समोर उभे राहून मला मिळणारे ऊन आणि शेकोटीची ऊब अडवत आहात. ऊबदार सूर्याचे किरण तुमची सावली अडवत आहे. मला तुमच्याकडून इतर काहीही नकोय.''

एवढ्या मोठ्या सम्राटाला असा नकार देण्याची कोणाची हिंमत झाली नव्हती. पण डायोजेनिस ह्यांच्या ह्या उत्तराने सम्राट ॲलेक्सझांडर थक्क झाले. त्याच्या लक्षात आले : संपूर्ण जग जिंकूनदेखील मी अस्वस्थ आहे, तृप्त नाही आणि ह्या माणसाकडे काहीही नसताना हा पूर्णतः सुखी-समाधानी आहे. तेथून निघताना सम्राट ॲलेक्सझांडर आपल्या सैनिकांना म्हणाले, ''मी 'ॲलेक्सझांडर' नसतो, तर मला 'डायोजेनिस' बनायला आवडले असते!''

उपरोक्त अनुभवाने सम्राट ॲलेक्सझांडर खूपच प्रभावित झाला. त्याची दृष्टी, अंतर्दृष्टी व दूरदृष्टी बदलली, सुधारली. त्यामुळेच त्यानंतर त्यांच्याविषयी आणखीन एक कथा सांगितली जाते. ती अशी की त्याने आपल्या मरणाआधी तीन 'इच्छा' व्यक्त केल्या होत्या : (१) माझ्या डॉक्टरांनी माझी शवपेटी वहावी, हे दर्शविण्यासाठी की कोणतेही औषध मृत्यू थांबवू शकत नाही; (२) माझी सारी धनदौलत रस्त्यावर पसरवावी, हे घोषित करण्यासाठी की सारा पैसा-अडका नि वैभव ह्या पृथ्वीवरच राहते आणि (३) शेवटी, माझे हात शवपेटीच्या बाहेर लोंबकळत ठेवावे, म्हणजे मी रिकाम्या हाताने आलो नि रिकाम्या हाताने हे जग सोडून जातोय हे साऱ्या माणसांना जगजाहीर व्हावे...

प्रस्तुत कथेचा त्रि-स्तरीय मथितार्थ स्पष्ट आहे :
- आध्यात्मिक अनुभवाने ओतप्रोत भरलेला माणूस बेडर असतो.
- महान व्यक्ती लहान माणसाच्या स्वातंत्र्याची कदर करते.
- बदलासाठी (बदल्यासाठी नव्हे!) अगदी सामान्य व्यक्ती व/वा नगण्य घटना पुरेशी असते.

जगज्जेत्या सम्राटाचा अंतिम संदेश बायबलमधील यिर्मया (ख्रिस्तपूर्व ६५०-५७०) संदेष्ट्याच्या भाकिताची आठवण करून देतो व मानवी जीवनाचा गर्भितार्थ प्रकट करतो :

''ज्ञानवंताने आपल्या ज्ञानाचा, बलवंताने आपल्या बळाचा आणि श्रीमंताने आपल्या श्रीमंतीचा अभिमान बाळगू नये... अभिमान <u>बाळगायचाच</u> असेल तर <u>दया</u> करणारा व पृथ्वीवर <u>धर्म</u> आणि <u>न्याय</u> चालविणारा परमेश्वर आहे, ह्याची त्याला <u>जाणीव</u> आहे, <u>ओळख</u> आहे ह्याच्याविषयी बाळगावा; ह्यात मला संतोष आहे, असे परमेश्वर म्हणतो'' (यिर्मया ९:२३-२४).

म्हणजेच मानवी बुद्धी, शक्ती व संपत्ती हे सारे काही नाही, पुरेसे नाही हे वेळोवेळी होणारे भूकंप, महापूर, दंगेधोपे, दंगली, युद्ध दाखवून देतात. तद्वत, दुसऱ्या बाजूला, परमेश्वरी शहाणपण, सामर्थ्य व कृपा ह्या बाबी प्रमाण मानून, परमेश्वराला मानवी विकासात भागीदार बनवले तर खचितपणे मानवी जीवन अर्थपूर्ण होईल, सुसह्य बनेल आणि हे जग पर्यावरणीय समतोलामुळे जगण्यालायक असेल...

**- फा. (डॉ.) जोएल डिकुना**

## उपासना वर्ष दिनदर्शिका : ऑक्टोबर २०२६

**वाचनग्रंथ : रवि., सोहळे, सण - पहिले वर्ष; सप्ताह - दुसरे वर्ष**

१. **बाळ येशूची संत तेरेजा- सण**
यशया ६६:१०-१४
स्तोत्र १३१:१-३
मत्तय १८:१-५

२. **रक्षक दूतांचा सण - स्मृती**
निर्गम २३:२०-२३
स्तोत्र ९१:१-६,१०-११
मत्तय १८:१-५,१०

३. ईयोब ४२:१-३,५-६,
१२-१७
स्तोत्र ११९:६६,७१,७५,
९१, १२५,१३०
लूक १०:१७-२४

४. **सामान्यकाळ २७वा रविवार**
यशया ५:१-७
स्तोत्र ८०:९,१२,१३-१६,
१९-२०
फिलिप्पे ४:६-९
मत्तय २१:३३-४३

५. गलती १:६-१२
स्तोत्र १११:१-२,७-१०
लूक १०:२५-३७

६. गलती १:१३-२४
स्तोत्र १३९:१-३,१३-१५
लूक १०:३८-४२

७. **जपमाळेची कु. मरिया-स्मृती**
प्रे.कृ.१:१२-१४
स्तोत्र : लूक १:४६-५५
लूक १:२६-३८

८. गलती ३:१-५
स्तोत्र : लूक १:६९-७५
लूक ११:५-१३

९. गलती ३:७-१४
स्तोत्र १११:१-६
लूक ११:१५-२६

१०. गलती ३:२२-२९
स्तोत्र १०५:२-७
लूक ११:२७-२८

११. **सामान्यकाळ २८वा रविवार**
यशया २५:६-१०
स्तोत्र २३:१-६
फिलिप्पे. ४:१२-१४,१९-२०
मत्तय २२:१-१४

१२. गलती ४:२२-२४,
२६-२७, ३१:५:१
स्तोत्र ११३:१-७
लूक ११:२९-३२

१३. गलती ५:१-६
स्तोत्र ११९:४१,४३-४५,
४७-४८
लूक ११:३७-४१

१४. गलती ५:१८-२५
स्तोत्र १:१-६
लूक ११:४२-४६

१५. **अविलाची संत तेरेजा-स्मृती**
इफिस १:१-१०
स्तोत्र ९८:१-६
लूक ११:४७-५४

१६. इफिस १:११-१४
स्तोत्र ३३:१-२,४-५,१२-१३
लूक १२:१-७

१७. **अंतिओखचे संत इग्नेशिअस-स्मृती**
इफिस १:१५-२३
स्तोत्र ८:२-७
लूक १२:८-१२

१८. **सामान्यकाळ २९वा रविवार**
यशया ४५:१,४-६
स्तोत्र ९६:१,३-५,७-१०
१थेस्सलनी १:१-५
मत्तय २२:१५-२१

१९. इफिस २:१-१०
स्तोत्र १००:१-५
लूक १२:१३-२१

२०. इफिस २:१२-२२
स्तोत्र ८५:९-१४
लूक १२:३५-३८

२१. इफिस ३:१-१२
स्तोत्र : यशया १२:२-६
लूक १२:३९-४८

२२. **संत जॉन पॉल दुसरे-स्मृती**
इफिस ३:१४-२१
स्तोत्र ३३:१-२,४-५,
११-१२, १८-१९
लूक १२:४९-५३

२३. इफिस ४:१-६
स्तोत्र २४:१-६
लूक १२:५४-५९

२४. इफिस ४:७-१६
स्तोत्र १२२:१-५
लूक १३:१-९

२५. **सामान्यकाळ ३०वा रविवार**
निर्गम २२:२१-२७
स्तोत्र १८:२-४,४७,५१
थेस्सलनी १:५-१०
मत्तय २२:३४-४०

२६. इफिस ४:३२-५:८
स्तोत्र १:१-४,६
लूक १३:१०-१७

२७. इफिस ५:२१-२३
स्तोत्र १२८:१-५
लूक १३:१८-२१

२८. **संत सायमन व ज्युड-सण**
इफिस २:१९-२२
स्तोत्र १९:२-५
लूक ६:१२-१९

२९. इफिस ६:१०-२०
स्तोत्र १४४:१-२,९-१०
लूक १३:३१-३५

३०. फिलिप्पे. १:१-११
स्तोत्र १११:१-६
लूक १४:१-६

३१. फिलिप्पे. १:१८-२६
स्तोत्र ४२:२,३,५
लूक १४:१,७-११

### नोव्हेंबर २०२६

१. **सामान्यकाळ ३१वा रविवार**
**सर्व संतांचा सोहळा**
प्रकटी ७:२-४,९-१४
स्तोत्र २४:१-६
१योहान ३:१-३
मत्तय ५:१-१२

२. **सर्व मृत भाविकांचा स्मृतीदिन**
प्रज्ञाग्रंथ ३:१-९
स्तोत्र २३:१-६
रोम ६:३-९ किंवा ५:५-११,
योहान ६:३७-४०

३. फिलिप्पे. २:५-११
स्तोत्र २२:२६-३२
लूक १४:१५-२४

४. फिलिप्पे. २:१२-१८
स्तोत्र २७:१,४,१३-१४
लूक १४:२५-३३

५. फिलिप्पे. ३:३-८
स्तोत्र १०५:२-७
लूक १५:१-१०

६. फिलिप्पे. ३:१७-४:१
स्तोत्र १२२:१-५
लूक १६:१-८

७. फिलिप्पे. ४:१०-१९
स्तोत्र ११२:१-२,५-६, ८, ९
लूक १६:९-१५

८. **सामान्यकाळ ३२वा रविवार**
प्रज्ञाग्रंथ ६:१२-१६
स्तोत्र ६३:२-८
१थेस्सलनी ४:१३-१८
मत्तय २५:१-१३

९. **लॅटरन महामंदिराचे समर्पण-सण**
यहेज्केल ४७:१-९,१२
स्तोत्र ४६:२-३,५-६,८-९
१करिंथ ३:९-१३,१६-१७
योहान २:१३-२२




JEWEL OF CHIRABAZAR
परंपरेचा साज... सौंदर्याची ओळख...
फेस्टिवल कलेक्शन
शाश्वत सौंदर्याचे,
पिढ्यानपिढ्यांचे दागिने...
उत्सवांच्या क्षणांना द्या दागिन्यांची खास साथ...
MK JEWELLERS
SUNDAY CLOSED
Shah & Co.™
528, Chira Bazar, Mumbai - 400 002.
Tel. 2205 6380, 2205 1124
OUR NEW LANDMARK
Now Facing
Kalbadevi Metro Station
77180 19981 | Email : mkshahjewellers@gmail.com
We have no branch at Virar, Vasai & Mumbai
Our Showroom is Very Nearby Marine Lines Station (Mumbai)
VALET PARKING

RNI MAHMAR - 11692 / 1960




हे मासिक, मालक, मुद्रक, सुवार्ता ट्रस्ट ह्यांनी मॅन्युएल प्रिन्ट, वालीव फाटा, सातिवली, ता. वसई, जि. पालघर -४०१ २०८ महाराष्ट्र येथून छापून सुवार्ता कार्यालय, जीवन दर्शन केंद्र, गिरीज, ता. वसई, जि. पालघर, जि. ४०१ २०१ येथून प्रकाशित केले. संपादक : फा. डॉ. जोएल डिकुना.